

हरि:ॐ

हरि:ॐ आश्रम प्रकाशन
नडियाद

# पूज्य श्रीमोटा-एक संत

(जीवनचरित्र आणि कार्य)

हरिः ॐ

# पूज्य श्रीमोटा - एक संत

( जीवनचरित्र आणि कार्य )

लेखक

डॉ. विद्यासागर लक्ष्मण कांबळे

हरिः ॐ आश्रम प्रकाशन, नडियाद.

हरिः ॐ

# समर्पणांजली

गांधीवादी विचारांनी भारलेले,
'गोसेवे'चं बहुमूल्य कार्य करणारे,
'शिवांबु चिकित्से'वर विश्वास ठेवून असणारे,
आणि तिचा प्रचार करणारे,
स्वपुरुषार्थाने 'एफर्ट्स प्रा. लि. (नडियाद) उभारणारे,
१९६८ मध्ये पूज्य श्रीमोटांच्या सान्निध्यात येऊन
त्यांच्याशी हृदयसंबंधाने जोडले गेलेले
साहित्य आणि मौन-एकांताचे प्रेमी,
आणि
ज्यांनी चौसष्टाव्या वर्षी एका शुभ सकाळी
प्रार्थनाभावात आणि हरिः ॐ व पूज्य श्रीमोटांच्या स्मरणात
ही शरीराची कुडी सोडून दिली,
त्या,
**स्व. श्री. विष्णुकांत गोकळभाई पटेल**
यांना, पूज्य श्रीमोटांचे हे जीवनचरित्र अर्पण करतांना
आम्ही धन्यता अनुभवीत आहोत.

हरिः ॐ आश्रम
नडियाद
दि. : ९-५-१९९६

**सी. डी. शाह**
मॅनेजिंग ट्रस्टी.

❑ **प्रकाशक :** हरिः ॐ आश्रम,
पोस्ट बॉक्स नं. ७४, नडियाद–३८७ ००१.

❑ **आवृत्ती :** प्रथम – ११, मे १९९६

❑ **प्रती :** २०००

❑ **पृष्ठे :** १६+३०८ = ३२४

❑ **किंमत : २० रुपये**

રાહત દર કિંમત રૂ. ૨૦-૦૦

❑ **प्राप्तीस्थान :** १. हरिः ॐ आश्रम,
पोस्ट बॉक्स, नं. ७४,
नडियाद–३८७ ००१. गुजराथ
२. हरिः ॐ आश्रम,
कुरुक्षेत्र, जहांगीरपुरा,
रांदेर, सुरत – ६८५५६४

❑ **मुद्रक :**
तुषार के. पटेल, **अर्थ कॉम्प्युटर,**
२७, अडवाणी मार्केट, दिल्ली दरवाजा बाहेर
अहमदाबाद–३८० ००४. दूरध्वनी क्र. : ५६२४३०६

हरिः ॐ

# समर्पणांजली

गांधीवादी विचारांनी भारलेले,
'गोसेवे'चं बहुमूल्य कार्य करणारे,
'शिवांबु चिकित्से'वर विश्वास ठेवून असणारे,
आणि तिचा प्रचार करणारे,
स्वपुरुषार्थाने 'एफर्ट्स प्रा. लि. (नडियाद) उभारणारे,
१९६८ मध्ये पूज्य श्रीमोटांच्या सान्निध्यात येऊन
त्यांच्याशी हृदयसंबंधाने जोडले गेलेले
साहित्य आणि मौन-एकांताचे प्रेमी,
आणि
ज्यांनी चौसष्टाव्या वर्षी एका शुभ सकाळी
प्रार्थनाभावात आणि हरिः ॐ व पूज्य श्रीमोटांच्या स्मरणात
ही शरीराची कुडी सोडून दिली,
त्या,
**स्व. श्री. विष्णुकांत गोकळभाई पटेल**
यांना, पूज्य श्रीमोटांचे हे जीवनचरित्र अर्पण करतांना
आम्ही धन्यता अनुभवीत आहोत.

हरिः ॐ आश्रम
नडियाद
दि. : ९-५-१९९६

**सी. डी. शाह**
मॅनेजिंग ट्रस्टी.

# लेखन, अनुवाद व संकलनासाठी संदर्भ ग्रंथ:

(सर्व गुजराथी)

| नाव | प्रकाशन साल |
|---|---|
| १. "तरणांमांथी मेरु" : सोमाभाई भावसार | (१९९५) |
| २. "पूज्य श्रीमोटा - जीवन अने कार्य" : ईश्वर पेटलीकर<br>रमेश भट्ट<br>रतिलाल महेता | (१९७५)<br>आणि<br>(१९८७) |
| ३. "जीवन दर्शन" : पूज्य श्रीमोटा | (१९७२) |
| ४. "पारसलीला" : इन्दुकुमार देसाई | (१९९१) |
| ५. "श्रीमोटाना जीवनमां महात्माओ" : रतिलाल महेता | (१९९१) |
| ६. "पूज्य श्रीमोटा साथे वार्तालाप" : रतिलाल महेता | (१९९२) |
| ७. "पूज्य श्रीमोटा चित्रकथा" : मुकुल कलार्थी<br>इन्दुकुमार देसाई | (१९८७) |
| ८. "जीवन संशोधन" : हेमंतकुमार नीलकंठ<br>नंदलाल शाह | (१९५७) |
| ९. "हरिवाणी"-फेब्रुवारी : रमेश भट्ट | (१९९६) |

॥ हरिः ॐ ॥

# निमंत्रण

एक 'जीव', जो गरीबीचा वारसा घेऊन जन्मला,
कर्मप्रवणता व अथक परिश्रम ही ज्याची 'प्रकृती' होती,
देशसेवा, तुरुंगवास आणि कर्मे ही ज्याने 'साधना' बनविली,
सद्‌गुरूंच्या परिसस्पर्शानंतर प्रचंड पुरुषार्थाने जो जीव 'शिव' बनला,
सद्‌गुरूंच्या आदेशानुसार ज्याने साधनेसाठी मौन-मंदिरे स्थापन केली,
आणि समाजाकडून साडेनऊ कोटी रूपये * घेऊन
समाजासच मौलिक कार्यासाठी परत केले,
समाजात 'गुण' आणि 'भाव' यांच्या विकासासाठी
जो आमरणांत झटला,
उत्स्फूर्त आणि उत्कृष्ठ अध्यात्म ग्रंथ-साहित्य-काव्य
यांची ज्याने निर्मिती केली,
गुरुवाद, आश्रम आणि संन्यास
यापासून जो अस्पर्शित होता,
साक्षी, अभय, करुणा, नम्रता, भाव, प्रार्थना
ज्याच्यात पूर्णत्वाने प्रगट झाले होते,
'मला समाजास बसतं करायचं आहे' हे ज्याचं स्वप्न होतं

अशा

गुजराथ भूमीत जन्मलेल्या, आणि
**'मी सर्वत्र विद्यमान आहे'** ही घोषणा करून
'इच्छामरण' स्वीकारलेल्या एका निष्काम कर्मयोग्याचं
**श्रीमोटांचं**
हे **जीवनचरित्र** आपणांस निमंत्रण देत आहे
त्याचं रसास्वादन करण्यास, अनुभव घेण्यास !

**डॉ. विद्यासागर लक्ष्मण कांबळे**

---

* ३१ मार्च १९९५ पर्यंत

# अर्घ्य

संतचरित्र म्हणजे काही कथा-कादंबरी नव्हे !

सत्याची अवहेलना होऊ न देता, अल्पोक्ती-अतिशयोक्ती न करता, घडलेला घटनांची प्रामाणिकतेने व क्रमवार गुंफण करून, त्या घटनारूपी फुलांचा एक सुंदर सुगंधित पुष्पहार बनवून, तो वाचकांना इष्टास अर्पण करण्याकरीता सुपूर्द करणे हेच लेखकाचं काम असतं.

यात लेखनाइतकंच संपादनाचंही महत्त्व आहे. लेखन करतांना क्वचित प्रसंगी घटनांमधील गाळलेल्या जागा कल्पनाशक्तीने भरून ती घटना अखंड करण्याचे कठीण कामसुद्धा लेखकाला जबाबदारीने करावे लागते.

हे चरित्र मराठीत प्रकाशित होण्यामागे व्यक्तीच्या प्रयत्नांपेक्षा शक्तीच्या कृपेचे महत्त्व अधिक आहे.

एके दिवशी मौनमंदिरात रात्री झोपण्यापूर्वी पूज्य श्रीमोटांना खूप कळवळून हृदयपूर्वक प्रार्थना केली, "आपल्या चरित्राचा अनुवाद करावा अशी आंतरिक इच्छा आहे. मराठी जाणणाऱ्यांनादेखील आपल्या प्रखर कर्मसाधनेची, पुरुषार्थाची, हरिः ॐ आश्रमांची तसेच समाजाच्या उत्थानासाठी अर्पण वाहविलेल्या दानगंगेची माहिती व्हावी असाही भाव आहे. पण आपल्या कृपेने आणि शक्तीनेच हे शक्य आहे. हे योग्य असेल तर तसा स्पष्ट संकेत द्या, तरच लेखणी हातात धरणं उचित आहे, सार्थ आहे."

सकाळी उठलो आणि चमत्कार घडावा तसं झालं. हरिः ॐ आश्रमाचे व्यवस्थापक डॉ. हरीशभाई यांना डॉ. विनोदचंद्र काशीभाई अमीन यांनी एक चेक आणून दिला. श्री. अमीन

हे पूज्य श्रीमोटांचे एक जुने आणि सेवाभावी भक्त आहेत. त्यांनी जो चेक दिला, तो आला होता अमेरीकेतून ! त्यांचे सुपुत्र डॉ. अश्विनभाई यांच्या पत्नी डॉ. सौ. शमाबहेन यांनी तब्बल दोन हजार डॉलर्सचा तो चेक पूज्य श्रीमोटांच्या सेवेसाठी स्वेच्छेने व अंतःप्रेरणेने पाठविला होता. चेकवरच खाली त्यांनी सूचनादेखील लिहिली होती. "For Translation of Books." तो चेक दाखवायलाच डॉ. हरीशभाई आले होते.

रात्री केलेल्या प्रार्थनेला सकाळीच उत्तर मिळालं, संकेत प्राप्त झाला या आनंदाने मी नाचायचाच बाकी राहिलो.

नंतर काम सुरू झालं आणि चरित्रलेखनासंदर्भात पूज्य श्रीमोटांचे काही आंतरिक अनुभव प्राप्त झाले, पण त्यांचा साक्षी नसल्याने ते स्वतःच्या हृदयातच जपून ठेवणं इष्ट आहे.

मात्र त्या अनुभूतींनी निःसंशयपणे आत्मविश्वास दिला आणि शक्ती दिली. त्यांनी जणू त्या अनुभूतींद्वारे सांगितलं, ''तू फक्त लेखणी हाती धर, रिक्त रहा, मोकळा रहा, जे जे काही होतंच ते होऊ दे, तू अडथळा निर्माण करू नकोस. सर्व काही होत राहील, करवून घेतलं जाईल.''

त्या अनुभवांनी मला प्रचंड सामर्थ्य दिलं. आणि अवघड, किंबहुना अशक्यप्राय असं करवून घेतलं पूज्य श्रीमोटांच्या शक्तीने, केवळ महिनाभराच्या अवधीत !

पूज्य श्रीमोटांच्या या चरित्रलेखनाचे काम तीनचार टप्प्यात पूर्ण झाले.

पहिल्या टप्प्यात जीवनातील घटनांचे संकलन करून त्यांचा अभ्यास करावा लागला.

त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात ते सुसूत्रतेने मांडून त्यात एक अखंडितता-सलगता आणण्यासाठी झटावं लागलं.

ही क्रमवार जुळणी झाल्यानंतर एक आराखडा मनात निश्चित झाला, ज्यात व्यक्ती, घटना आणि परिस्थिती यांचा समावेश होता; तसेच पूज्य श्रीमोटांसह इतर व्यक्तींचे प्रसंगानुरूप व परिस्थितीनुरूप जे बोल, विचार, मनोभाव आणि सूक्ष्म तरंग होते त्यांचीदेखील नोंद होती.

हे सर्व अंतरी बिंबल्यानंतर आता तिसऱ्या टप्प्यात शब्दसमूहरूप देऊन ते वाचकांसमोर ठेवतांना तो एक बुद्धीला आणि मनाला बोजड वाटणारा 'रूक्ष अहवाल' होऊ नये ही खबरदारी घेणं आवश्यक होतं. सहजता, प्रवाहितता व रसमाधुर्य यांचा त्रिवेणीसंगम असल्याशिवाय हे शक्य नव्हतं; आणि हे अर्थातच प्रयत्नसाध्य नाही, पुरुषार्थाने प्राप्त केलं जाऊ शकत नाही.

झाडावर फूल सहजतेने उमलावं, क्षितिजावर इंद्रधनुष्य अवचित प्रगट व्हावं, तसं सहजतेने हे 'अंतरीतून प्रगटीकरण' असलं तरच त्याचं मूल्य आहे आणि हे घडतं केवळ संतकृपेमुळे, गुरुकृपेमुळे, ईश्वरकृपेमुळे ! इथे असं घडलं आहे की नाही हे ठरविणं वाचकांच्या हाती आहे.

चरित्रलेखन सुरू असतांना केवळ रंजकतेस प्राधान्य द्यायचं ठरवलं असतं तर सत्यास बगल द्यावी लागली असती, खूप ठिकाणी तडजोड स्वीकारावी लागली असती; काटछाट करावी लागली असती. लोकप्रियतेच्या निकषावर ते भले यशस्वी ठरलं असतं, तरी सत्यास डावलण्याचा अक्षम्य गुन्हा झाला असता.

त्यामुळे पूज्य श्रीमोटांचे आणि इतरांचे घटनांच्या संदर्भातील जे प्रत्यक्ष शब्द, भाव, विचार उपलब्ध होते ते काहीही तडजोड न करता जवळजवळ तशाच स्वरूपात द्यायचे ठरविले. त्यामुळे काहीकाही ठिकाणी चरित्रात क्लिष्टता येण्याचा दोष निश्चितपणे निर्माण झाला, परंतु तो अपरिहार्य होता.

जिज्ञासू, मुमुक्षू साधकांच्या दृष्टीने, खरं तर कस्तुरीमृगाच्या नाभीतील कस्तुरीप्रमाणे सत्याचं महत्त्व अधिक आहे आणि रंजकतेला दुय्यम स्थान आहे.

तरीही, बहुतांश सर्वसाधारण वाचकवर्गाचा विचार करून त्यांना हे चरित्र बोजड वाटणार नाही अशा पद्धतीने त्याचे दोन विभाग केले.

पहिल्या विभागात पूज्य श्रीमोटांच्या जीवनचरित्राचा समावेश आहे व दुसऱ्या विभागात त्यांचे बहुरंगी व्यक्तिमत्त्व, त्यांच्याच शब्दांत सद्‌गुरु व साधना याविषयी त्रोटक माहिती, त्यांची काही अमृतवचने, साधनामर्म, त्यांची स्वरचित आरती, हरिः ॐ आश्रमांची माहिती, दानगंगा आणि सनावळी यांचा समावेश आहे.

पूज्य श्रीमोटांच्या जीवनकालातील उपलब्ध असलेल्यापैकी जवळजवळ सर्व महत्त्वाचे पैलू या चरित्रग्रंथात प्रगट झाले आहेत.

सुदैवाने पूज्य श्रीमोटांनी त्यांच्या हयातीतच भक्तजनांना पत्रांद्वारे त्यांच्या जीवनातील बहुतांश घटनांसंदर्भात विस्तारपूर्वक लिहिले आहे. हे सर्व हरिः ॐ आश्रमाद्वारे 'जीवन दर्शन' या ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाले आहे.

त्याचप्रमाणे पूज्य श्रीमोटांनी लिहिलेली पत्रे, त्यांचे लिखित इतर ग्रंथ, त्यांचे बोल इत्यादींवर आधारीत 'पूज्य श्रीमोटा – जीवन अने कार्य' या संदर्भग्रंथातही त्यांच्याविषयी खुलासेवार उल्लेख आहे. पूज्य श्रीमोटांनी स्वतः तो संपूर्ण वाचून 'ग्रंथ योग्य असून वस्तुस्थितीशी व सत्याशी इमान राखून आहे' असे मान्य केले होते.

चरित्रलिखाण करतांना मुख्यत्वाने हे दोन संदर्भग्रंथ केंद्रीभूत धरले आहेत.

मांडणी, रचना व प्रासादिक लेखन या दृष्टीकोनातून पूज्य श्रीमोटांचे सर्वात धाकटे बंधू स्वर्गीय श्री सोमाभाई भावसार यांनी लिहिलेल्या 'तरणांमांथी मेरू' या सुलभ, सोप्या व ओघवत्या भाषेत लिहिलेल्या चरित्राची अनन्यसाधारण मदत झाली. त्यांचा ऋणनिर्देश करून त्या ऋणात राहण्यातच मी स्वतःस धन्य मानीत आहे.

सर्व लिखाण पूर्ण झाल्यानंतर, या चरित्रग्रंथाची छापखाना प्रत नकलून देण्यासाठी, पूज्य श्रीमोटांच्या प्रेरणेने, मौनमंदिरात बसलेल्या एका वयोवृद्ध प्राध्यापकांनी खूप मदत केली. त्याशिवाय व्याकरणासंदर्भात देखील बऱ्याच महत्त्वाच्या सूचना केल्या. निनावी राहू इच्छिणाऱ्या त्या सहृदयी व्यक्तीमुळे चरित्रास शुद्धता प्राप्त झाली. त्यांचेही प्रेमपूर्वक आभार मानणे हे माझे कर्तव्य आहे.

कणाकणाने मधु गोळा करून तयार झालेलं हे रसभरीत चरित्ररूपी मधाचं पोळं आपणांस सादर करीत आहे. त्याचं रसास्वादन करण्यासाठी आपणा सर्वांना हार्दिक निमंत्रण !

जीवनसाधना करण्यास प्रेरणा मिळावी, तो स्फुल्लिंग प्राप्त व्हावा, फुलावा व त्यातून धगधगती ज्वालामुखीसारखी व्याकुळता प्रगटून ईश्वरप्राप्तीच्या आणि आनंदप्राप्तीच्या एकमेव जीवनहेतूकडे ती केंद्रित व्हावी, हीच अपेक्षा आहे या चरित्राची ! आणि निश्चितच, हे सर्व केलं गेलेलं नसून, करवून घेतलेलं कार्य असल्याने पूज्य श्रीमोटांची शक्ती निश्चितच हे परिवर्तन, ही किमया घडवून आणेलच यात मला तिळमात्र शंका नाही. लेखनात निश्चितपणे काही उणीवा, काही दोष राहिले असणारच ! ते दोष लेखणी नीट न धरणाऱ्याचे, अर्थात माझे आहेत. पूज्य श्रीमोटा व आपण सर्वजण क्षमाशील दृष्टीने ते पोटात घ्यावेत हीच प्रार्थना !

लेखणीचं निमित्त होऊ देण्याची कृपा करणाऱ्या 'गुरुशक्तीस' हा चरित्रग्रंथ समर्पित करीत आहे.

**डॉ. विद्यासागर लक्ष्मण कांबळे**
जाधव मार्केट, मु. पो. कुळगांव,
जि. ठाणे. महाराष्ट्र.
पिन : ४२१ ५०३

# निवेदन

पूज्य श्रीमोटांनी लिहिलेली, आणि त्यांच्या उपलब्ध ध्वनीफिती, प्रवचने, मुलाखती, काव्ये, पत्रसंग्रह इत्यादींवर आधारीत अनेक पुस्तके गुजराथी भाषेत असली तरी मराठी भाषिकांनादेखील त्यांच्या अद्‌भुत कर्मयोगाचा आणि प्रखर साधनेचा परिचय व्हावा या हेतूनेच या पुस्तकास आकार दिला.

पूज्य श्रीमोटांच्या जीवनचरित्रातील बव्हंशी सर्व घटना, सर्व पैलू आणि त्यांचे सेवाकार्य तसेच हरिः ॐ आश्रमांची स्थापना करून साधकांना मौन–एकांत साधनेची करून दिलेली नाविन्यपूर्ण आधुनिक उपलब्धी – या सर्वांचाच या पुस्तकात सारांशाने उल्लेख केला गेला आहे.

हे पुस्तक वाचून त्यामुळे जिज्ञासा चाळवून कर्मयोगाची, जीवनसाधनेची, मौन–एकांत जीवनाची वाट चोखळण्यास कोणी उद्युक्त झालं तर त्यातच आहे धन्यता या लिखाणाची !

या पुस्तकाच्या प्रकाशनाचा संपूर्ण भार अमेरीकेतील 'स्वजन' डॉ. सौ. शमाबहेन अश्विनभाई अमीन यांनी उचलल्याबद्दल आम्ही त्यांचे हृदयपूर्वक आभारी आहोत. पूज्य श्रीमोटांची कृपादृष्टी त्यांच्यावर आहेच, ती तशीच अखंडित राहो हीच पूज्य श्रीमोटांच्या चरणी प्रार्थना.

सी. डी. शाह
मॅनेजिंग ट्रस्टी

हरिः ॐ आश्रम,
पो. बो. नं. ७४,
नडियाद.
दि. ९--५-१९९६

# अनुक्रमणिका

## खंड एक : पूज्य श्रीमोटा यांचे जीवनचरित्र


| | | |
|---|---|---|
| १. | जीवन रंगारी - एक ध्रुवतारा | ३ |
| २. | श्रीमोटांचा जन्म | ५ |
| ३. | अनाहुत ब्राह्मण | ६ |
| ४. | गरीबीचा वारसा | ७ |
| ५. | खडतर मजुरी | ९ |
| ६. | चातुर्य | १२ |
| ७. | चोरी | १५ |
| ८. | स्वसमर्थन | १६ |
| ९. | अगतिकता | १९ |
| १०. | मानी कुटुंब | २० |
| ११. | साधूची भविष्यवाणी | २२ |
| १२. | दंडुकेशाही | २५ |
| १३. | ज्वालामुखीचा विस्फोट | २९ |
| १४. | प्राणीप्रेम | ३१ |
| १५. | पितृप्रेम | ३३ |
| १६. | व्यसनातून सुटका | ३५ |
| १७. | सत्यप्रियता | ३६ |
| १८. | पुढील शिक्षणासाठी पेटलाद | ४० |
| १९. | पितृवियोग | ४२ |
| २०. | सेवेचं अनमोल मोल | ४५ |
| २१. | हौस फिटली | ४८ |
| २२. | मॅट्रीक झालो, पुढे काय ? | ५० |
| २३. | संगदोष | ५३ |

२४. बडोदा कॉलेज सोडलं ५५
२५. स्वावलंबनाने उच्च शिक्षण ५७
२६. ''एवढा पगार घेणं योग्य ?'' ६१
२७. ''मुलं म्हणजे काय शेळ्यामेंढ्या ?'' ६५
२८. उपद्रवी मुलांना अद्दल ६७
२९. ज्ञातीबाहेर ? ७०
३०. सेवाव्रत ७३
३१. ''हरिसी भजता...'' ७५
३२. जीवनदान ७९
३३. नामस्मरण हेच औषध ८२
३४. बालयोगी महाराजांची प्रथम भेट ८५
३५. ''बंगला, एकांत आणि जलाशय !'' ८८
३६. दीक्षा–तीन दिवस समाधी ९२
३७. स्मशानवास ९५
३८. 'बोकड' ९६
३९. धुनीवाले दादा–पूज्य केशवानंदजी महाराज ९७
४०. सत्संगामुळे सद्गती १०६
४१. ''मुझे एक मगरमच्छ देखनेकु ले चल !'' १०८
४२. ''नर्मदे मात की जय !'' १११
४३. ''इथे तुझा आश्रम होईल !'' ११५
४४. ''तुज चरणे !'' ११७
४५. विवाह ११९
४६. ''जोपर्यंत तू मला बघत नाहीस, तोपर्यंत सर्व व्यर्थ !'' १२४
४७. सर्पदंश १२७
४८. अवधूताचा समागम १३१
४९. भजन एकच, परिणाम दोन १३८
५०. साकोरीला उपासनी महाराजांकडे १४१

५१. लाठीमारात कसोटी १४५
५२. "तू त्राटक कर !" १४७
५३. जेलयात्रा – जीवनसाधना १४९
५४. साधना हाच हेतु – सहाय्य सद्‌गुरूंचे १५१
५५. सेवाभाव १५२
५६. कलंक लागण्यापासून रक्षण १५४
५७. श्री सद्‌गुरूंचे स्थूल देहात पुनरागमन १५६
५८. "योगक्षेमं वहाम्यहम् ।" १६०
५९. एकांत साधना १६३
६०. चित्रकूटचा तांत्रिक ब्राह्मण १६४
६१. हृदय जिंकलं १६६
६२. 'धुवांधार' १६९
६३. अघोरी बाबांकडे हिमालयात ! १७१
६४. ब्रह्मचर्यासाठी अग्निसाधना १७९
६५. श्रीकृष्ण दर्शन – सगुण साक्षात्कार १८१
६६. अभयप्राप्तीची कसोटी : गिरनारमध्ये १८३
६७. प्रभाबांची सदेह पुनर्भेट १८४
६८. सेवानिवृत्ती व कराचीस प्रयाण १८६
६९. "कराचीवाले बाबा"– एक औलिया १८८
७०. "परधर्मो भयावहः ।" १९५
७१. अद्वैताचा साक्षात्कार १९८
७२. दागिन्यांची चोरी २००
७३. "वचनपूर्ती कशी करू ?" २०५
७४. आईचा पुनर्जन्म २१०
७५. "पेदाईश के दिन करांची जाना !" २१३
७६. शिर्डीत २१५
७७. मूक सत्याग्रह २१७

| | | |
|---|---|---|
| ७८. | समदृष्टी | २२० |
| ७९. | "... अब भी तेरा अहम् नहीं गया ?" | २२३ |
| ८०. | "समुद्रात चालत जा" | २२५ |
| ८१. | 'मेहेबूब'चा हुकूम | २२७ |
| ८२. | सद्‌गुरूंचा प्रेमप्रसाद | २३४ |
| ८३. | गुरुदक्षिणा | २३६ |
| ८४. | अनाग्रही व अनासक्त श्रीमोटा | २३८ |
| ८५. | "तू समाजाचं देणं लागतोस !" | २३९ |
| ८६. | प्रेमस्पर्श | २४२ |
| ८७. | प्रेमीस भेटता प्रेमी | २४४ |
| ८८. | परतीचा प्रवास | २४८ |
| ८९. | देहत्याग | २५३ |
| ९०. | "अग्नये स्वाहाः ।..." | २५८ |


## खंड दोन : परिशिष्ट


| | | |
|---|---|---|
| १. | सद्‌गुरूंविषयी – पूज्य श्रीमोटांच्या शब्दांत | २६३ |
| २. | पूज्य श्रीमोटा – एक बहुरंगी व्यक्तीमत्त्व | २६९ |
| ३. | साधनेसंदर्भात – पूज्य श्रीमोटांच्या शब्दांत | २७८ |
| ४. | हरिः ॐ आश्रम | २८३ |
| ५. | अमृतबिंदू | २८९ |
| ६. | साधनामर्म | २९८ |
| ७. | "ॐ शरण चरण लेजो..." – आरती | ३०१ |
| ८. | सेवाकार्ये व दानगंगा – यादी | ३०३ |
| ९. | पूज्य श्रीमोटांच्या जीवनातील महत्त्वाच्या तारखा | ३०५ |

# खंड एक

## पूज्य श्रीमोटा यांचे जीवनचरित्र

"मी सर्वत्र विद्यमान आहे."

–पूज्य श्रीमोटा

# १. जीवन रंगारी – एक ध्रुवतारा

रंगारी कुटुंबातला एक मुलगा अठरा विश्वे दारिद्र्य असणाऱ्या परिस्थितीत नेटाने, जिद्दीने, स्वपुरुषार्थाने शिकत होता. आईवडिलांचं स्वप्न होतं की मुलगा शिकून मोठा ऑफिसर होऊन आपल्या गरीबीची लक्तरं दूर करील, पण तो तर भारावून गेला गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाने, त्यांच्या आचारविचारांनी ! त्यांच्या आवाहनानुसार त्याने शपथ घेतली तळागाळातल्या दीनदुःखीजनांच्या सेवेची !! डिग्रीचा मोह त्यागून हरिजन सेवेच्या कार्याशी तो संलग्न झाला, सर्वांचाच विरोध सहन करून, स्वीकारुन !!!

देशसेवा, हरिजनसेवा हे त्यांचं उद्दिष्ट होतं पण नियतीच्या मनात मात्र निराळंच होतं. या त्यागी, पुरुषार्थी जीवास तिने ईश्वरप्राप्तीच्या मार्गावर खेचून घेतलं आणि कर्मयोग्याची भूमिका त्याला प्रदान केली. मग सेवा आणि प्राप्त झालेलं प्रत्येक कर्म – हे सर्व काही त्याच्यासाठी जीवनसाधनारूप बनलं !

मग दिवसा हा कर्मयोग आणि रात्री स्मशानात, एकांतवासात भक्तियोग अशी खडतर साधना सुरु झाली, पक्ष्यांनी चोचा मारण्यापासून सुरक्षित रहावं म्हणून झाडाने पिकलेलं फळ पानांनी झाकून ठेवावं, तशा गुप्ततेने !

काळ वहात गेला आणि एका मंगलक्षणी तपश्चर्येची पूर्णाहुती झाली. ईश्वरी चेतनेत तो पूर्णपणे बिरघळून गेला. उच्चतम दिव्य लोकाचे दरवाजे त्याच्यासाठी उघडले गेले आणि शांतीच्या, आनंदाच्या शोधात संसारात भटकणाऱ्या, भरकटणाऱ्या जीवांना दिशा दाखविण्याची क्षमता त्याला प्राप्त

झाली. शांतीचं, आनंदाचं दान करण्याची ही सर्वोच्च सेवा तो नम्रतेने, निरहंकारितेने करू लागला.

वडिलोपार्जित कपडे रंगविण्याचा धंदा त्याने केला नाही पण लोकांची मळकट जीवनं आणि हृदयं धुवून, स्वच्छ करून, ईश्वरप्रीतीच्या कधीही न पुसल्या जाणाऱ्या आणि उत्तरोत्तर गडदच होत जाणाऱ्या रंगाने त्याने त्यांची हृदये रंगविली.

सद्‌गुरुंच्या आदेशानुसार साधकांना साधना करण्यासाठी मौन, एकांत प्राप्त करवून देणारी मौन मंदिरे त्याने उभारली, समाजास मौलिक कार्यांसाठी दानाची गंगा वाहविली, आणि अंतःस्फूर्त साहित्य प्रगट केलं.

समाजाने त्याच्या पायाशी लोळण घेतली, धनांच्या राशी त्याच्या चरणांवर ओतल्या, मानसन्मान दिला, प्रसिद्धीचं वलय त्याच्याभोवती पसरलं पण तो मात्र होता अस्पर्शित-चिखलात उगवणाऱ्या कमलाप्रमाणे !

स्वपुरुषार्थाच्या आधारे वाटचाल करून समर्थ सद्‌गुरूंच्या कृपाछत्राखाली ईश्वरप्राप्तीचं गौरीशंकर ज्यांनी कणखरपणे आणि उन्नत माथ्याने प्राप्त केलं, असे हे श्रीमोटा ! जीवनशिल्प घडविणाऱ्या त्या अद्‌भुत व्यक्तिमत्त्वाचं जीवन संतसमुदायात चमकून उठलं ध्रुवताऱ्याप्रमाणे, आपल्या स्थानी स्थिर राहून त्याच्याकडे पाहणाऱ्यांना दिशा दाखविण्यासाठी !

❖

## २. श्री मोटांचा जन्म

संवत् १९५४ चा भाद्रपद महिना. शुक्लपक्ष संपून कृष्णपक्ष सुरु होता. तिथी चौथी. इंग्रजी कालगणनेप्रमाणे ४ सप्टेंबर, १८९८ चा दिवस.

अंध:काराची काजळी झटकून पहाट पसरू लागली. पूर्व दिशेला आकाश लालतांबूस झालं. सूर्य हळूहळू आपलं डोकं वर काढीत होता आणि सृष्टी आपला आळस फेकून अर्धोन्मिलीत नयनांनी त्याच्याकडे पहात होती. मंदिरांमध्ये काकड आरत्यांचा मंजुळ ध्वनी ऐकू येत होता, घंटा घणघणत होत्या, आणि पक्षी चिवचिवाट करीत होते. या सर्वांनी वातावरण भारलं गेलं होतं.

आशा या मंगल सुप्रभाती सावली गावातील श्री. भाईचंद भगत यांच्याकडे मात्र सर्वत्र धावपळ सुरु होती. त्यांची पुत्रवधू सूरज प्रसूती वेदनांनी व्याकूळ झाली होती, सर्वत्र चितेचं वातावरण होतं.

शेवटी कोणीतरी धावत जाऊन दाईला बोलावून आणलं. घरात जाऊन सर्व सूत्रं तिने आपल्या हाती घेतली आणि प्रसूती निर्विघ्न पार पडावी यासाठी ती प्रयत्नांची शिकस्त करु लागली.

काही वेळातच बाळाच्या रडण्याचा ट्यँहँ...ऽऽऽ ट्यँहँ ऽऽऽ आवाज ऐकू आला आणि आनंदित झालेल्या दाईने बातमी दिली की सूरजने मुलाला जन्म दिला आहे. सूरजबां आणि आशारामजींकडे दुसरं अपत्य जन्माला आल्याची ही गोड बातमी शेजारीपाजारी सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली.

पुत्रजन्माच्या आनंदात आशारामजींनी सर्वांना गूळ-धणे देऊन त्यांचं तोंड गोड केलं.

आपल्या पोटी कोणत्या दिव्यात्म्याने जन्म घेतला आहे याविषयी माता-पिता दोघेही अजाण होते, बाल मोटांच्या जन्माने आपलं मातृत्व-पितृत्व सार्थकी लागलं हे त्यांना समजून यायला अजून बराच अवकाश होता.

❖

## ३. अनाहुत ब्राह्मण

दिवसांमागून दिवस जाऊ लागले आणि बाल मोटा शुक्लेंदुवत् मोठे होऊ लागले. त्यांचा जन्म शनिवारचा म्हणून काहीजण त्यांना 'शनियो' म्हणून संबोधित. खरंतर त्यांच्या आईने त्यांचं नाव ठेवले होतं 'चुनीलाल', पण ती लाडाने त्यांना 'चुनिया' म्हणून हाक मारीत असे.

निष्पापता, निर्दोषता आणि निरागसता असलेला चुनीलाल सर्वांचाच लाडका होता. शेजारपाजारचे लोक त्याला घरी खेळायला घेऊन जात, त्याचं कोडकौतुक करीत व त्याच्या बालक्रीडांनी आनंदित होत.

एकदा तो अंगणात खेळत असतांना एक भस्मचर्चित ब्राह्मण तिथे आला. अंगणात खेळणाऱ्या त्या मुलाकडे त्याचं लक्ष गेलं आणि तो चपापला. जवळ जाऊन त्याने चुनीलालचा हात हाती घेऊन निरखून पाहिला. मनगटावर काळा डाग होता आणि हातांच्या रेखांमध्ये त्रिशूळ होता.

हा ब्राह्मण आपल्या 'चुनिया'चे हात का बघत आहे याचं सूरजबांना कोडं पडलं आणि त्यांनी विचारलं, "महाराज, काय झालं ? का हात बघताहात आपण ?"

सूरजबांकडे हसतहसत पहात तो म्हणाला, "माई, तुझ्या मुलाचा भावी काळ फार उज्ज्वल आहे, ते पाहतोय मी हातांवरील रेखांमध्ये !"

"तो कसा काय ?" सूरजबांनी उत्सुकतेने विचारलं.

चुनीलालचा हात सूरजबांना दाखवत तो ब्राह्मण म्हणाला, "माई, बघ ! तुझ्या लाडल्याच्या डाव्या हाताच्या मनगटावर मोठा काळा डाग आहे आणि हातांच्या रेषांमध्ये त्रिशूळ आहे, दिसतोय ना ? याचा अर्थ मोठा झाल्यावर हा एकतर मोठा माणूस होईल किंवा महान संत होईल. भाई, तू फार भाग्यवान आहेस. हे गोड रहस्य तुला सांगितल्याबद्दल या गरीब ब्राह्मणाला खूश कर, माई !" ब्राह्मण आशेने म्हणाला.

नेहमी त्या ब्राह्मणास कधी मूठभर डाळ, तांदूळ वा पीठच मिळत असे. आजमात्र आनंदित झालेल्या सूरजबांनी त्याला डाळ, तांदूळ, तूप, गूळ, पीठ असा सगळा शिधा दिला आणि त्याशिवाय वर एक चांदीची पावली पण दिली, दक्षिणा म्हणून !

आज सकाळीच एवढं सारं मिळाल्यामुळे ब्राह्मणाला तो शुभशकून वाटला आणि त्या बालकास, त्याच्या आईस हृदयपूर्वक "कल्याणमस्तु !" असा आशीर्वाद देत तो आला तसाच अकल्पितपणे निघून गेला, जाताना आनंदाची उधळण करून गेला.

❖

## ४. गरीबीचा वारसा

श्री मोटांचा जन्म झाला ते सावली गावातील घर तसं प्रशस्त होतं, पण श्रीमोटांचे आजोबा वारल्यानंतर पेढीची वहिवाट

व्हायला पाहिजे तशी झाली नव्हती आणि 'बडा घर नि पोकळ वासा' अशीच अत्यंत हलाखीची स्थिती होती. कसंतरी करून दोन वेळेस हातातोंडाची गाठ पडे. जाडेभरडे कपडे वर्षातून एकदाच शिवले जात. याप्रकारे आपल्या फाटक्या-तुटक्या संसाराचा गाडा दोघे आईबाप कसाबसा रेटत होते.

शेवटी परिस्थिती अगदी हातघाईवर आली. देणेकरी देणी देईनात आणि घेणेकरी 'आत्ताच्या आत्ता देऊन टाका' असं म्हणू लागले. सर्वच बाजूंनी कोंडी झाल्यावर राहतं घर आणि कापडाची पेढी त्यांना सुपूर्द करून टाकण्याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक राहिला नव्हता.

भरल्या हृदयाने 'सावली' गाव सोडून पंचमहाल जिल्ह्यातील 'कालोल' या गावी आशारामजींचं कुटुंब राहायला आलं. एकच एक खोली आणि तिला जोडून ओसरी असलेलं छोटंसंच घर त्यांना स्वीकारावं लागलं.

घर चांभारवाड्यात होतं, दारु पिणाऱ्या, शिवीगाळ करणाऱ्या असंस्कारी आणि अशिक्षित लोकांचा शेजार होता, तरीही ज्ञातीने भावसार असलेल्या आशारामजी भगतांचं कुटुंब आपले संस्कार टिकवून होतं.

भले, बापजाद्यांचं सगळं गेलं, तरीही ईश्वराने हातपाय तरी शाबूत ठेवले होते, त्यामुळे काळजी नव्हती. हे सर्व घडण्यामागे त्या ईश्वराचाच काही संकेत असणार असे मानून आशारामजींनी परिस्थितीचा स्वीकार केला आणि कपडे रंगविण्याचं काम सुरु केलं. श्री मोटांची आईपण मिळेल ती कामं करू लागली. दळण, कांडण, पाणी भरणं, धान्य निवडणं, मजुरी करणं – जे काही काम मिळत गेलं ते ते – ती माऊली

पोटाची खळगी भरण्यासाठी करु लागली. दिवसरात्र, ऊनपाऊस, सोपंकठीण, शक्यअशक्य काहीही न पाहता अखंड श्रमयज्ञ सुरू झाला !

❖

## ५. खडतर मजुरी

चुनीलाल घरातली हा परिस्थिती पहात होता. आईवडील इतके कष्ट करीत असतांना आपण बसून रहावं हे त्याच्या बालमनाला पटेना. आपणही काहीतरी मदत करावी आणि त्यांच्या शिरावरचा भार हलका करावा हे त्याने ठरवलं. मग तो कामाच्या शोधात राहू लागला.

एकदा त्याला समजलं की वीटभट्टीवर काम मिळेल. तो लगेच तिथे गेला मालकाजवळ जाऊन उभा राहिला.

"काय रे पोरा, काय हवंय तुला ?" त्याने विचारलं.

"साहेब, मी काम करायला आलोय. मला कामावर ठेवून घ्या." त्याने सांगितलं.

एवढासा टीचभर पोरगा काम मागतो आहे यावर त्याचा विश्वासच बसेना. शंकित स्वरात त्याने विचारलं, "एवढासा तर जीव आहे तुझा ! तू या गरम विटा उचलू शकशील का ?"

आत्मविश्वासाने चुनीलाल उत्तरला, "नक्कीच, आनंदाने !"

का कोणास ठावूक, पण या पोराला कामावर ठेवावं असं मालकाला वाटलं.

"तर मग जा, आणि इतरांबरोबर कामाला लाग. त्यांच्याप्रमाणेच तुलाही पैसे देईन," त्याने परवानगी दिली.

काम मिळाल्यावर आनंदाने धावतच तो वीटभट्टीजवळ गेला आणि विटा उचलून ट्रकमध्ये ठेवण्याचं काम करू

लागला. विटा गरम असल्या तरी तोंडातून 'ब्र' ही न काढता सगळं सहन करून तो काम करू लागला. आपल्या आईवडिलांना मदत करायलाच हवी या भावनेने त्याच्यात ही सहनशक्ती आली होती.

संध्याकाळी विटा मोजून हिशोबाप्रमाणे मिळालेले पैसे घेऊन तो घरी आला. स्वकष्टाने पैसे कमाविल्याच्या आनंदाने त्याचा चेहरा फुलून आला होता.

मिळालेले पैसे सूरजबांच्या हाती ठेवल्यावर टचकन् त्यांच्या डोळयात पाणी आलं. ज्या वयात हाती खेळणी धरायची त्या वयात पोराला विटा उचलाव्या लागत आहेत या विचाराने त्यांचं काळीज तीळतीळ तुटत होतं, पण त्या तरी काय करणार? आभाळ फाटल्यागत घरची स्थिती होती, कितीही शिवलं तरी पुरंच पडत नव्हतं आणि गळणंही थांबत नव्हतं. हे सहन करणं भागच होतं.

आतून उसासून येऊ पहाणारे दुःखाचे कढ थांबवीत त्यांनी आपल्या लाडक्या चुनियाला घट्ट मिठीत घेतलं आणि त्याचे मटामटा मुके घेतले. गरम विटा उचलल्यामुळे लाल झालेल्या आणि फोड आलेल्या त्याच्या हातांना त्यांनी हळुवारपणे तेल लावलं आणि मग जेवण करून आईच्या कुशीत शिरून काम करून थकलेला चुनिया लगेच गाढ झोपी गेला.

दिवस असेच जात होते.

एके दिवशी कोणीतरी चुनीलालला सांगितलं, "ए चुनीलाल, तुला काम पाहिजे असेल तर बाजारात जा. एक गवंडी त्याच्या कामासाठी मजूर शोधतोय. त्याला लहान मुलगाच हवाय. तू जा बघू पटकन ! "

चुनीलाल धावत धावतच गेला आणि त्या गवंड्याला भेटून त्याने काम मिळविलं आणि त्याच्या बरोबर बांधकामाच्या जागेवर गेला.

तिथे गेल्यावर त्याने विटांचे छानपैकी ढीग बनविले माल व्यवस्थित कालवून दिला आणि तो पाट्यांमधून वाहून तत्परतेने त्याला देऊ लागला. त्या गवंड्याला काहीच सांगावं लागलं नाही. चुनीलालची हुशारी आणि चटपटीतपणा पाहून तो फार खूश झाला. असा समजूतदार, मेहनती मुलगा हाताखाली असल्यामुळे त्याचं काम भराभर आणि मनासारखं झालं होतं.

मजुरीचे पैसे देतांना तो चुनीलालला म्हणाला, ''ए पोरा, तू उद्यापण ये हं !''

''हो ऽऽ, येईन की !'' चुनीलालने मान डोलावून उत्तर दिलं. त्यालातरी हेच पाहिजे होतं. दुसऱ्या दिवशीदेखील तो कामावर गेला. त्या गवंड्याने हाती घेतलेलं काम सुरु होतं तोपर्यंत चुनीलालला काम मिळतच राहिलं.

कपाशीच्या मोसमात पांढऱ्याशुभ्र कपाशीची बोंडं खुडायला जायला त्याला फार आवडे. ''या बोंडांमध्ये पांढराशुभ्र मऊमऊ कापूस ईश्वर कसाकाय भरत असेल ?'' त्याला आश्चर्य वाटे. ईश्वराने या सृष्टीत कायकाय गमती केल्या आहेत असं त्याला वाटे. तो भराभर बोंडं खुडत जाई आणि पाठीवरच्या पोत्यात जमा करीत जाई. लहान असूनही त्याचे छोटेछोटे हात भराभर चालत. कामचुकारपणा त्याला माहितच नव्हता.

काम संपल्यावर चुनीलालने जमविलेल्या कपाशीच्या बोंडांचा ढीग इतरांएवढाच होई. पैसे देतांना मात्र तो लहान

असल्यामुळे मालक त्याला अर्धीच मजुरी देई. दुपारी जेवणाच्या सुटीतही त्याला भाकरीपण एकच मिळालेली असे.

आपण जर काम सर्वांएवढंच करतो, तर मग आपल्याला जेवण आणि पैसे निम्मेच का दिले जाताहेत हे गणित त्याची बालबुद्धी सोडवू शकत नसे.

तो मालकास विचारी, "दादा, मी जर मोठयांएवढच काम केलंय तर मग मला तुम्ही पैसे कमी का देता ? भाकरीपण एकच दिली होती, असे का ?"

त्याच्या या प्रश्नाला मालकाकडेही उत्तर नसे. तो केवळ त्याची पाठ थोपटून शाबासकी देई. उत्तर टाळून म्हणे, "पोरा, छान काम केलंस हं तू. येत जा तू रोज." गरीबाच्या प्रश्नाला उत्तर द्यायची त्याला आवश्यकता तरी का वाटावी ?

मिळालेले पैसे घेऊन चुपचापपणे चुनीलाल घरी निघून येई.

गरीबाच्या शब्दांना काहीच किंमत नसते हे कळण्याइतकं त्याचं वय नव्हतं !

❖

## ६. चातुर्य

लहानपणापासूनच चुनीलाल तल्लख बुद्धीचा होता. त्याने शाळेत प्रवेश घेतला. शिक्षण सुरू झालं आणि भराभर शिकत एकेक इयत्ता तो पार करीत गेला. त्याची आकलनशक्ती व ग्रहणशक्ती फार चांगली होती आणि दुसऱ्यांनाही तो वेळप्रसंगी अडलेले विषय समजावून देई.

पहिल्या चार इयत्तांचं शिक्षण पूर्ण झालं आणि नंतर खरा प्रश्न निर्माण झाला. चौथ्या इयत्तेनंतर ज्या 'अँग्लो व्हर्नाक्युलर

मिडल स्कूल' मध्ये प्रवेश घ्यावयाचा होता तिथे फी दिल्याशिवाय गत्यंतर नव्हतं.

चुनीलालने विचार करून यावर तोड काढली. तो शाळेच्या संचालकांना भेटला आणि शाळेच्या साफसफाईचे आणि पट्टेवाल्याचे काम देण्याची त्यांना विनंती केली. "मी गरीब असल्यामुळे मला जर हे काम मिळालं, तरच मला पुढे शिकता येईल" डोळ्यात पाणी आणून चुनीलाल त्यांना म्हणाला. संचालकांचं मन विरघळलं. त्यांनी त्याला होकार दिला.

शाळेत प्रवेश घेतल्यानंतर चुनीलालच्या लक्षात आले की आपण जर मेहनत घेतली तर चारी वर्षांचा अभ्यासक्रम आधीच पूर्ण करू शकू. त्याने जोर लावून अभ्यास केला आणि चारी वर्षांची तयारी करून ठेवली. नंतर परीक्षा घेण्यासाठी विनंती करायला तो हेडमास्तरांना भेटायला गेला.

त्याचं सर्व बोलणं हेडमास्तरांनी ऐकलं आणि म्हणाले, "बाळ, तू जिद्दीने अभ्यास पूर्ण केला याचं मला कौतुक वाटतं, पण चारी वर्षांच्या परीक्षा एकदम घेण्याचा अधिकारमात्र मला नाहीये. शिक्षण खात्याचे इन्स्पेक्टर साहेब चतुरभाई यांच्या हाती सर्व अवलंबून आहे. मला तुझ्या चारी वर्षांच्या परीक्षा एकदम घेता येणार नाहीत." ते खेदाने बोलत होते.

आपले अभ्यासाचे सर्व कष्ट पाण्यात गेले असं त्याला क्षणभर वाटलं. पण हार घेईल तो चुनीलाल कसला ? त्याने ठरवलं, "आपण चतुरभाईना जाऊन भेटू आणि त्यांची संमती मिळवू."

श्री. चतुरभाई पटेल हे एक रुबाबदार व्यक्तिमत्त्व होतं. कडकडीत इस्त्री केलेला सदरा, सुंदर तलम धोतर, लाँग कोट

“‘साहेब, मी ‘अँग्लो व्हर्नाक्युलर मिडल स्कूल’ मध्ये शिकत आहे. तिथल्या चारी वर्षांचा अभ्यासक्रम मी दीड वर्षात पूर्ण करून टाकला आहे. त्या चारी वर्षांच्या परीक्षा घेण्याची परवानगी तुम्ही हेडमास्तरांना दिलीत तर माझी अडीच वर्षे वाचतील. माझी तुम्हाला हीच विनंती आहे.” त्याने भराभर सर्व सांगितलं.

“हात्तिच्या, एवढंच ना ? जा, तुझं काम झालंच म्हणून समज,” हसून आश्वासक आवाजात ते म्हणाले.

आनंदाने उड्या मारतमारत चुनीलाल घरी आला.

काही दिवसांनी शाळेच्या तपासणीसाठी चतुरभाई आले आणि हेडमास्तरांना सांगून चुनीलालच्या चारी वर्षांच्या परीक्षेचं आयोजन करून दिलं. तयारी पूर्ण असल्यामुळे तो सर्व परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला यात आश्चर्य नव्हतं.

आपली हुषारी वापरून चतुरभाईचं मन जिंकून परीक्षांचे चार गड चुनीलालने सर केले होते !

❖

# ७. चोरी

चुनीलाल शाळेत जाण्याच्या बाबतीत अगदी काटेकोर होता. तो कधीही शाळा बुडवीत नसे. त्याच्याबरोबर शिकणारी बरीच मुले रोज घरून पैसे घेऊन येत आणि मधल्या सुटीत त्याचा खाऊ विकत आणून खात. फरसाण, शेवमुरमुरे, चणेशेंगदाणे, मिठाया, चॉकलेटगोळ्या असे काही न काही खाण्याची त्या मुलांना सवय होती.

त्याला तर घरातून फुटकी दिडकीसुद्धा मिळत नसे त्यामुळे त्याला हे शक्यच नव्हतं. त्याने आपल्या बालमनाला मुरड

आणि माथ्यावर पगडी हा त्याकाळी साहेबाचा मानला जाणारा पोषाख त्यांना अतिप्रिय होता. अशा या चतुरभाईची चुनीलालने भेट घेतली.

त्यांनी चुनीलालला विचारलं, "काय बाळ, काय पाहिजे आहे तुला ? काही काम आहे का ?"

तो धीटपणे म्हणाला, "साहेब, मी एक गरीब मुलगा आहे. मला शिकण्यासाठी मदतीची गरज आहे. तुम्ही मला कपडे रंगवायला द्या. आमचा रंगाऱ्याचा धंदा आहे. मी छानपैकी कपडे रंगवून देईन."

त्याच्या धीटपणावर चतुरभाई खूश झाले. या मुलाला मदत केलीच पाहिजे असं त्यांना वाटलं. रंगवायला काय द्यावं ?"–त्यांनी विचार केला. आपल्या पगडीचा रंग उन्हाने फिका पडला आहे, ती याला द्यावी असं त्यांनी ठरवलं आणि चुनीलालला ती पगडी दिली. ते म्हणाले, "घेऊन जा ही पगडी, पण रंगवून लगेच घेऊन ये म्हणजे झालं !"

"हो ! लगेच आणीन मी दोनतीन दिवसात !" तो म्हणाला.

त्याने मन लावून, सुरेख रंगवून पगडी चतुरभाईंना नेऊन दिली. पगडीला सुगंधित रंगांचा मंद सुवास येत होता. त्याचं काम पाहून चतुरभाईची स्वारी खूश झाली. चुनीलालची पाठ थोपटून, शाबासकी देऊन ते त्याला पैसे देऊ लागले. "बाळ, किती पैसे द्यायचे तुला ?" त्यांनी विचारलं.

चुनीलाल म्हणाला, "साहेब, मला तुमचे पैसे नकोत. मला तुमच्याकडून निराळीच मदत हवी आहे."

"कोणती ?" अचंब्याने चतुरभाईंनी विचारलं.

"साहेब, मी 'अँग्लो व्हर्नाक्युलर मिडल स्कूल' मध्ये शिकत आहे. तिथल्या चारी वर्षांचा अभ्यासक्रम मी दीड वर्षात पूर्ण करून टाकला आहे. त्या चारी वर्षांच्या परीक्षा घेण्याची परवानगी तुम्ही हेडमास्तरांना दिलीत तर माझी अडीच वर्षे वाचतील. माझी तुम्हाला हीच विनंती आहे." त्याने भराभर सर्व सांगितलं.

"हात्तिच्या, एवढंच ना ? जा, तुझं काम झालंच म्हणून समज," हसून आश्वासक आवाजात ते म्हणाले.

आनंदाने उड्या मारतमारत चुनीलाल घरी आला.

काही दिवसांनी शाळेच्या तपासणीसाठी चतुरभाई आले आणि हेडमास्तरांना सांगून चुनीलालच्या चारी वर्षांच्या परीक्षेचं आयोजन करून दिलं. तयारी पूर्ण असल्यामुळे तो सर्व परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला यात आश्चर्य नव्हतं.

आपली हुषारी वापरून चतुरभाईचं मन जिंकून परीक्षांचे चार गड चुनीलालने सर केले होते !

❖

## ७. चोरी

चुनीलाल शाळेत जाण्याच्या बाबतीत अगदी काटेकोर होता. तो कधीही शाळा बुडवीत नसे. त्याच्याबरोबर शिकणारी बरीच मुले रोज घरून पैसे घेऊन येत आणि मधल्या सुटीत त्याचा खाऊ विकत आणून खात. फरसाण, शेवमुरमुरे, चणेशेंगदाणे, मिठाया, चॉकलेटगोळ्या असे काही न काही खाण्याची त्या मुलांना सवय होती.

त्याला तर घरातून फुटकी दिडकीसुद्धा मिळत नसे त्यामुळे त्याला हे शक्यच नव्हतं. त्याने आपल्या बालमनाला मुरड

घातली होती. तरीही एकदा त्याच्या मनात तीव्र इच्छा निर्माण झाली. त्याला वाटलं, "एखादे वेळी खाऊ खायला काय हरकत आहे ?"

आई रोज दळणकांडण करण्याचे, मजुरीचे पैसे कोठे ठेवीत असे ती जागा त्याला माहीत होती. त्याने तिथून दोन पैसे चोरले आणि बाजारात जाऊन इतर मुलांबरोबर शेवमुरमुरे विकत घेऊन खाल्ले. खाऊन झालं. तो तात्पुरता आनंद मिळाला आणि मगमात्र त्याच्या मनाने त्याला खडसावून विचारलं, "चुनीलाल, तुझी आई बिचारी राबराब राबून जे पैसे कमविते ते तू असे चोरी करून घेतलेस ? हे तुला शोभतं का ? जिभेचे चोचले पुरवाण्यासाठीच केलंस ना हे सारं ?"

शाळेतून घरी परतल्यावर आईपुढे जाऊन त्याने घाबरत घाबरतच खालच्या मानेने आपण केलेल्या चुकीची कबुली दिली.

आईला ते ऐकून 'माझ्या चुनियाने प्रामाणिकतेने चूक कबूल केली' याचा खरातर आनंदच झाला, तरीही कृतक्‌कोपाने ती म्हणाली, "कर्म माझं ! गाढवा, परत असं केलंस ना, तर चांगली बदडून काढेन बघ !"

मुकाटपणे चुनीलाल ओसरीत जाऊन आपल्या अभ्यासाला लागला. आपल्या चुकीची कबुली दिल्यानंतर एखाद्या पिसासारखं त्याचं मन आता खूप हलकं झालं होतं.

❖

## ८. स्वसमर्थन

शाळेत शिकत असतांना चुनीलालने पहिला क्रमांक कधीच सोडला नाही. आपला स्वतःचा अभ्यास सांभाळून तो आपल्या मित्रांनादेखील अडलेला विषय समाजावून देत असे, मार्गदर्शन

करीत असे. त्याच्या या स्वभावामुळे शाळेतील वर्गमित्रांत आणि शिक्षकांमध्ये तो सर्वांचा आवडता होता.

एकदा शाळेत परीक्षा चालू होती. गणिताचा पेपर होता. चुनीलालने भराभर उदाहरणे सोडवून एक पुरवणी पूर्ण केली. बाजूलाच त्याचा मित्र बसला होता. अभ्यासात बिचाऱ्याची फारशी गती नव्हती. आणि त्यात अजून गणितचा पेपर ! तो तर डोक्याला हात लावूनच बसला होता. तो त्याला म्हणाला, "चुनीलाल, तुझी पुरवणी मला दे ना ! मी पटकन उतरवून घेतो आणि तुला लगेच परत करतो."

त्याच्या मनात चलबिचल झाली. दुसऱ्याला अशा प्रकारे पुरवणी देता कामा नये असं त्याचं मन त्याला सांगत होतं तरीही मित्रप्रेमाने त्या विचारावर मात केली. त्याने पुरवणी मित्राला देऊन टाकली.

त्यांची कुजबूज आणि देवाणघेवाण चाणाक्ष शिक्षकांच्या ध्यानी आल्याशिवाय राहिली नाही. भराभर चालत ते चुनीलालजवळ आले आणि कडक आवाजात विचारलं, "चुनीलाल, तुझी उत्तरपत्रिका कोठे आहे ? दाखव मला."

तो काय उत्तर देणार ? घाबरलेल्या सशाप्रमाणे थरथर कापत मान खाली घालून तो मूक राहिला.

त्याच्या मूग गिळून बसण्यामुळे शिक्षकांना अधिकच राग आला. दरडावून त्यांनी विचारलं, "बोल, तुझी उत्तरपत्रिका तू या बाजूच्या मित्राला दिलीस की नाही ? एवढा हुषार मुलगा असून तू असे करतोस ?".

चुकीची कबुली देत चुनीलाल अपराधीपणाने म्हणाला, "सर ! माझी चूक झाली पण मी स्वतः त्याला दिली नाही.

त्याने मागितली म्हणून दिली."

त्याचं हे उत्तर ऐकून शिक्षकांचा पारा अजून वर गेला, "गाढवा, चूक करतोस आणि तिचं समर्थनही करतोस ? चल हेडमास्तरांकडे. तुला डिसमिसच करायला लावतो."

त्याला घेऊन ते तडक हेडमास्तरांच्या ऑफिसमध्ये गेले आणि सर्व प्रकार त्यांच्या कानी घातला.

हेडमास्तर त्याच्याकडे पहात खेदाने म्हणाले, "चुनीलाल तुझ्यासारख्या हुषार आणि चांगल्या वर्तणुकीच्या मुलाकडून मला ही अपेक्षा नव्हती. का केलंस तू हे सारं ?"

चुनीलालची पाचावर धारण बसली होती. "आपल्याला शाळेतून काढून टाकलं आणि शिक्षण संपलं तर पुढे काय ? सगळंच मुसळ केरात !" रडत रडत आणि गयावया करीत हेडमास्तरांना तो म्हणाला, "सर, माझी ही पहिली आणि शेवटचीच चूक तुम्ही माफ करा. माझी चूक मी कबूल करतो. त्याने मागितली म्हणूनच मी त्याला पुरवणी दिली होती. परत कधीच मी असं करणार नाही."

हेडमास्तरांना दया आली. त्यांना तरी कोठे चुनीलालला शाळेतून काढून टाकायची इच्छा होती ? स्वावलंबनावर शिकणाऱ्या अशा हुषार मुलाचं भवितव्य त्यांना नष्ट करायचं नव्हतं. कडक शब्दात समज देऊन त्यांनी चुनीलालला माफ केलं.

परत कधी अशा भानगडीत पडायचं नाही हा कानाला खडा लावून तो खोलीबाहेर पडला आणि वर्गात जाऊन निमूटपणे पेपर सोडवू लागला.

❖

# ९. अगतिकता

पावसाळा सुरू झाला आणि चांगला पाऊस पडला की शेतामध्ये पेरण्यांची कामं सुरू होत.

शेतातील इतर कामांच्या मजुरीपेक्षा भाताची रोपं लावण्यासाठी शेतकरी चार पैसे जास्त देत असत. कारण पाणी भरलेल्या शेतातील चिखलात उभं राहून दिवसभर काम करावं लागत असे. तरीसुद्धा चार पैसे अधिक मिळतात म्हणून मजुरांचा ओढा तिकडेच जास्त असे.

चुनीलालपण भाताची रोपं लावण्यास जाई.

शेतकरी त्याला सांगे, "हे बघ पोरा, रोपं लावतांना तुला सर्वांबरोबर रहायला हवं. लहान आहेस म्हणून मागे पडलास तर काही उपयोग नाही. असं जमत असेल तरच कामावर घेईन. बोल, आहेस तयार ?"

तो हसून सांगे, "मालक, तुम्ही कामावर ठेवून तर पहा. नाही जमलं तर मजुरीदेखील देऊ नका, मग तर झालं ?"

सांगितल्याप्रमाणे तो सर्वांबरोबर भराभर रोपं लावीत जाई. कोठे अडखळला, थांबला, मागे राहिला असं होत नसे. वरून पाऊस कोसळत असला तरी तशा पावसातदेखील तो काम करीत असे. पाण्यात काम करूनकरून पायांच्या बोटांमध्ये चिखल्या होत, पाय उलून जात. तरीही तो त्याची तमा न बाळगता काम करीत राही. वाकूनवाकून काम करून संध्याकाळपर्यंत कंबरेचं हाड अन् हाड खिळखिळं होऊन जाई, जीव लोळागोळा होई. छोटासा चुनिया हे सारं सहन करीत नेटाने काम करीत राही.

कोणतंही काम निष्ठेने आणि प्रामाणिकतेने जीव ओतून

करायचं हा गुण लहानपणापासूनच त्याच्या अंगी होता.

संध्याकाळी काम संपलं की या टीचभर पोराने केलेलं काम पाहून शेतमालक आनंदित होई आणि पाठ थोपटून शाबासकी देई. मजूरी मात्र, तो लहान असल्यामुळे, कमीच मिळे. इतर मजूर त्याला सांगत, "बाळ, पूर्वापार हे असंच चालत आलंय, त्याला आपण तरी काय करणार ? आपले हात दगडाखाली आहेत. तोंड दाबून बुक्कयांचा मार सहन करायलाच हवा. हळूहळू सवय होते गरीबाला या साऱ्याची."

गरीबीमुळे असणारी अगतिकता, दीनता, कारुण्य आणि दुःख काय असतं हे त्यांच्या अशा शब्दांतून प्रगट होत असे.

गरीबीचा हा शाप आशारामजींच्या कुटुंबासदेखील पुरेपूर लाभला होता !

❖

## १०. मानी कुटुंब

चुनीलाल अभ्यासात हुषार असल्यामुळे त्याला खूप मित्र होते. कालोलमध्ये लाड वाणी लोकांची वस्ती बरीच मोठी होती आणि संपन्न स्थिती असल्यामुळे त्यांची बहुतेक मुलं 'अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूल' मध्येच शिकायला जात.

त्यांच्या वाडीत वर्षातून दोनदोन महिने जेवणावळी असत, त्यामुळे चुनीलालचे वाणी मित्र कोणकोणतं पक्वान्न खाल्लं त्याचं रसभरीत वर्णन शाळेत नेहमी करीत. ते ऐकून त्याच्या तोंडाला पाणी सुटे.

एकदा तो आपल्या मित्राला म्हणाला, "लेको, तुम्ही रोजरोज मिष्टान्न खाता पण आपल्या मित्राला काही द्यावं असं मात्र तुम्हाला कधीच वाटत नाही, धत् !"

ते ऐकून मित्र ओशाळला आणि त्याला आश्वासन देत म्हणाला, "ठीक आहे, आज रात्री आमच्या वाडीजवळ तू य. आज लाडूंचा बेत आहे. वाढायला मीपण आहे. मी तुला भरपूर लाडू देतो." याप्रमाणे सर्व खलबत झालं.

संध्याकाळी चुनीलाल वाण्यांच्या वाडीजवळ गेला. त्याच्या मित्राने त्याला पाहिलं आणि अंधाऱ्या जागी उभं रहायला सांगून परातभर लाडू गुपचूप आणून दिले.

एवढे ढीगभर लाडू पाहून त्याला वाटलं, "एवढे लाडू आहेत तर एक आत्ता इथेच खाऊन टाकावा !" पण त्याला लगेच आईवडिलांची, भावांची आठवण झाली. एकट्यानेच लाडू खायच्या आपल्या स्वार्थी विचाराची त्याला लाज वाटली आणि त्याचा तो विचार बारगळला.

लाडू घेऊन तो उत्साहाने घरी आला. परातभर लाडू पाहून डोळे मोठे करून आईने त्याला विचारलं, "अरे चुनिया, कोठून आणलेस हे लाडू ?"

त्याने सरळपणे सगळं सांगून टाकलं. ते ऐकलं मात्र आणि आईच्या अंगाचा तिळपापड झाला. रागाने थरथरत ती उद्‌गारली, "अरे मूर्खा ! तुला एवढीसुद्धा अक्कल नाहीये का, की चोरलेले लाडू आपण कसे खाणार ? दळभद्र्या, ही कसली अवदसा आठवली तुला ? परत कधी असं काही घेऊन आलास तर घराबाहेरच काढीन तुला !"

आई रागावल्यानंतर मात्र त्याची सदसद्‌विवेकबुद्धी जागी झाली. "घरची कष्टाची मीठभाकरी सोडून असा लाडवांचा आपल्याला मोह झाला हे आपलं चुकलंच !" केलेल्या कृत्याचा त्याला आता पूर्ण पश्चात्ताप झाला. पण घडायचं ते

घडून गेलं होतं. शेवटी ते लाडू तसेच बाजूला पडून राहिले. त्यातला एक कणदेखील चाखून पाहण्याची इच्छा त्या मानी कुटुंबातील एकालाही झाली नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी रोजच्याप्रमाणे झाडूवाला येऊन रस्ता झाडू लागताच आई चुनियाला म्हणाली, "चुनिया, कालचे ते लाडू देऊन टाक त्या झाडूवाल्याला." त्याने लगेच आज्ञापालन केलं आणि लाडू झाडूवाल्याला देऊन टाकले.

सकाळीसकाळीच हे दान मिळालेलं पाहून झाडूवाल्याचा चेहरा उजळला. जणूकाय दिवाळीचाच दिवस उजाडला असावा असं त्याला मनोमन वाटलं आणि काम भराभर आटेपून लाडू घेऊन तो आपल्या घरी चालता झाला.

खडतर गरीबीतही सुसंस्कारांची आणि सद्‌गुणांचीच कास धरायला लावणारे आईवडील मिळणं हे चुनीलालचं सद्‌भाग्य होतं !

❖

## ११. साधूची भविष्यवाणी

कालोलला आशारामजींचं कुटुंब येऊन राहू लागलं आणि एके दिवशी एक विशेष घटना घडली.

सूरजबां ओसरीत बसून काम करीत होत्या. तेवढ्यात एक साधु दारात येऊन उभा राहिला. भगवी वस्त्रे आणि पांढरीशुभ्र दाढी असलेल्या साधूच्या डोळ्यांतून, व्यक्तिमत्त्वातून शांती प्रवाहित होत होती.

"माई, साधुको खाना खिलाना," सूरजबांकडे पाहात तो म्हणाला.

"अरे बाबा, आमच्याकडेच दोन वेळच्या जेवणाची भ्रांत

आहे, तिथे तुला खायला कोठून देऊ ? तू दूसरीकडे जा. इथे तुझा काही निभाव लागणार नाही," त्या म्हणाल्या.

चुनिया हे संभाषण ऐकत ओसरीवरच उभा होता. त्याच्याकडे स्थिरपणे पाहात जणूकाही अज्ञाताचा शोध घेत असल्याप्रमाणे धीरगंभीरपणे साधु म्हणाला, "माई, तुझ्या मुलाला तू असातसा समजू नकोस. तो खूप मोठा धर्मात्मा होणार आहे. त्याची खूप काळजी घे."

आपल्या मुलाची स्तुती करून जेवण उपटायचा या साधूचा विचार असावा असंच सूरजबांना वाटलं. साधु अजूनही दारातच उभा होता. "माई, खाना खिलाओगी न ?" त्याने मधाळ आवाजात विचारलं.

थोडं कावूनच सूरजबां म्हणाल्या, "अरे बाबा, आमच्याकडे आहे फक्त कोरडी भाकरी. दुसरीकडे तुला सगळं व्यवस्थित मिळेल. आमच्यावर मेहेरबानी कर आणि तू चालू लाग पाहू !"

"ठीक है माँ, जैसी ईश्वर की इच्छा !" निर्लेपतेने हे शब्द उच्चारून साधु परत फिरला आणि जाऊ लागला.

सूरजबांना अचानक वाटलं, "अतिथीच्या रूपात कोण येईल हे काय सांगावं ? याला असं जाऊ देणं योग्य नाही. आहे ती मीठभाकरी देऊ आपण त्याला."

"महाराज, थांबा ! घरात जे आहे, ते वाढते मी. या आत."

साधु परत फिरला आणि सूरजबांनी दिलेल्या आसनावर बसला.

सूरजबांनी आत जाऊन थोड्या वेळापूर्वी केलेल्या गरम भाकरी एका थाळीत वाढल्या, त्यावर थोडंसं तूप टाकलं,

बाजूला गुळाचा खडा ठेवला आणि एका लोट्यात पाणी काढून ती थाळी आणि लोटा साधूपुढे ठेवला.

आचमन करून, चित्राहुती देऊन साधु जेवायला बसला. हळूहळू शांतपणे त्याने सर्व खाल्लं, तृप्तीचा ढेकर दिला. जेवणानंतर थाळीत हात धुवून तो जायला निघाला.

जातांना तो म्हणाला, "माई ! लाडू, पेढे, जिलबी खाण्यापेक्षा तुझ्या तूपगूळभाकरीने माझा अंतरात्मा तृप्त झाला. एक लक्षात ठेव, आम्ही काय दिलं हे पहात नाही, तर कोणी कोणत्या भावनेने दिलं हे पहातो. माझं जेवण तर निमित्त होतं. माई, येणं झालं ते खरंतर तुझ्या मुलासाठी. विश्वास ठेव, तुझा मुलगा म्हणजे धुळीतील रत्न आहे. वेळ आल्यावर त्याचं तेज फाकल्याशिवाय राहणार नाही. ईश्वर तुमचं कल्याण करो !"

आपला हात चुनियाच्या डोक्यावर ठेवून त्याला आशीर्वाद देऊन तो साधु संथपणे निघून गेला.

काळ वहात चालला होता.

आपल्या वडिलांचा भजनानंदी स्वभाव चुनियातदेखील उतरला होता. तो गोमा नदीच्या किनारी महादेवाच्या मंदिरात फावल्या वेळात जाऊन बसत असे. त्या एकांतात त्याला खूप बरं वाटे. तिथे शांत वातावरणात भजनं म्हणतम्हणत तो एका निराळ्याच विश्वात रममाण होई. वेळेचंही भान सुटून जाई.

एकदा असंच झालं. सांज ढळली तरी चुनियाचा पत्ता नव्हता. सूरजबांना काळजी वाटू लागली, "दिवे लागायची वेळ झाली तरी या पोराचा पत्ता नाही. माझ्या जिवाला कसा घोर लागून राहिलाय ! कोठे गेला असेल कोणास ठावूक ?" त्यांनी शेजारीपाजारी चौकशी केली.

एकजण म्हणाला, "चुनिया ना ? तो असणार तिकडे शंकराच्या मंदिरातच ! बसला असेल भजनं म्हणत. खरंच आहे म्हणा, 'भुताचा वास पिंपळावर ? शंकराचा गण ना तो, बसला असेल त्याच्या पायाशीच !'"

विनवणी करून सूरजबां म्हणाल्या, "जा रे बाबा आणि घेऊन ये त्याला. माझा जीव कसा टांगणीला लागलाय. अंधारात काही किडूकमिडूक डसलं तर काय करणार ? ताबडतोब जाच तू !"

त्याने चुनियाला मंदिरातून घरी आणलं.

सूरजबांनी रागावून त्याला विचारलं, "चुनिया, मेल्या एवढं आहे तरी काय त्या मंदिरात की ऊठसूठ तिथे जाऊन भजनं म्हणत बसतोस ? थोडी काळवेळेची, अभ्यासाची शुद्ध ठेवत जा."

चुनिया काहीच बोलला नाही. चिडीचूप ! पूर्ण मौन !!

## १२. दंडुकेशाही

दिवस भराभर वहात गेले आणि आशारामजींना कालक्रमानुसार अजून दोन अपत्ये झाली. जमनादास आणि चुनीलालच्या जोडीला मूळजीभाई आणि सोमाभाई या अजून दोन खाणाऱ्या तोंडांची भर पडली. सहा जणांच्या संसाराचा गाडा रेटतारेटता आशारामजींचे प्राण कंठाशी येऊ लागले. सततच्या मानसिक चिंतातणावांपासून मुक्ती मिळविण्यासाठी त्यांनी पूर्वीपासूनच दोन व्यसनं जवळ केली होती : अफू खाण्याचं आणि हुक्का पिण्याचं !

हळूहळू हुक्क्याचं व्यसन वाढत गेलं आणि दिवसाच नव्हे तर रात्रीदेखील ते हुक्क्याच्या आधीन होऊ लागले. आपल्या छोट्याश्या घराच्या ओसरीत ते शेण्यांचे निखारे पेटते ठेवीत

आणि लहर आली की उठून हुक्का पीत बसत. घर अगदी रस्त्याला लागूनच असल्यामुळे रात्री गस्त घालणारे पोलीस त्यांच्याकडे येऊन बसत आणि दुनियाभरच्या गप्पा करीत, हुक्कयाचे दम टाकीत रहात. थोड्यावेळाने ताजेतवाने झाले की परत कामाला निघून जात. या प्रकारे आशारामजींचं पोलिसांशी चांगळंच सूत जमलं होतं.

एकदा असेच नेहमीप्रमाणे रात्री बऱ्याच उशिरा दोन पोलीस आले, हुक्का घेतला आणि दम टाकू लागले. त्यांना विषयांचा तोटा नव्हताच ! गप्पा सुरू झाल्या. एवढ्यात एका पोलिसाचं लक्ष गेलं की ओट्यावर कोणीतरी झोपलं आहे.

त्याने आपल्या पोलिसी ताठ्याने विचारलं, "ए भगत ! इथे कोण झोपलं आहे ?"

"पाहुणे आहेत."

"तर मग पोलीस चौकीवर का कळवलं नाहीस हे ?" गुर्मीने त्या पोलिसाने उद्धट प्रश्न केला.

"कोळी-वाघरी असेल तर, त्यांनी हे कळविण्याची गरज आहे, आम्हाला नाही" आशारामजींनी सडेतोड उत्तर दिलं.

आपल्यासारख्या पोलिसाला हा यःकश्चित रंगारी ठणकावून उत्तर देतो आहे याचा त्या पोलिसाला फार राग आला आणि त्याने खाडकन् आशारामजींच्या मुस्काटीत ठेवून दिली. तेवढ्यानेच त्याचं समाधान झालं नाही. याला आपण पोलिसी इंगा दाखवून याची हड्डी नरम करायला हवी असं त्याच्या मनाने घेतलं आणि गुरासारखं बडवीत आणि आयाबहिणींवरुन शिव्या देत तो त्यांना पोलीस चौकीवर घेऊन गेला.

बिछान्यात जागा होऊन भेदरलेला चुनिया हे सर्व पहात होता, पण हे सगळं थांबवायची त्याच्या चिमुकल्या हातांमध्ये शक्ति नव्हती, "आपल्या वडिलांना हेच पोलीस मारत नेताहेत, जे रोज आपल्या घरी हुक्का पीत आणि आपल्याकडे येऊन ताजेतवाने होऊन जात ? आणि कारण तरी किती क्षुल्लक ? त्यासाठी आयाबाहिर्णींवरुन शिव्या ?" त्याचं रक्त तापून उठलं. "नाही ! आपल्या वडिलांना आपण सोडवून आणायचंच !" त्याच्या मनाने निश्चय केला.

"पण जायचं कोणाकडे ? गाऱ्हाणं कोणाला घालायचं ?" विचार करताकरता अचानक लख्खकन त्याला आठवले मनुभाई रावसाहेब !

कालोल गावात रावसाहेबांना सर्वजण मानत. सरकार दरबारी वजन असलेले ते सच्छील व सज्जन गृहस्थ होते. अडीअडचणीस धावून जाऊन मदत करण्याचा त्यांचा स्वभाव होता.

सूरजबा त्यांच्या घरी कधीकधी दळणकांडण करायला जात असल्यामुळे ते आशारामजींच्या कुटुंबास ओळखत होते. त्यांना त्यांच्याबद्दल सहानुभूती व आपुलकी होती.

"या अशा आणीबाणीच्या प्रसंगी मदत करू शकतील तर ते फक्त रावसाहेब !" चुनीलालने त्यांच्याकडे जायचं ठरवलं आणि त्यांच्या घराकडे धाव घेतली.

सुदैवाने रावसाहेब घरीच होते. रडतरडत सर्व करूण कहाणी चुनीलालने त्यांच्या कानी घातली. पोलिसाच्या या अरेरावी वर्तनामुळे रावसाहेब फार नाराज झाले, रागावलेदेखील ! रात्रीच्या रात्री त्यांनी नोकरास घोडागाडी काढायला सांगितली आणि चुनीलालला बरोबर घेऊन ते पोलीसचौकीवर आले.

पोलीसचौकीवर ठाणेप्रमुखाचा पत्ता नव्हता. हजर असलेले पोलीस आणि जमादार खुद्द रावसाहेबांना, आणि तेही अशा मध्यरात्री पाहून चकित झाले.

"त्या गरीब बिचाऱ्या रंगाऱ्याला सोडून द्या, त्याने असा कोणता गुन्हा केला आहे की ज्याची शिक्षा म्हणून तुम्ही त्याला इथे मारतमारत घेऊन आलात ? त्याने काय चोरी केली की डाका घातला ?" रावसाहेबांनी रागावून चौकीतल्या पोलिसांना खडा सवाल केला.

प्रश्नांच्या या सरबत्तीने सारेजण थंड झाले. त्यांच्याकडे याला काहीच उत्तर नव्हतं. आपली चूक झाली आहे याची जाणीव झाली तरी आशारामजींना सोडून द्यायला तो पोलीस 'का कू'-करु लागला. त्याचा अहंकार शरणागती स्वीकारायला तयार होत नव्हता.

मग मात्र रावसाहेब कमालीचे खवळले. ते म्हणाले, "आत्ताच्या आत्ता तुमच्या ठाणेप्रमुखाला बोलावून आणा. तुम्ही या गरीबाला जे मारलंय त्याची मला पोलीस केस करायची आहे. मी आत्ता त्या रंगाऱ्याला सरकारी दवाखान्यात घेऊन जातो आणि तुम्ही केलेल्या अमानुष मारहाणीसंदर्भात डॉक्टरांकडून सर्टिफिकेट घेऊन येतो."

रावसाहेबांची ही मात्रा बरोबर लागू पडली. पोलीस केस जर झालीच असती तर तो पोलीस गोत्यात येत होता. विनाकारण दंडुकेशाही करुन जुलूमजबरदस्ती केल्यामुळे तोच दोषी ठरला असता व पर्यायाने पोलीस खात्याचीदेखील बदनामी झाली असती.

त्या पोलीसाच्या कपाळावर घामाचे थेंब जमा झाले. तो

अजीजीने म्हणाला, "रावसाहेब, माझी चूक झाली हे मी मान्य करतो. मी त्यांना आत्ताच सोडतो आणि त्यांची तसेच तुमचीदेखील माफी मागतो. तुम्ही आता उगाच हे प्रकरण वाढवू नका. याउप्पर कधीच आमच्याकडून आशारामजींना त्रास होणार नाही याची मी हमी देतो, आपण विश्वास ठेवावा"

रावसाहेबांनी ते मान्य केलं, आशारामजी गजांबाहेर येण्याशीच त्यांचा मतलब होता. कोर्टकचेऱ्यात अडकायची त्यांचीतरी कोठे इच्छा होती ?

शेवटी आशारामजी गजांबाहेर आले. गुरासारखा मार खाल्ल्यामुळे होणाऱ्या असह्य शारिरीक वेदनांमुळे आणि निष्कारण झालेल्या मनस्तापामुळे त्यांचा चेहरा पिळवटून गेला होता. मानहानीचं मणामणांचं ओझं खांद्यावर घेऊन ते पार वाकून गेले होते.

एखाद्या निर्जीव प्रेतासारखी त्यांची ही अवस्था चुनियाला पाहवली नाही. त्याला भडभडून आलं आणि घशात हुंदका दाटून आला.

आपल्या थकलेल्या वडिलांना घेऊन चुनिया घरी आला, पण ते आल्याचा आनंद कोणालाच नव्हता. सर्वांच्या हृदयात जणू अमावस्या दाटून आली होती आणि तिच्या काळ्याकुट्ट उदास अंधःकाराने घर भरुन गेलं होतं !

❖

## १३. ज्वालामुखीचा विस्फोट

वडिलांवर झालेला अन्याय्य जुलुमामुळे चुनियाच्या हळव्या मनावर प्रचंड आघात झाला. ज्वालामुखी खदखदून उकळता लाव्हा बाहेर यावा तशी त्याची स्थिती झाली.

"गरीब असणं हा का गुन्हा आहे ? कोणीही यावं आणि अपमान करावा ? हाड्हूड् करावं ? अवहेलना करावी ? आयाबाहिणींवरून शिव्या द्याव्यात ?"... तो आतल्या आत जळफळत राही, आक्रंदन करीत राही, जळत राही आणि काय केलं म्हणजे सगळे आपल्यापुढे झुकतील, आपल्याला मान देतील हे शोधत राही.

विचार करकरून त्याच्या बालमनास शेवटी उत्तर मिळालं. त्याचं ते मन त्याला सांगत होतं," आपल्या तालुक्याच्या मामलेदार साहेबांपुढे सगळे कसे दबून असतात. गरीब असो, श्रीमंत असो, शेठ असो, विद्वान असो, लहान-थोर, स्त्री-पुरुष सारेसारे त्यांचा शब्द झेलायला कसे एका पायावर तयार असतात, अगदी त्यांच्या ताटाखालचं मांजर बनतात त्यांच्यापुढे ! बस्स, मी मामलेदारच होईन !" त्याने दृढनिश्चय केला.

निर्णय क्षणात घेतला, पण तो अमलात आणणं सोपं काम नव्हतं. ते ध्येय प्राप्त करण्यासाठी त्याला फार लांबचा पल्ला गाठायचा होता. रस्ता जंगलात होता, त्यात काटेकुटे होते आणि दशदिशांत अंधःकार होता. घरात पोटाची खळगी भरायला अन्न नव्हतं, पांघरायला टीचभर वस्त्र नव्हतं आणि तरीदेखील प्राणपूर्वक ते ध्येय गाठायचंच होतं !

ध्येयप्राप्तीसाठी खूपखूप शिकावं लागणार होतं याची त्याला जाण आली. हट्ट, मौजमजा, खेळणं हे तो विसरूनच गेला. जे असेल, जे मिळेल ते स्वीकारण्याचा त्याचा स्वभाव बनला. गरीबीत सर्व चालवून घ्यावं लागतं याची त्याला जाण होती, अनुभव होता आणि त्याला पर्यायही नव्हता.

एकलव्याच्या निष्ठेने त्याचा ध्यास होता, तशी जिद्द होती, एकाग्रता होती, झोकून द्यायची मनस्विता होती, देह कष्टविण्याची तयारी होती.

तो ठामपणे वाटचाल करू लागला, ध्येयप्राप्तीसाठी !

त्याची समग्र शक्ती एकवटली मामलेदार व्हायच्या ध्येयाकडे !

त्याच्या या दृढ निश्चयाकडे आणि वाटचालीकडे पाहून नियती मात्र गालातल्या गालात हसत होती !

❖

## १४. प्राणीप्रेम

कालोलमध्ये श्री मोटांच्या घरी एक गाय होती. जागा लहानच असल्यामुळे ओसरीला लागून रस्त्यावरच तिला बांधून ठेवीत. रस्त्यावर त्यामुळे शेणामुताचा चिखल होई. रस्ता बरबटून जाई, माशा भणभणत आणि येणारे जाणारे वैतागून वेळप्रसंगी चार शब्दपण सुनावून देत.

घरातलं कामाचं रहाटगाडगं तर न संपणारं असे. म्हणून एकदा कंटाळून श्रीमोटांच्या आईने ठरविलं की हा जास्तीचा उपद्व्याप सांगितलाय कोणी ? सरळ गाय विकून मोकळं व्हावं, तेवढीच प्रपंचाला मदत तरी होईल.

आपला हा निर्णय तिने घरातील सर्वांना सांगितला. कोणी काहीच बोललं नाही. फक्त चुनियाने मात्र विचारलं, "आई, तू म्हणते आहेस की गाय विकून टाकायची, पण त्या गायीच्या जागी मी असतो तर तू मला विकून टाकलं असतंस का ?"

त्याचा हा तिरपागडा आणि पेचात टाकणारा प्रश्न ऐकून आई कावली, करवादली आणि जोरात म्हणाली, "मेल्या, असं

तिरकं बोलायला तुला चांगलं येतं. पण त्या गायीमुळे किती त्रास होतो, किती कामं वाढतात आणि लोकांचे किती शिव्याशाप ऐकायला लागतात याची कल्पना आहे का तुला ?''

आईचं हे बोलणं चुनियाने शांतपणे ऐकून घेतलं आणि परत विचारलं, ''जर गायीची देखभाल करायची आणि साफ-सफाईची जबाबदारी मी घेतली, तर मग गाय विकायचा प्रश्न येईल का !''

''तू जर हे सर्व करणार असशील तर माझी काही ना नाही, पण बोलला आहेस तसं करून दाखव म्हणजे झालं. नाहीतर मी गाय विकून टाकीन,'' आई तंबी देऊन म्हणाली.

''ठीक आहे, ते सर्व आता माझ्याकडे लागलं,'' चुनियाने आत्मविश्वासाने सांगितलं.

दुसऱ्या दिवशी पहाटे उठून त्याने रस्त्यावरचं शेण एकत्र करुन एका कोपऱ्यात त्याचा ढीग केला. कोरडी माती आणून ती त्या साफ केलेल्या रस्त्यावर टाकली. रस्ता आता एकदम स्वच्छ झाला होता.

गायीसाठी घासकडबा विकत आणण्यासारखी घरची परिस्थिती मुळीच नव्हती, म्हणून त्याने त्यावर एक बिनपैशाचा उपाय शोधला होता.

कालोल हे व्यापाराचं गाव होतं आणि आजूबाजूच्या गावातून रोज सकाळी बैलगाड्यांमधून लोक सामानसुमान, भाजीपाला, धान्य इ० विक्रीसाठी बाजारात घेऊन येत. गावाच्या हद्दीपाशी सर्व बैलगाड्या मोकळ्या करून गाडीवान बैलांना खायला चारा टाकीत आणि बाजारात जाऊन कामधंदा, चहापाणी करुन येत. काम झाल्यावर बैलगाड्या परत जुंपून निघून जात.

बैलगाड्या निघून गेल्यावर तिथे बराच चारा पडलेला असे. चुनिया सर्व चारा गोळा करुन, मोळी बांधून आणी, आणि गायीला खाऊ घाली. तिला पाजण्यासाठी, फिरविण्यासाठी तोच घेऊन जाई. कधीकधी तो शाळेतील कुणबी मित्रांच्या शेतात जाऊन हिरवागार चारा कापून आणी, आणि गाईपुढे टाकी.

बोलल्याप्रमाणे त्याने करुन दाखविल्यानंतर गायीविषयी काही बोलायला आईला कधीच संघी मिळाली नाही.

❖

## १५. पितृप्रेम

आशारामजी हुक्का आणि अफूचे व्यसनी होते. हुक्कयाची सवय तेवढी खर्चिक नव्हती पण अफूसाठी मात्र रोजचे चारसहा आणे तरी लागतच !

सुरुवातीस कालोलला रंगाची कामं मिळत होती तोपर्यंत ठीक होतं पण हळूहळू रंगकाम मिळणं दुष्कर झालं आणि पैशांची चणचण वाढू लागली.

एखाद्या वेळी उदास, भकास, निस्तेज चेहऱ्याने वडिलांना ओसरीत बसलेलं पाहिलं की चुनियाच्या लक्षात येई की आज वडिलांना अफू मिळालेली दिसत नाहीये. ते अशावेळी गात्रं शिथिल झाल्याप्रमाणे पडून राहात, जणू जीवन अर्थहीन, नीरसच झालं असावं !

त्यांना असं पाहून चुनियाला अतिशय दुःख होई आणि इकडून तिकडून कसेतरी पैसे मिळवून तो त्यांना अफू आणून देई. नुसत्या अफूने नशा येत नाही, जोडीला गोडधोड खावं लागतं हे माहित असल्याने आपल्या मित्रांच्या दुकानात जाऊन मोतीचूर, जिलबी, हलवा अशी मिठाईपण तो घेऊन येई

आणि वडिलांना देई.

त्यांना असे लाचार स्थितीत पाहून चुनियाला खूप गलबलून येई. वडिलांवर त्याचं अगाध प्रेम होतं. रात्री त्यांच्या बाजूलाच तो झोपत असे. रात्रीबेरात्री त्यांना हुक्कयाची तलफ येई तेव्हा तोच त्यांना हुक्का तयार करून देई. पोराच्या या सेवेने बाप खूश होई आणि हुक्का पीतपीत आणि भजनं म्हणतम्हणत निद्रादेवीस शरण जाई.

कालचक्रानुसार हळूहळू विलायती रंगांचा शिरकाव झाला आणि देशी रंगांना कोणी विचारेनासं झालं. फार छोट्या खेड्यात हे लोण तेवढं पोहोचलं नव्हतं म्हणून अर्थार्जनासाठी 'मलाल' या कालोलजवळच्या गावी जायचं आशारामजींनी ठरविलं आणि ते तिथे राहू लागले.

दिवस वाहत चालले होते.

एकदा चुनियाला आपल्या पित्याची फारफार आठवण येऊ लागली. आईला त्याने विचारलं ''मी मलालला जाऊ ? बाबांची खूपखूप आठवण येतेय गं ! ''त्याचे डोळे वडिलांच्या आठवणीने भरून आले.

पोराची अशी अवस्था पाहून आईने त्याला परवानगी दिली. ''जा, पण लवकर परत ये. शाळा जास्त बुडवू नकोस. आणि हो, जातांना बरोबर देते तो डबा घेऊन जा. ''मेथीचे ढेबरे गाठोड्यात बांधून तिने ते गाठोडं चुनियाच्या हाती दिलं.

मलालला चालत जायचं होतं, गाडीघोड्याचा प्रश्नच नव्हता. आतुरतेने झपाझप पाऊले टाकत तो चालू लागला. आलवा गाव जवळ आलं. भूक सणसणून लागली होती. गावापाशी असलेल्या ओहोळाजवळ बसून त्याने शिदोरी सोडली.

एवढ्यात अचानक झाडीतून चोर धुमकेतुप्रमाणे उगवले. चुनियाचा छोटासाच देह ! तरीही भीती त्याच्यामध्ये प्रवेश करू शकली नाही. चोर आता काय करतात हे तो शांतपणे पाहू लागला.

"ए पोरा, काढ सगळं, तुझ्याकडे जे जे आहे ते !" चोरांनी त्याला दरडावलं.

तो बेडरपणे म्हणाला, "बाबांनो, माझ्याकडे काऽऽही नाही. अंगावरचा झब्बा आहे आणि हे ढेबरे आहेत. पाहिजे तर यातील काही घेऊन जा, पण मला थोडं खाऊ द्या की !"

त्यांनी पाहिलं की इथे तर डोंगर पोखरून उंदीरच निघालाय ! काहीही मारपीट न करता ढेबरे तेवढे घेऊन त्या चोरांनी पोबारा केला.

आता उपाशी पोटीच मलालपर्यंत चालत जाणं भाग होतं. पण उपाशी असणं त्याला का नवीन होतं ?

वडिलांना भेटून मन शांत झाल्यावर तो परत कालोलला आला आणि आपल्या अभ्यासात गर्क झाला.

## १६. व्यसनातून सुटका

वडिल स्वतः अफूचे व्यसनी होते हे तर खरंच, पण आपल्या मुलालाही त्यांनी व्यसनी बनविलं होतं. त्याच्या पितृसेवेवर खूश असलेला तो पिता आपल्या पोराला रोज अफूची छोटी गोळी देत असे. दुपारी मधल्या सुटीत जेवणाच्या वेळी तो ती खाई. हे व्यसन आहे, हा मादक पदार्थ आहे याची कल्पना त्या कोवळ्या पोरास कशी येणार ?

एके दिवशी त्यांनी दिलेली गोळी हरवली आणि अफू न मिळाल्यामुळे वर्गात तो अगदी सुस्त पडला, हवा गेलेल्या फुग्याप्रमाणे ! त्याच्या शरीरातील उत्साह व मनातील हुषारी जणू कोठे हरवली होती. गुरूजींच्या शिकवण्याकडे त्याचं लक्ष लागेना. सोपं उदाहरण तो सोडवू शकेना.

वर्गात सर्वात आधी उत्तर तयार ठेवणारा हा हुषार मुलगा आज असा का वागतोय आणि उदाहरण का सोडवू शकत नाहीये हे गुरूजींना समजेना आणि उदाहरण चुकल्याबद्दल रागाने त्यांनी चुनीलालला शिक्षा केली.

रोजची गोळी न घेतल्यामुळे असं घडलं हे त्याच्या लक्षात आलं . घरी आल्यावर त्याने वडिलांना सारं सांगितलं. ते हसून म्हणाले, ''अरे, एखाद्या दिवशी गणित सुटलं नाही तर रोजच सुटणार नाही असं आहे का ? गोळी न घेतल्याने उदाहरण सोडवता येणार नाही असं कधी होईल का ? घेत जा तू गोळी.''

वडिलांनी सांगितलं खरं, पण त्याला ते पटलं नाही. त्याने खोलवर विचार केला की जर त्या गोळीवरच माझी हुषारी, माझी शक्ती अवलंबून असेल तर ती गोळी मी घेता कामा नये.''

त्या दिवसानंतर चुकूनही अफूच्या गोळीला त्याने स्पर्श केला नाही.

❖

## १७. सत्यप्रियता

श्रीमोटा कालोलला शिकत होते, पण घरची ओढग्रस्त परिस्थिती पाहून त्यांना फार वाईट वाटे. डोळ्यांवर कातडं ओढून बसण्यापेक्षा शिक्षणाला रामराम करून नोकरी करावी

असा त्यांनी निश्चय केला आणि घरी तसं सांगितलं. लाचार मातापित्यांनी संमती दिली.

दुसऱ्या दिवशी आशारामजी त्यांना घेऊन 'गोधरा' येथे गेले. ज्या शेठजींकडे रंगकाम करायला ते जात असत त्यांचं घर आशारामजींच्या कालोल येथील घराजवळच होतं. त्याच शेठजींच्या दुकानात ते चुनीलालला घेऊन गेले. ओळखीमुळे ते पोराला निश्चित कामावर ठेवून घेतील अशी त्यांची खात्री होती.

शेठजींकडे गेले खरे, पण त्यांची इच्छा दिसली नाही. ते म्हणाले, ''सध्या माझ्याकडे नोकराची गरज नाहीये.'' आशारामजींनी आर्जवं केली. चुनीलालपण म्हणाला, ''शेठजी, तुम्ही कोणतंही काम द्या, मी ते चांगल्याप्रकारे करीन. काही दिवस माझं काम पहा आणि मग ठरवा, मला ठेवायचं की नाही ते.''

इतकी गळ घातल्यावर भीडेखातर का होईना त्यांनी त्याला नोकरीवर ठेवलं. सकाळी लवकर उठून चुनीलाल दुकानी येई. फूल, अक्षता, कुंकू दरवाजाला वाहून दुकानास भावपूर्वक नमस्कार करी. मग दुकान उघडून झाडलोट करी. गादीतक्क्याच्या खोळी नि चादरी रोजच्या रोज धुवून, वाळवून एकही चुणी दिसणार नाही याप्रकारे चादरी आंथरून तक्क्यांनाही खोळी चढवी.

त्याच्या अशा भावपूर्वक आणि प्रेमपूर्वक केलेल्या कामामुळे शेठजी प्रसन्न झाले आणि पाच रुपये महिना पगाराची नोकरी पक्की झाली. ही रक्कम त्यावेळी खूप होती !

त्याची हुषारी आणि चटपटीतपणा पाहून धान्य तोलण्याचं जबाबदारीचं काम त्याच्यावर सोपवायचं

शेठजींनी ठरविलं. त्याला जवळ बोलावून स्वतः हातात तराजू घेऊन धान्याचं वजन कसं करायचं ते शेठजींनी दाखविलं. तराजूचा दांडा कसा धरायचा, आणि मणामागे दोनअडीच शेर धान्य जास्त कसं तोलून घ्यायचं ते त्याला दाखविलं.

अशा पद्धतीने काटा मारून जास्त धान्य घेणं हा त्या काळी रिवाजच होता आणि कोणास ते गैर वाटत नसे. गावागावातून लोक धान्य आणीत आणि व्यापारी या पद्धतीनेच त्याचं वजन करीत.

त्याने शेठजींचं सारं ऐकलं, पाहिलं पण काम सुरू केलं ते आपल्या पद्धतीनेच ! योग्य ते वजन करूनच तो शेतकऱ्याकडून धान्य घेऊ लागला. काटा मारून वजन करण्यास त्याच्या सदसद्विवेक बुद्धीने पूर्ण नकार दिला. पोरगा छान काम करतोय म्हणून शेठजी खुशीत होते.

काही दिवस असेच गेले. एके दिवशी तो वजन करून धान्याची रास करीत होता. पण तो काम इतक्या झपाट्याने करीत होता की एका शेतकऱ्याला संशय आला, "पोरगा काहीतरी गोलमाल करतोय !" त्याने आरडाओरड सुरू केली. शेठजी धावतधावत तिथे गेले आणि त्याला विचारलं, "दादा, का ओरडताय ? काय झालं ?"

"शेठजी, हा पोरगा चालाखी करतोय. काटा मारून जास्त धान्य घेतोय, "शेतकरी रागाने म्हणाला.

"नाही दादा, एवढासा पोरगा असं काही करील तरी का ? तुम्हीच उगीच संशय घेत आहात," व्यापाऱ्याने समजूत घातली.

पण या समजूत घालण्याचा उलटाच परिणाम झाला. चलाखी नक्कीच होतेय हा त्याचा संशय अधिकच बळावला आणि त्याचा आवाज अजून वर चढला.

शेवटी लोक जमून अधिक तमाशा होऊ नये म्हणून शेठजी म्हणाले, "ठीक आहे दादा, आपण सगळ्या धान्याचं वजन परत करू. मग तर झालं ?"

सगळ्या धान्याचं परत एकदा वजन करण्यात आलं. वजनात थोडीपण खोट आली नाही. शेतकरी वरमला आणि निमूटपणे निघून गेला.

शेठजींची अब्रू वाचली, पण या प्रसंगामुळे पोरगा आपण सांगितल्याप्रमाणे वजन करत नाहीये हे त्यांच्या लक्षात आलं.

त्यांनी चुनीलालला विचारलं, "काय रे, तुला सांगितलं तसं वजन करीत नाहीयेस का ?"

"शेठजी, वजनापेक्षा जास्त धान्य का घ्यायचं ?" त्याने प्रतिप्रश्न केला.

शेठजी उसळून म्हणाले, "आलाय मोठा दीडशहाणा मला शिकवायला ! तुझ्यासारखा हरिश्चंद्राचा अवतार झालो तर माझं दिवाळंच निघायचं ! अजूनही शहाणा हो आणि मी दाखविल्याप्रमाणेच वजन करीत जा, कळलं का ?"

चुनीलाल शांतपणे म्हणाला, "शेठजी, माझ्याकडून खोटं काम होणार नाही; तुम्ही मला लाख सांगितलंत तरी ते होणार नाही."

अधिकच रागावून शेठजी ओरडले, "बघ, तुला मी शेवटची संधी देतो. मी सांगतो तसंच काम कर, नाहीतर तुला नोकरीवरून काढूनच टाकीन !"

"शेठजी ते जमणार नाही. तुम्हाला कामावर ठेवायचं तर ठेवा, नाहीतर काढून टाका, तुमची मर्जी !" त्याचा निश्चय तसूभरपण ढळला नव्हता.

शेठजींच्या दुकानाचा दरवाजा चुनियाला कायमचा बंद झाला.

❖

## १८. पुढील शिक्षणासाठी पेटलाद

कालोलच्या 'अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूल' मध्ये घन:श्यामराय नटवरराय मेहता नावाचे एक शिक्षक होते. श्रीमोटांचं त्यांच्याकडे नेहमी येणंजाणं असे. त्यांची सटरफटर कामं श्रीमोटा आनंदाने करीत, त्यामुळे त्यांना श्रीमोटांविषयी लोभ आणि आपलेपणा होता.

श्रीमोटांसारखा बुद्धिमान आणि चुणचुणीत मुलगा पुढे शिकण्याऐवजी एका व्यापाऱ्याकडे नोकरीला आहे हे त्यांना पटत नव्हतं, पण श्रीमोटांच्या घरी असलेला खडखडाटही ते जाणून होते, आणि यावर काही तोडगा निघाला पाहिजे अशी त्यांची प्रामाणिक भावना होती.

श्री घन:श्यामराय यांना घरातील लोक 'घनुभाई' या नावाने हाक मारीत. त्यांची मावशी प्रभाबां पेटलादला रहात असे. या प्रभाबांना गरीबांविषयी खूप कणव होती आणि वेळप्रसंगी कोणास पैशांची नड असल्यास त्या शक्य ती मदत करीत. त्यांना जाऊन भेटावं आणि चुनीलालच्या बाबतीत विचारावं असं ठरवून घनुभाई पेटलादला गेले आणि प्रभाबांना म्हणाले, "मावशी, चुनीलालसारखा कामकाजात तरबेज असलेला होतकरू मुलगा कोणाचा आधार मिळाला तर आपलं

शिक्षण पूर्ण करू शकेल. आपण कोणास भाररूप होऊ नये याची काळजी तो निश्चित घेईल आणि सर्वांची मनं आपल्या प्रेमाने जिंकेल हे मी स्वानुभवावरून सांगू शकतो. तू जर 'हो' म्हणत असशील तर मी त्याला इथे घेऊन येईन.''

थोडा विचार करून प्रभाबां तयार झाल्या. मग श्रीमोटांच्या आईवडिलांना भेटून घनुभाईंनी त्यांचीपण संमती घेतली आणि सरतेशेवटी चुनीलाल पेटलादला प्रभाबांकडे शिकण्यास जाणार हे सुनिश्चित झालं.

हे सर्व ऐकून श्रीमोटांना अस्मान ठेंगणं झालं. 'आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन डोळे,' अशी त्यांची स्थिती झाली. शिक्षणाची आणि उदरनिर्वाहाची सोय होत होती आणि आपल्यामुळे आईवडिलांवर पडणारा त्यांचा भारही कमी झाला होता. एक दगडात दोन पक्षी मारले गेले होते !

त्यांच्या आईवडिलांना मात्र पोराची माया तोडणं खूप कठीण गेलं. आपला लाडका चुनिया दूर जाणार हा विचारच त्यांच्या काळजाला घरं पाडीत होता. पण लोकांनी त्यांना समजावून सांगितलं, ''तुम्ही फक्त तुमचा विचार करू नका. त्याच्या भवितव्याचाही विचार करा. शिकण्याची अशी सुवर्णसंधी त्याला परत मिळेल की नाही हे कोणी सांगावं ? जर तो शिकूनसवरून मोठा झाला तर तुम्हाला काय सोडून राहणार आहे का ? 'दैव देतं पण कर्म नेतं,' असं होऊ देऊ नका. हा योगायोग घडवून आणणाऱ्या त्या नियंत्याचे आभार माना आणि पोराला निर्धास्तपणे पाठवा. घनुभाई आणि प्रभाबांना आपण चांगले ओळखतो.ते त्याला घरच्यासारखेच वागवतील. तुम्ही निश्चिंत रहा.''

शेवटी काळजावर दगड ठेवून आणि डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहवत त्या मायबापांनी लाडक्या चुनियाला निरोप दिला. आईवडिलांच्या पायांवर डोकं ठेवल्यानंतर श्रीमोटांचे डोळे डबडबून आले. त्या दोघांची छबी अंतःकरणात अंकित करून जड पावलांनी आणि भरल्या हृदयाने त्यांनी निरोप घेतला.

कालोल सुटलं, आता पेटलाद ! इथं सगळं काही नवीन होतं. गाव, तिथली माणसं, तिथलं वातावरण, घर, शेजारपाजार सर्व काही नवीन होतं. आईवडिलांच्या आठवणीने मन कधी कधी खूप भरून येई... पण श्रीमोटांनी हळूहळू सर्व स्वीकारलं आणि मग ते रुळून गेले. प्रभाबांच आता त्यांची नवी आई झाली होती. त्यांच्या मायेच्या पंखांखाली श्रीमोटा रमून गेले, समरस झाले.

थोड्याच दिवसात पेटलादच्या हायस्कूलमध्ये श्रीमोटांनी पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतला आणि एक नवीन अध्याय सुरू झाला.

❖

## १९. पितृवियोग

पेटलादला आल्यावर थोड्या दिवसातच श्रीमोटा त्या वातावरणात एकजीव होऊन गेले. ऐदीपणे बसून राहणं हा त्यांचा स्वभावच नव्हता. घरातील वडिलधाऱ्या मंडळींना, नोकराचाकरांना इतकंच नव्हे, स्वयंपाक्याला पण ते जमेल ती मदत करीत. मुलांशीही मिळून मिसळून वागत, गोष्टी सांगून त्यांना रमवीत.

प्रभाबांनी पण असं कधीच मानलं नाही की हे परक्याचं पोर माझ्या घरी शिकण्यास ठेवून घेतलंय ! घरातील इतर

मुलांसारखीच वागणूक त्यांना मिळे. त्यांचं खाणंपिणं, कपडेलत्ते यावर प्रभाबां जातीने लक्ष ठेवून असत. यामुळे श्रीमोटांची गाडी हळूहळू मार्गी लागली.

'सोजित्रा'चे ईश्वरभाई पटेल हे पेटलाद हायस्कूलचे हेडमास्तर होते. ते एक आकर्षक व्यक्तिमत्त्व होतं. 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' या म्हणीप्रमाणे ते विद्यार्थ्यांना प्रवेश देतांनाच पारखून घेत. विशेषतः गरीब आणि स्वावलंबी मुलांविषयी त्यांच्या हृदयात खास स्थान होतं. अशा कनवाळू हेडमास्तरांच्या हाताखाली शिकण्याची संधी प्राप्त होणं हे श्रीमोटांचं सद्‌भाग्यच होतं !

घोरपडीप्रमाणे आपल्या ध्येयास घट्ट धरून श्रीमोटांचा अभ्यास जोरात सुरू होता. त्यांची प्रगती पाहून घरच्यांना आणि शाळेतील शिक्षकांना - सर्वांनाच पूर्ण समाधान होते.

दिवस भराभर उलटत गेले आणि कोणाच्याही ध्यानीमनी नसतांनाच, शरीराने आणि मनाने पूर्णतः खचलेल्या आशारामजींनी इहलोकाचा निरोप घेतला. या घटनेने श्रीमोटांच्या कोवळ्या मनावर जणू वज्राघातच झाला. प्रेमळ पित्याचे छत्र हरपल्यावर त्यांचा जीव कासावीस झाला. अंतहीन वाळवंटात एखाद्या अजाण बालकास सोडून द्यावं अशी त्यांची स्थिती झाली.

नियती त्यांची कठोर परीक्षा घेत होती, पण विधीलिखित टाळणं त्यांच्या हाती नव्हतं. वेड्यापिश्या झालेल्या आपल्या आईचे अश्रू पुसून त्यांनी तिला धीर दिला, सांत्वना दिली आणि दुःखाचा सागर पिऊन परत अभ्यासाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली.

या आघाताने काहीकाळ ते खचल्यासारखे वाटले तरी, राखेतून उभ्या राहणाऱ्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे उलट त्यांच्या अंतरी एक जिद्द निर्माण झाली की कसंही करून माझं ध्येय मी गाठीनच, कितीही अडचणींचे डोंगर समोर येवोत, मी ते उल्लंघून जाईनच !

या प्रसंगामुळे त्यांची आत्मशक्ती उलट जागृतच झाली, प्रगट झाली आणि सर्वस्वाने केंद्रित झाली एकमेव ध्येयाकडेच !

नियतीने जरी त्यांचं सर्वकाही हिरावून घेण्याचाच चंग बांधला होता, तरी ते मात्र कधीकधी खोल चिंतनात गढून जात : "सूर्य सर्वांना प्रकाश देतो; वृक्ष छाया देतात, फळं देतात; लतावेली फुलं देतात; फुलं सुगंध देतात; नदी पाणी देते. सारा निसर्ग देतोय भरभरून, आणि मानव ?... तो मात्र फक्त घेण्याचंच काम करतोय. देण्यातला आनंद तो विसरूनच गेलाय. तिजोऱ्यांमध्ये सगळं काही बंद करायचंय सर्वांनाच ! असं का ? हा कलीचा शाप आहे की विज्ञानाचं फळ आहे की मनुष्याचंच अध:पतन आहे ?"

आपण घेण्यासाठी नव्हे तर देण्यासाठी जगायचं, प्रेमपूर्वक जगायचं, भावपूर्वक जगायचं ही खूणगाठ श्रीमोटांनी मनाशी पक्की बांधली आणि समोर येईल ते काम जीव ओतून निरपेक्षतेने आणि प्रामाणिकतेने करायचं हा त्यांच्या स्वभावातील एक विशिष्ट पैलू अधिकच तेजाने लखलखू लागला !

❖

# २०. सेवेचं अनमोल मोल

पेटलादला एक रंगाचे व्यापारी होते. त्यांच्या घरी जानकीदास महाराज नावाचे महात्मा आले होते. शेठजींची महाराजांवर अत्यंत श्रद्धा होती. चर्चा करणं, उपदेश देणं, कथाकीर्तन करणं, हे महाराजांना आवडत नसे. त्यांचं शास्त्रांचंही अध्ययन नव्हतं, परंतु ते एक साधेसरळ आणि खरे संत होते.

श्रीमोटा बऱ्याचवेळा आपली शाळा सुटली की पेटलादला त्यांच्या दर्शनास जात असत. तिथे गेल्यावर झाडलोट करणं, त्यांचे कपडे धुणे अशी जी शक्य असेल ती सेवा ते करीत. महाराज त्यांच्याशी विशेष बोलत नसत आणि तेसुद्धा काहीच विचारीत नसत. "बाळ, तुझं नाव काय ? काय शिकतोस ? कोठे राहतोस ?" अशी जुजबी चौकशी मात्र महाराजांनी एकदोनदा केली होती.

एकदा महाराजांकडे गेल्यावर ते श्रीमोटांना म्हणाले, "बाळ, तुझ्या शरीरास भयंकर असं आजारपण येणार आहे, त्यामुळे तू वेळेआधीच सर्व अभ्यास पूर्ण करून ठेव." श्रीमोटांनी हे ऐकून घेतलं. काहीच बोलले नाहीत. त्यांना खाजगी शिकवणी लावून शिकणं पेलवणारं नव्हतं, त्यामुळे हे तसं अशक्यप्रायच होतं. जे काय व्हायचं असेल ते होवो असं मानून शांत राहणंच त्यांनी पत्करलं.

काही दिवसांनी परत एकदा ते महाराजांकडे गेले असता तिथे बसलेल्या एका व्यक्तीस ते म्हणाले, "गुरुजी, या मुलाकडे जरा लक्ष ठेवा. याच्या सर्व विषयांचा अभ्यास तुम्ही चांगल्या प्रकारे करून घ्या. याला फार दुरून यावं लागत असल्यामुळे ठराविक वेळीच तो येऊ शकेल असं नाही."

"ठीक आहे महाराज, जशी आपली आज्ञा !" ती व्यक्ती अदबीने म्हणाली. ती व्यक्ती म्हणजे शेठजींतर्फे चालविणाऱ्या जाणाऱ्या संस्कृत पाठशाळेचे प्राचार्य होते.

श्रीमोटांनी दोन महिन्यातच त्यांच्याकडून संस्कृत, विशेषतः व्याकरण सखोल शिकून घेतलं. इतर विषयांचा अभ्यास मात्र त्यांनी गाईड्स आणि प्रश्नोत्तरींचे संच यांच्या मदतीने पूर्ण केला.

काही दिवसांनी ते अहमदाबादला मोठ्या भावास भेटायला गेले. आईपण तिथेच होती. जानकीदास महाराजांच्या पूर्वसूचनेप्रमाणे त्यांना खरोखरच तिथे एका जिवावरच्या गंभीर दुखण्याला सामोरं जावं लागलं. बरेच दिवस औषधपाणी सुरू होतं. प्रकृतीस मात्र अपेक्षित उतार पडत नव्हता. शेवटी अशी वेळ आली की ते बेशुद्ध झाले. सर्वांच्या तोंडचं पाणी पळालं. पोरगा हातातून जातो की काय या भीतीने त्यांच्या आईच्या पोटात गोळा उठला.

आजारपणात त्यांना जानकीदास महाराजांचं सतत स्मरण होत होतं आणि त्यांचं दर्शनही अशा बेभान अवस्थेतदेखील होत होतं. ईश्वरकृपेने आणि संतमहात्म्यांच्या आशीर्वादाने आजाराने पळ काढला आणि ते कालोलला परत गेले. जातांना डॉक्टरांनी कडक सूचना दिली होती, "या मुलावर कोणत्याही प्रकारचा शारीरिक वा मानसिक ताण पडता कामा नये. त्यास अभ्यास करू देऊ नका, ते श्रमदेखील त्याला पेलवणार नाहीत." आजारपणाने श्रीमोटांना खूप दुर्बल करून टाकलं होतं यात शंकाच नव्हती !

आजारपणात इतके दिवस वाया गेल्यानंतर आता आपलं हे वर्ष फुकट गेल्यातच जमा आहे असं त्यांना मनोमन वाटलं,

कारण मॅट्रिकची पूर्वपरीक्षा तर कधीच होऊन गेली होती. तरीही ते हेडमास्तरांना भेटायला गेले.

हेडमास्तर श्री. पटेल साहेब यांची श्रीमोटांवर खूप माया होती. इतक्या कठीण परिस्थितीत पोरगा हिंमतीने व स्वावलंबनाने शिकतोय आणि तिमाही, सहामाही परीक्षेत चांगले मार्क्स मिळवतोय म्हणून त्यांना अपार कौतुक वाटे. ते म्हणाले, ''चुनीलाल, तू काही काळजी करू नकोस. तुझी गुणवत्ता मला ठाऊक असल्यामुळे तुझा फॉर्म मी पाठवून दिलाय. तू परीक्षेस बसू शकतोस.'' हे ऐकल्यानंतर त्यांचा आनंद गगनात मावेना.

परीक्षेची वेळ जवळ आली ''परीक्षेपूर्वी अहमदाबादला श्री सरयूदासजी महाराजांच्या दर्शनास जाऊन ये'', ही जानकीदास महाराजांची सूचना त्यांना आठवली आणि त्याप्रमाणे ते त्यांचं दर्शन घेण्यास तिथे जाऊन आले. महाराजांनी त्यांना प्रसन्नतेने 'यशस्वी भव' असा आशीर्वाद दिला.

परीक्षेचे पेपर्स एकामागून एक संपत गेले. त्यांचं शरीर नक्कीच दुर्बल होतं, पण मन खंबीर होतं, अभ्यासाची तयारी होती आणि संतांचे आशीर्वाद पाठीशी होते.

रिझल्ट लागला. गणित, संस्कृत आणि गुजराथीत डिस्टिंक्शन मिळवून ते पास झाले होते. हे ही थोडकं म्हणून की काय, ते शाळेत सर्वप्रथम आले होते.

हेडमास्तरांच्या हस्ते सर्वप्रथम आल्याचं पारितोषिक स्वीकारतांना त्यांचे डोळे अश्रूंनी भरून आले. त्यांना जानकीदास महाराजांचं तीव्रतेने स्मरण झालं, ''आपण त्यांची निरपेक्षतेने आणि खऱ्या भावनेने जी सेवा केली त्याचं फळ त्यांनी अशा प्रकारे दिलं. खरंच, महाराजांनी सुचवलं नसतं आणि पूर्वसूचना

देऊन अभ्यास करवून घेतला नसता तर आपलं नाव कदाचित पास होण्याऱ्यांच्या यादीत दिसलं नसतं. आजच्या भाग्याच्या क्षणामागे आहेत केवळ महाराजांचे आशीर्वाद !''

आपल्या भरल्या डोळ्यांसमोर तरळणाऱ्या जानकीदास महाराजांच्या प्रेमळ प्रतिमेस त्यांनी भावपूर्वक प्रणाम केला.

❖

## २१. हौस फिटली

बडोदा आणि कच्छ संस्थानांचे माजी दिवाण मणिभाई जशाभाई यांच्या घरात श्रीमोटा पेटलादला राहात होते. कुटुंब विशाल होतं आणि कामं अनंत होती. प्रत्येकाला काही न् काही काम सोपवून दिलं होतं आणि तो ते व्यवस्थितपणे पार पाडीत असे.

घरातील दागदागिने सांभाळण्याचं जबाबदारीचं काम श्रीमोटांना अत्यंत विश्वासाने दिलं होतं. त्या दागिन्यांची नावानिशी यादी त्यांनी बनविली होती. ते कोणी नेले आणि केव्हा परत केले याची तारीखवार नोंद ते ठेवीत. त्यामुळे एकदेखील दागिना इकडचा तिकडे होणार नाही याची सर्वांना खात्री असे. त्यांच्या कामातील काटेकोरपणाची आणि नीटनेटकेपणाची ही पावतीच होती !

एकदा तिजोरीतील सर्व दागिने काढून यादीप्रमाणे तपासत असतांना एक अत्यंत देखणी अंगठी त्यांच्या दृष्टीस पडली. त्यांनी ती हातात घेतली आणि सहज चाळा म्हणून बोटात घालून बाघितली, ती बरोबर बसत होती.

''आपल्यासारख्या गरीबाला आयुष्यात अशी अंगठी घालायला मिळणार नाही. आता बोटात घातलीच आहे तर

संध्याकाळपर्यंत ती तशीच राहिली तर बिघडलं कोठे ?'' श्रीमोटांच्या मनात विचार आला आणि अंगठी बोटात तशीच ठेवून बाकीचे दागिने तिजोरीत टाकून ती बंद केली.

घरातील कोणाचंच त्या अंगठीकडे लक्ष गेलं नाही. संध्याकाळी श्रीमोटा बाहेर फिरायला निघाले. रस्त्यात एक परिचित सद्‌गृहस्थ भेटले आणि ख्याली खुशालीच्या गप्पागोष्टी सुरू झाल्या. बोलत असतांना त्यांची नजर श्रीमोटांच्या बोटातील अंगठीकडे गेली.

त्यांच्या चेहऱ्यावरील प्रश्नार्थक भाव श्रीमोटांनी ताडले आणि त्यांनी केलेला मूक प्रश्नही वाचला. ते विचारत होते, ''चुनीलाल, तुझ्या हातात एवढी महाग सोन्याची अंगठी कशी ? चोरली तर नाहीस ना तू ?''

उगाचच श्रीमोटांना अपराध्यासारखं वाटलं. त्यांनी त्या व्यक्तीचा निरोप घेतला.

त्यांच्या मनात विचार आले, ''आपण केवळ सहज घालण्यासाठी अंगठी वापरतोय, पण निष्कारण कोणाचा गैरसमज होत असल्यास ती घालण्याचा अर्थच काय ?'' ते लगेच जवळच्या रस्त्याने घरी गेले.

प्रभाबा बाहेरच बसल्या होत्या. श्रीमोटा त्यांच्याकडे गेले आणि खाली मान घालून गप्पगप्प उभे राहिले. प्रभाबांना आश्चर्य वाटलं, ''याला झालं तरी काय ?''

त्यांनी विचारलं, ''काय रे चुनीलाल, गप्पगप्प आहेस ? काही दुखलं खुपलं का ?''

श्रीमोटांनी मूकपणे मान नकारार्थी हालविली आणि मग दृष्टी वर करून त्यांच्याकडे अपराधी चेहऱ्याने बघत म्हणाले,

"बां, माझं चुकलं, मला क्षमा करा ! मी कोणालाच न विचारता ही अंगठी बोटात घातली, पण केवळ हौस म्हणून ! ती मला चोरायची नव्हती."

सारा प्रकार प्रभाबांच्या ध्यानी आला. त्या हसतहसत हळूवारपणे म्हणाल्या," अरे, घातली तर घातली, त्यात बिघडलं कोठे ? तू का मला परका आहेस होय ? आणि अंगठी तू चोरशील असं मला वाटेल तरी का ? उगाच वाईट मानून घेऊ नकोस आणि अपराधी भाव मनात ठेवू नकोस. जा बघू तुझ्या कामाला."

श्रीमोटांच्या मनावरचा भार हलका झाला आणि ते घरात गेले. त्यांनी अंगठी बोटातून काढली आणि तिजोरीत परत ठेवून दिली.

अंगठी बोटात घालण्याची त्यांची हौस एका दिवसातच फिटली होती.

❖

## २२ मॅट्रीक झालो, पुढे काय ?

ईश्वरेच्छेनेच श्रीमोटांच्या शिक्षणाचा गाडा मॅट्रिकपर्यंत आला होता. "आधीचं शिक्षण झालं कालोलला, मग पेटलादला आणि आता मॅट्रिकनंतर कोठे ? नवीनच प्रश्नचिन्ह निर्माण झालं. त्या प्रश्नचिन्हाला फाटेही बरेच होते : खर्चाचा, राहण्याचा, खाण्यापिण्याचा ! मॅट्रिकच्या परिक्षेपेक्षादेखील हे प्रश्न कठीण होते.

विचार करताकरता त्यांना कालोलच्या एका सद्‌गृहस्थांचं स्मरण झालं. ते बडोदा कॉलेजात 'फेलो' होते. कालोलला असतांना त्यांची काही कामं श्रीमोटांनी केली होती. दोघांना

एकमेकांबद्दल आपुलकी होती, त्यांना भेटल्यास काही मार्ग निघेल असं श्रीमोटांना वाटलं.

बडोद्याला रेसिडन्सी होस्टेलमध्ये त्यांना भेटण्यास श्रीमोटा मग लगेच गेले. योगायोगाने त्यांची भेटदेखील झाली. श्रीमोटांना पाहून त्यांना फार आनंद झाला.

श्रीमोटांनी आपला येण्याचा उद्देश त्यांना सांगितला,'' साहेब, माझी घरची परिस्थिती तर तुम्ही जाणताच. मी मॅट्रीक झालो, पण पुढे सर्व काळोख आहे. पुढच्या सर्व वाटा अंधारात आहेत. कॉलेजात प्रवेश घ्यायचा तर आधी राहण्याची व्यवस्था करावी लागेल. कृपा करुन तुमच्या खोलीत राहण्याची मला परवानगी द्या. खोली नीट ठेवण्याचं काम माझ्याकडे लागलं.''

त्यांनी आनंदाने संमती दिली. ''जरूर रहा. तुझ्या राहण्याने मलापण एक चांगली सोबत मिळेल,'' ते म्हणाले.

राहण्याची सोय झाल्यावर श्रीमोटा पेटलादला गेले आणि आपलं सामान घेऊन परत बडोद्याला आले.

आल्याआल्या त्यांनी खोलीचा कायापालट करून टाकला. साफसफाई करुन, खोलीतल्या वस्तू जागच्या जागी नीट-नेटकेपणाने ठेवून त्यांनी तिला एक नवं रूप दिलं. येणाऱ्याजाणाऱ्यांना थोडावेळ तिथे थांबण्याचा मोह व्हावा असं सौंदर्य तिला प्राप्त झालं.

त्यांनी बडोदा कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. मॅट्रिकच्या परीक्षेत शाळेत सर्वप्रथम आल्याचं जे बक्षिस मिळालं होतं, ते यावेळी कामास आलं.

काही सहृदयी व्यक्तींच्या मदतीमुळे त्यांच्या इतर खर्चाची पण सोय झाली आणि कॉलेजजीवन सुरु झालं.

सुरुवातीस ते कॉलेजच्या मेसमध्ये जेवत, पण तिथला खर्च फार आहे हे त्यांच्या लगेच लक्षात आलं. श्रीमंतांची मुलं शिकण्यास येत असल्यामुळे तिथे मेजवान्या, मिठाया, पक्वान्नं यांचे अवाजवी खर्च असत.

आपल्याला मदत करणाऱ्यांची पै न् पै व्यवस्थितपणे आणि काटकसरीने वापरली गेली पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता, त्यामुळे असा फाजील खर्च करणं त्यांच्या सदसद्-विवेकबुद्धीला पटलं नाही.

पैशांची बचत करण्यासाठी कमी खर्चात भोजनाचा प्रबंध कोठे करता येईल याचा ते विचार करू लागले. त्यांना लहानपणचा एक प्रसंग आठवला, "आईबरोबर बडोद्यातील मांडवी भागात एका वैष्णव हवेलीत आपण प्रसाद भोजन घेतलं होतं."

एकदा उत्तर मिळाल्यानंतर पुढचं काम विशेष कठीण नव्हतं. शोधावं लागलं पण ती वैष्णव हवेली * सापडली. हवेलीच्या मुखियार्जीना भेटून श्रीमोटा त्यांच्या पाया पडले आणि आपली विनंती रूजू केली, "महाराज, मी कॉलेजात शिकणारा विद्यार्थी आहे. हातावर पोट असणारे माझे आईवडिल आहेत आणि केवळ स्वजनांच्या आणि सहृदयी व्यक्तींच्या सद्भावनांमुळे मी शिकू शकत आहे. भोजनावर माझा अवाजवी खर्च होऊ नये म्हणून मला तुमच्याकडे रोज भगवंताचं प्रसाद-भोजन घ्यायची इच्छा आहे. तुम्ही मला कृपा करून रोज एक पत्रावळ देत जाल तर मी तुमचा फार ऋणी होईन !"

श्रीमोटांच्या हृदयातील उत्कटता मुखियार्जीना स्पर्शून गेली आणि ते राजी झाले.

---

* वैष्णवांचे मंदिर

अतिशय रुचकर, स्वच्छ आणि शुद्ध तुपातलं प्रसादभोजन श्रीमोटांना केवळ दीड आण्यात मिळू लागलं. मात्र 'रेसिडेन्सी होस्टेल' पासून ही हवेली जवळजवळ तीन मैल दूर होती पण त्याचा श्रीमोटांना बाऊ वाटला नाही.

एवढं अंतर चालण्यासाठी लागणाऱ्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी त्यांनी एक नामी शक्कल शोधून काढली. होस्टेलमधून लवकर उठून फुटपाथवर चालताचालता पुस्तकं वाचतवाचत ते एवढं अंतर पार करीत, हवेलीत येत, स्नान करीत, प्रसादभोजन घेत आणि मग तसेच परत जात, त्याच पद्धतीने !

कॉलेजचं एक सत्र या प्रकारे पार पडलं. नंतर मात्र चुनीलालचा द्राविडी प्राणायाम करुन भोजन करण्याचा हा प्रकार प्रभाबांना कळला आणि आपल्या लाडक्या मुलास तंबी देऊन त्यांनी हा प्रकार बंद करविला. त्यास होस्टेलवरच जेवण घेता येईल अशी व्यवस्था त्यांनी करून दिली. प्रभाबां यांना श्रीमोटा आपली आध्यात्मिक आई मानीत असत. तिचा शब्द मोडणे त्यांना शक्य झाले नाही. शेवटी प्रेमाचाच विजय होतो ना !

❖

## २३. संगदोष

'रेसिडेन्सी होस्टेल'मध्ये पेटलादच्या नागर ज्ञातीतील काही विद्यार्थी होते. त्यांनी सर्वांनी एक 'टी क्लब' स्थापन केला होता. त्यात आळीपाळीने सर्वजण चहा बनवीत, परंतु घरी पाण्याचा ग्लास उचलायलादेखील ज्यांच्याकडे नोकर असत अशा त्या मुलांना हे काही जमेना.

श्रीमोटांना सर्वजण ओळखत होते म्हणून एकदा त्या सर्वांनी त्यांना विनंती केली, "चुनीलाल, तू आमच्या 'टी क्लब'चा कारभार हाती घे. हे झेंगट आम्ही पेलू शकत नाही. तू जर आमच्यांसाठी एवढं केलंस तर आम्हीपण तुला शक्य ती सर्व मदत करीत जाऊ."

कोवळ्या वयात गरम विटा उचलणारे, भाताजी रोपं लावणारे श्रीमोटा – त्यांना एवढ्याशा कामाचं काय वाटणार? त्यांनी आनंदाने होकार दिला.

मग त्या सर्वांना वेळेवर आणि नियमितपणे झकास चहा मिळू लागला. कपबशा, भांडी वेळच्या वेळी धुतली जाऊन आपापल्या स्थानी गेलेली दिसू लागली. पोरं एकदम खूश झाली. बोलल्याप्रमाणे ती त्यांना मदत करू लागली. अधूनमधून सिनेमाला गेल्यास ते मित्र श्रीमोटांनापण बरोबर घेऊन जात.

एरवी जागरूक असणाऱ्या श्रीमोटांमध्ये मित्रांच्या या संगदोषामुळे हळूहळू सिनेमा पाहण्याची चटक निर्माण झाली. मित्रांच्या पैशांवर ते सिनेमा पाहात इथपर्यंत ठीक होतं, पण हळूहळू स्वतःच्या पैशांनीदेखील ते सिनेमा पाहू लागले. एकदा असेच एकटे असतांना त्यांना सिनेमाला जायची अनिवार इच्छा झाली. दारूड्या माणसाला दारू मिळाली नाही तर तो जसा अस्वस्थ होईल, तशीच त्यांची स्थिती झाली. पैसे तर खिशात नव्हते, करायचं काय ?

पैशांची कशी सोय करावी याचा विचार करताकरताच अनपेक्षितपणे—समुद्राच्या पाण्यातून देवमाशाने तोंड वर काढावं, त्याप्रमाणेच— एक विचार उसळून वर आला, "चुनीलाल, तुला जी मदत मिळते आहे ती तुला शिकायला मिळते की चैनीखातर

उडवायला ? मदत करणाऱ्या त्या साऱ्यांच्या भावना पायदळी तुडवून, सद्भावनांचा चक्काचूर करून पैसे मातीमोल करायला तुला लाज नाही वाटत ? आजपर्यंत बरेच चोचले पुरवलेस तू नेत्रसुखाचे, हे सिनेमे पाहून ! आतातरी जागा हो !''

त्यांच्या अंतरीच्या विवेकाने त्यांना एक सणसणीत चपराक दिली होती, डोळ्यात अंजन घातलं होतं.

नंतर मित्रांनी बऱ्याचवेळा त्यांना सिनेमाला येण्यासाठी आग्रह केला, पण जागरूक असलेल्या श्रीमोटांनी त्यांना ठामपणे परंतु नम्रतेने नकार दिला आणि पुन्हा ते मोहात अडकले नाहीत.

❖

## २४. बडोदा कॉलेज सोडलं

बडोदा कॉलेजमध्ये श्रीमोटांचं शिक्षण जोमाने सुरू झालं. पहिलं आणि दुसरं वर्ष पूर्ण करून त्यांनी 'ज्युनिअर बी.ए.' ला प्रवेश घेतला.

कॉलेजातील मित्रमंडळीत, प्राध्यापकांत, आप्तजनांत - सर्वांमध्ये ते सुपरिचित होते, स्नेहपात्र, प्रीतीपात्र होते. 'एक हुषार विद्यार्थी' असा नावलौकिक त्यांना प्राप्त झाला होता.

श्रीमोटांची प्रगती पाहून सर्वांनाच खात्री होती की आपलं ध्येय ते निश्चितपणे गाठतीलच ! खूपखूप शिकून उच्चाधिकारी व्हायची आपली मनीषा श्रीमोटा विसरले नव्हते. आईवडिल पण त्याच आशेवर डोळे लावून बसले होते. पण भविष्याच्या वाटेवर काय दडून आहे हे कोणीच जाणू शकत नाही, पाहू शकत नाही, सांगू शकत नाही; काळच ते व्यक्त करतो आपल्या वर्तमानक्षणांतून - अनेपक्षितपणे, अनाहूतपणे ! आणि अगदी तसंच घडलं !

१९२०-१९२१चे दिवस आले. 'रौलट ॲक्ट'चा अन्याय आणि जालियानवाला बाग हत्याकांड यामुळे सारा देश हादरून गेला, सुन्न झाला. ब्रिटिश सरकारची ही क्रूरता पाहून गांधीजींनी सरकारविरूद्ध सत्याग्रह जाहीर केला.

त्यांनी सरकारी नोकरांना आवाहन केलं, 'तुम्ही नोकऱ्यांचे राजीनामे द्या'; वकीलांना सांगितलं, 'कोर्ट कचेऱ्यांचा त्याग करा'; विद्यार्थ्यांना सांगितलं, 'सरकारी कॉलेजं बाहिष्कृत करा';जनतेस आदेश दिला, 'विदेशी मालावर बहिष्कार टाका.'

याप्रमाणे गांधीजींची बाहिष्काराची एक जंगी लढत सुरू झाली. मग बऱ्याच जणांनी सरकारी नोकऱ्या सोडून दिल्या, कितीतरी वकीलांनी कोर्टकचेऱ्यांचा त्याग केला, गावोगावी विदेशी मालाच्या होळ्या पेटल्या.

देशात एवढी प्रचंड उलथापालथ सुरू असतांना आणि वातावरण एवढं झंझावाती असतांना डोळ्यांना झापडं लावून बसून राहणं श्रीमोटांना शक्य नव्हतं. काळपुरुषाच्या खोपडीत देशासाठी सर्वच बांधव आपापला भोग देत असतांना स्वस्थ बसून राहणं श्रीमोटांच्या पुरुषार्थाला शक्य नव्हतं, मान्य नव्हतं !

बडोदा कॉलेज सोडण्यास सर्वप्रथम तयार झाली दोन मुलं : एक, श्रीमोटा आणि दुसरा, पांडुरंग वळामे !

आईवडिलांना, नातेवाईकांना आणि स्नेही-आप्तजनांना त्यांचा हा निर्णय ऐकून धक्का बसला. यापासून त्यांना परावृत्त करण्याचा सर्वांनी खूप प्रयत्न केला.

त्यांनी विचारलं, ''तुम्ही हे काय करीत आहात ? तुम्ही तुमच्या कुटुंबाकडे पहा, गरीबीत घालविलेल्या दुःखकष्टाचं स्मरण करा, मामलेदार व्हायच्या आपल्या ध्येयाचा विचार

करा ! आगीत उडी घेण्याचा विचार करू नका !!''

पण भारतमाता त्यांना साद देत होती, ''तू तुझ्या एकट्याची गरीबी पाहू नकोस, आपल्या कुटुंबाची गरीबी पाहू नकोस; आपल्याला कोणा एकाचीच नव्हे, एका कुटुंबाचीच नव्हे, तर साऱ्या भारतदेशाची गरीबी दूर करायची आहे ! बलिदानाशिवाय काहीच मिळत नाही हे नीट स्मरणी असू दे. ''

कोणाच्याही विरोधाची पर्वा न करता श्रीमोटांनी गांधीजींचं आवाहन स्वीकारून आणि भारतमातेचा करूण आक्रोश ऐकून बडोदा कॉलेजला रामराम केला आणि अहमदाबादमध्ये पू. गांधीजींच्या प्रेरणेने सुरू झालेल्या गुजराथ विद्यापीठात ते दाखल झाले.

देशसेवेच्या वेदीवर उभं राहून आपलं बलिदान देण्यास श्रीमोटा सज्ज झाले होते.

❖

## २५. स्वावलंबनाने उच्च शिक्षण

गुजराथ विद्यापीठात श्रीमोटांनी प्रवेश घेतला खरा पण आता पूर्वीसारखी सहृदयी व्यक्तींकडून मदतीची अपेक्षा करणं गैर होतं. त्यांच्या अपेक्षांना तडा गेल्यावर जीवननौकेचं सुकाणू स्वतःच्याच हाती घेणं भाग होतं. तशी मानसिक तयारी करूनच त्यांनी बडोदा कॉलेज सोडण्याचा निर्णय घेतला होता.

आता श्रीमोटांना सर्वच 'अ, आ, ई,' पासून सुरू करावं लागणार होतं. खाण्यापिण्याचा, राहण्याचा खर्च निभावेल असा पुरुषार्थ करणं ही तातडीची बाब होऊन बसली.

'असेल माझा हरी, तर देईल खाटल्यावरी' म्हणत, बसून न राहता त्यांनी तत्कालीन दोन मार्ग शोधून काढले. एक–

'नवजीवन'च्या अंकांची विक्री आणि दुसरा-विद्यापीठाची साफसफाई आणि झाडलोट !

इतर कोणाला हे झाडलोट करण्याचं काम देण्यापेक्षा स्वावलंबनाची कास धरणाऱ्या श्रीमोटांना देणं विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी आनंदाने मान्य केलं.

गांधीजींचं 'नवजीवन' हे साप्ताहिक त्याकाळी दर रविवारी विक्रीस येत असे. शनिवारी संध्याकाळी एक रुपयास सोळा प्रती या हिशोबाने श्रीमोटा बऱ्याचश्या प्रती घेऊन येत आणि गल्लीबोळ ढवळून काढीत 'गांधीजींचं नवजीवन', गांधीजींचं नवजीवन' असं ओरडत त्याची विक्री करीत. अत्यंत लोकप्रिय असल्यामुळे प्रती भराभर खपत. एका प्रतीमागे एक पैसा सुटत असे. 'नवजीवन'च्या विक्रीची किंमत पाच पैसे होती.

अंक विक्रीतून मिळालेल्या रुपयाबारा आण्यात आठवड्याचा जेवणाखाण्याचा खर्च श्रीमोटा भागवीत. बचत व्हावी म्हणून स्वतः स्वयंपाक बनवीत. बऱ्याचवेळा दिवसातून एक वेळच जेवण घेणं शक्य होई. कधीकधी तेवढेदेखील पैसे नसल्यास चणेमुरमुरे खाऊनसुद्धा दिवस काढण्याची पाळी येई. शहरात नातेवाईकांची घरं खूप होती आणि गेल्यास कोणीही प्रेमाने नक्कीच पोटभर जेवू घातलं असतं,पण त्यात शोभा नव्हती.

गुजराथ कॉलेजसमोरील चाळीतील पहिल्या खोलीत त्यांची राहण्याची व्यवस्था होती. सात पैशात एकएक दिवस, स्वकष्टाच्या कमाईचं अन्न खाऊन, श्रीमोटा स्वाभिमानाने गुजराण करू लागले.

कोणतंही काम करण्यास श्रीमोटांना कधीच लाज वाटली नाही वा संकोच झाला नाही. स्वाभिमान राखून कष्टाचे चार पैसे मिळविण्यासाठी केव्हाही, कोठेही आणि कसलंही काम करण्याची त्यांची लहानपणापासूनच तयारी होती.

कॉलेज सुरू होतं, अभ्यासही सुरू होता आणि वातावरण गांधीजींच्या विचारांनी, प्रभावांनी, तसेच आव्हानांनी भारलेलं होतं.

अशातच एकदा गांधीजींनी विद्यार्थ्यांना संबोधून भाषण दिलं, ''मला तर वाटलं होतं की तुम्ही कॉलेज सोडून गावात जाल, त्यांना समजावून द्याल, समाजात नवीन प्राण-चेतना निर्माण कराल. पण तुम्ही तर एका डिग्रीचा मोह सोडून दुसऱ्या डिग्रीचा मोह जिवंतच ठेवला आहे. ज्ञान आणि जागृतीची मशाल गावागावात नेण्यातच तुमच्या तारुण्याचं सार्थक आहे.''

गांधीजींचं हे मर्मभेदी आवाहन ऐकून श्रीमोटांनी गावांमध्ये जायचं ठरवलं, 'स्वराज्य आश्रम'च्या गिडवाणीजींच्या हाताखाली सराव प्राप्त करून 'भरुच' जिल्ह्यातील 'वागरा' या अत्यंत मागासलेल्या तालुक्यात ते कार्य करण्यासाठी गेले.

तिथे अडचणी अनंत होत्या. एक पैसापण खर्चायला मिळत नसे, न टपालाला, न प्रवासाला ! ते गेले खरे, पण मनासारखं काही झालं नाही आणि विद्यापीठात परत येणं श्रीमोटांनी स्वीकारलं.

प्रवेश घेण्यासाठी त्यांना नव्याने परीक्षा द्यावी लागली. विद्यापीठाने मागितलं ते सरदार वल्लभभाई पटेल यांचं 'अमुक अमुक ठिकाणी काम केलं आहे' असं सर्टिफिकेटसुद्धा त्यांनी आणून दिलं आणि रीतसर प्रवेश मिळवून श्रीमोटांनी परत

पुस्तकांमध्ये डोकं खुपसलं.

बी. ए.ची डिग्री प्राप्त होण्यास जेमतेम तीनचार माहिनेच राहिले असतील नसतील तेव्हा परत पू. गांधीजींचं विद्यापीठात भाषण झालं, ''देश पेटून उठला आहे आणि तुमच्याने थंडपणे बसून अभ्यास करणं शक्य कसं होतंय ?''

एखाद्या तीरासारखे हे शब्द श्रीमोटांच्या हृदयात सूंऽऽ सूंऽऽ करीत शिरले आणि त्यांनी डिग्री प्राप्त करण्याच्या मोहरूपी पक्ष्याचा वेध घेतला.

देशकार्यासाठीच प्राणपणाने जोडलं जावं या उर्मीने त्यांनी कॉलेजकडे कायमची पाठ फिरवली आणि नडियादला इंदूभाई याज्ञिक यांच्याबरोबर हरिजन सेवा कार्याशी ते संलग्न झाले.

आफ्रिकेतील कंपाला शहरात गलेलठ्ठ पगाराची शिक्षकाची नोकरी आणि पॅरीसला तशीच आकर्षक नोकरी, अशा दोन नोकऱ्या करण्याचं आमिष त्यांच्याकडे चालून आलं, पण हातात गंगाजल घेऊन देशसेवेसाठीच गरजेपुरत्या पगारातच जीवन घालविण्याची प्रतिज्ञा घेतलेल्या श्रीमोटांनी त्याकडे ढुंकूनही पाहिलं नाही.

हरिजन आश्रमात, हरिजन सेवेत त्यांनी स्वतःला सर्वस्वाने झोकून दिलं.

अशाप्रकारे गुजराथमध्ये हरिजन कार्याची सुरुवात नडियादपासूनच झाली, नडियादमध्येच पहिल्या हरिजन शाळेचा मुहूर्त झाला आणि इथेच पहिला हरिजन आश्रम झाला.

पुढे प्रचंड विस्तारणार असलेल्या वटवृक्षाचं बीज पेरलं श्रीमोटांनीच आणि फुलविलंही त्यांनीच !

❖

## २६. "एवढा पगार घेणं योग्य ?"

श्रीमोटांचे ज्येष्ठ बंधू जमनादास भगत यांना यासुमारास क्षयाची बाधा झाली. घरात कमावणारे ते एकुलते एक, आणि त्यांनीच अंथरूण धरल्यावर कुटुंबाचा आणि आजारपणाचा असा दुहेरी खर्च श्रीमोटांच्या अंगावर येऊन पडला. सुदैवाने त्यांना त्याचवेळी एक, हरिजन शाळेचं व दुसरं, हरिजन आश्रमाचं – अशी दोन कामं मिळाली होती. त्यामुळे दोघांचं वेतन मिळत असे आणि कसाबसा खर्चाचा गाडा रेटला जात असे.

एवढ्यात गांधीजींकडून त्यांना अकल्पितपणे बोलावणं आलं. कशाकरिता त्यांनी बोलावलं असावं हे एक कोडंच होतं आणि ते तिथे गेल्यावरच सुटणार होतं. श्रीमोटांना गांधीजींपाशी नेण्यात आलं तेव्हा गांधीजींची दहा मिनिटे आराम करण्याची वेळ होती. ते श्रीमोटांना म्हणाले, "मी दहा मिनिटे झोपतो, नंतर आपण बोलू."

ते बिछान्यावर पहुडले आणि पडल्यापडल्या एका क्षणात झोपी गेले. श्रीमोटा हातात पंखा घेऊन त्यांना वारा घालीत बसले.

बरोबर दहा मिनिटांनी गांधीजी उठले.

"बापू, हेच ते चुनीलाल भगत आपण बोलावल्यानुसार ते आले आहेत." श्रीमोटांचा परिचय करून देण्यात आला.

त्यांनी श्रीमोटांकडे पाहिलं. त्यांना आश्चर्य वाटलं. एवढं कोवळं वय आणि तरीही देशसेवेत झोकून दिलंय स्वतःला ! त्यांना कौतुकही वाटलं आणि आनंदही झाला. "मी सांगितलेलं लोकांच्या हृदयाला स्पर्शतंय नक्कीच, म्हणून तर असं तरुण रक्त देशासाठी शरीराचा, इच्छा–आकांक्षांचा, संसाराचा, भौतिक ध्येयांचा त्याग करायला सज्ज झालंय !"

आपल्या विचारांना बांध घालीत, थोडंसं गंभीर होत गांधीजींनी श्रीमोटांना विचारलं, "एवढ्या तरुण वयात तुम्ही सेवाकार्य करीत आहात ही आनंदाची गोष्ट आहे, पण आपल्या गरीब देशात गरीबांच्या सेवेचं व्रत ज्याने स्वीकारलं आहे त्याला एवढा जास्त पगार देणं योग्य आहे का ? आणि त्यानेही तो घेणं योग्य आहे का ?"

बापूंकडे आपल्याला का बोलावण्यात आलं असावं याची उलगडा श्रीमोटांना लगेच झाला. "आपण दोनदोन कामं करून एवढा पगार घेतोय ही गोष्ट आपल्याच सहकाऱ्यांच्या डोळ्यात खुपतेय आणि त्यांनीच हे बापूंपर्यंत पोहोचवलंय. पण, आपण पैसे कमवायला, चैनीखातर हे करीत आहोत का ? घरचा खर्च, भावाच्या आजारपणाचा खर्च याची तोंडमिळवणी व्हायला हवी ना ? नाही, आपण निश्चित चुकत नाहीये...!" विचारांमध्ये ते हरवून गेले.

ते गप्पगप्पच आहेत हे पाहून गांधीजींनी परत छेडलं, "मी काय विचारलं याकडे तुमचं लक्ष दिसत नाहीये !"

श्रीमोटा चमकून भानावर आले. थोडंसं ओशाळून ते म्हणाले, "अं हं, तसं नाहीये ! क्षमा करा, मी जरा विचारात गुंतलो होतो."

निर्व्याजपणे हसत गांधीजी म्हणाले, "काही हरकत नाही, बोला !"

श्रीमोटा थोडं भावनावश होऊन म्हणाले, "बापू, घरी आम्ही लहानमोठी मिळून एकंदर सात माणसं आहोत. माझा मोठा भाऊ हरिजनसेवेचं कार्य करताकरता क्षयाने आजारी पडला आणि बऱ्याच दिवसांपासून आणंदला डॉ. कुक यांच्या

मिशन हॉस्पिटलमध्ये बिछान्याला खिळून आहे. माझी आई आणि वहिनीपण फार परिश्रम करताहेत. मला उदरनिर्वाहासाठी दुसरा आधार नाहीये... बापू, मला जर पैसेच कमवायचे असते तर मी शिक्षण असं अर्धवट सोडलं नसतं, डिग्री घेऊन ऑफिसर होऊन खोऱ्याने पैसा ओढू शकलो असतो ! पण...'' श्रीमोटा बोलायचे थांबले. त्यांच्या डोळ्यात पाणी तरळलं.

मुलगा फारच भावनावश झालेला पाहून गंभीर होत बापूंनी विचारलं, ''ठीक आहे, पण एवढ्या लहान वयात दोनदोन कामं करतांना तुम्ही थकत नाही ? जबाबदारीचं ओझं वाटत नाही ?''

श्रीमोटा स्वतःला सावरून धीटपणे म्हणाले, ''बापू, विल्यम पिट वयाच्या चोविसाव्या वर्षीच इंग्लंडचा पंतप्रधान झाला होता !''

ते गप्प झाले, गांधीजींच्या डोळ्यात रोखून पाहू लागले. जणू ते मूकपणे विचारत होते, ''बापू, आजपर्यंत ही दोनदोन कामं मी करून दाखवली आहेतच ना ?''

त्यांचं उत्तर ऐकून गांधीजी कौतुकाने हसले. ''एवढं लहान वय, पण समज किती ! आत्मविश्वास किती !! जिद्द किती !!! माझ्यासमोर बोलतांना अजिबात चाचरत नाहीये की बिचकत नाहीये ! विल्यम पिट...''ते आपुलकीने, मायेने श्रीमोटांकडे पाहात होते. त्यांनी श्रीमोटांना जवळ बोलावलं बाजूला बसवलं, पाठ थोपटली आणि म्हणाले, ''मला आनंद होतोय की तुमच्यासारखे निष्ठावान कार्यकर्ते मला मिळालेत ! तुम्ही सेवेत स्वतःला केवढं सर्वस्वानं अर्पण केलंय ! मला तुमचा अभिमान आहे. तुम्ही खूप मोठे व्हाल !''

नंतर थोडंसं गंभीर होत ते म्हणाले, ''कितीही झालं तरी शेवटी नीती-नियम आपल्याला स्वतःला पाळायला हवेत. आपण ठरवून दिलेली चाकोरी आपणच मोडू शकत नाही. तसं केलं तर मागचे पण तोच मार्ग अनुसरतील. तुमचं सर्व म्हणणं जरी खरं असलं तरी एकाच माणसाने दोनदोन कामं करणं आपल्या संकेतात बसत नाही.''

ते एकदम गप्प झाले, विषयाचा निवाडा केल्याप्रमाणे !

श्रीमोटांनी बापूंच्या चरणी प्रणाम करून त्यांचा निरोप घेतला.

एकूण कोणतं तरी एक काम सोडावं लागणार हे आता सूर्यप्रकाशाइतकं स्पष्ट दिसत होतं. पण त्यांना त्याची खंत नव्हती. ''ज्या ईश्वराने आधी ही दोन कामं दिली होती, त्याच ईश्वराने एक काम काढून घेतलं तर त्यात निश्चित काही हेतु असेलच, माझं हितच असेल त्यात ! मुशीत तापविल्याशिवाय नाहीतरी सोनं शुद्ध होत नाहीच, कसदार होत नाहीच !'' परत येतांना श्रीमोटांच्या मनात विचार आले.

त्यांच्या अंदाजाप्रमाणे नंतर त्यांना रीतसर सुचविण्यात आलं, ''त्यांनी एक काम पसंत करावं आणि दुसरं सोडावं.''

त्यांनी हरिजनशाळेचं कार्य स्वीकारलं.

याविरुद्ध लढण्याचं, परत प्रयत्न करण्याचं कोणीतरी त्यांना सुचवलं.

पण त्यांना ईश्वराविरुद्ध लढायचं नव्हतं. त्यांच्या लेखी बापू हेच ईश्वर होते. त्यांचा शब्द अंतिम होता, आणि तो योग्यच असेल यात शंका घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता !

❖

## २७. "मुलं म्हणजे काय शेळ्यामेंढ्या ?"

१९१९ साल सुरू झालं. सरकारने 'काळा कायदा' केला. त्याविरुद्ध देशभर झंझावती वातावरण तयार झालं. गावोगाव पत्रकं निघाली, सभा भरविण्यात आल्या. 'काळा कायदा मुर्दाबाद'च्या नाऱ्यांनी गावं दणाणून गेली. आबालवृद्ध, स्त्रीपुरुष त्वेषाने म्हणत होते :

"नहीं रखनी, नहीं रखनी
सरकार जालीम नहीं रखनी !"

प्रत्येक गावात, शहरात प्रभातफेऱ्या निघू लागल्या. पू. गांधीजी, पंडित जवाहरलाल नेहरु, दासबाबू, लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद यासारख्या नेत्यांच्या जयजयकाराने लोकांमधील आत्मशक्ती जागृत झाली.

डॉ. ॲनी बेझंट त्यावेळी महासभेच्या प्रमुख होत्या. त्यांनी 'होमरूल लीग'ची स्थापना केली आणि साऱ्या देशात सरकारविरूद्ध चळवळ सुरू केली.

अशा या ॲनी बेझंट एकदा नडियादला येणार होत्या. निरनिराळ्या संस्थांना, कार्यक्रमांना, सभांना त्यांच्या भेटीच्या वेळा नियोजित झाल्या होत्या. त्यांत श्रीमोटांनी देखील हरिजन शाळेच्या भेटीची वेळ घेतली होती.

अनेक संस्थांमध्ये जायचं असल्याने जर वेळेवर व आटोपशीर आयोजन असलं तरच पुढच्या कार्यक्रमास वेळेवर जाणं संभवनीय होतं. दुर्दैवाने तसं झालं नाही आणि उशिराने उशीर वाढतच गेला.

श्रीमोटांच्या हरिजन शाळेसाठी संध्याकाळची वेळ मुक्रर होती. शाळेतील सर्व विद्यार्थी व श्रीमोटा आतुरतेने मॅडमची

वाट पहात होते. एका इंग्रज स्त्रीने देशाचं सुकाणू हाती घेतलं होतं आणि इंग्रजांना हाकलण्यासाठी ती त्वेषाने पुढे आली होती. अशी मर्दानी महिला हरिजन शाळेत येणं हे बालकांचं सद्‌भाग्यच !

वाट पाहूनपाहून शाळेतील मुलं शेवटी कंटाळली. संध्याकाळ टळून रात्र व्हायला आली तरीही मॅडमचं आगमन झालं नव्हतं. श्रीमोटांपुढे धर्मसंकट निर्माण झालं. मुलांना थांबायला सांगावं तर तो जुलूम होतोय, करावं काय ?... शेवटी त्यांनी विचार केला की ॲनी बेझंटना याबद्दल समजावता येईल पण मुलांना डांबून ठेवणं उचित नाही. त्यांनी मुलांना मोकळं केलं. सर्व मुलं आपापल्या घरी निघून गेली.

थोड्या वेळातच स्थानिक लोक, कार्यकर्ते, यांच्यासमवेत ॲनी बेझंट यांचं आगमन झालं. पाहतात तर शाळेत मुलं नव्हती !

काही स्थानिक कार्यकर्त्यांनी विचारलं, ‘‘भगत, तुम्ही मुलांना का अडवलं नाही ? त्यांना जाऊ का दिलंत ? तुम्हाला तर माहीत होतं की मॅडम येणार आहेत !’’

‘‘मी काय करू ? तुम्ही दिलेल्या वेळेपेक्षा फार उशिरा आलात. मुलांना मी कसा डांबून ठेवणार ?’’

ॲनी बेझंट हे सर्व ऐकत होत्या. त्यांच्याकडे वळून श्रीमोटा म्हणाले, ‘‘विचारा मॅडमना, की तुम्ही जर वेळ पाळू शकत नसाल, तर त्याची शिक्षा मुलांना का ? मुलं म्हणजे काय शेळ्यामेंढ्या आहेत की ज्यांना कोंडवाड्याप्रमाणे वर्गात डांबून ठेवावं ?’’

ॲनी बेझंट समजूतदार होत्या. आपणच येण्यास उशीर केला आहे याची जाणीव त्यांना होतीच ! त्या श्रीमोटांना

हसून म्हणाल्या, “तुमचं म्हणणं एकदम रास्त आहे, तुम्ही योग्य तेच केलंत. मुलांना कोंडून ठेवणं अन्यायाचं झालं असतं.”

❖

## २८. उपद्रवी मुलांना अद्दल

नडियादमध्ये हरिजनशाळेच्या आसपास मुसलमानांची बरीच वस्ती होती. शाळेची वेळ झाली की मुसलमानांची चारपाच गुंड मुलं शाळेच्या जवळपास फिरत रहात आणि शाळेतील मुलांना त्रास देत.

अरबट चरबट बोलणं, शिवीगाळ करणं, हाऽऽ हाऽऽ हीऽऽ हीऽऽ' करणं, अशा निरनिराळ्या प्रकारांनी ती त्या हरिजन बालकांना सतावीत. शाळेतील मुलांच्या बऱ्याच तक्रारी श्रीमोटांकडे आल्यावर याचा सोक्षमोक्ष लावून टाकावा असे ठरवून ते त्या उद्दंड मुलांच्या आईवडिलांना भेटले आणि ‘आपल्या मुलांना समजावून सांगा आणि समज द्या’ असं त्यांना निक्षून सांगितलं.

या भेटीनंतर तर ती मुलं अजूनच शेफारली. आपल्याला अडविणारं कोणीच नाही असं त्यांच्या मनाने घेतलं आणि अचानक केव्हाही येऊन मुठी भरभरून धूळ वर्गात टाकून ती पळून जाऊ लागली.

मग श्रीमोटा त्या परिसरातील उर्दू शाळेतल्या बऱ्याच मुसलमान शिक्षकांना भेटले आणि त्यांच्याकडे तक्रार केली शिवाय त्यांच्या काझीसाहेबांना भेटून त्यांनादेखील वस्तुस्थितीची जाणीव करून दिली.

एवढे सगळे शांततापूर्ण मार्ग अवलंबिले तरीही त्या मुलांच्या

वर्तणुकीत किंचितमात्रही फरक पडला नाही, तेव्हा आता मात्र त्यांना इंगा दाखविलाच पाहिजे, भीमटोला दिलाच पाहिजे हे श्रीमोटांनी ठरवलं. आपल्या पुरुषार्थाला हे आव्हान आहे असंच त्यांना वाटलं.

काय करायचं याची योजना निश्चित झाली. त्या आडदांड मुलांना सूर्याची पिल्लंच दिसावीत अशी तिची आखणी झाली. त्याचे दूरगामी परिणाम काय होतील याचाही श्रीमोटांनी साकल्याने विचार केला आणि एके दिवशी ते दरवाजामागे हातात जाडजूड सोटा घेऊन उभे राहिले.

नेहमीप्रमाणे ती टारगट मुलं आली आणि आता मुठीतील धूळ ती वर्गात टाकणार, तेवढ्यात श्रीमोटा झटकन् बाहेर आले आणि त्या तीनचार पोरांवर लांडग्याप्रमाणे तुटून पडले. हा प्रसाद मिळताच त्यांची पार दाणादाण झाली आणि ते पळून गेले.

घरी जाऊन त्या मुलांनी आपल्या आईवडिलांना घडलेलं सर्व तिखटमीठ लावून सांगितलं. त्यामुळे ते सर्वजण संतप्त होऊन गोळा झाले आणि त्या मुसलमान स्त्रीपुरुषांचं टोळकं शाळेच्या दाराशी येऊन ठेपलं.

मामला गंभीर झाला होता. अशा स्फोटक परिस्थितीत काहीही घडू शकलं असतं. वातावरण एवढं चिघळेल याचा श्रीमोटांना अंदाज आला नव्हता. "आता काय करावं ?" त्यांना काही उमगेना. ते क्षणभर डोळे मिटून स्तब्ध झाले. अचानक त्यांना जाणवलं की जणूकाही, कोणी त्यांच्या हृदयात आदेश देत होतं, "अंगावरचे सर्व कपडे काढून टाक आणि त्यांच्या समोर निर्भयतेने उभा रहा."

आज्ञा मिळताच पटकन श्रीमोटांनी त्याचं पालन केलं. भराभर अंगावरील लंगोटी व्यतिरिक्त सर्व कपडे त्यांनी काढून टाकले, आणि त्या टोळक्यासमोर जाऊन उभे राहिले. सर्व मुसलमान त्यांच्या या लोकविलक्षण आणि अकल्पित कृतीने स्तब्ध झाले.

श्रीमोटा त्यांना म्हणाले, "त्यांना मला मारायचे असेल त्यांनी खुशाल मारावं. पहा ! मी एकदम उघडाबंब आहे, त्यामुळे तुम्हाला व्यवस्थित मारता येईल.

"तुमची मुलं इतके दिवस त्रास देत होती, शिवीगाळ करत होती, वर्गात धूळ टाकत होती आणि या निरुपद्रवी हरिजन बालकांना सतावीत होती. आमच्या लाख सांगण्या-समजावण्याचा तुमच्यावर काहीच परिणाम झाला नाही. मुलांचे आईवडिल, त्यांचे शिक्षक, तुमचे मुल्ला, काझी या सर्वांनीच त्याकडे दुर्लक्ष केलं. आम्हीपण सहन तरी किती करणार ? प्रत्येक गोष्टीला मर्यादा असतेच ना ? अशा स्थितीत मी जर असं पाऊल उचललं तर यात गैर ते काय ? तुम्हीच न्याय करा आणि जर माझं काही चुकलं आहे असं वाटत असेल तर खुशाल मारा ! माझी 'ना' नाही."

त्यांच्या या सरबत्तीने ते सारेजण आणखी ढेपाळले. सुरुवातीचा त्यांचा जोश ओसरला आणि चूक आपल्या मुलांचीच आहे याची त्यांना पूर्णतः जाणीव झाली.

ते सर्वजण शांत झाले. एवढंच नव्हे तर त्यातील काहीजण उलट श्रीमोटांना म्हणाले, "भगत, तुम्ही जे काही केलंत ते योग्यच केलं ! आमच्या सांगण्या-समजावण्यास देखील ही मुलं जुमानत नव्हती. तुम्ही त्यांची चामडी नरम केल्यामुळे आतातरी ती सुधारतील आणि हूडपणा सोडतील. परत यांनी

अशी दंगामस्ती केलीच तर तुम्ही त्यांना बेशक तुडवा ! आम्ही काहीही बोलणार नाही.''

साऱ्या प्रकरणला एकदम कलाटणी मिळाली आणि शांत झालेले ते मुसलमान पांगून हळूहळू आपापल्या घरी निघून गेले.

त्यानंतर शाळेतील मुलांना कधीच त्रास झाला नाही आणि शाळेचं कामकाज सुरळीतपणे चालू लागलं.

श्रीमोटांचा येण्याजाण्याचा रस्ता त्या मुसलमानांच्या वस्तीतूनच होता. ते येताजाता बरोबर चणेमुरमुरे ठेवीत आणि त्यां द्वाड मुलांना जवळ बोलावून खाण्यास देत व त्यांच्याशी गोड बोलत. हळूहळू ती मुलं जुनं सर्व विसरून गेली आणि श्रीमोटांशी त्यांची मैत्री झाली.

प्रेमभावनेच्या बळाबर त्या मुलांमध्ये परिवर्तन होऊन त्यांच्यातील त्रास देण्याचा दुर्गुण लोप पावला आणि ती एकदम शांत झाली.

❖

## २९. ज्ञातीबाहेर ?

श्रीमोटांच्या हरिजनसेवेचं कार्य जेव्हा सुरू होतं तो काळ कर्मकांड, शिवाशिवीच्या चिखलाने बरबटलेला होता. माणसासारखाच माणूस असलेल्या दीनदुबळ्या, अशिक्षित हरिजनांना सवर्णांमध्ये मिसळण्याची, त्यांच्यात उठबस करण्याची, त्यांच्याबरोबर खाण्यापिण्याची बंदी होती. त्यांचा स्पर्श झाला तर सवर्ण स्नान करीत आणि त्याचं तोंड पाहिलं तर अपशकुन मानीत, एवढंच नव्हे तर त्याची सावली अंगावर पडली तरी भ्रष्ट झाल्याचं मानीत, असा तो काळ होता.

अशी हाड्हूड्, असं कुत्र्यामांजरासारखं लाजिरवाणं जिणं समाजाने त्यांच्या माथी मारलं होतं आणि त्यांचा काहीही अपराध नसतांनादेखील त्यांना दलित, अस्पृश्य मानून अज्ञान, अंधःकार, उपेक्षा, दारिद्र्य, दुःख, कष्ट यांच्या दरीत फेकून देऊन सवर्ण आपलं मोठेपण सिद्ध करू पहात होते आणि ईश्वरानेच निर्माण केलेल्या मानवतेस काळिमा फासत होते.

अशा हरिजनांमध्ये मिळूनमिसळून वागून त्यांच्यातीलच एक बनून राहणारे श्रीमोटा त्यांच्या ज्ञातीतील लोकांच्या टीकेचे लक्ष्य बनले आणि ते लोक नाराजी प्रगट करू लागले.

श्रीमोटा मात्र 'आपण भलं की आपलं काम भलं', या वृत्तीने सेवा आणि कर्मसाधना करीत होते. कोणाच्याच टीकेची, निंदेची त्यांनी पर्वा केली नाही.

''हरिजनांना दिल्या जाणाऱ्या या अन्याय्य वागणूकीत सुधारणा होऊन समजदार हिंदूंनी तरी त्यांच्यात मिळून-मिसळून वागावं आणि त्यांच्यात आत्मविश्वास अणि धैर्य निर्माण होण्यासाठी प्रेमपूर्ण चार शब्द बोलावेत,'' अशी भावना पू. गांधीजींनी आपल्या 'नवजीवन'मध्ये व्यक्त केली होती.

या सूचनेमुळे प्रेरणा घेऊन नडियादमध्ये सवर्ण आणि हरिजनांसाठी एक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आलं. त्यात सहभागी होण्यासाठी तेव्हाचे नेते गोकळदास बापू आणि फूलचंद बापूजी शाह पण आले होते. संमेलनाचे आयोजक होते श्रीमोटा !

संमेलन यशस्वीपणे पार पडलं. सवर्ण आणि हरिजन बंधुभगिनी एकाच बैठकीवर बसले, मिळूनमिसळून वागले आणि त्यांनी एकमेकांना पुडीतून सुक्यामेव्याचा प्रसाद दिला, घेतला. यथोचित भाषणे होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

या पार पडलेल्या संमेलनाने नडियादमध्ये प्रचंड खळखळ माजली. त्यात सहभागी होणाऱ्यांना, फार मोठा गुन्हा केला असल्याप्रमाणे, ज्ञातीबाहेर काढण्यात आलं. इतरजनांचं तर ठीक, पण खुद्द गोकळदास बापू आणि फूलचंद बापूजींना देखील ज्ञातीबाहेर काढण्यात आलं.

श्रीमोटांवर पण अशीच कारवाई करावी अशी धुसफूस त्यांच्या ज्ञातीतपण सुरू झाली.

त्यावेळी नडियादमध्ये गोदडियास्वामींचा (स्वामी प्रकाशा-नंदजींचा) विशेष प्रभाव होता. त्यांच्या बैठकीत हा विषय निघाल्यावर ते म्हणाले, "आपला हिंदूधर्म कसा आहे ? आणि आज आपला काय करीत आहोत ? तुम्ही सर्वजण इथे माझ्याकडे जमलात, मिळूनमिसळून वागलात, स्पर्श केला तर तुम्हाला कोणी ज्ञातीबाहेर काढतंय का ? मग त्या हरिजनांचाच अपवाद का ? जातीभेद निर्माण करणारा आहे मनुष्य, न की ईश्वर ! या भेदबुद्धीने, जातीभेदानेच आपलं सर्वांचं, समाजाचं आणि हिंदुधर्माचं नुकसान झालं आहे !"

सर्वांवर स्वामीजींच्या वाणीचा प्रभाव पडला आणि आकाशातले ढग विरून जाऊन ते निरभ्र व्हावं तद्वत श्रीमोटांना ज्ञातीबाहेर काढण्याचे विचार विरून गेले.

❖

# ३०. सेवाव्रत

श्रीमोटांनी सेवेचा मार्ग स्वीकारला तो केवळ स्वतःच्या समाधानासाठी ! अंतरीच्या हाकेला प्रतिसाद देऊनच त्यांनी सेवा स्वीकारली. कोणास खूश करणे ह्रा उद्देश नव्हताच !

सेवेचं व्रत म्हणजे तारेवरची कसरत ! नव्हे तलवारीच्या धारेवरून वाटचाल !! कोणाचे राग-लोभ, निंदा-स्तुती, ईर्षा-द्वेष, लाभ-हानी, स्वास्थ-अस्वास्थ्य, ऊन-पाऊस — कशाचाही विचार न करता, दुबळेपणास थारा न देता तैलधारावत निष्कामतेने कार्य करीत रहायचं हेच त्या पांथस्थाचं काम असतं !!!

हे कार्य करीत असतांना ज्यांच्या सोबतीने कार्य करायचं अशा ज्येष्ठ सहकाऱ्यांनी आपल्याशी लढा दिला, आपल्याला तोंडघशी पाडलं तरी ती अग्निपरीक्षा मानून पुढेपुढे जात रहायचं ही श्रीमोटांची धारणा होती.

कुटुंबाकडे लक्ष देऊनच त्यांची ही कर्मसाधना सुरू होती. मोठ्या भावास क्षयाची बाधा होऊन रोग आटोक्याबाहेर जाऊ लागल्याने, त्या परिस्थितीत, झेपत नसूनही, नाईलाजाने त्याला 'मिशन हॉस्पिटल'मध्ये दाखल केलं होतं. क्षय हा त्याकाळी 'राजरोग' मानला गेला होता. अशा भयंकर रोगाने भावाचं शरीर पार पोखरून गेलं होतं.

भावाची कमाई बंद झाल्यावर सहासात जणांच्या पालनपोषणाचा खर्च, घरखर्च आणि हॉस्पिटलमधील औषधपाण्याचा खर्च — असा तिहेरी बोजा आपल्या अवघ्या पन्नास रूपये पगारात भागविण्याची कसरत श्रीमोटांना करावी लागत होती. त्यामुळे घरखर्चाला हातभार लागावा म्हणून,

त्यावेळी योगायोगाने सुरू असलेल्या तुरीच्या डाळीच्या गिरण्यांमधून तुरीची डाळ निवडण्यासाठी ते घरी घेऊन येत.

दुपारी कामाच्या रगाड्यातून मुक्त झाल्यावर आई व वहिनी ती डाळ निवडण्याचं काम करीत आणि त्यातून मणामागे पाचसहा पैसे या हिशोबाने दिवसाकाठी रूपयाएवढी मजुरी मिळत असे.

कसाबसा कुटुंबाचा गाडा रेटला जात होता.

या पराकोटीच्या अटीतटीच्या संघर्षमय स्थितीमुळे श्रीमोटा कधीकधी विचलीत होत, उदास होत.

"गरीबी दूर करण्याच्या मिषाने पैसे कमाविण्याची वृत्ती निर्माण होऊ नये म्हणून आपण हातात गंगाजल घेऊन केवळ देशसेवा करण्याचं व्रत अंगीकारलं. त्यातून मागे फिरता येत नाही आणि या जबाबदाऱ्याही पेलवत नाहीत, जमाखर्चाची आकडेमोड पूर्णच होत नाही ! तोंड तरी कसं द्यायचं या साऱ्याला ?" श्रीमोटांपुढे बऱ्याचवेळा केवळ प्रश्न असत ! प्रश्नच प्रश्न !! न सुटू शकणारे प्रश्न !!!

या प्रश्नांच्या भोवऱ्यात ते अगदी तळाशी जाऊन पोहोचले तरी श्रीमोटांचा निर्धार दृढ होता, "ज्या देशसेवेसाठी मी कॉलेज सोडलं, डिग्रीचा मोह सोडला, भौतिक सुखं लाथाडली, ती सेवा मी सोडणार नाही. कितीही अडचणींचे डोंगर येवोत, मी ते पार करीनच !"

देशसेवेच्या वेदीवर उभं राहून त्या यज्ञात आपली आहुती देण्याचा त्यांचा निर्धार वज्रलेप होता.

❖

## ३१. "हरिसी भजता...."

कशाचाही उपयोग न होता शेवटी श्रीमोटांच्या भावाने रोगजर्जर कायेचा त्याग केला. आधीच असलेल्या दुःखात, कष्टात शोकाचीही भर पडली. उदासीनतेच्या छायेने सारं घर काळवंडून गेलं.

भाऊ गेला, पण जातांना कर्जाचा प्रचंड बोजा मागे ठेवून गेला. भावाने बऱ्याच जणांकडून गूपचूप पत्रं पाठवून पैसे घेतले होते हे समजल्यानंतर तर श्रीमोटांना प्रचंड मानसिक धक्का बसला.

ते शाळेत ज्या रस्त्याने जात, त्या रस्त्याला लागूनच त्यांची एक मावशी रहात असे. भावाने तिच्याकडून थोडेथोडे करून साडेसातशे रुपये घेतले होते. मावशीची आर्थिक स्थिती उत्तम होती, म्हणून तिने ही रक्कम त्याला कर्जाऊ दिली होती.

एवढी डोंगराएवढी रक्कम कोठून द्यायची याचं भूत श्रीमोटांच्या मानगुटीवर होतं.

ते रोज सकाळी सातच्या सुमारास घरातून चहा पिऊन निघत आणि रस्त्याने भजनं गातगात शाळेत जात.

"दीनानाथ तू दयाळु नटवर, हात माझा सोडू नको !", "जीवननौका तुझ्याच हाती, सांभाळुनि मजला नेई रे !"... आणि अशीच वेगवेगळी भजनं म्हणत ते आपल्याच धुंदीत, जगास विसरून चालत जात.

एके दिवशी याप्रमाणे जात असतांना त्यांना अचानक हाक ऐकू आली, "ए चुनीलाल, थांब !"

श्रीमोटांनी आवाजाच्या दिशेने मान वर केली. मावशी आपल्या घराच्या खिडकीत उभी होती.

"काय मावशी ?" त्यांनी विचारलं.

जरा रागावूनच मावशी म्हणाली, "माझे पैसे देऊन टाक लवकर. किती दिवस होऊन गेलेत !"

ते अजीजीने म्हणाले, "देईन हं मावशी. मी खरोखर तुझी पै न् पै चुकती करीन."

उत्तर देऊन ते चालू लागले. हे उत्तर तर दिलं पण पैसे कोठून आणायचे या प्रश्नाचं उत्तर मात्र त्यांच्याकडे नव्हतं.

परत एकदा ते शाळेत जात असतांना मावशीने हाक मारली. ती काय विचारणार आहे त्यांना कळलं, तरीही त्यांनी विचारलं, "काय मावशी, काय काम आहे !"

मावशी कटु स्वरात म्हणाली, "मेल्या, सर्व काही माहीत आहे, तरी विचारतोस ?"

"थोड्याच दिवसात देईन हं, "ते खाली मान घालून म्लानपणे म्हणाले आणि चालू लागले. नेहमीनेहमी ही बोलणी, घरचा कर्जाचा डोंगर यांच्या विचारांनी त्यांचं चित्त हल्ली थाऱ्यावर नसे. वाटे, काय अर्थ आहे या जगण्यात ! गरीबीने पिचणाऱ्याला अशी न सुटणारी कोडी देव का घालतो ?

मावशीने विचारालं आणि त्यांनी 'देईन देईन' सांगावं असं अजून एकदोनदा झालं.

एके दिवशी मावशीचा राग अनावर झाला. "आज येऊ दे तर त्याला, अशी फटकारते की बघ ! नुसताच 'देईन देईन' म्हणून चालढकल करतोय. देता येत नसतील तर घेतले कशाला ? पैसे काय झाडाला लागतात ?"

रागाने आतल्या आत खदखदत मावशी रस्त्यावर उभी होती.

थोड्या वेळाने नेहमीप्रमाणे भजनं म्हणत श्रीमोटा तिथे आले आणि मावशीने त्यांचा हात गच्च पकडून त्यांना थांबविलं. कर्कश्श्य आवाजात ती वाग्बाण चालवू लागली, "ए चुनीलाल, आज शेवटचं सांगतेय तुला. बऱ्या बोलाने देऊन टाक माझे पैसे, नाहीतर माझ्यासारखी वाईट मीच ! मेल्याला भजनं गायला तेवढी येतात, ढोंगं आहेत सगळी ! एवढा देवदेव करतोस तर माझे घेतलेले पैसे देत का नाहीये ? मेल्या, माझे पैसे वसूल केल्याशिवाय मी तुला सोडणार नाही."

रागाच्या भरात आपण काय बोलत आहोत याचीही मावशीला शुद्ध नव्हती. तिचा आरडाओरडा ऐकून रस्त्यावर लोकांची गर्दी जमली. सकाळची वेळ आणि भाजीबाजाराचा दिवस असल्यामुळे रस्ता गजबजलेला होता. हा फुकटचा तमाशा पहायला सर्वजण या दोघांभोवती घोळका करून उभे होते.

खालच्या मानेने श्रीमोटा मावशीचे हे जिव्हारी लागणारे बोल ऐकत होते. तिच्या शब्दांनी त्यांच्या हृदयाला घरं पडत होती. अशी मानहानी, अपमान होण्यापेक्षा सीतेप्रमाणे धरती दुभंगून तिच्या पोटात सामावून जावं असं त्यांना वाटलं. "हे परमेश्वरा, काय वेळ आणलीस माझ्यावर ? काय उत्तर देऊ मी ? कसे देऊ पैसे ? कोणाकडे मागू ? कळवळून ते भगवंताला प्रार्थना करू लागले.

मावशीच्या पाया पडून ते रडतरडत म्हणाले, "मावशी, देईन मी सर्व पैसे, अगदी लवकरच देईन !" कसंबसं हे बोलून ते शाळेच्या दिशेने पाय ओढत चालू लागले आणि भजन म्हणून परमेश्वरास गाऱ्हाणं घालू लागले.

आज त्यांच्या भजनात पिळवटून टाकणारी आर्तता होती.

"हरिसी भजता अजुनि कुणाची,
लाज गेली, जाणिली नाही रे !..."

"हे भगवंता, तू प्रल्हाद, द्रौपदी, मीरा, नरसी सर्वांची लाज राखलीस, त्याप्रमाणे माझ्याही मदतीला धावून ये आणि आपलं ब्रीद राख, नाहीतर तुझ्या नावाला काळीमा लागेल रे!" श्रीमोटा स्वतःच एक प्रार्थना झाले होते आणि भक्ताची नव्हे तर त्या परमेश्वराचीच परीक्षा होती.

शाळेच्या कामात श्रीमोटांचं अजिबात लक्ष लागलं नाही. घरी परत आल्यावर काहीही खाल्ल्याविनाच तळमळत ते रात्रभर प्रार्थना करीत राहिले, आसवं गाळीत राहिले.

अशा व्यग्र मानसिक अवस्थेत काही दिवस गेले आणि एक दिवस सकाळी पोस्टमनने एक रजिस्टर्ड पाकीट श्रीमोटांच्या हाती ठेवलं. एका अनामिकाने त्यांना साडेसातशे रुपये पाठविले होते, जेवढे मावशींना द्यायचे होते बरोबर तेवढेच !

आनंदाने नाचतनाचत ते मावशीच्या घरी गेले आणि सर्व पैसे सुपूर्द केले.

पैसे मिळाल्यावर पण मावशीने तारे तोडलेच ! म्हणाली, "मेल्या, रस्त्यात तुझी एवढी अब्रू काढली म्हणून ते पैसे दिलेस, नाही तर तू काय देणार होतास ? पैसे होते तरी नाहीयेत म्हणत होतासच ना ?"

श्रीमोटांनी काही उत्तर दिलं नाही.

डोक्यावरचं मणामणाचं ओझं दूर होऊन त्यांचं मन हलकं फुलकं झालं होतं. त्यांची लाज राखणारं ते भजन

कौस्तुभमण्याप्रमाणे तेजाने लखलखत शोभत होतं त्यांच्या भजनमालिकेच्या हारात !

❖

## ३२. जीवनदान

मावशीचं देणं फिटल्यामुळे भार हलका झाला तरी अजूनही बऱ्याच जणांचे हिशोब चुकते करायचे होते. ''सर्वांना देणं असलेल्या या पैशांची सोय कशी करायची ? व्रतस्थ असल्यामुळे मोठी नोकरी करणंही शक्य नाही. पगाराची रक्कम घरखर्चाला पण पुरत नाही म्हणून त्यातून शिल्लक ठेवून, जमा करून देणी फेडणंही शक्य नाही. मग करायचं तरी काय ?''

या प्रश्नांच्या आणि विचारांच्या चक्रव्यूहात अडकल्यावर श्रीमोटांचा जीव कासावीस होई, मस्तकाच्या शिरा ताणल्या जात, आत कोणी घणाने घाव घालतंय असा भास होई, शरीराचे स्नायु अन् स्नायु ताणले जात.

या तणावाचं प्रमाण हळूहळू वाढत गेलं आणि त्यातूनच 'फिट्स' येण्याचा आजार त्यांना जडला.

या 'हिस्टेरिकल फिट्स' कधी येतील हे सांगता येत नसे. कधीकधी चालताचालता ते फिट्समुळे खाली कोसळत, तर कधी शाळेत शिकवत असतांना त्रास होई.

कामानिमित्त कोठे जायचे असले तर त्यासाठी श्रीमोटा सायकल वापरीत आणि बऱ्याचवेळा फिट्समुळे सायकलवरून पडत. सगळं सामान रस्त्यावर विखुरलं जाई. अंगावरच्या झब्ब्याच्या खिशात कधीकधी शाळेचे, आश्रमाचे पैसेदेखील असत, पण कधीही काही विपरीत घडलं नाही. देवासारखं कोणी धावून येई आणि त्यांचं सामान गोळा करून त्यांना

शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करीत राही. आणि ते शुद्धीवर आल्यावर मगच निघून जाई.

फिट्सचं प्रमाण वाढून अगदी पराकोटीला गेल्यावर मात्र ते हताश झाले. त्यांच्या मनात विचार आले, "देशी-विदेशी इतकी औषधं केली तरीही गुण आला नाही. आता या आजाराचा शेवट करण्याचा एकच मार्ग आहे. नर्मदामातेला या शरीराचाच भोग देऊन टाकावा ! सर्व शरणागतांना ती सामावून घेते तशीच मलापण कुशीत घेईलच !"

निश्चय पक्का केल्यावर नर्मदाकिनारी जाऊन तेथे एक उंच टेकडी पाहून तिच्यावर ते चढले आणि नदीच्या बाजूस असलेल्या टोकावर जाऊन उभे राहिले.

धीरगंभीर नर्मदेचं पात्र संथपणे वहात होतं. तिच्याकडे पहात मनोमन तिला वंदन करून एका क्षणात आपला देह त्यांनी खाली झोकून दिला.

त्यांच्या देहाला थंडगार पाण्याचा स्पर्श झाला आणि नंतर मात्र अघटित घडलं. पाण्यातून वावटळीप्रमाणे एक लाट उसळली आणि तिने त्यांच्या शरीरास उचलून पार त्या टेकडीच्याही पलीकडे दूरवर फेकून दिलं.

पाण्यात उसळलेल्या त्या झंझावाती लाटेत श्रीमोटांना अत्यंत रूपवान, दैदिप्यमान, तेजस्वी, सालंकृत अशा स्वरूपात नर्मदामातेचं दर्शन झालं. अद्‌भुत, अवर्णनीय आणि शब्दातीत असं ते दर्शन होतं.

जमिनीवर आदळल्यानंतर त्यांची शुद्ध हरपली. नेमका त्याचवेळी एक साधु तिथे आला आणि त्यांना उचलून तो आपल्या स्थानी घेऊन गेला.

थोड्या वेळाने ते शुद्धीवर आले. नर्मदामातेच्या अद्‌भुत दर्शनाचं त्यांना पुनस्स्मरण झालं.

ते विचार करू लागले, ''आपला निर्णय ठाम असूनही नर्मदामातेने आपल्याला जीवनदान दिलंय. निश्चितच प्रभुकृपेने या शरीराचं काही प्रयोजन असावं.''*

''खरं म्हणजे भावनेच्या प्रवाहात वाहवून, वैफल्याने ग्रासून, असं करण्याचा प्रयत्न करून, मी कशापासून पळू इच्छित होतो ? रोगापासून, कुटुंबियांपासून, जगापासून की स्वतःपासून ?''

चुकीच्या निर्णयाला बळी पडून आत्मघातकी .निर्णय घेऊनही आपल्याला नवजीवन देणाऱ्या त्या करुणाकर ईश्वराच्या या अतर्क्य लीलेनं श्रीमोटांचं हृदय भरून आलं.

नर्मदामाता जणू त्यांना सांगत होती, ''बाळा, तू परत जा. अजून तुला जगासाठी जगायला हवं. धीर सोडू नकोस. परिस्थितीला तोंड दे, तरच तू माझा सुपुत्र शोभशील. माझ्या मायेची पाखर तुझ्यावर आहेच ! कणखर हो आणि वाटचाल कर. या जगात शाश्वत काहीच नाही, ना सुख ना दुःख, ना आजारपण ना स्वास्थ्य ! कधीतरी हे प्रारब्धभोग संपतीलच आणि उज्ज्वल यश तू प्राप्त करशीलच ! जा, तुला माझा आशीर्वाद आहे !''

एका नव्या उमेदीने आणि नव्या उत्साहाने सळसळत श्रीमोटा घरी परतले.

वादळाच्या तडाख्यात वाट चुकलेला पक्षी घरट्यात परत आला होता !... पंखांत नवीन बळ घेऊन आला होता !

❖

---

* "By His Grace, I am meant for something."

# ३३. नामस्मरण हेच औषध

नर्मदा तीरावरून श्रीमोटांना आपल्या स्थानी नेऊन त्यांची काळजी घेणाऱ्या त्या साधुमहाराजांचं स्थान सूरपाणेश्वरच्या धबधब्याजवळ रम्य आणि शांत ठिकाणी होतं. 'मोखडी' घाटाजवळ रणछोडजींचं मंदिर होतं, तिथेच त्या महात्म्याचा निवास असे.

नेमक्या त्याच दिवशी आणि त्याचवेळी त्या खडकाजवळ येऊन उभ्या राहणाऱ्या त्या साधूस कदाचित तसा पूर्वसंकेत मिळाला असावा.

ते शुद्धीवर आल्यावर साधुमहाराजांनी त्यांना विचारलं, "बाळ, कशासाठी तू हे जीवन संपवू पहात होतास ? एवढं कसलं दुःख आहे तुला, की ज्याने गांजून जाऊन तू हे अविवेकी कृत्य करण्याच्या भरीस पडावं ?"

आपली सर्व कहाणी श्रीमोटांनी त्यांना सविस्तर सांगितली आणि फिट्स येण्यामुळे आलेलं नैराश्य हेच त्याला कारणीभूत होतं हे पण सांगितलं.

साधुमहाराजांनी त्यांना थांबवून ठेवलं आणि तीन दिवस त्यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवलं. त्या तीन दिवसात श्रीमोटांनी त्यांचीदेखील मनःपूर्वक खूप सेवा केली.

त्या तीन दिवसांच्या दरम्यान चारपाच वेळा श्रीमोटांना परत फिट्स आल्या तेव्हा त्या साधुमहाराजांनीच त्यांची जिवापाड काळजी घेतली.

तीन दिवसांनी परत जाण्यापूर्वी साधूमहाराजाचं दर्शन करतेवेळी त्यांनी श्रीमोटांना विचारलं, "बेटा, सांगितलं तर एक करशील ? ते केलं तर तुला फिट्स येणं हळूहळू बंद होऊन जाईल आणि तू पूर्ण बरा होशील."

"जी, बापजी !" दोन्ही हात जोडून विनयाने श्रीमोटा म्हणाले.

साधुमहाराजांनी सांगितलं, "हे बघ ! रोगमुक्तीसाठी तुला औषधपाण्याची काहीच गरज नाहीये ! तू केवळ 'हरिः ॐ'चा जप कर. भावपूर्वक आणि प्रेमपूर्वक नामस्मरण कर. त्यानेच तुझा रोग जाईल. एका वर्षानंतर तुला तुझ्या सद्‌गुरूंचं दर्शन होईल आणि ते तुझ्या जीवनाचा विकास घडवून आणतील !"

श्रीमोटांच्या निरपेक्ष सेवेने संतुष्ट झालेल्या त्या साधु महाराजांनी त्यांच्या डोक्यावर हात ठेवून हृदयपूर्वक आशीर्वाद दिला. साधुमहाराजांना प्रमाण करून श्रीमोटा घरी येण्यासाठी तिथून निघाले.

"महाराजांनी एखादी जडीबुटी दिली असती तर कदाचित माझा विश्वास बसला असता, पण केवळ नामस्मरणानेच हा रोग जाईल ?" परतीच्या वाटेवर असलेल्या श्रीमोटांच्या मनाने शंकेचं भूत उभं केलं.

त्यावेळी श्रीमोटांची दोन मोठी श्रद्धास्थानं होती. एक, पू. गांधीजी आणि दुसऱ्या प्रभाबां. त्यामुळे या दोघांना विचारून खात्री करून घ्यावी असं त्यांनी ठरविलं.

पू. गांधीजींना पत्र लिहून त्यांनी विचारलं, "बापू, मला फिट्सचा त्रास होतो आणि नर्मदातीरावरील एका साधूने नामस्मरणाने हा रोग बरा होईल असं सांगितलंय. हे खरं आहे का ?

उत्तरादाखल गांधीजींनी लिहिलं, "भगवंताच्या नावात प्रचंड शक्ती आहे. त्याच्यासाठी अशक्य असं काहीच नाही. तू श्रद्धेने नाम घे. तुझा रोग निश्चित बरा होईल."

त्यानंतर बडोद्यास गेले असतांना त्यांनी प्रभाबांना पण नामजपासंदर्भात विचारलं. त्यांनीही गांधीजींच्या उत्तरास अनुमोदन दिलं.

बडोद्यास असतांना परत एकदा त्यांना फिट्सचा ॲटॅक आला आणि जिन्यावरून गडगडत ते पार तळाशी आले. शरीर सोलपटून निघालं आणि थोडंफार रक्तही आलं.

पडल्यानंतर थोड्या वेळाने शुद्धीवर येतात न येतात तोच त्यांना नर्मदातीरावरील त्या साधुमहाराजांचं दर्शन झालं. ते श्रीमोटांना म्हणाले, "अरे ! भगवंताचं नामस्मरण करून तर बघ ना ! प्रयोग करून बघायला तुझं काय जातंय ?"

या दर्शनाविषयी प्रभाबांना सांगताच त्यांना फार आनंद झाला. त्या म्हणाल्या, "चुनिया, तू फार भाग्यवान आहेस. तू आत्तापासूनच नामस्मरण सुरू कर. तुझा रोग बरा होईलच अशी माझी मनोदेवता मला सांगते आहे."

आता मात्र आपण नामस्मरण सुरू केलं पाहिजे हे श्रीमोटांच्या अंतरी पक्कं रूजलं आणि सतत "हरिः ॐ" च्या स्मरणात डुंबून राहण्यासाठी ते प्रयत्नशील राहू लागले. नामाचा ओघ वाढत गेला आणि नव्या शक्तीने, नव्या जोमाने, नव्या उत्साहाने ते अंतर्बाह्य रसरसू लागले.

नामस्मरण घनीभूत होत गेलं आणि हळूहळू रोगाने चारसहा महिन्यातच मागच्या पावलाने पळ काढला.

नामात किती शक्ती आहे ते सिद्ध झालं होतं !

# ३४. बालयोगी महाराजांची प्रथम भेट

एकदा श्री. हरिप्रसाद कंथारिया श्रीमोटांना भेटायला आले. ते नडियादला राहणारे एका सेवाभावी वृत्तीचे सज्जन सद्गृहस्थ होते.

श्रीमोटांनी त्यांचं आपुलकीने स्वागत केलं आणि विचारलं ''काय हरिप्रसादभाई, कसे आहात ? आणि आज इकडे कोठे ?''

हरिप्रसादभाई म्हणाले, ''भगत, तुम्हाला अहमदाबाद मध्ये एक 'बालयोगी महाराज' बोलावताहेत हे सांगायला मी मुद्दाम आलोय''

''मला ?'' आश्चर्याने अवाक् होऊन श्रीमोटा उत्तरले. ''मी तर अशा कोणत्याही बालयोगी महाराजांना ओळखत नाही.''

हरिप्रसादभाई ठामपणे म्हणाले, ''हो, हो, तुम्हालाच ! अहमदाबादला भद्र येथे साबरमती नदीच्या किनाऱ्यावर साधूंचा आखाडा आहे. तिथे ते आलेले आहेत. अवधूत वृत्तीचे सिद्ध महात्मा आहेत. बंगाली शरीर आहे आणि बालपिशाच्चवृत्तीने सतत क्रीडा करत असतात. पूर्ण अंतर्ज्ञानी आहेत. आपल्याला काहीच सांगावं बोलावं लागत नाही, ते स्वतःहून सांगतात सगळं काही ! लोकांची सारखी रीघ लागलेली असते. मी दर्शनाला गेलो तेव्हा सारखेसारखे म्हणत होते, 'नडियाद से चुनीलाल भगत को बुलाओ ! नडियाद से चुनीलाल भगत को बुलाओ !' आणि त्यामुळेच हे सांगायला मी तातडीने आलोय.''

मनाने हरिप्रसादभाई बालयोगी महाराजांकडे कधीच पोहोचले होते आणि अत्यंत भावविह्वल होऊन बोलत होते.

श्रीमोटांचं आश्चर्य अजून कमी झालं नव्हतं. "कोण असावे हे साधुमहाराज ? मी त्यांना ओळखत नसतांनादेखील मला त्यांनी बोलवावं हे आश्चर्यच नव्हे का ? काय काम असेल ?" एकामागून एक बरेच प्रश्न निर्माण झाले.

श्रीमोटांना विचारांच्या गुंत्यात अडकलेलं पाहून हरिप्रसाद-भाईनी अजीजीने विनवणी केली, "भगत, सिद्ध महात्मा स्वतःहून बोलावताहेत तर जाऊन याच कसे !... मी येतो आता."

हरिप्रसादभाईनी निरोप घेतला. जाताजाता श्रीमोटांच्या हातात पाच रुपयांची नोट कोंबत ते म्हणाले, "भगत, अहमदाबादला जायचं मन झालं आणि पैसे नसले तर त्यामुळे अडून राहू नये म्हणून हे असू द्या."

हातातल्या नोटेकडे श्रीमोटा पहात राहिले. काय करावं याचा निर्णय त्यांना घेता येईना. शेवटी 'अंतरी' जसं करायची प्रेरणा होईल तसं वागायचं त्यांनी ठरविलं आणि त्याचा विचार करणं सोडून आपल्या नित्यकामात गढले.

दिवस जात होते पण त्यांच्या अंतर्यामी मात्र बालयोगी महाराजांचे शब्द - 'नडियादसे चुनीलाल भगत को बुलाओ' सतत गुंजन करीत होते, पिच्छा पुरवत होते. जणूकाही एखादी अदृश्य शक्ति त्यांना जबरदस्तीने ओढत होती, लोखंडाच्या कणाला चुंबकाने खेचावं तशी !

शेवटी याचा सोक्षमोक्ष लावायचा ठरवून अहमदाबादला जाण्याचं त्यांनी निश्चित केलं आणि तीनचार दिवसांची रजा घेऊन ते निघाले.

तिथे पोहोचल्यावर महाराजांना शोधायला त्यांना वेळ लागला नाही. बालयोगी महाराजांजवळ जाऊन त्यांच्या चरणी

प्रणाम करुन श्रीमोटा समोर बसले.

त्यांना पाहून महाराज हसले आणि म्हणाले, "आ गया बच्चा ! इधर आ, मेरी पास बैठ ! "श्रीमोटांना त्यांनी आपल्याजवळ बसविलं.

पक्ष्याचं एखादं पिल्लू जसं झाडाच्या एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उड्या मारत खेळत असावं तसंच बालयोगी महाराज पण स्वत:च्याच मस्तीत इकडे तिकडे उडया मारीत खेळत असत. कधीकधी ते नदीच्या पाण्यात जाऊन लहान बालकाप्रमाणे पाण्याशी खेळत बसत, पाणी उडवीत चित्कारत. ते काय करतील हे सांगणं कठीणच होतं. पण त्यांच्या शरीरात थकवा असा नव्हताच ! असीम शक्ती, स्फूर्ती, चैतन्य आणि आनंदाची ती साक्षात् बालमूर्ती होती.

त्यांच्या दर्शनास तर अगणित माणसं येत. फळं, फुलं, पुष्पहार, मिठाया, पेढे, बर्फी असं काही न् काही घेऊन येत. बालयोगी महाराज ते त्यांना देत आणि म्हणत, " खा जा बच्चा ! " आणि श्रीमोटा ते खाऊन टाकीत.

दिवसभरात जवळजवळ दहाबारा शेर एवढी पक्वान्नं, मिठाया आणि जेवणाच्या थाळया ते पचवीत. पोट अगदी तुडुंब भरलेलं असलं आणि त्यांनी खाण्याची आज्ञा केली की ते सर्व श्रीमोटा परत रिचवू शकत होते, अगदी अर्ध्याअर्ध्या तासानेदेखील रिचवू शकत होते हे मोठं आश्चर्य होतं ! एकेदिवशी तर ढीगभर झमझणीत खिचडीदेखील महाराजांनी श्रीमोटांना खाऊ घातली.

म्हणताम्हणता सातआठ दिवस कापरासाखे उडून गेले. जणू काही एका स्वप्नातच श्रीमोटा वावरत होते, निराळ्याच दिव्य आनंदात रममाण होते.

इतके दिवस उलटून गेल्याचं लक्षात आल्यावर मात्र नडियादला परत जायला त्यांचं मन ओढ घेऊ लागलं आणि लगेच महाराजांकडे जाऊन त्यांनी आज्ञा मागितली.

"ठहर जा, ठहर जा बच्चा, गभरा मत ! अभी तो तुझे दीक्षा देना बाकी है । इसलिए ही मैंने तुझे बुलाया है ।" आपल्याच मस्तीत असलेले बालयोगी महाराज म्हणाले.

श्रीमोटांनी नम्रतेने सांगितलं, "बापजी, मी आहे नोकरदार मनुष्य. माझ्यामागे कुटुंबाची आणि शाळेची जबाबदारी आहे. इथे येऊन सातआठ दिवस उलटून गेले आहेत. आता मला जायलाय हवं. म्हणून तुम्हीच माझ्या गावी याल तर माझ्यावर खूप उपकार होतील."

यावर बालयोगी महाराज काहीच बोलले नाहीत. त्यांना प्रणाम करून श्रीमोटा नडियादला परत आले आणि कामावर हजर झाले.

नदीस प्रचंड पूर येताच तिच्या प्रवाहाच्या ओघाची दिशाच बदलून जावी तसं स्थित्यंतर श्रीमोटांमध्ये प्रवेश करुन चुकलं होतं आणि त्यांची जीवननौका श्रीसद्‌गुरुंच्या चरणकमलांकडे गतिमान झाली होती. नव्हे, सद्‌गुरुंनीच ती ओढून घ्यायला सुरुवात केली होती ! एका न परतीच्या अंतिम प्रवासाचा श्रीगणेशा झाला होता !

## ३५. "बंगला, एकांत आणि जलाशय !"

दाहोदला 'अंत्यज सेवा मंडळा'च्या कार्यवाहक सभेस उपस्थित राहण्यासाठी श्रीमोटा निघाले. रेल्वे स्टेशनवर येऊन तिकीट काढलं आणि अचानक त्यांची दृष्टी जवळच एका

कोपऱ्यात शांतपणे बसलेल्या बालयोगी महाराजांकडे गेली.

त्यांनी तिथे जाऊन लगेच बालयोगी महाराजांना भावपूर्वक साष्टांग दंडवत केला.

"बच्चा, किधर जा रहा है ?" त्यांनी विचारलं.

"दाहोदला मिटींगला जातोय," ते हात जोडून म्हणाले.

"गधा कहीं का ! मैं मिलने आया और तेरेकु जाना है ? वापस कर टिकट !" त्यांनी फर्मावलं.

श्रीमोटांनी तिकीट परत केलं आणि दाहोदला येऊ शकत नसल्याची तारदेखील करून टाकली. नंतर बालयोगी महाराजांना घरी येण्यासाठी त्यांनी प्रार्थना केली. महाराजांनी ती मान्य केली.

घरी आल्यावर महाराज म्हणाले, " बच्चा, मैं तुझे दीक्षा देने आया हूं । मुझे एक बडा मकान चाहिए ।"

ते अचंबित होऊन म्हणाले, " बापजी ! मी आहे एक गरीब मनुष्य आणि असं घर देऊ शकतील अशा मोठमोठया लोकांशी माझी ओळख नाहीये."

त्यांच्या या उत्तरावर महाराज एकदम रागावले आणि हात उगारून त्यांना मारायला धावले. शिव्यांची लाखोली वाहात ते म्हणाले, "साला, तू तो गधा है, तेरे में कुछ अकल नहीं, बुद्धू है....!" मग पुढे म्हणाले " देख ! सिर्फ मकानही काफी नहीं, मुझे एकांत भी चाहिए ।"

"अरे ! प्रभु ! इथे असं मोठं घर मी मिळवू शकेन याचीच शक्यता नाहीये, आणि तुम्ही एकान्तातील घराविषयी बोलत आहात," श्रीमोटांनी मनातल्या मनात कुरकूर केली.

त्यांच्या मनातला हा तरंग ताडून महाराजांची स्वारी परत

खवळली आणि परत शिव्या हासडून ते म्हणाले, ''सुन, बडा मकान चाहिए, एकांत मे चाहिए, और वो भी जलाशय के पास में । अब जा और इसका इन्तजाम करके मेरे पास आ !''

महाराजांच्या अटी वाढतच चालल्या होत्या आता हे जमायचं कसं ? श्रीमोटांपुढे पेच निर्माण झाला.

बालयोगी महाराजांना नमस्कार करुन ते रोजच्याप्रमाणे शाळेत जायला निघाले. शाळेच्या रस्त्याने जातांना मध्ये कासमसेठ या प्रतिष्ठित मुसलमान सद्‌गृहस्थांचे घर लागत असे. ते आपल्या घराच्या ओट्यावर श्रीमोटांची वाट बघत उभे असत. ते घराजवळ आल्यावर कासमशेठ 'अस्सलाम् आलयकुम्' म्हणून श्रीमोटांना सलाम करीत आणि ते पण सलाम परत करीत. त्या दोघांच हा रोजचाच नित्यक्रम होता.

आज मात्र 'एक मोठं घर, एकान्त, जलाशय' या विचारात गर्क होऊन श्रीमोटा कासमसेठच्या घरासमोरून सलाम न करताच पुढे निघून गेले. आज असं का व्हावं याचं कासमशेठना फार आश्चर्य वाटलं. पुढे गेल्यावर श्रीमोटांना स्मरण झालं की आज आपण कासमोशेठना सलाम केला नाही. ते परत फिरले आणि कासमशेठकडे येऊन त्यांना सलाम केला.

त्यांनी अचंब्याने विचारलं, ''भगत, आज सलाम कसे विसरलात ? कोणत्या विचारात होता तुम्ही ?''

''माझ्या घरी एक औलिया आले आहेत आणि त्यांनी अशक्य अशी मागणी केलीय माझ्याकडे, त्याच विचारात होतो मी, ''श्रीमोटा म्हणाले.

''तुम्ही मला सगळं सविस्तर सांगा बघू,'' त्यांनी औत्सुक्याने विचारलं.

श्रीमोटांनी अथपासून इतिपर्यंत सर्व सांगितलं आणि निराश होऊन विचारलं, "तुम्हीच सांगा कासमशेठ, मला गरीबाला हे शक्य तरी आहे का ?"

ते हसले आणि म्हणाले," अरे, भगत ! यात काळजी करण्यासारखं काय आहे ? मिशनच्या दवाखान्याजवळ आपला 'हाजी मंजिल' बंगला आहे, जवळपास वस्तीपण नाहीये आणि बाजूला 'राम तलाव' आहे. तुमच्या औलियाच्या सगळ्या मागण्या पूर्ण होताहेत. तुम्ही वापरा तो बंगला, ही घ्या चावी. खुशाल पाहिजे तितके दिवस ठेवा त्या औलियांना आपल्या बंगल्यात !"

अल्पावधीत आणि अकल्पितपणे प्रश्न सुटल्यामुळे श्रीमोटांचा आनंद गगनात मावेना. ताबडतोब जाऊन बालयोगी महाराजांच्या पायांवर डोकं ठेवावं असा भाव त्यांच्या हृदयात प्रगटला, पण 'कर्तव्य प्रथम !' ही निष्ठा असल्यामुळे आपल्या भावनेस आवर घालून ते शाळेत गेले.

संध्याकाळी घरी आल्यावर त्यांनी सद्‌गदित होत बालयोगी महाराजांना आधी भावपूर्ण नमस्कार केला आणि मग बंगल्याची सोय कशी झाली ते इत्यंभूत सांगितलं.

आता दीक्षेचा क्षण जवळ येऊन ठेपला होता.

एका अनुभूतीसंपन्न शक्तिशाली दात्याकडून पुरुषार्थी पक्व साधकाला ईश्वरत्वाचं बीज दान दिलं जाण्याच्या प्रसंगाचे साक्षी होण्यासाठी हाजी मंजिल' ची वास्तु आणि 'तो क्षण'– दोघेही आतुरतेने वाट पहात होते !

❖

## ३६ दीक्षा – तीन दिवस समाधी

'हाजी मंजिल' बंगला खूप प्रशस्त होता. इथे कसलीही धावपळ नव्हती. वर्दळ नव्हती. वातावरणात फक्त शांती भरून होती. श्रीमोटा बंगल्यात शिरले. आज वसंतपंचमीचा दिवस होता. सर्व सृष्टी आनंद साजरा करीत होती.

बंगल्यात बालयोगी महाराज त्यांची वाटच पहात होते. "माझ्यासमोर आसनात बस, ध्यान लाव आणि निर्विचार होऊन जा, "महाराजांनी आज्ञा केली.

ते त्याप्रमाणे पद्मासनात बसले. ध्यान लावून निर्विचार होण्याचा प्रयत्न केला, पण वाऱ्याच्या वावटळीने धूळ आणि पालापाचोळा आकाशात उडवून लावावा आणि वातावरण गढूळ व्हावं तसे निरनिराळे विचार येतच होते. शेवटी त्यांनी डोळे उघडले आणि ते म्हणाले, "होता येत नाहीये."

ते उद्गारले, "काय म्हणतोस ! ?"

"हो बापजी, विचारशून्य होऊ शकत नाहीये, खूप खूप विचार येताहेत."

"ठीक आहे, तर मग आता माझी मूर्ती दृष्टीसमोर ठेवून ध्यान लाव" महाराज म्हणाले.

परत प्रयत्न झाला, पण निष्फळ ठरला. परत डोळे उघडून महाराजांकडे पहात श्रीमोटा म्हणाले, "बापजी, तुमची मूर्ती दृष्टीसमोर राहते पण विचार तर अजूनही येतातच !"

बालयोगी महाराज त्यांच्याकडे रोखून पाहात म्हणाले, "माझी मूर्ती दिसते आणि तरीही विचार येताहेत ? याचा अर्थ माझ्याविषयी तुझ्यात अद्याप पूर्ण प्रेम उत्पन्न झालेलं नाहीये.

"काही हरकत नाही, तू आता माझ्याकडे पहा, माझं रूप

डोळ्यात साठवून ठेव आणि मग ध्यान कर,'' महाराजांनी परत आज्ञा केली.

तोही प्रयत्न झाला. पण निर्विचार अवस्था आली नाही. श्रीमोटा आता हतबल झाले. डोळे उघडून परत म्हणाले,'' बापजी, विचार येतच आहेत, उलट वाढले आहेत.''

तीन वेळा प्रयत्न करूनही ईप्सित साध्य झालं नाही हे पाहून बालोयोगी महाराज क्रोधिष्ट झाले. त्यांनी जवळजवळ आठेक इंच लांबीचा लोखंडाचा खिळा सामानातून बाहेर काढला आणि हातात पकडून त्याचा लोखंडी दट्टा श्रीमोटांच्या दोन्ही भुवयांच्या मध्ये आज्ञाचक्राच्या स्थानावर जोरात मारला.

ध्यान लावण्याचा प्रयत्न असफल होईल हे माहीत होतं म्हणूनच कदाचित तो लांबलचक खिळा बालयोगी महाराजांनी आपल्याजवळ ठेवला असावा.

खिळ्याचा आघात होताच श्रीमोटांच्या अंतरीचं वादळ शमलं. विचारांची धूळ जमिनीवर बसली, आकाश स्वच्छ, पारदर्शी व्हावं त्याप्रमाणे निर्विचार अवस्था प्राप्त झाली. मनाचा लय झाला, प्राण स्थिर झाला, त्याचाही लय झाला. शरीराचं भान तर आधीच गेलं होतं. समुद्राच्या पाण्यात विरघळून गेलेल्या मिठाच्या खड्याप्रमाणे, उरली फक्त जागृती – चैतन्यपूर्ण जागृती !

काही काळानंतर श्रीमोटांचं देहभान परत आलं, त्यांनी पाहिलं तर गुरुमहाराज स्वतः त्यांच्या पायाला, अंगाला मालीश करत होते. त्यांनी श्रीमोटाना विचारलं, ''ए पोरा, आता विचार येत होते का ?''

''नाही बापजी, विचारबिचार काही नव्हते. 'सगळं जणू संपून गेलं असावं' अशी स्थिती होती.''

"असा किती तास बसला होतास ? "महाराजांनी विचारलं.

"असेल पंधरावीस मिनिटे."

"नाही."

"तास ? अर्धातास ?"

"अरे ! कसला अर्धा तास, एक तास ?"

"तर मग — वीस तास ?"

"नाही, तीन दिवस होऊन गेलेत ! "बालयोगी महाराज म्हणाले.

ऐकून श्रीमोटांना आनंद झाला की साधनामार्गातील मोठ्यातला मोठा अनुभव आपल्याला प्राप्त झाला पण त्याचबरोबर तीन दिवस आपलं हरिजन शाळेचं काम करता आलं नाही याचं दु:खही त्यांना तीव्रतेने झालं.

वसंतपंचमीच्या दिवशी दीक्षा प्राप्त झाल्यानंतर बालयोगी महाराज श्रीमोटांना म्हणाले," पूज्य धुनीवाले दादा यांच्या आज्ञेनेच मी या बाजूला आलो. तुझे गुरु तेच आहेत. तू त्यांच्याकडे जाऊन त्यांचे आशीर्वाद घेऊन ये. तशी तयारी करूनच जा."

"जी बापजी," श्रीमोटा नम्रपणे म्हणाले.

बालयोगी महाराज अजून सांगतच होते, "बेटा, तू भगवंताचं स्मरण अखंड करीत रहा, भजन कीर्तन गात जा. लज्जा संकोच सोडून दे.

"तू अभय, नम्रता, मौन आणि एकांताचं पालन कर. आत्मनिवेदन करीत रहा. जागृती ठेवून उठणाऱ्या प्रत्येक

विचाराचं, वृत्तीचं, स्थूल कर्माचं आणि संसार व्यवहाराचं समर्पण करीत जा."

श्रीमोटा सद्‌गुरुंचा शब्द न् शब्द हृदयी एखाद्या ठेव्याप्रमाणे जपून ठेवत होते. साधनेची गुरुकिल्ली देणारे ते संजीवन शब्द होते, सद्‌गुरुंच्या शक्तीने भारलेले जिवंत शब्द होते.

दीक्षा प्राप्त झाली आणि एक अनाथ जीव सनाथ झाला. बाळाला त्याची आई भेटली होती, आणि दोघेही आता निश्चिंत होते !

❖

## ३७. स्मशानवास

बालयोगी महाराजांची श्रीमोटांना आज्ञा होती की अभयप्राप्ती होण्यासाठी तू रोज रात्री स्मशानात जाऊन साधना करीत जा. त्यानुसार त्यांचा रात्री कोणत्यातरी स्मशानातच मुक्काम असे.

नडियादला संतराम मंदिराच्या मागे असलेल्या स्मशानात ते साधनेस जात. ती करतांना झोप येऊ नये म्हणून आपलं छातीपोट झाडाला बांधून ठेवीत आणि नामस्मरण, प्रार्थना, ध्यान, भजने आत्मनिवेदन अशा निरानिराळ्या प्रकारांनी पहाटेपर्यंत साधना करीत. स्मशानातील लाकडांची व्यवस्था पाहणाऱ्या एक वृद्ध आजी त्यांना रोज मडक्यातून थंडगार पाणी आणून देत.

स्मशानात ते जामिनीवरच झोपत आणि उशाला दगड घेऊन अंगावर पंचा पांघरीत.

त्याकाळी प्रख्यात असलेले गोदडिया स्वामी बऱ्याच वेळा स्मशानात येत. दोघेजण तत्त्वचर्चा, सत्संग यात रमून जात.

आणि आनंदात वेळ पसार होई.

पहाट फुटू लागली की आपली साधना आवरून श्रीमोटांची पावले घराकडे वळत आणि आईच्या कुशीत शिरून झोपण्याचा, निरागस बालकाचा आनंद ते लुटीत. आई प्रेमाने त्यांना रागावून म्हणे, "मेल्या, एवढा रेड्यासारखा वाढलास तरी अजून आईच्या कुशीत झोपतोस ? लाज नाही वाटत तुला ? तू का आता लहान आहेस ?" आईचे बोलणे हसण्यावारी नेऊन ते आईला उलट अधिकच बिलगत.

❖

## ३८. 'बोकड'

त्याकाळी नडियादमध्ये 'बोकड' * या नावाची एक अतिशय भयंकर जागा होती. बाभळीची भरगच्च झाडी असलेल्या या जागेत दिवसाढवळ्यादेखील जाण्याची कोणाची बिशाद नसे. पोलीसदेखील तिथे जायला बिचकत.

आपल्या एकान्त साधनेच्या दृष्टीने हे एक उत्कृष्ठ स्थान आहे असे निश्चित करुन बरेच दिवस श्रीमोटांनी तिथे घालविले. अशा भयप्रद जागेत चोर, लुटारु, डाकू, खुनी निर्धास्तपणे येत. त्यांच्या दृष्टीने ते स्थान अत्यंत सुरक्षित होतं. श्रीमोटांचं तिथे येऊन साधना करणं त्यांना आवडत नसे आणि ते वारंवार त्यांना धमक्या देत, पळवून लावण्यासाठी निरनिराळ्या क्लृप्त्या वापरून पाहात, पण श्रीमोटांवर यापैकी कशाचाच परिणाम झाला नाही.

एकदा त्यांची साधना सुरु असतांना त्यावेळी तीन चोर तिथे आले आणि आपल्या चोरीच्या मालाची वाटणी करू

*(हा भाग आता इमारतींनी गजबजून गेला आहे आणि पूर्वीची भयप्रद स्थिती अजिबात राहिली नाही.)

लागले. आपल्याशिवाय अजून कोणीतरी झाडीत आहे हे त्यांना जाणवलं. श्रीमोटांना पाहून त्यापैकी एकजण म्हणाला, "साल्याला खतमच करून टाका म्हणजे तो आपल्याला ओळखून काढण्याचा आणि पोलिसांना सांगण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही."

ते बोलले खरे, पण ते कृतीत आणण्याचं धाडस त्यांना झालं नाही.

बोकडची श्रीमोटांची साधना निर्वेधपणे सुरू राहिली.

## ३९. धुनीवाले दादा : पूज्य केशवानंदजी महाराज

दीक्षा दिल्यानंतर बालयोगी महाराजांनी सांगितल्याप्रमाणे दादांच्या दर्शनास जायचं श्रीमोटांनी ठरविलं. महाराजांनी सांगितलं होतं की 'दादांकडे जातांना पूर्ण तयारी करून जा', म्हणून त्यांनी सातआठ दिवसांची रजा काढली, पण महाराजांना त्यांनी हे सांगितल्यावर ते नाराज झाले. तयारी करून जाण्याचा अर्थ 'पूर्ण पाशमुक्त होऊन जा', असा असल्याचं त्यांनी श्रीमोटांना समजावून दिलं.

### ❑ सर्व पाश तोडले :

"आपण दादांकडे जात आहोत आणि जर त्यांनी तिथेच राहायची आज्ञा केली तर त्याप्रमाणे तिथेच कायमचे राहू," हे आईला समजावून सांगणं श्रीमोटांसाठी फार कठीण होतं. त्यांनी प्रभाबांना पत्र लिहून सर्व कळवलं आणि आईला समजावून देऊन तिची संमती मिळविण्याचं कठीण काम त्यांच्यावर सोपविलं.

प्रभाबांनी कसंबसं आईला तयार केलं. 'तुमच्या उदर-निर्वाहासाठी व्यवस्था करून मगच श्रीमोटा दादांकडे जाणार आहेत,' हे देखील त्यांनी तिला सांगितलं होतंच !

आईच्या संमतीची मोठी कामगिरी पार पाडल्यानंतर मग श्रीमोटांनी 'हरिजन सेवा संघा'चा राजीनामा दिला आणि नवसारीहून परिक्षितभाईंना बोलावून नडियादच्या कामाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविली.

अशा प्रकारे मागचे सर्व दोर कापून टाकल्यानंतर दादांकडे जायला ते पूर्ण मोकळे झाले.

**❑ प्रथम दर्शन:**

दादांचे स्थान मध्य प्रदेशात इटारसीजवळील 'सांईखेडा' येथे होते. तेथे पोहोचल्यावर एका धर्मशाळेत आपलं सामान टाकून स्नानादी उरकून उत्साहाने व आतुरतेने ते दादांच्या दर्शनास निघाले.

लोक दादांना घाबरून दूर राहतात हे त्यांना माहित नव्हतं. ते गेले नि सरळ त्यांच्या चरणांवर डोकं ठेवलं. दादा सर्वांना जवळ येऊ देत नसत. कधीकधी दर्शनास आलेल्यास ते आपल्या दंडुक्याने तडाखा लगावून देत. श्रीमोटा दर्शन घेत असतांनासुद्धा लोक ओरडले, "ए, दूर हो ! दूर हो !! दादा तुझं टाळकं फोडतील." पण दादांनी काहीच केलं नाही.

दर्शन घेऊन ते त्यांच्यापासून सहासात फूट अंतरावर जाऊन बसले आणि दादांच्या लीला पाहू लागले.

**❑ दादा — एक अद्भुत महापुरुष :**

दादा म्हणजे एक लोकविलक्षण महापुरुष होते !

लोकांचा जास्त उपद्रव होऊ नये म्हणून त्यांनी आपलं

स्थान सांईखेडा गावापासून दूर जंगलात ठेवलं होतं, तरीही लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्यांच्या दर्शनास येत असत.

दादांची शरीरयष्टी एखाद्या काठीप्रमाणे शिडशिडीत होती. ते आजानुबाहु होते आणि त्यांचे पायही लांबसडक होते. बहुधा ते दिगंबरच असत. पण लहर असल्यास आणि कोणाचा नवीन वेष आवडल्यास ते त्याच्याकडून मागून घेत आणि स्वत:च्या अंगावर चढवीत.

दादांसमोर एक धुनी अखंड पेटलेली असे आणि तिथेच ते कायम बसून असत. पावसाळ्यातदेखील धुनी अखंड पेटती राही आणि दादाही तिथेच असत.

हनुमानजींप्रमाणे दादांच्या गळ्यात आणि कमरेला रुईच्या फुलांच्या माळा असत. या माळा अंगावर धारण करणे ही सोपी गोष्ट नाही. अत्यंत उष्ण प्रकृतीच्या या फुलांचा स्पर्श जिथे होईल तिथे चामडी लाल होऊन फोड येतात. अशा ढीगभर माळा गळ्यात आणि कमरेवर धारण करून प्रज्वलीत धुनीच्या दाहक आगीजवळ ते बसलेले असत हे एक आश्चर्यच होतं.

दादांजवळ सतत दंडा असे. दर्शन करायला येणाऱ्या कोणास जर त्याचा प्रसाद मिळालाच तर त्याचं नशीब उघडत असे. पण दंडुक्याच्या माराच्या भीतीने लोक जवळ जायला कचरत असत.

**❑ बीभत्स वाणीचा उगम आणि शंका :**

दादांची वाणी फार बीभत्स आणि अर्वाच्य होती. त्यांच्या बोलण्याला ताळमेळ नसे. असंबद्ध असे त्यांचे बोलणे समजायला खूप कठीण असे.

प्रथम दर्शनाच्या वेळी श्रीमोटांनी जेव्हा दादांची ही अशी अद्वातद्वा वाणी ऐकली तेव्हा त्यांच्या मनात विचार आला, "कशी ही वाणी ? इतकी शिवीगाळ ? सरळ निघावं आणि नडियादला परत जावं." पण तत्क्षणी त्यांचं दुसरं मन त्यांना सांगू लागलं, "अरे ! ज्या बालयोगी महाराजांनी तुला दीक्षा दिली, त्यांचे हे गुरु ! ज्या बालयोगी महाराजांच्या अगम्य आणि अद्‌भुत भावलीलांचं तुला वारंवार दर्शन झालं, ज्यांच्या दिव्य आणि गूढ शक्तीने तुला अनंत 'जिवंत अनुभव' दिले त्यांचे हे सद्‌गुरु, ते किती समर्थ असतील ?"

मनातील विचारांच्या या खळबळीने श्रीमोटांना एक निष्कर्ष दिला, "त्यांच्या अशा बोलण्या-वागण्यामागे काहीतरी रहस्य असलं पाहिजे."

❑ **शंकानिरसन :**

श्रीमोटांच्या मनात हा विचार येतो न येतो तोच दादांनी सणसणीत शिव्या हासडल्या आणि समोरच्या समूहाकडे पहात ते म्हणाले, " मी बोलेन तेव्हा माझ्यासमोर उभ्या असणाऱ्या टोळक्यातील सर्वांच्या चेहऱ्याकडे लक्ष ठेव आणि ज्याच्या चेहऱ्यावरील हावभावात तुला फरक जाणवेल, त्याच्या मागेमागे जाऊन त्यालाच विचार."

इतर कोणालाही कळलं नाही तरी श्रीमोटांच्या लगेच ध्यानी आलं की ही शिव्यांची सरबत्ती आणि हे बोल आपल्यासाठीच आहेत.

दादांच्या बोलण्यानुसार मग त्यांनी छाननी करायला सुरुवात केली. रोज निदान सहासात जणांना तरी ते भेटत आणि विचारणा करीत की दादा असं का बोलतात ? त्या सर्वांनी

श्रीमोटांना सांगितलं की दादांनी ज्या शिव्या दिलेल्या असत त्या सर्व शब्दशः तशाच, त्या प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात दिलेल्या असत, आणि त्यांच्या तोंडून बाहेर पडलेल्या शब्दांप्रमाणेच सारं काही त्या प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात घडलेलं असे.

❑ **"तो दिसतोय ना, त्याला दगड मार, रक्तबंबाळ कर !" :**

श्रीमोटांच्या मनात दादांविषयी निर्माण झालेल्या शंकेचं पूर्णतः निरसन करण्यासाठीच जणू एक प्रसंग त्यांच्या सान्निध्यात घडला.

नामजप, स्मरण, आणि प्रार्थना करीत श्रीमोटा दादांच्या समोर बसून होते. अचानक दादा रस्त्यावरून शांतपणे जाणाऱ्या एका माणसाकडे बोट दाखवून म्हणाले, "तो माणूस दिसतोय ना, मार..., मार साल्याला..., रक्तबंबाळ होईल अशा प्रकारे मार !"

शांतपणे जाणाऱ्या त्या माणसाला दगड मारायला श्रीमोटांचं मन का-कू करू लागलं. पण शेवटी गुरुंची आज्ञा आहे म्हणून देवाचं नाव घेत त्यांनी जोरात त्या माणसाला एक दगड मारला.

कोणत्या दिशेने दगड आला हे पाहून तो श्रीमोटांकडे गेला आणि रागाने त्यांना विचारू लागला, "काय रे दगड कशाला मारलास ? मी तुझं काय बिघडवलंय ?"

श्रीमोटा त्याला म्हणाले," बाबा रे, मी माझ्या इच्छेने दगड मारला नाही, पण माझे हे गुरुमहाराज बसले आहेत ना, त्यांनी सांगितलं म्हणून मारला."

मग तो मनुष्य तणतणत दादांकडे गेला आणि जाब विचारू लागला.

ते एकलं मात्र, आणि दादांनी त्याला असं काही फैलावर

घेतलं की बोलायचीच सोय नाही. तो कोणतं कुकृत्य करायला चालला होता हे त्यांनी त्याला अगणित शिव्यांच्या वर्षावात बोलून दाखविलं.

दादा बोलत गेले तसतसा त्याचा चेहरा उतरत गेला, लाजेने काळवंडला आणि पश्चात्तापाने दग्ध होऊन दादांच्या पाया पडून शेवटी तो रडू लागला, क्षमायाचना करू लागला.

दादांनी त्याला शांत केलं आणि सांत्वना दिली. दादांच्या चरणी मस्तक ठेवून आणि दादांचे आशीर्वाद घेऊन तो मनुष्य आनंदाने घरी गेला.

आपल्या अंतर्यामित्वाच्या शक्तीची एक झलक दादांनी या घटनेद्वारे दाखवून श्रीमोटांच्या संशयाचा बीमोड केला.

दादांच्या या बीभत्स वाणीची तथाकथित बुद्धिवाद्यांकडून टीका होई, वर्तमानपत्रातही छापून येई. चुनीलाल व्यास हे श्रीमोटांचे मित्र त्यांना हे लिखाण नियमित वाचायला देत. परंतु त्यामागचं रहस्य समजण्याची, अनुभवण्याची संधी श्रीमोटांना मिळाली होती म्हणून ते त्याची उपेक्षाच करीत.

❑ **राजासंबंधी बोलणं :**

एकदा दादा एक राजाविषयी आणि त्याच्या इंग्रज सरकारबरोबर असलेल्या देशद्रोही संबंधाविषयी बोलत होते, जवळजवळ अर्धाएक तास ते बोलत होते. समोरच्या जमावात मात्र तशी कोणतीही व्यक्ती दिसत नव्हती.

दादांच्या बोलण्याला एरवादा तासच उलटून गेला असेलनसेल तोच दोनतीन घोडेस्वार, मागे मोटार आणि तिच्यामागे परत घोडेस्वार आणि सर्वात मागे पोलीस अशा थायत युवराजांची वरात आली.

## ❑ चांदीच्या थाळ्यांस लाथ मारली :

युवराज मोटारीतून उतरले. त्यांच्या माणसांनी मोटारीतून दोन थाळ्या बाहेर काढल्या. एकीत बरेचसे चांदीचे रुपये होते आणि दुसऱ्या थाळीत काही सोन्याची नाणी होती. प्रणाम करून युवराजाने ते सर्व दादांच्या समोर धरलं. त्याच क्षणी दादांनी त्या थाळ्यांना एवढ्या जोरात लाथ मारली की त्या दूरवर उडून पालथ्या पडल्या आणि सर्व नाणी इतस्तत: विखुरली गेली. पोलीसांनी आणि युवराजांच्या माणसांनी कोंडाळं करून ती सर्व गोळा केली. दादा त्या नाण्यांवर अक्षरश: थुंकले.

"इथे कशाला आला आहेस ?" शिव्यांची लाखोली वाहात दादांनी रागाने विचारलं.

थोडा वेळ चुपचाप उभं राहून युवराज निघून गेला.

नंतर चौकशी केल्यानंतर श्रीमोटांना समजलं की इंदूरच्या महाराजांचा युवराज ती भेट घेऊन आला होता. इंदूरच्या महाराजांनी त्याकाळी बरीच कारस्थानं केली होती, एकाचा खूनही करविला होता आणि त्यासंदर्भात एक 'बावला खून खटला' देखील चालू होता. आणि या सगळ्या प्रकाराविषयीच दादा बोलत होते.

वडिलांची गादी आपल्यास मिळावी या हेतूनेच तो युवराज आला होता आणि ती नाण्यांची भेट दादांच्या चरणी चढविली होती.

## ❑ संतांकडचा शंभुमेळा :

दादांचा दरबार सर्वांसाठी मुक्त होता. तिथे कोणालाही आमंत्रण नव्हतं आणि कोणालाच प्रतिबंध नव्हता. सर्व प्रकारचे लोक दादांकडे येत. योगी-भोगी-रोगी येत, नर्तिका येत,

वेश्या येत, चोर-लफंगे येत, सट्टेवाले येत, साधु-संन्यासी येत, विद्वान-पंडित येत, राजे-महाराजे वा गरीबही येत.

हवशे, नवशे आणि गवशे अशा तिन्ही प्रकारचे लोक दादांच्या दरबारात तळ ठोकून असत.

दादांकडे येणाऱ्या प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या श्रद्धेप्रमाणे कमीजास्त फळ मिळत असे.

**❑ "घरी परत जा, माझी प्रार्थना करीत राहा !" :**

दादांकडे श्रीमोटा येऊन दहाबारा दिवस उलटून गेल्यानंतर एकदा दादांनी बाजूला पडलेला एक नारळ उचलला आणि जोरात श्रीमोटांच्या दिशेने फेकला, तो त्यांच्या कपाळाला लागला, मोठं टेंगूळ आलं.

मग दादा म्हणाले, "आता तू तुझ्या घरी परत जा आणि तिथेच राहून साधनेत वाटचाल कर. तू माझी प्रार्थना करीत रहा. तुला जी कर्मे प्राप्त होतील त्यांनाच चिकटून रहा !"

दादांच्या या आज्ञेनंतर ते नडियादला परत आले, 'हरिजन सेवा संघा'त परत सामील झाले आणि दादांनी सांगितल्या-प्रमाणे कर्मसाधनेस लागले.

**❑ भगवतप्रसाद पंड्यांची आजारमुक्ती आणि सर्वसंग परित्याग :**

श्रीमोटांचे स्नेही भगवतप्रसाद पंड्या बडोद्यात 'डफरीन हॉस्पिटल' मध्ये अंडाशयाच्या क्षयाच्या उपचारासाठी दाखल झाले होते. त्यांनी ठक्करबाप्पांची दीर्घकाळ सेवा केली होती.

दादांच्या भेटीनंतर श्रीमोटा त्यांना भेटले. दादांचा दरबार आणि त्यांची दिव्य शक्ती याविषयी त्यांना श्रीमोटांनी सविस्तर सांगितलं. "दादांच्या दर्शनाने कदाचित तुमची व्याधी दूर होईल म्हणून तुम्ही जाऊनच या !" असा त्यांनी आग्रह केला.

श्रीमोटांच्या सूचनेनुसार ते नंतर दादांकडे गेले आणि दादांच्या कृपेने व्याधीमुक्त झाले. दादांच्या आज्ञेनुसार नंतर ते तिथेच कायमचे राहिले. शेवटी ते दादांप्रमाणेच दिगंबर रहात असत.

### ❑ प्रार्थनेचे शब्द हुबेहुब — सर्वज्ञ दादा :

भगवतप्रसाद पंड्या दादांबरोबर नेहमी असत. दादा जेव्हा श्रीमोटांच्या संदर्भात काही बोलू लागत तेव्हा ते लगेच लिहून ठेवीत किंवा लक्षपूर्वक ऐकत.

नडियादला स्मशानात साधना करीत असतांना श्रीमोटा ज्या प्रार्थना करीत त्याचा शब्द न् शब्द दादा बोलून दाखवीत. अशा कमीत कमी दोन प्रार्थना आणि एक भजन भगवतप्रसादांनी श्रीमोटांना तिथे गेल्यावर एकदा दाखविलं होतं.

यापैकी ''प्रभु ! शरण चरणमां राखो रे, पावले लागु'' ही प्रार्थना पू. गांधीजींच्या आश्रमात आजही गायली जाते.

### ❑ दादांच्या दर्शनास आईला नेलं :

'दादांचे आशीर्वाद प्राप्त व्हावेत' या हेतूने एकदा ते आपल्या आईलाही दादांकडे घेऊन गेले.

त्यांच्या आईने जेव्हा दिगंबरस्वरूप दादांना पाहिलं तेव्हा वैतागून ती म्हणाली, '' कर्म माझं ! मेल्या, हे कोठे आणलंस मला ?''

आपल्या आईला पाच रुपये देऊन त्यांनी सांगितलं की दादांच्या दर्शनास गेल्यावर ते त्यांना अर्पण कर. पण ती काही केल्या ते मान्य करायला तयारच होईना. श्रीमोटांनी तिला सांगितलं, ''तू आत्ता ते पाच रूपये दे, मी तुला नंतर दहा रूपये देईन !'' परंतु तिने शेवटपर्यंत आपला हेका सोडला नाही.

❑ **वडे करून खाऊ घातले :**

दादांकडे असतांना एकदा आईने श्रीमोटांना सांगितलं, "चुनिया, मला तू सर्व सामान आणून दे. मी दादांना वडे करून खाऊ घालीन." त्याप्रमाणे त्यांनी तिला हवं ते ते आणून दिलं.

तिने वडे बनविले आणि दादांना अर्पण केले. दादांनी थोडंसं खाऊन बाकीचे प्रसादरूपाने वाटून टाकले.

❑ **जीवनकेंद्र — केवळ दादाच !**

दादांच्या दर्शनास आपल्या जीवनकालात श्रीमोटा फार फार तर तीनचार वेळाच गेले. त्यांच्याशी त्यांचं बोलणंदेखील क्वचितच झालं, पण त्यांच्या संपूर्ण अस्तित्वाचं, जगण्याच्या हेतूचं केंद्र होतं फक्त दादा ! दादा !! आणि दादाच !!!

❖

## ४०. सत्संगामुळे सद्गती

एकदा दादांचं दर्शन घेऊन श्रीमोटा घरी येण्यासाठी निघाले तेव्हा दादा बोलू लागले "जर एखादा मनुष्य अनुभवी आणि चैतन्यात स्थिरता प्राप्त केलेल्या * महात्म्याशी खऱ्या हृदयाने जोडला गेला असेल तर त्याचा उद्धार होऊन जातो."

श्रीमोटांच्या मनात विचार आला," स्वतःची महत्ता प्रदर्शित करण्यासाठीच गुरुमहाराज असं बोलत आहेत."

सर्वज्ञ अशा त्या अवधूत, दिगंबर महात्म्यापासून हा विचारतरंग लपून राहणं शक्यच नव्हतं. श्रीमोटांना उद्देशून ते परत म्हणाले, " अरे, इथून जवळजवळ पंधरा मैलांवर एक गाव

---

* साक्षात्कारी

आहे, तिथे तू जा. तिथे एक मनुष्य मरणोन्मुख आहे, तो काय काय बोलतो ते ऐक. ते सर्व पाहून, विचार करून मग परत ये !"

आपल्या मनातील खळबळ दादांनी जाणल्यामुळे श्रीमोटा प्रभावित झाले आणि त्यांच्या सूचनेनुसार त्या गावी गेले. कोणता मनुष्य मरणोन्मुख आहे हे त्यांनी शोधून काढलं.

त्या माणसाच्या घरी ते पोहोचले तेव्हा तो बेभान होता आणि आयुष्यभरात केलेली कुकर्मे आठवीत होता, वाटेल ते अर्वाच्य बोलतं होता. थोडया वेळाने मात्र त्याच्या आवाजात आणि वक्तव्यात बदल झाला.

त्याने दादांचं स्मरण केलं आणि प्रार्थना केली, "हे धुनीवाले दादा ! हे गुरु महाराज ! मी केवढा पापी आहे, तरीही प्रभुकृपेने मला तुमचा सत्संग प्राप्त झाला आणि तुम्ही मला प्रेमाने तुमच्या हृदयाशी बांधून घेतलंत हे माझं किती अहोभाग्य ! आता माझा उद्धार करा ! तुमच्याविना माझं कोणीच नाही. मी तुम्हाला शरण आलो आहे !"

हे बोलून तो गप्प झाला. त्याच्या चेहऱ्यावर शांती पसरली. तो चेहऱ्यावर झालेला बदल, तो संतोष, ती शांती, ती प्रभा कोणालाही जाणवण्याइतपत स्पष्ट होती. जणूकाही गुरु महाराजांचा हात त्याच्या शिरी होता आणि ते जणू त्याच्या उशाशी उपस्थितच होते ! आणि खरं तर तसंच होतं ! !

त्या माणसाने शांतपणे देह सोडला. त्याला भाग्याचं मरण मिळालं होतं !

## ४१. "मुझे एक मगरमच्छ देखनेकु ले चल !"

बालयोगी महाराजांचा दीर्घकालीन दिव्य सहवास आणि साधनेत मार्गदर्शन श्रीमोटांना दोन वेळा प्राप्त झालं. एकदा दीड महिना आणि नंतर परत एकदा अडीच महिने, 'हाजी मंजिल' मध्ये !

एकदा ते त्यांना म्हणाले," मुझे एक मगरमच्छ* देखनेकु ले चल !"

"बापजी, न्यायला माझ्याकडे पैसे नाहीयेत," श्रीमोटांनी स्पष्टपणे सांगितलं.

"ऐसा है ? देख, अभी आ जाएगा", ते म्हणाले आणि गंमत अशी की त्यानंतर बरीच माणसं दर्शनाला आली आणि जातांना महाराजांपुढे दक्षिणा ठेवून गेली. महाराज पैशांचा स्वीकार कधीच करीत नसत, पण आज भक्ताच्या प्रेमापोटी त्यांनी ते पैसे स्वीकारले.

पैशांची व्यवस्था झाल्यावर आता जाणं निश्चित झालं. "जायचं खरं, पण कोठे ?" श्रीमोटांपुढे प्रश्न निर्माण झाला.

"प्रभु ! आपल्याला मी घेऊन जाईनच, पण मगरमच्छ कोठे आहेत ते मला सांगाल तर तुम्हाला तिथे घेऊन जाईन..."

महाराजांकडून उत्तराची अपेक्षा करणाऱ्या श्रीमोटांच्या पदरी निराशाच पडली.

"मगरमच्छ! मगरमच्छ!" या एका शब्दाशिवाय दुसरा शब्द त्यांना जणू माहितच नव्हता ! निर्णय घेणं त्यांनी शिष्यावरच सोपविलं होतं.

श्रीमोटांनी ठरवलं, "आपण त्यांना आणंदपर्यंत घेऊन जाऊ. तेथे बडोदा, खंबात आणि डाकोर असे तीन फाटे फुटतात म्हणून आणंदला पोहोचल्यावर तिथेच परत महाराजांना विचारू."

*कासव

ठरल्याप्रमाणे मग त्यांनी महाराजांना रेल्वेने आणंदपर्यंत आणलं. रेल्वेतून महाराज प्लॅटफॉर्मवर उतरल्यावर त्यांनी महाराजांच्या चरणी वंदन केलं आणि विचारलं, "इथून तीन ठिकाणी जाता येतं. बडोदा भागात खूप मोठमोठी कासवं आहेत..." मध्येच त्यांना थांबवीत महाराज म्हणातले, "इस लाईन उपर जानेका नहि हे।"

"ठीक आहे. खंबातला एक फाटा जातो तिथेपण समुद्र आहे, तिथे कदाचित कासवं असतील."

बालयोगी महाराजांनी मौन धारण केलं, निर्णय घेणं परत श्रीमोटांच्याच शिरी आलं. "डाकोर की खंबात ?" प्रश्न होता ! "डाकोरला गोमती नदीत मोठमोठी कासवं आहेत, मुरमुरे टाकून महाराजांना ती दाखवू" — त्यांनी विचार केला आणि डाकोरच्या दिशेने प्रवास सुरू झाला.

तिथे गेल्यावर गोमती नदीवर जाण्यास, पैसे नसल्याने घोडागाडीचा प्रश्नच नव्हता. पदयात्रा करीत जाणे हाच मार्ग शिल्लक राहिला. गोमतीच्या दिशेने चालत असतांना रस्त्यात एके ठिकाणी थांबून श्रीमोटांनी दोन पैशांचे मुरमुरे विकत घेतले. ते नदीपाशी पोहोचले. नदीचं पात्र संथपणे वहात होतं. नदीच्या पाण्यात मुरमुरे टाकताच मोठमोठी कासवं भराभर वर येऊन ते मुरमुरे खाऊ लागली.

महाराजांना ती दाखवत श्रीमोटा म्हणाले, "महाराज ! प्रभु ! बघा ही कासवं !"

"अरे ! साला ! कैसा गध्धा जैसा है, बेवकूफ ! तेरे में अक्कल नहीं !" सणसणीत शिव्या हासडत ते त्यांच्या अंगावर ओरडत बोलू लागले.

"ही जर कासवं नाहीत तर मग बापजी, आपण कोणत्या कासवांविषयी बोलताहात ? मला काही कळत नाही, मी फार गोंधळून गेलोय. मी कासव दाखवायला तुम्हाला आता कोठे घेऊन जायचं ?"

नदीला लागूनच ज्या स्थानी भगवंताची तुला केली होती तिथे तराजूच्या डाव्या बाजूला एक वेडसर वाटणारा, मळकट कळकट असा मनुष्य पडून होता. महाराज श्रीमोटांच्या प्रश्नाचं उत्तर न देता त्या माणसाजवळ गेले आणि खाली बसून त्यांचं बोलणं सुरु झालं.

"तुम्ही कोठे झोपता ?" महाराजांनी विचारलं.

"आकाशात !..." "तुम्ही काय करता ?" त्या वेडसर मनुष्याने महाराजांना प्रतिप्रश्न केला. श्रीमोटा हे ऐकत होते पण त्यातलं 'ओ की ठो' त्यांना कळलं नाही. ते वेड्यासारखे फक्त पहात राहिले, ऐकत राहिले.

बालयोगी महाराजांनी मग श्रीमोटांकडे बोट दाखवून त्या मनुष्यास सांगितलं, "हा मुलगा कधीकधी साधनेत अडचण निर्माण झाल्यास तुमच्याकडे येईल. त्याला समजेल अशा भाषेत बोला."

डाकोरमध्ये नंतर विचारपूस केल्यावर श्रीमोटांना समजलं की त्यांचं नाव नथुराम शर्मा होतं. लोक त्यांना 'मस्तराम' म्हणत. बालपिशाच्च वृत्तीचे ते एक महान संत होते. ते कधी कसे वागतील हे सांगता येत नसे. जवळपास कोणी पेटीवाला असल्यास ते त्याला बोलावून ती वाजवायला लावीत. श्रीमोटा भेटायला जात तेव्हा तर हमखास बोलावीत.

कोणी मस्तरामजींकडे गेल्यास त्यांची इच्छा झाली तर ते

म्हणत, "ए, चाय लाव, भजिया लाव !" श्रीमोटा त्यांच्याकडे जात तेव्हा त्यांना भक्तिभावाने नमस्कार करीत. एकदा त्यांनी मस्तरामजींना विनंती केली, "महाराज, आपण जर मला काही सेवा करायची संधी दिलीत तर मला आनंद होईल." त्यांच्या मनीचा भाव पूर्ण करण्यासाठी एकदा त्यांनी पावशेर भजी आणायला सांगितली. श्रीमोटांनी ती लगेच आणून दिली.

मस्तरामजींनी सर्व भजी फस्त केली. ती खात असतांना लहान बालकाप्रमाणे ते त्यांना म्हणाले, "तुला एकपण नाही देणाऽऽर !" श्रीमोटा हात जोडून म्हणाले, "प्रभु ! जशी तुमची मर्जी. माझी इच्छा नाहीये की तुम्ही मला द्यावीत !" साधनेच्या संदर्भात श्रीमोटांच्या बऱ्याच प्रश्नांची उत्तरं आणि साधनेत मार्गदर्शन त्यांना मस्तरामजींकडून प्राप्त झालं आणि तेव्हा त्यांच्या लक्षात आलं," ओ हो ! हा तर खूप पुढे गेलेला दिव्यात्मा आहे."

आध्यातिक क्षेत्रात उच्चातिउच्च कक्षेत जो पोहोचला आहे, सर्वोच्च शिखर ज्याने प्राप्त केलं आहे, त्यालाच सद्गुरु श्री बालयोगीजी महाराज 'मगरमच्छ' म्हणत होते हे त्यांना मस्तरामजींच्या दर्शनानंतर समजलं.

अवधूत सद्गुरुंचे शब्द, त्यांचे गूढ अर्थ आणि ते समजावून देण्याची रीत, सारं काही अनोखं होतं, अद्भुत होतं !

❖

## ४२. "नर्मदे मात की जय !"

माथ्यावर असलेला सूर्य आग ओकीत होता. भट्टीतल्या निखाऱ्यांप्रमाणे जमीन तापली होती. अंगातून घामाच्या धारा वहात होत्या. बालयोगी महाराज श्रीमोटांना घेऊन नर्मदा किनारी 'चांदोद-करनाळी' येथे आले होते.

समोर एक धर्मशाळा दिसली आणि महाराजांनी विश्रांती घेण्यासाठी तिथे चलण्याची श्रीमोटांनी त्यांना विनंती केली. दोघेजण धर्मशाळेत गेले आणि त्यांनी एका खोलीत मुक्काम केला. खोलीतून नर्मदामातेचं विशाल पात्र संथपणे वहात असतांना दिसत होतं त्या पात्रावर आपली दृष्टी स्थिर करून महाराज म्हणाले, ''बच्चा जाव ! और नर्मदा मैय्या का पानी लेके आव !''

आज्ञेनुसार श्रीमोटा लोटा घेऊन निघाले. किनाऱ्यावर जाऊन त्यांनी पाणी भरून घेतलं आणि ते आणून महाराजांपुढे ठेवलं. लोट्याकडे पाहून महाराजांनी विचारलं, ''लोटा माँज के लाया है ?''

''नाही, गुरुदेव !'' ओशाळून श्रीमोटा परत गेले. ''लोटा धुवायला हवा ही साधी गोष्ट आपल्या लक्षात कशी आली नाही ?'' त्यांना स्वतःचंच आश्चर्य वाटलं. लोटा स्वच्छ घासून नर्मदा मातेचं ते शीतल जल ते लोट्यातून घेऊन आले आणि त्यांनी महाराजांसमोर तो लोटा धरला.

महाराजांनी त्यांच्या डोळ्यात रोखून पाहात विचारले, ''किनारे से लाया के दूर से ?''

ते म्हणाले,'' बापजी, पात्रात गेलो नव्हतो, किनाऱ्यावरूनच आणलंय.''

महाराज एकदम नाराज झाले, '' ऐसा जल नहीं चलेगा। जाओ, नर्मदामैया के अंदर जाकर ले आव !''

''ठीक आहे, गुरुदेव !'' ते म्हणाले.'' महाराज आपल्याला परतपरत पाठविण्यासाठी मुद्दाम निमित्त तर शोधत नाहीत ना ?'' त्यांना शंका आली. पण त्यांनी ती दाबून टाकली

आणि नदीच्या पात्रात शिरून, परत लोटा धुवून स्वच्छ जल भरून घेतलं आणि परतले.

जसे ते महाराजांच्या जवळ पोहोचले तसे महाराज त्यांच्या पायाकडे पहात रागावून ओरडले, "जूता पहन के जल लाया ? गधा कहीं का ! अब जाव, जूता उतार के जल ले आव !"

श्रीमोटांची खात्री झाली की यात काहीतरी रहस्य असलं पाहिजे. "महाराजांना पाणी हवं याकरीता ते मला परतपरत पाठवत नाहीयेत. कशासाठी पाठवत असावेत ते ? आपली परीक्षा पाहताहेत ? हा आपलं आज्ञापालन करतो की नाही हे पाहताहेत ? की सहनशीलतेची कसोटी पाहताहेत ?" त्यांना विचार करूनही प्रश्नाचं उत्तर सापडलं नाही. मग तो नाद सोडून चटके देणाऱ्या रखरखत्या रेतीत "हरिः ॐ"चं उच्चारण करीत ते परत एकदा नर्मदेच्या किनाऱ्यावर अनवाणी पायांनी गेले, पात्रात शिरले, जल भरून घेतलं आणि निघाले. महाराजांनी कितीही फेऱ्या मारायला लावल्या तरी आपण दमायचं नाही असा त्यांनी दृढ निर्धार केला. महाराजांकडे येऊन त्यांनी लोटा त्यांच्यासमोर ठेवला. महाराजांचं लक्ष मात्र दुसरीकडेच होतं. एखाद्या निरागस बालकाप्रमाणे त्यांच्या चेहऱ्यावर मोहक हास्य होतं. त्यांच्या दृष्टीच्या रोखाने श्रीमोटांनी पाहिलं. एक सुंदर बालिका हातात चांदीची थाळी घेऊन त्यांच्या खोलीच्या दिशेने संथपणे येत होती. तिने खोलीत प्रवेश केला आणि महाराजांसमोर ती थाळी ठेवून त्याच संथ गतीने ती निघून गेली. थाळीत भोजन होतं. ते पाहताच आपल्याला भूक लागली आहे याचं श्रीमोटांना स्मरण झालं.

त्यांच्याकडे हसून पहात महाराज म्हणाले, “खा ले बच्चा !” श्रीमोटांनी ते अमृततुल्य भोजन ग्रहण केलं. खाल्ल्यावर एक अद्‌भुत तृप्ती आणि शांती आपल्याला प्राप्त झाली आहे असा त्यांना अनुभव आला.

संध्याकाळीपण एक गवळ्याची मुलगी भाकरी, दूध आणि लोणी घेऊन आली. “महाराज धर्मशाळेत आले आहेत हे या मुलींना कळलं कसं ?” श्रीमोटांना हे कोडं पडलं.

महाराजांनी ते खाण्याची आज्ञा केली आणि मग त्यांनी ते साधं परंतु स्वादिष्ट अन्न खाल्लं. आपल्या नेहमीच्या जेवणापेक्षा या अन्नाला एक विशिष्ट गंध होता, आगळा स्वाद होता. आणि परिपूर्ण तृप्ती होती.

“अब चलो, जहाँसे आये वहाँ वापस चले !” महाराज त्यांना म्हणाले आणि ते निघाले. निघतांना श्रीमोटांची दृष्टी त्या थाळ्यांवर गेली. त्या मुली थाळ्या परत घेऊन जायला आल्या नव्हत्या. “त्या थाळ्या त्यांनी महाराजांनाच अर्पण केल्या असाव्यात !” असा त्यांनी निष्कर्ष काढला आणि त्या दोन्ही थाळ्या बरोबर घेतल्या.

धर्मशाळेतून बाहेर पडल्यावर बालयोगी महाराजांची पाऊले गावाऐवजी नदीच्या दिशेने वळली तेव्हा त्यांना फार आश्चर्य वाटलं, तरीही आज्ञाधारकपणे ते त्यांच्या मागेमागे चालू लागले.

नर्मदा किनाऱ्यावर येऊन ठेपल्यावर महाराजांची आज्ञा झाली, “सब बरतन नदी में डाल दो !”

त्यांनीं विचारलं, “ही चांदीची थाळी पण ?”

बालयोगी महाराज एकदम क्रोधित होऊन ओरडले, "साले, तो क्या यह तेरे बाप का है ? जिसका है उसको देना चाहिए कि नहीं ?"

हे ऐकलं मात्र, आणि श्रीमोटांच्या अंगावर सरसरून काटा आला, अष्टसात्त्विक भाव जागृत झाले, हृदय भरून आलं आणि डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. "म्हणजे त्या दोन्ही मुली प्रत्यक्ष नर्मदामाता होत्या ? साक्षात नर्मदामाता ? किती भाग्यवान आहे मी ! सद्गुरुमाऊलीमुळे आज नर्मदामातेचं दोनदा दर्शन घडलं, तिच्या हातचं अमृततुल्य अन्न ग्रहण करण्याची देवदुर्लभ संधी प्राप्त झाली !" श्रीमोटा आनंदविभोर झाले. त्यांच्या भरल्या कंठातून भावपूर्ण शब्द पडले, "नर्मदे मात की जय !" त्या जयजयकाराबरोबरच हातातील सर्व भांडी त्यांनी नर्मदामातेला अर्पण केली.

श्रीमोटांना नर्मदा मातेचं दर्शन झालं !...

आणि नर्मदा मातेला बालयोगी महाराजांचं दर्शन झालं !!

## ४३. "इथे तुझा आश्रम होईल !"

नडियाद शहरापासून पाच मैल अंतरावर सेढी नदीच्या किनारी एक शांत जागा होती. नदीकाठच्या विहीरीच्या बाजूला एक छोटंसं छप्परवजा झोपडं बांधून एक कबीरपंथी साधु तिथे रहात असत. उन्हाळ्यात नदीचं पाणी आटलं की पाणी प्यायला लोक त्या विहिरीपाशी येत, पाणी पीत आणि महाराजांजवळ थोडावेळ बसून निघून जात. डेरेदार वटवृक्षाच्या छायेखाली असलेल्या त्या झोपडीत बसल्यावर मन कसं हलकं-फुलकं होऊन जाई.

अशा या एकान्तातील शांत आणि रम्य ठिकाणी बालयोगी महाराज आपल्या शिष्याला – श्रीमोटांना १९२२-२३ च्या सुमारास घेऊन आले.

तिथे त्यांनी श्रीमोटांना तिथल्या वटवृक्षाच्या एका फांदीवर बसवून रात्रभर 'हरिः ॐ'चे नामस्मरण करवून घेतलं. झाडावर बसून त्यांची साधना सुरू होती आणि महाराज त्यांच्याच मस्तीत झाडाखाली इकडेतिकडे फिरत होते.

जप करताकरता मध्यरात्री श्रीमोटांना झोपेची थोडी पेंग आली. महाराजांच्या कूर्मदृष्टीतून हे निसटणं अशक्यच होतं. त्यांनी एक दगड उचलून जोरात शिष्याला मारला. जांघेवर सणसणून लागलेल्या या दगडाच्या माराने त्यांची झोप खाडकन उडाली आणि परत नामस्मरणाचा ओघ सुरू झाला.

महाराज त्यांना दरडावून म्हणाले, "भगवानका नाम बराबर जाग्रत होके ले । अगर दूसरी दफा जरा भी गफलत हुई तो दूसरा पत्थर लगाऊंगा ।" या त्यांच्या दरडावण्यामागे आणि उरावर बसून साधना करवून घेण्यामागे आपल्याविषयी किती प्रेम आहे याची जाणीव श्रीमोटांना होती.

महाराज त्यांना म्हणाले, "बच्चा, तेरा इधर आश्रम होगा। और जैसा तू ईश्वर का नाम लेता है, वैसा सब लोग इधर ईश्वर का नाम लेंगे ।"

त्यांनी हे ऐकलं खरं, पण असं घडू शकेल हे मानायला त्यावेळी त्यांचं मन तयार झालं नाही.

या स्थानी ज्या कबीरपंथी साधूचं स्थान होतं त्यांच्या परंपरेतील पहेलदासजी महाराजांनी या स्थानाचं महत्त्व प्रगट

करणारी भविष्यवाणी कथन केली होती. बडोद्याच्या विष्णुप्रसाद ईश्वरलाल पंड्यांनी वयाच्या पंधराव्या वर्षी, ३० सप्टेंबर १८४५ रोजी ती नोंदवून ठेवली.

"या जागेवर एक तपस्वी होईल. दहा वर्षांपर्यंत इथे कोणी राहणार नाही. त्यानंतर ही रमणीय जागा होईल. इथे राहणाऱ्यास कधीही कोणाकडे काहीच मागण्याची गरज पडणार नाही. सद्गुरु बालकदासजींची येथील गादी भविष्यात कोणीही तोडू नये. या जागेवर भजन भाव करणारा * कधीही दुःखी होणार नाही."

बालयोगी महाराज श्रीमोटांना येथे घेऊन आले त्याच्या सत्त्याहत्तर वर्षे आधी वर्तविलेली ही भविष्यवाणी नंतर खरी झाली.

या जागी आश्रम होणार आहे हा संकेत जाणला होता पहेलदासजी महाराजांनी ! आणि बालयोगी महाराजांनी देखील !! हे घडण्यामागे होती केवळ ईश्वरेच्छा !!!

❖

## ४४. "तुज चरणे !"

मिशन रोडवरील 'हाजी मंजिल' बंगल्याच्या मागच्या बाजूस हरिजन बालकांसाठी आश्रम होता. आश्रमासमोरच एक पाद्री रहात असे. हिंदू धर्माविषयी त्याने थोडंफार वाचलं होतं. अधूनमधून त्याची श्रीमोटांशी महिना पंधरा दिवसातून भेट होत असे व चर्चाही घडत असे.

एकदा सत्संग सुरू असतांना त्याने टीका प्रदर्शित करणारा भाव प्रगट केला. तो म्हणाला, "मोटा, तुमच्या धर्मात किती

* भावपूर्वक साधना भजन इ. करणारा

पंथ, किती देवदेवता आणि किती पुस्तकं आहेत, पण आमच्या धर्मात एकच एक देव आहे आणि एकच एक पुस्तक आहे. बायबल हेच आमचं एकमेव धार्मिक पुस्तक आहे आणि येशू ख्रिस्त हाच आमचा एकमेव भगवान आहे. आमच्याकडे तुमच्यासारखी खोगीरभरती नाहीये !''

श्रीमोटा हसून त्याला उत्तर देत म्हणाले, ''साहेब, तसं नाहीये. तुम्ही मनात उगाच खोटी गाठ निर्माण केली आहे. भले, आमच्याकडे देवदेवता आणि धार्मिक पंथ आणि ग्रंथ अनेक असतील, पण सर्वांचा पाया आणि गाभा एकच आहे. एकच एका ईश्वरावर, त्या सत्तेवर आमची दृढ श्रद्धा आहे; आणि तीच सत्ता, तोच ईश्वर साकार आणि निराकार दोन्ही आहे, निरनिराळी रूपं घेऊन प्रगट होतोय, लीला करतोय !''

पाद्र्याला बोलणं पटल्यासारखं वाटलं, तरीही तो हेका सोडायला तयार नव्हता.

तो म्हणाला, ''असं सांगणारं एखादं पुस्तक किंवा आधार दाखवू शकाल तरच मी मानीन !''

श्रीमोटा काही बोलले नाहीत. परंतु त्याच रात्री सलग एका बैठकीत बसून त्यांनी एक प्रदीर्घ सुंदर काव्य लिहिलं. त्यात — ईश्वर कसा आहे, चराचरात कसा व्यास आहे, सत्-असत् दोन्हीत कसा आहे, सगुण-साकार, निर्गुण-निराकारात कसा तोच आहे — याचं त्यांनी अत्यंत सुंदर आणि भावपूर्ण शब्दांत आणि प्रवाही शैलीत वर्णन केलं. ईश्वराची प्रार्थना करीतकरीत, त्याचा महिमा गातगात त्यांनी या उत्स्फूर्त काव्यात उपासना कशी करायची याचंही वर्णन

केलं आहे. शब्द, सौंदर्य, काव्यात्मकता, सत्य, अनुभूती, उत्स्फूर्तता, भावपूर्णता, प्रार्थना या सर्वांचाच संगम असलेलं हे काव्य त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी पाद्री महाशयांना वाचून दाखविलं व समजावून सांगितलं, कारण पाद्री महाशयांना गुजराथी वाचता येत नव्हतं. काव्याखाली लेखकाचं नावमात्र श्रीमोटांनी लिहिलं नव्हतं.

ते काव्य ऐकून पाद्रीमहाशय खूश झाले आणि त्यांनी हिंदु धर्माच्या तत्त्वज्ञानाची वाखाणणी केली. प्रकाशानंदजी महाराज (गोदडिया स्वामी) देखील हे काव्य ऐकून फारच आनंदित झाले व त्या काव्याचे जपमाळेच्या मणक्यांइतके १०८ श्लोक करण्याचं त्यांनी श्रीमोटांना सुचविलं. हे काव्य नंतर 'तुज चरणे'* या नावाने प्रसिद्ध झालं आणि आजपर्यंत त्याच्या किमान पंचवीस हजार प्रती भक्तांच्या संग्रही आहेत.

❖

## ४५. विवाह

आपली जीवननौका कोणत्या दिशेने चालली आहे आणि कोणतं ध्येय आपल्याला प्राप्त करायचं आहे याची श्रीमोटांना जाण होती. ते ध्येय साकार करणं अथवा ते करताकरता स्वतःचा होम करणं हीच त्यांची एकमेव इच्छा होती. त्यामुळे विवाहबंधनात आणि त्याच्या जबाबदाऱ्यात अडकणं हे त्या इच्छेशी अजिबात सुसंगत नव्हतं.

आईची मात्र इच्छा होती की चुनियाने लग्न करावं. दोनचार वेळा तिने तसं बोलूनही दाखविलं, पण त्यांनी ठाम नकार देऊन विषय बंद केला.

*'तुझ्या चरणी'

शेवटी तिच्या सहनशक्तीचा अगदी अंत झाला आणि त्यांना बोलावून तिने जरा घुश्श्यातच विचारलं, ‘‘चुनिया, तुला मी लहानाचं मोठं करण्यासाठी एवढं केलं, दळणकांडण केलं, कसलेकसले कष्ट उपसले, त्या आईची आज्ञा जर तू पाळू शाकत नसशील, तर मग तुझ्या गुरुमहाराजांची आज्ञा तू काय पाळणार आहेस ? यापूर्वीपण कितीतरी भक्त होऊन गेले, त्यांनी लग्न केलं होतं. ते काही तुझ्यासारखे विवाहाविना अडून राहिले नव्हते. मला माहीतेय की तू ईश्वराचं भजन करतोस, घरात झोपत नाहीस; शरीर आजारी असलं तरीपण रात्री गावाबाहेर कोठेही झोपतोस, पण आम्हाला संसारात रहायचं आहे आणि तुझ्या इतर भावांनापण रहायचं आहे. तूच जर लग्नाला ‘नाही’ म्हणू लागलास तर आपल्या कुटुंबाची, कुळाची अब्रू जाईल. तुझ्या दुसऱ्या भावाचं काय होईल ? तुला लग्न करावंच लागेल !’’

आईचं बोलणं त्यांना पटलं. विशेषतः, ‘‘तुला लहानाचं मोठं करायला जिने दळणकांडण केलं त्या आईची आज्ञा तू पाळू शकत नाहीस तर तुझ्या गुरूंची आज्ञा तू काय पाळणार आहेस ?’’ हे तिचे शब्द त्यांच्या हृदयात तीराप्रमाणे शिरले. त्यांचा चेहरा उतरला आणि ते खोल विचारात गढून गेले.

होकार मिळविण्यासाठी त्यांच्या आईने मग अजून एक युक्ती केली. ती गोदडिया स्वामींना भेटायला गेली. नडियाद मध्ये संतराम मंदिराजवळ ‘चांगेश्वर महादेवा’चं मंदिर आहे तिथे ते येत. श्रीमोटांचा त्यांच्यावर खूप भक्तिभाव होता हे ती जाणून होती. त्यांना भेटून डोळ्यात पाणी आणून तिने त्यांना काकुळतीने विनवणी केली, ‘‘महाराज, माझ्या चुनियाला

कसंही करून लग्नाला तयार करा. माझी तेवढी एकच इच्छा बाकी आहे.''

महाराज म्हणाले, ''माताजी, तुम्ही घरी जा. मी सगळं काही ठीक करतो, तुम्ही काही काळजी करू नका.''

काही दिवसांनी श्रीमोटांचं महाराजांकडे जाणं झालं. तेव्हा महाराजांनी त्यांना प्रेमाने विचारलं, ''चुनीलाल, तू आईचं ऋण मानतोस ना ?''

आजच हा प्रश्न त्यांनी आपल्याला का विचारावा याचं श्रीमोटांना कोडं पडलं. ''होय बापजी, निश्चितच !'' त्यांनी उत्तर दिलं.

''तर मग ज्या आईने तुझं हागणंमुतणं सांभाळून, दुखणी काढून आणि दुःखकष्ट भोगून तुला मोठं केलं, तिचं ऐकायला नको का ? तिचं बिचारीचं एकच मागणं आहे की आपल्या मुलाने लग्न करावं म्हणजे तो सुखी होईल. बाळ, आईचं मागणं धुडकावून तिच्या हृदयाला दुःखाच्या डागण्या देऊ नकोस,'' महाराजांनी थोडंसं गंभीर होत त्यांना सांगितलं.

त्यांनी एवढं सांगितल्यावर आईला 'नाही' म्हणण्याचा प्रश्नच राहिला नाही. आईला अस्मान ठेंगणं झालं. मात्र त्यांनी आईला ठणकावून सांगितलं, ''मी लग्न करीन, पण लक्षात ठेव, कोणत्याही प्रकारचा अनावश्यक आणि डामडौलाचा खर्च मी होऊ देणार नाही आणि कर्ज काढूनही काही करायचं नाही.''

पोरगा लग्नाला राजी झाला याचा आनंद झालेल्या त्या माऊलीने सारंकाही कबूल केलं.

श्रीमोटांनी विचार केला,''लग्न व्हायचंच आहे तर ते होऊन जाऊ दे. तुझ्यात आदर्शाविषयी निष्ठा किती दृढ आहे,

त्यापासून तू किती ढळतोस ते तरी अनुभवायला मिळेल. या संग्रामातूनच तुझ्यातले शौर्य, पराक्रम, तेजस्विता हे गुण प्रगट होतील.''

लग्नाची सर्व तयारी झाली. नडियादहून अहमदाबादला जायला वरपक्षाची मंडळी तयार झाली. सामानसुमान बाहेर काढून त्याचा ढीग केला आणि श्रीमोटा घोडागाडी घेऊन येतील या विचाराने सारे तिथेच थांबले. पण ते बाहेर आले, त्यांनी स्वतःचं सामान स्वतःच उचललं आणि ते स्टेशनच्या दिशेने चालू लागले. नाईलाजाने सर्वांना वराचा कित्ता गिरवावा लागला.

रेल्वेने अहमदाबाद स्टेशनवर आल्यावर तिथून विवाहस्थानी पण वरपक्ष चालतच गेला. ही कंजूसी आणि मूर्खपणा आहे अशी बऱ्याचजणांनी टीका केली पण त्यांच्या बोलण्याची श्रीमोटांना कोठे पर्वा होती ? आपल्या विचारांशी, मतांशी आणि धारणांशी ते भक्कम होते. याबाबतीत तडजोड स्वीकारणं त्यांच्या रक्तातच नव्हतं !

लग्नाचे विधी सुरू झाले. गुरुजींनी येऊन शुभमंत्र उच्चारण्यास सुरूवात केली. श्रीमोटांचं 'स्मरण' आणि 'प्रार्थना' नडियादहून निघाल्यापासून अखंडितपणे सुरू होती. त्यात एवढी प्रगाढता होती की भजनं म्हणून त्यांना शरीराचं बाह्य-भान प्रयत्नपूर्वक टिकवावं लागत होतं.

आता गुरुजींचं मंत्रउच्चारण सुरू झालं आणि ते बाह्यभान टिकवणंदेखील त्यांना कठीण जाऊ लागलं. लग्नसोहळ्याच्या प्रसंगी भजनं गाणं शक्यच नव्हतं. तसं केलं असतं तर आईला निश्चितपणे वाटलं असतं की ''चुनियाने माझी अब्रू घालविली !''

पाटावर बसल्याबसल्या त्यांना अशी भावावस्था प्राप्त झाली की बाह्यभान पूर्णतः लोप पावलं, शरीर निष्कंप झालं आणि अर्धोन्मिलीत नेत्रांतून अश्रूबिंदू ओघळू लागले.

या अकल्पित आणि अनाकलनीय प्रकाराने मंडपात एकच खळबळ माजली. त्यांना काही रोग झाला असावा अथवा कसली तरी बाधा झाली असावी अशी शंका बऱ्याच जणांच्या मनात आली.

वरपक्षातील मंडळींनी समजावून सांगितलं, ''असं अधून मधून होण्याची यांना सवय आहे. तुम्ही घाबरू नका. थोड्याच वेळात हे भानावर येतील.''

हे सर्व पाहून आई उद्वेगाने उद्‌गारली, ''मेल्याने लग्नाच्या वेळीपण नाटक करायचं सोडलं नाहीच !''

तासाभरानंतर त्यांची भावसमाधी उतरली, आणि पुढचे विधी सुरू झाले आणि यथोचितपणे पार पडले.

'शुभमंगल सावधान'च्या गजरात त्यांचं गृहस्थाश्रमात पदार्पण झालं होतं.

वधूला लग्नाच्या दिवशी ताप होता. बऱ्याच दिवसांपासून तशी ती आजारीच होती. तिचे काका तिला लग्न लागल्यावर ताबडतोब माहेरी घेऊन गेले. आजारपणामुळे तिचं नडियादला जाणं कधीच शक्य झालं नाही. क्षयाच्या आजाराने तिच्या शरीरास ग्रासून टाकलं. तिने केवळ 'लग्नाच्या बोहल्यावर उभे राहण्याचा' आपला ऋणानुबंध पूर्ण केला आणि सौभाग्याचा टिळा बरोबर घेऊन चारसहा महिन्यातच शरीर सोडून दिलं.

परत लग्नाचा विषय काढण्याचं धाडस करण्यास श्रीमोटांची आई धजावलीच नाही.

❖

## ४६. ''जोपर्यंत तू मला बघत नाहीस, तोपर्यंत सर्व व्यर्थ!''

सद्गुरुंनी दिलेली साधना श्रीमोटा करीत होते. साधनेत अडचणी, विघ्ने, संघर्ष हे असणारच ! त्यांचं अतिक्रमण केल्याशिवाय यशोमंदिरात प्रवेश होणार कसा ? छिन्नीचे घाव बसल्याशिवाय दगडाला देवपण येणार कसं ?...प्रत्येक साधकाला शुद्धीकरणासाठी यातून पार होणं आवश्यक असतंच !

त्यांच्या आयुष्यात अशी वेळ येऊन ठेपली. विकारांच्या लाटांचं तांडवनृत्य सुरू झालं. जंगलात आग लागून पशुपक्षी सैरावरा धावू लागावे तशी त्यांची स्थिती झाली. नामस्मरणाच्या आणि प्रार्थनेच्या धारेने ती आग विझविण्याचा त्यांनी प्राणपूर्वक प्रयत्न केला पण सारंसारं निष्फळ ठरलं !

मोठमोठ्या तपस्यांच्या, योग्यांच्या जीवनातदेखील या विकारांच्या लाटांनी झंझावात निर्माण केला आहे. श्रीमोटांची पण अशीच करूण स्थिती झाली. पाण्याच्या भोवऱ्यात अडकून ते आतआत तळापर्यंत गेले आणि त्यांचा जीव कासावीस झाला, व्याकुळ झाला.

अशा स्थितीतही त्यांच्या पुरुषार्थात खंड पडला नव्हता. स्मशानाजवळील तलावात उभं राहून ते आर्ततेने, मोठमोठ्याने आक्रंदन करून त्या प्रभूस आणि सद्गुरुंस आळवीत, पुकारीत ! प्रार्थना करीत !! गंगौघाप्रमाणे स्मरणधारापण अखंड होती. काही स्थूल उपायदेखील करून झाले, पण सर्वांचा परिणाम शून्य !

एका प्रचंड पुराच्या प्रवाहाच्या धारेत ते सापडले होते आणि तो प्रवाह उद्दंडपणे त्यांना वाहवून नेत होता. अशा आणीबाणीच्या वेळी एका सद्गुरुंशिवाय अन्य कोणी तारू शकेल असं दिसत नव्हतं.

त्यावेळी सद्गुरुंना हृदयात प्रगटविण्याची कला त्यांना प्राप्त झाली नव्हती म्हणून प्रत्यक्षच भेटून, त्यांच्या चरणी लीन होऊन त्यांची याचना करावी आणि यातून मार्ग मिळवावा असं त्यांनी निश्चित केलं.

सद्गुरुंना शोधायचं कोठे, आणि कसं, हा एक गहन प्रश्न होता. त्यावेळी हरिद्वार येथे कुंभमेळा सुरू होता. कुंभमेळा म्हणजे साधुसंतांचं माहेर ! तीनचार वर्षे स्थूल देहाने भेटू न शकणारी संतमंडळी यानिमित्ताने एकत्र येतात आणि आपल्या उपस्थितीने तिथे नवीन प्राणाचा संचारदेखील करतात ! कुंभमेळ्यात सर्व ठिकाणचे साधुसंत, संन्यासी, मुनी, बैरागी, योगी, महंत येतात. सर्वांनाच ओढ असते तिथे येण्याची ! गुरुदेवांची भेटही तिथेच होऊ शकेल असं त्यांना मनोमन वाटलं आणि त्यांची पाऊले चालू लागली कुंभमेळ्याच्या दिशेने !

कुंभमेळ्यातील वातावरणात एक वेगळंच चैतन्य होतं. हजारो - लाखो माणसांचा अथांग समुद्र पसरला होता. जागोजागी साधुसंतांचे आखाडे, धुन्या, तंबू, राहुट्या, पडाव होते. दर्शनासाठी मुंग्यांप्रमाणे रीघ लागली होती. एवढ्या मोठ्या कुंभमेळ्यात सद्गुरुंना शोधायचं म्हणजे गवताच्या गंजीत सुई शोधण्यासारखं होतं. प्रत्येक ठिकाणी जाऊन ते सद्गुरुंचा शोध घेऊ लागले.

हंबरडा फोडून आईच्या शोधार्थ सैरावरा धावणाऱ्या वासराप्रमाणे ते सर्वत्र फिरू लागले. स्वतःच्या देहाची, खाण्यापिण्याची, निद्रेची तमा न बाळगता दोन दिवस नि दोन रात्री ते अखंड शोध घेत होते. शेवटी ते थकून चूरचूर झाले, एक पाऊलही पुढे टाकता येणार नाही इतकी गात्रं शिथिल झाली, गुरुदेव भेटत नाहीत म्हणून अंतरीच्या आक्रोशाने परिसीमा गाठली, थकून ते गंगाकिनारी बसले. सांज ढळ्ली होती आणि रात्रीने चांदण्यांच्या ठिपक्याठिपक्यांची नक्षी असलेली काळीभोर चादर सृष्टीच्या अंगावर अलगद पांघरायला सुरुवात केली होती. सहजच त्यांची बाजूला दृष्टी गेली. आणि त्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. झाडाखाली आपल्याच मस्तीत बालयोगी महाराज बसलेले होते !

अंधाऱ्या खोलीत लख्खकन प्रकाश पडावा तसं त्यांना वाटलं. ता धावतधावत गेले आणि पडून राहिले सद्‌गुरुंच्या चरणांवर डोकं ठेवून ! एक समर्पित पुष्प बनून !! डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वहात होत्या आणि सद्‌गुरुंच्या पावन चरणांवर अभिषेक होऊन ती पाऊलं धुतली जात होती. पाऊणएक तास ते श्रीचरणी तसेच पडून राहिले, प्रार्थना करीत स्वतःला मोकळं करीत राहिले.

शेवटी गुरुमहाराजांनी त्यांना उठविलं.

ते म्हणाले, "गुरुदेव ! मी तुम्हाला तीन दिवसांपासून शोधत आहे, पण तुम्ही तर जवळ असूनही दिसला नाहीत ?"

हंसून बालयोगी महाराज म्हणाले, "मी तर तुला बघत होतो, पण जोपर्यंत तू मला बघत नाहीस, तोपर्यंत सर्व व्यर्थ !"

श्रीमोटा अवाक्च झाले. ते म्हणाले, "पण बापजी ! मला थोडं बोलावलं असतं तर ! तुम्हाला असंदेखील वाटलं नाही का, की हा पोरगा बिचारा उपाशीतापाशी आपल्या गुरुंना शोधत आहे, शुद्धबुद्ध विसरून गेला आहे ?"

"तुला बोलवायचं काम माझं नाही. मला बोलवायचं काम तुझं आहे. तू मला पहात नाहीस तोपर्यंत बोलावणं व्यर्थच होय !"

सद्गुरुंच्या या साध्यासुध्या वाटणाऱ्या वाक्यांमध्ये दडलेला गहन आणि सूक्ष्म अर्थ कळण्याची शक्ती त्यावेळी त्यांच्यामध्ये नव्हती. त्याचं संपूर्ण आकलन त्यांना कालांतराने झालं. ज्या कारणाकरिता सद्गुरुंकडे जाणं झालं होतं, त्यापासून मुक्त होण्याची सूक्ष्म कला आणि सूक्ष्म साधना त्यांना सद्गुरुंनी तेव्हा प्रदान केली. ती साधना करताकरता प्राण कंठाशी यावेत इतकी ती कठीण होती, तरीसुद्धा श्रीमोटांनी ती नेटाने पार पाडली आणि विकारांच्या चक्रीवादळातून ते बाहेर पडले.

❖

## ४७. सर्पदंश

प्रार्थना, स्तवन, भजन, ध्यान, धारणा, नामस्मरण इत्यादीं द्वारा भगीरथ पुरुषार्थ करूनही श्रीमोटा आपले नामस्मरण दिवसांच्या सोळा तासांपेक्षा जास्त वाढवू शकले नाहीत, हे त्यांना काट्याप्रमाणे सलत होतं.

एकदा 'बोदाल हरिजन आश्रमा'च्या उद्घाटनाच्या निमित्ताने सरदार वल्लभभाई पटेल येणार होते. श्रीमोटा आणि हेमंतकुमार नीळकंठ हे दोघे संचालक होते.

सभेची वेळ झाली आणि सरदारश्री आले. खच्चून भरलेल्या जनसमुदायाने हर्षाने जयघोष केला. हरिजन आश्रमाच्या उद्घाटनास एवढे लोक जमल्याबद्दल सरदारश्रींनी लोकांचं अभिनंदन केलं आणि अस्पृश्यतेचा कलंक समाजातून दूर करण्याचं आवाहन केलं.

सभा संपली आणि पूर ओसरावा तशी गर्दी निघून गेली. दिवसभराच्या श्रमाने थकलेले श्रीमोटा शेतात झोपायला गेले. त्यांच्यासोबत ठक्करबाप्पा आणि श्रीकान्त शेठ पण झोपायला आले. श्रीमोटा मध्ये आणि दोन बाजूला ते दोघेजण झोपले.

दिवसा मंडप उभारणीसाठी शेतात साफसफाई करीत असतांना एक साप लोकांना दिसला होता. त्याला न मारता लोकांनी छेडछाड करून सोडून दिलं होतं. आपल्या जागेवर अतिक्रमण झाल्यामुळे चवताळलेला तो साप दिवसा दूर निघून गेला होता आणि सर्व सामसूम झाल्यावर तो परत आपल्या जागेकडे आला. आतादेखील आपली जागा लोकांनी झोपून अडविल्यामुळे, क्रोधाने त्याने बाजूच्या दोघाजणांना सोडून देऊन नेमका श्रीमोटांच्या जांघेवर दंश केला आणि आला तसाच सळसळत निघून गेला.

वेदनेने मोठ्याने ओरडत श्रीमोटा फटकन् जागे होऊन उठून बसले. एकदम डोक्यात झटका बसल्यासारखं झालं. डोक्याच्या मध्यभागी काहीतरी सूंऽऽ सूंऽऽ करीत गेलं असावं असं त्यांना वाटलं आणि डोकं एकदम जड झालं. जांघेच्या जागीदेखील डंख केल्यासारखं जाणवलं होतं.

बाजूचे दोघेही झटकन् जागे झाले. लगेच त्यांनी श्रीमोटांना कडुलिंबाचा पाला आणि मीठ खायला दिलं. ते त्यांना कडू

लागलं नाही. आता आपली शुद्ध हरपायला लागली आहे असं त्यांना जाणवलं आणि त्याचवेळी गांधीजींचं एक वचन त्यांना अचानक आठवलं, "ज्याला साप चावला असेल त्याला मारूनमारून पण जागतं ठेवावं, त्यात हिंसा नाहीये, तर केवळ अहिंसाच आहे."

श्रीमोटांनी दृढपणे ठरविलं की "सर्पदंश झालेला आहे, यातून जर जिवंत रहायचं असेल तर कोणत्याही परिस्थितीत सभान–जागृत रहायलाय पाहिजे." म्हणून त्यांनी "हरिः ॐ"चा जप मोठ्याने सुरू केला. एका बाजूस सापाचं विष बेभान करू पहात होतं आणि दुसऱ्या बाजूस प्राणपूर्वक आणि वेगाने होत असलेल्या नामस्मरणाने जागृती ठेवण्याचा प्रयत्नदेखील अखंडितपणे सुरू होता.

सर्पदंश झाला आहे हे लक्षात आल्यावर सर्वजण घाबरून गेले आणि श्रीमोटांना 'आरोदर' या गावी सापाचं विष उतरविणाऱ्या माणसाकडे नेण्यात आलं. त्याच्या उपायांचा काहीच उपयोग झाला नाही. श्रीमोटांच्या वेदना, हरिः ॐ चं स्मरण आणि विषाचा फैलाव हे तिन्ही सुरूच होतं. परत त्यांना बोदालला आणलं. ठक्करबाप्पांना हे कळविण्यात आलं.

'बोरसद'हून एकाजणास टॅक्सी आणायला ठक्करबाप्पांनी पिटाळलं. पैसे जवळ नसल्याने तो हात हलवीत परत आला. मग दुसऱ्या माणसास पैसे देऊन 'बोरसद'हून टॅक्सी मागवून ताबडतोब आणंदच्या 'मिशन हॉस्पिटल'मध्ये श्रीमोटांना नेण्यात आलं.

डॉ. कुक हे त्या हॉस्पिटलचे प्रमुख होते. त्यांनी सर्व घडलेलं ऐकलं आणि श्रीमोटांना तपासलं. जरा नाखुशीने आणि रागानेच ते म्हणाले, "तुम्ही फार उशिरा आणलं आहे.

बहात्तर तास उलटून गेले आहेत. विष सर्व शरीरात भिनलंय. मी प्रयत्न करतो, पण खात्री देता येत नाही. परमेश्वराच्या हातीच सर्व अवलंबून आहे.''

श्रीमोटांना ऑपरेशन थिएटर मध्ये नेऊन 'स्टमक वॉश' आणि 'एनिमा' दिला गेला. त्यातून जे पाणी निघालं त्याचं पृथःकरण केलं तर दिसून आलं की फार मोठ्या प्रमाणात विष होतं.

'एनिमा' आणि 'स्टमक वॉश' देणं सुरूच ठेवलं. हळूहळू पाण्यातलं विषाचं प्रमाण कमी होत गेलं. शेवटी एकदाचं पाणी असं निघालं की त्यात विष जवळजवळ नगण्यच होतं.

सुटकेचा निःश्वास टाकून डॉक्टर म्हणाले, ''पेशंटची पुण्याई, ईश्वराची कृपा आणि माझे प्रयत्न या तिघांमुळे पेशंट जिवंत राहिला आहे. अन्यथा एवढं जहरी विष साऱ्या शरीरात पसरल असतांनाही कोणी क्वचितच जिवंत राहू शकला असता ! सारी ईश्वराची दया !! तुम्ही आता पेशंटला घरी नेऊ शकता.'' थकलेले डॉक्टर निघून गेले. एका पेशंटचा जीव वाचवू शकल्याचं समाधान त्यांच्या थकलेल्या चेहऱ्यावरही सर्वांना वाचता आलं.

असं म्हटलं गेलं आहे की ''प्रत्येक शापाला एक वरदानही असतंच !... For every curse, there is a blessing for it ! नियतीने घडवून आणलेल्या सर्पदंशाच्या घटनेनंतर श्रीमोटांच्या नामस्मरणात अखंडता आली, अजपाजप प्रगट झाला.

नियती हसून त्यांना विचारीत होती. ''घडलं तो शाप होता की वरदान ?''

त्यांच्या मनात विचार आले, "प्रत्येक कर्म करतांना नामस्मरण अखंड ठेवण्यासाठी आपण किती झटलो ! कितीतरी वेळा हारपण झाली ! आत्ताच्या घटनेमुळे मात्र आपल्याला मृत्यूचा अनुभवपण प्राप्त झाला आणि त्याचबरोबर जे परिश्रमपूर्वक देखील साध्य होऊ शकलं नव्हतं ते सरळ आणि सहज बनून गेलं. खरोखर, ही भगवंताची कृपाच होय !

"जीवनातल्या चांगल्या आणि वाईट दोन्ही प्रसंगात त्या भगवंताची केवळ कृपाच असते, फक्त कृपा !"

आत सुरू असलेला अजपाजप श्रीमोटा शांतपणे ऐकत होते. अंतरी हृदयसिंहासनावर स्थानापन्न होऊन सद्गुरु छिन्नीने जीवत्त्वाच्या कपच्या तोडीत होते आणि त्यातूनच तो अजपाजपाचा ध्वनी स्पंदित होत होता.

मूर्ती लवकरच प्रगट होईल हे आता सुनिश्चित होतं !

❖

## ४८. अवधूताचा समागम

एक दिवस नडियादमध्ये 'मरीडा' भागाजवळील परिसरातील मुलांना शाळेसाठी बोलावित असतांनाच एका हरिजन बंधूंनी त्यांना बातमी दिली, "चुनीभाई, आपल्या कुंडामागील शेतात एक नग्न मनुष्य येऊन झोपला आहे. केव्हाचा तिथे झोपून आहे, पण अजिबात हालचाल करीत नाहीये !"

ऐकून त्यांना आश्चर्य वाटलं. "असा मनुष्य एकतर वेडा असेल किंवा उच्च स्थितीतील अवधूत असेल. या दोघां-शिवाय अजून कोणाची अशाप्रकारे नग्न पडून राहण्याची हिंमत होणारच नाही," त्यांच्या मनात विचार आला.

आपल्या शाळेचं काम दुसऱ्या शिक्षकावर सोपवून ते घरी गेले आणि नवे कपडे घालून शेताकडे निघाले. आपल्याबरोबर एका मोठ्या लोट्यात त्यांनी दोन शेर दूधही घेतलं.

शेतात पोहोचल्यावर त्यांनी पाहिलं, ती नग्न व्यक्ती अजून झोपलेलीच होती.

श्रीमोटा काही अंतरावर बसून ईश्वरस्मरण करू लागले. दोनएक तासानंतर त्या व्यक्तीने किंचित चुळबूळ केली. अजून काही वेळ गेला. आता ती व्यक्ती कूस बदलून परत झोपी गेली. शेवटी श्रीमोटांच्या बाजूला परत कूस बदलून एकदाचे त्याने डोळे उघडले.

श्रीमोटांनी हातातील दुधाचा लोटा त्या व्यक्तीपुढे धरला आणि प्रेमाने म्हणाले, "प्रभु ! कृपा करून या दुधाचा स्वीकार कराल तर आपली फार कृपा होईल."

एक चकार शब्द न बोलता त्यांनी तो लोटा हाती घेतला आणि गटागटा सर्व दूध पिऊन टाकलं.

आता संध्याकाळचे सहा वाजत आले होते. ते श्रीमोटांना म्हणाले, "मला एखाद्या मुसलमानाकडे घेऊन चल." ते मराठीत बोलत आहेत असं त्यांना वाटलं. आतापर्यंतच्या त्यांच्या वागणुकीवरून हे कोणीतरी अवधूत असावेत अशी त्यांची खात्री झाली होती.

"अशा नग्न स्थितीतील व्यक्तीस कोणता मुसलमान त्यांना आपल्या घरी ठेवून घेईल ? अशी अवधूत व्यक्ती कशी वागेल हे काही सांगता येतं का ?" ते विचारांच्या भोवऱ्यात सापडले.

विचार करताकरता त्यांना हकीम साहेबांचं स्मरण झालं. ''ते आपल्याशी प्रेमसंबंध ठेवून आहेत तेव्हा त्यांनाच विचारावं.'' — त्यांनी ठरविलं.

ते हकीमसाहेबांकडे गेले. ते घरीच होते. श्रीमोटांनी त्यांना नम्रतेने विचारणा केली, ''हकीमसाहेब, कुंडाच्या मागे एक अवधूत आलेले आहेत आणि त्यांना मुसलमानाच्याच घरी रहायचं आहे. म्हणून आपणास विनंती करायला आलो आहे. आपल्या माडीवर त्यांना राहण्याची आपण जर परवानगी द्याल तर मी स्वतः त्यांच्या सेवेत सतत हजर राहीन आणि तुम्हाला कसलीच तोशिस पडू देणार नाही.''

त्यांनी प्रेमाने अनुमती दिली.

श्रीमोटांनी अजून स्पष्ट केलं, ''हकीमसाहेब, अवधूत तद्दन नग्नावस्थेत आहेत, पण तुम्ही घाबरून जाऊ नका. मी त्यांना समजावीन आणि बारदाणाच्या तुकड्यात गुंडाळून आणीन.''

हे ऐकल्यावर हकीमसाहेबांच्या चेहऱ्यावर थोड्या आठ्या पसरल्या आणि ते विचार करू लागले. ते पाहून श्रीमोटांनी परत सांगितलं, ''हकीमसाहेब, या बाबांना मुसलमानाकडेच राहायचं असल्याने आपणास विनंती करीत आहे. हिंदूकडे राहणं त्यांना चालत असतं तर, मी माझ्या स्वतःच्याच घरी आनंदाने नेलं असतं अथवा अन्यत्र व्यवस्था करू शकलो असतो.

''तुम्ही जर 'हो' म्हणत असाल तर अंधार झाल्यावर मी त्यांना घोडागाडीतून घेऊन येईन. घोडागाडीस चारी बाजूंनी पडदे लावीन

म्हणजे कोणीही पाहू शकणार नाही. तुमच्या घरासमोर आल्यावर लगेच त्यांना जिन्यावरून माडीवर चढवीन म्हणजे कोणाला कळणारही नाही. मग तर तुमची काही हरकत नाहीये ना ?''

हकीमसाहेब म्हणाले, ''भगत, तुमचे अवधूत असे न वागोत की ज्यामुळे त्यांना 'बाहेर जा' म्हणण्याची आमच्यावर पाळी यावी ! याची जबाबदारी तुमच्यावर राहील हे लक्षात ठेवा.''

हकीमसाहेबांची संमती तर मिळाली. मग घोडागाडीची व्यवस्था करून श्रीमोटा अवधूतांकडे कुंडावर गेले. सात वाजून गेले होते आणि सर्वत्र अंधार पसरायला सुरुवात झाली होती. ते अवधूतांना म्हणाले, ''बाबा, वस्तीतून जायचं असल्याने हा छोटा बारदाणाचा तुकडा कमरेभोवती नेसा आणि घोडागाडीत बसा. घर आल्यावर मात्र लगेच जिना चढून वर जा !''

अवधूत घोडागाडीत बसले. श्रीमोटांनी घोडागाडीचे सर्व पडदे पाडले आणि हकीमसाहेबांच्या घराच्या दिशेने घोडागाडी चालू लागली.

हकीमसाहेबांच्या घराच्या जिन्याजवळ श्रीमोटांनी घोडागाडी थांबवायला लावली. अवधूत पटकन् उतरले आणि झपाट्याने जिना चढून वर गेले. त्या अवधूतांचं शरीर त्या मानाने स्थूल असूनदेखील ते इतक्या त्वरेने आणि जोमाने जिना चढून गेले की ते पाहून श्रीमोटा अचंबितच झाले.

माडीवर गेल्यावर ते अवधूतांना म्हणाले, ''बाबा, आता थोडावेळ आरामशीर बसा. मी तुम्हाला बसायला गादी, जेवणासाठी प्रसाद, पाण्याचा मटका आणि दोन पेले इत्यादी आवश्यक ते ते घेऊन येतो.''

झटकन् जाऊन श्रीमोटा हे सर्व घेऊन आले, त्याशिवाय मलमूत्र विसर्जनासाठी मातीची पसरट भांडी, विटा, माती आणि केरसुणी हेदेखील आणलं.

त्यांनी विटा रचून मातीचं पसरट भांडं विटांच्या मधोमध ठेवलं आणि त्यावर माती टाकली. बाबांना शौचासाठी बसण्याची अशी व्यवस्था झाली. नंतर केरसुणी घेऊन त्यांनी सर्व जागा व्यवस्थित झाडून काढली आणि मग पाण्याचा माठ भरून तोही आणून ठेवला.

एवढं झाल्यावर त्यांनी बाजरीची भाकरी, भाजी आणि दूध त्यांच्यासमोर ठेवलं. त्यांनी ते सर्व खाल्लं, त्यावरून त्यांना ते आवडलं असावं असा श्रीमोटांनी अंदाज केला.

"बाबा, रात्री झोपण्यासाठी सतरंजी, गादी-उशी घेऊन येऊ ना ?" त्यांनी दोनतीनदा बाबांना विचारलं. अवधूतांनी त्यांच्या बोलांकडे पूर्ण दुर्लक्ष केलं आणि आपल्याच मस्तीत बसून राहिले, त्यामुळे ती गोष्ट निकालात निघाली. मग परत श्रीमोटांनी त्यांना विचारलं नाही.

'आपण बाबांची सेवा करावी' असा भाव निर्माण झाला आणि श्रीमोटा त्यांच्याजवळ गेले आणि पायावर हळुवारपणे हात फिरवायला सुरूवात केली. त्यांनी अजिबात विरोध केला नाही. मग त्यांनी हातपाय चेपायला सुरूवात केली. ही सेवा करण्याचं भाग्य त्यांना एकच दिवस प्राप्त झालं, नंतर त्यांनी नकार दिला.

अवधूत स्वतःहून काही काम करायला सांगत नसल्यामुळे ते स्वतःच सुचेल ती सेवा करू लागले. बाबांसाठी मलमूत्र विसर्जनास विटा, भांडी व मातीची व्यवस्था केली होती, तरी ते मात्र त्याचा उपयोग न करता मनास येईल तिथे विधी

करीत. श्रीमोटा ते सर्व प्रेमाने साफ करीत आणि बाबाचं गुह्य अंगपण साफ करून पुसत, कारण बाबा शौचविधी केल्यानंतर काहीच स्वच्छता ठेवीत नसत. त्यांचं शरीराकडे जणू लक्षच नव्हतं. बाबांची सेवा श्रीमोटा खूप प्रेमाने करीत होते. त्यांच्या सेवेत कसलीच त्रुटी राहू नये याची ते पुरेपूर दक्षता घेत. सेवा करताकरता त्यांचं नामस्मरण, प्रार्थना, भजनं हेदेखील सुरू होतं. बाबा हे सर्व पहात, ऐकत पण त्यांनी आपलं मौन कधीच सोडलं नाही.

असे काही दिवस गेले आणि एक विस्मयजनक घटना घडली. अवधूतांचं खाणंपिणं व्यवस्थित सुरू होतं, पण चारपाच दिवस त्यांनी मलमूल विसर्जन केलंच नाही. त्यांचं शरीरसुद्धा पूर्ण स्वस्थ होतं. आजार वा विकृतीचं कोणतंच लक्षण दिसून आलं नाही. मलमूत्रत्यागावर त्यांचं स्वतःचं पूर्ण नियंत्रण असल्याचं या घटनेद्वारे त्यांनी श्रीमोटांना दाखवून दिलं.

अवधूतांना येऊन दहाबारा दिवस उलटून गेले आणि मग आपणास परत जायचं आहे असा त्यांनी श्रीमोटांना संकेत दिला. श्रीमोटांनी पूर्वीप्रमाणेच घोडागाडीची व्यवस्था केली आणि त्याच पद्धतीने 'उत्तरसंडा' च्या दिशेने ती चालू लागली.

काही अंतर पार केल्यावर बाबांनी घोडाघाडी थांबविण्याचा इशारा केला. त्यांना आता यापुढे चालत जायचं आहे हे श्रीमोटांच्या लक्षात आलं. त्यांनी टांगा थांबवून बाबांना खाली उतरू दिलं आणि त्यांच्या चरणी प्रणाम केला.

अवधूत चालू लागले. तेपण त्यांच्याबरोबर चालत राहिले. थोड्या वेळाने अवधूत म्हणाले, ‘‘तू माझ्याबरोबर चल.’’

श्रीमोटा हात जोडून म्हणाले, ''प्राप्त झालेल्या व्यक्ती-परिस्थिती-ऋणानुबंधांच्या संयोगानुसार — त्यांच्या संदर्भात माझ्याकडून अपेक्षित धर्माचे, ईश्वरासाठी, शक्य तेवढे प्रेमभक्तीपूर्वक पालन करणे—यासच मी 'प्रत्यक्ष धर्म' मानतो. तरीदेखील तुम्ही जर पुढे साधनेत उच्च गती प्राप्त करवून देणार असाल तर मी येईन''

थोडा वेळ गप्प राहून बाबा म्हणाले, ''जरूर, तू माझ्या स्थानी ये.''

श्रीमोटांनी उत्तर दिलं : ''तुम्ही माझ्या या तीन गोष्टींचा स्वीकार करा — माझी साधना फलद्रूप होण्यासाठी तुम्ही कृपा करावी; मला आपलं सतत दर्शन व्हावं आणि आपल्याविषयी उत्कट भावभक्ती माझ्यात प्रगट व्हावी; आणि आपण ज्या ठिकाणी असाल तिथे मला येण्याजाण्यासाठी रक्कम अचानक कोणाकडून तरी प्राप्त व्हावी — या तीन गोष्टी पूर्ण झाल्या तरच मी आपल्या स्थानी येऊ शकेन. आपण माझ्या या तीन विनंत्यांचा स्वीकार करावा !''

यावर काहीही न बोलता अवधूत निघून गेले आणि श्रीमोटा परत फिरले. हकीमसाहेबांच्या घरी जाऊन त्यांची जागा साफसूफ करून दिली आणि त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

हकीमसाहेब म्हणाले, ''भगत, तुमचे अवधूत दुसरेतिसरे कोणी नसून साकोरीचे 'उपासनी बाबा' होते. तुमच्या सेवेने ते प्रसन्न झाले आणि तुम्हास घेऊन जाण्यासाठीच ते आले होते.''

आपलं बाबांबरोबर झालेलं बोलणं श्रीमोटांनी हकीम-साहेबांना सविस्तर सांगितलं. त्यांनी ते लक्षपूर्वक ऐकलं आणि

आपलं मत प्रगट केलं, "भगत, तुम्ही बाबांबरोबर गेला असता तर फारफार बरं झालं असतं."

पण आपली कर्मे, कौटुंबिक आणि इतर कर्तव्ये व जबाबदाऱ्या सोडून आपण बाबांबरोबर गेलो नाही यात काही अनुचित केलं असं श्रीमोटांना वाटलं नाही आणि आपल्या कामात ते पूर्ववत व्यग्र झाले.

❖

## ४९. भजन एकच, परिणाम दोन

एक दिवस सकाळी नित्यक्रमाप्रमाणे श्रीमोटा हरिजन शाळेत जायला निघाले. येताजाता भजनं म्हणत जाण्याचा त्यांचा परिपाठ होता. त्याप्रमाणे भजन गातगात ते चालले होते. अमुक एक भजन अमुक वेळीच म्हणायचं असा त्यांचा नियम नव्हता. उत्स्फूर्तपणे जे गायची इच्छा होईल ते भजन ते म्हणत.

हरिजनशाळेत जाण्याच्या रस्त्यावरच एक वैष्णव हवेली * लागत असे. खाली मंदिर होतं आणि वर महाराजश्री रहात असत. हवेलीत सकाळीसकाळी दर्शनासाठी वैष्णव भक्तांची धावपळ रोजचीच असे.

त्या दिवशी श्रीमोटा शाळेत जात असतांना त्या हवेली समोरून जातांना,

"वैष्णव झाला नाहीस तू,<br>
हरिजन झाला नाहीस तू,<br>
कशास गुर्मित फिरतो रे ?.. वैष्णव..."

हे भजन गात चालले होते. आपण कोठून चाललो आहोत

* वैष्णवांचं मंदिर

याचेही त्यांना भान नव्हते, स्वतःच्याच मस्तीत ते भजन म्हणत चालले होते.

वैष्णव हवेलीतील एका वैष्णव भक्ताने ते ऐकलं आणि त्याच्या मनाने घेतलं की हा माणूस हे भजन मुद्दाम मला चिडविण्यासाठीच म्हणतोय ! तो रागाने बेभान झाला आणि श्रीमोटांजवळ धावत येऊन त्याने खाडकन् त्यांच्या थोबडीत ठेवून दिली. अचानक मिळालेल्या या माराने ते स्तंभित झाले. हा मनुष्य आपल्याला का मारतोय याचा त्यांना उलगडाच झाला नाही.

त्या खवळलेल्या माणसाचा राग अजून कमी झाला नव्हता. तो म्हणाला, ''साऽऽला, सकाळीसकाळी वैष्णवांची निंदा करतोस, मुद्दाम चिडविण्यासाठीच हवेलीसमोर भजन म्हणतोस ? आम्ही नाहीये, तर मग काय तू स्वतःला मोठा वैष्णव समजतोस होय रे ?...''

श्रीमोटा त्याचं बोलणं ऐकून शांतपणे हात जोडून म्हणाले, ''साहेब, तुम्हाला संबोधून मी हे भजन गात नाहीये, मी तर स्वतःलाच सुधरविण्यासाठी मनाला उद्देशून म्हणतोय आणि तेही आज प्रथमच नव्हे, तर बऱ्याच दिवसांपासून ! तुमचा निष्कारण गैरसमज झालाय.''

रागाने बडबडत तो मनुष्य निघून गेला आणि श्रीमोटांनी हवेलीतील प्रभुजींना बाहेरूनच मानसिक नमस्कार केला आणि ते परत शाळेकडे भजन गातगात चालू लागले.

प्रभुजींनीच आपली परीक्षा पाहण्यासाठी त्यांच्या द्वारावर लीला करून त्यांच्या भक्तास थप्पड मारण्यास उद्युक्त केलं आहे हीच भावना त्यांच्या मनी होती.

काही दिवस असेच गेले. त्यांचा दैनंदिन कार्यक्रम सुरूच होता.

उपासनी महाराजांचं नडियादला आगमन होऊन गेल्याला बरेच दिवस उलटून गेले होते. हल्ली त्यांना त्या दिगंबर अवधूतांचं दर्शन वारंवार होत होतं. मनही आज साकोरीस जाण्यास ओढ घेत होतं. एकदोन दिवसात पैशांची सोय झाली तर साकोरीला जायचं त्यांनी ठरविलं.

याच सुमारास, १९२८ मध्ये, बारडोलीचा सत्याग्रह जोरदारपणे सुरू होता, आणि स्वयंसेवकांच्या यादीत श्रीमोटांनीदेखील आपलं नाव नोंदविलं होतं.

बारडोलीला बोलावलं असल्याचं पत्र त्यांना आजच मिळालं होतं. नेहमीप्रमाणे आजही ते हरिजनशाळेत जायला निघाले आणि भजन म्हणतम्हणत त्याच वैष्णवांच्या हवेलीवरून पुढे जाऊ लागाले.

योगयोगाने त्यांच्या मुखी त्यादिवशीसुद्धा तेच भजन होतं, "वैष्णव झाला नाहीस तू, कशास गुर्मित फिरतो रे ?" तेवढ्यात एक वैष्णव भक्त धावतधावत त्यांच्याजवळ आला आणि त्याने श्रीमोटांच्या हाती पंचेचाळीस रूपये ठेवले.

श्रीमोटा अचंबित झाले आणि त्यांनी विचारलं, 'भाई ! ही रक्कम कसली आहे ? आणि मला का देताहात ?'

ती व्यक्ती म्हणाली, "तुम्ही रोज या मार्गाने येताजातांना भजनं गात जात असता दे मी रोज पहात आहे. त्याशिवाय संतराम मंदिरातून दर्शन करून येतांना बऱ्याचदा मी तुम्हाला तिथेही मोठ्याने भजनं म्हणतांना ऐकलंय व त्यामुळे माझ्या मनात तुम्हाविषयी प्रेम आणि एक विशिष्ट भाव निर्माण झाला आणि कितीतरी दिवस मनात होतं की तुम्हाला काहीतरी द्यावं. आज ती इच्छा फार प्रबळ झाली आणि

हातात येईल तेवढी रक्कम घेऊन मी तुमचीच वाट बघत होतो... म्हणून ही अल्पशी प्रेमभेट आहे. कृपया तिचा स्वीकार करा.''

श्रीमोटांचं हृदय भरून आलं. मनोमन त्यांनी परत प्रभुजींना, सद्‌गुरुंना, उपासनी बाबांना साष्टांग दंडवत केला.

उपासनी बाबांच्या दिव्य अदृश्य शक्तीनेच त्या भक्तास पैसे देण्याची प्रेरणा दिली होती याविषयी त्यांच्या मनात तिळमात्र शंका नव्हती.

आता साकोरीस जाण्यावर शिक्कामोर्तब झालं !

रजेचा अर्ज पोस्टात टाकून श्रीमोटांनी प्रस्थान केलं साकोरीला, उपासनी महाराजांकडे !

❖

## ५०. साकोरीला उपासनी महाराजांकडे

साकोरीला पोहोचल्यावर सामान एके ठिकाणी ठेवून, स्नान करून श्रीमोटा उपासनी महाराजांच्या दर्शनास गेले.

त्याकाळी बाबा लाकडाच्या मोठ्या पिंजऱ्यात बसून असत आणि एक छोटी तेराचौदा वर्षांची मुलगी बाबांच्या सेवेत असे, जी पुढे 'गोदावरी माता' म्हणून ख्यातनाम झाली.

श्रीमोटांनी जवळ जाऊन बाबांना साष्टांग दण्डवत केला. बाबांनी त्यांना पिंजऱ्याजवळच बसायची आज्ञा केली. ते बाजूलाच बसले आणि त्यांच्या नेहमीच्या साधनेत गढून गेले.

पाचसहा तास उलटून गेले असतील. नंतर श्रीमोटांना लघुशंकेची भावना झाली. उठण्याचा प्रयत्न केला तर उठता येईना. बसूनबसून पाय आखडले असतील म्हणावं तर पाय हालत होते, गुडघ्यात वाकतही होते. असं का व्हावं याचं

त्यांना कोडं पडलं. बाबांनी आज्ञा केलेल्या बसण्याच्या जागेत हातपाय हलवता येत होते, पण उठता येत नव्हतं किंवा सरकतसरकत त्या जागेपलीकडेही जाता येत नव्हतं.

हे काहीतरी विचित्र प्रकरण आहे हे श्रीमोटांना जाणवलं. ते परत साधनेत गुंतले, दोनअडीच तास गेले असतील. आतामात्र लघुशंका थांबवता येणं शक्य नाही असं त्यांना जाणवलं. संयम तरी किती ठेवणार ? त्यांनी परत उठण्याचा, हलण्याचा प्रयत्न केला, पण शरीर जणूकाही एखाद्या अदृश्य शक्तीने त्या वर्तुळात जमिनीला जखडून ठेवलं होतं. हे असं का होतंच याचा उलगडा त्यांना नंतर झाला. परत नामस्मरण, प्रार्थना, ध्यानात मग्न झाल्यावर त्यांना जाणवलं की, "ही तर सगळी उपासनी महाराजांचीच करामत आहे आणि निश्चितच यात त्यांचा काहीतरी विशिष्ट हेतु आहे. माझ्या शरीरास काहीही झालेलं नाही."

असं ज्ञान अंतर्यामी होताच त्या पवित्र जागेत लघुशंका करण्याचा श्रीमोटांचा संकोच दूर झाला. आणि मग काय ! पाण्याची जणू धारच लागली ! नंतर तर शौचपण तिथेच होऊ लागलं, मलमूत्राचा तिथे जणू बिछानाच तयार झाला.

बाबांच्या दर्शनास आलेली मंडळी हे सर्व पाहून फार चिडली. मग ते सर्वजण दुरूनच दगडविटा फेकून मारू लागले.

"साल्याला बाबा व्हायचंच !" कोणीतरी म्हणालं.

"हरामखोराला उचलून बाहेरच फेकून द्या !" दुसरापण रागाने उद्गारला. पण जवळ येण्याचं साहस कोणाला होईना. त्या घाणीत पाय ठेवणार कोण ?

मलमूत्र बाहेर येण्याचं प्रमाण आता खूपच वाढलं. श्रीमोटांचे सर्व कपडे लद्‌बद्‌ होऊन गेले. जवळजवळ चार फुटांची जागा मलमूत्राने भरून गेली.

हा सर्व प्रकार उपासनी महाराज साक्षीवत्‌ पहात होते. त्यांनी एक शब्दही उच्चारला नाही. तिथे बाबांच्या सेवेस असणारी ती लहान मुलगी मात्र लोकांना 'दगडविटा मारू नका' हे काकुळतीने सांगून त्यांना शांत करण्याचा प्रयत्न करीत होती.

चारपाच दिवस हा प्रकार चालला. त्या कालावधीत खायलाच काय, तर पाण्याचा घोटसुद्धा श्रीमोटांना मिळाला नाही.

त्यावेळी बाह्यतः त्यांचं शरीर जरी इतकं अस्वच्छ व नरकजन्य स्थितीत होतं, तरीही मन मात्र उच्च भूमिकेत होतं. समाधीस्थितीत ते स्वतः आपल्याच शरीराच्या शुद्धिकरणाच्या क्रियेकडे साक्षीवत्‌ पहात होते व लोकांच्या मार देण्याकडेही तसेच साक्षीवत्‌ पहात होते, जणूकाय ते शरीर त्यांचे नसून दुसऱ्या कोणाचे तरी होते !

पाचसहा दिवसानंतर उपासनी महाराजांनी गरम पाणी मागवून ते श्रीमोटांना प्यायला दिलं. हे पाणी देणंसुध्दा दोनतीन दिवस चाललं. मलमूत्र विसर्जनाचा हा प्रकार अजूनही सुरूच होता.

त्या दोनतीन दिवसानंतर बाबांनी त्यांना कोरड्या भाकरीचा तुकडा खायला दिला.

जवळजवळ अकरा दिवस श्रीमोटा अशा स्थितीत होते. नंतर एकदा त्यांना वाटलं की आता उठता येणं शक्य आहे.

मग ते त्वरेने उठले. दूर जाऊन लद्‌बद् झालेले सर्व कपडे त्यांनी काढून टाकले, शरीर स्वच्छ केलं आणि लंगोटी नेसून, फावडं आणि घमेल्याच्या सहाय्याने बाबांच्या पिजऱ्याजवळची सर्व जागा व्यवस्थित साफ केली. मग पाण्याने धुवून नंतर ओल्या फडक्याने पुसून काढली.

ही सर्व साफसफाई त्यांनी मनाच्या एका बेभान अवस्थेतच केली. नंतर बाजारात जाऊन ते चंदनाच्या तेलाची एक बाटली घेऊन आले आणि ते तेल त्यांनी सर्वत्र व्यवस्थित शिंपडलं.

हे सर्व केल्यानंतर त्यांनी नडियादला परत जाण्यासाठी बाबांची अनुज्ञा मागितली. अर्ध्या तासानंतर बाबांनी त्यांना संमती दिली व म्हणाले, ''आता तुझी ही स्थिती कायम 'जिवंत' राहील.'' *

श्रीमोटा जेव्हा सुरुवातीसुरुवातीस त्यांच्या गुरुमहाराजांकडे –केशवानंदजी महाराजांकडे जात तेव्हा कितीतरी वेळा श्रीमोटांनी त्यांना बोलतांना ऐकलं होतं, ''मी साईबाबा आहे, मी ताजुद्दीन बाबा आहे, मी उपासनी महाराज आहे, मी अक्कलकोट स्वामी आहे.''

आणि नंतर श्रीमोटांच्या जीवनात या सर्व सिद्धमहात्म्यांनी त्यांना प्रत्यक्ष सदेह भेटून मार्गदर्शन केलं व ध्येयसिद्धीसाठी मदत केली तेव्हा त्यांना सद्‌गुरुंच्या वाणीचा अर्थ कळला. या सर्व सिद्ध महात्म्यांमध्ये त्यांना स्वतःच्या सद्‌गुरुंचं दर्शनही घडलं, 'जिवंत–जागृत' प्रत्यक्ष दर्शन घडलं !

❖

---

* ही चैतन्यपूर्ण अवस्था टिकून स्थिर राहील, ह्यापासून तू ढळणार नाहीस.

# ५१. लाठीमारात कसोटी

१९३० मध्ये स्वराज्याच्या लढ्याची घोषणा झाली. गांधीजींनी दांडी यात्रा काढली. आश्रम सोडतांना ते म्हणाले, ''कावळ्या-कुत्र्याच्या मौतीने मरू, पण स्वराज्य घेतल्याशिवाय परत येणार नाही.''

''ब्रिटीशांच्या दडपशाहीस झुगारून शूरवीर बनून घराबाहेर या आणि निर्भयपणे ब्रिटीश राजवटीस विरोध करा आणि लढा'', असा गांधीजींनी आदेश दिला.

मिठाचा सत्याग्रह सुरू झाला. मिठाच्या आगारांमधून मीठ आणून विकायला लोकांनी सुरूवात केली.

चिमूटभर मिठासाठी लोकांनी हजारो रुपये दिले आणि ते विकत घेतलं, आणि त्याच मिठासाठी सरकारने लोकांची डोकी फोडली, स्त्रीपुरुषांच्या अंगावरून घोडे दौडविले.

अशा अटीतटीच्या वेळी श्रीमोटा कसे गप्प बसतील ? सत्याग्रहाच्या लढाईत तेही सामील झाले.

'बोरसद' तालुक्यात 'दहेवाण' गावी एक सभा भरणार होती आणि कोणत्याही परिस्थितीत ती भरू द्यायची नाही हा सरकारचा निश्चय होता. सत्याग्रहीपण खंबीर होते आणि सभातर भरवायचीच हा त्यांचा निर्णयदेखील वज्रलेप होता.

टोळ्याटोळ्यांनी माणसं जमू लागली. ज्या ठाकूरसाहेबांचं हे दहेवाण गाव, तेसुद्धा इंग्रज सरकारशी हात मिळवून होते आणि सभेत काहीतरी होणारच हे निश्चित होतं.

शेवटी सभा भरली आणि भाषणास सुरुवात झाली. अर्धे भाषण होते न् होते तोच पोलीस लोकांवर चालून आले आणि त्यांनी लाठीमार सुरू केला. लोकांची पळापळ सुरू झाल्यावर

तर त्यांना अजूनच चेव आला. लाठ्यांच्या तडाख्यांनी अनेकांचे हातपाय मोडले, डोकी फुटली. पोलिसांमध्ये जणू सैतान संचारला होता.

श्रीमोटा मात्र या गोंधळात एका जागी स्थिर उभे होते. लोकांची पांगापांग झाली, सर्व पळून गेले, एकटे श्रीमोटा तिथे उभे होते. त्यांची हाताची मूठ आवळलेली होती व तिच्यात मीठ गच्च पकडून ठेवलं होतं. जसजशा त्यांच्या अंगावर लाठया पडत, तसतसे ते जोरात 'हरिः ॐ' चे उच्चारण करीत. लाठ्यांचा वर्षाव होत होता आणि त्यांच्या तोंडून 'हरिः ॐ'च्या आरोळ्या सतत येत होत्या.

मारणाऱ्यांना आता स्वतःचीच लाज वाटायला लागली. शेवटी पोलीस प्रमुखांपर्यंत ही गोष्ट पोहोचली आणि ते स्वतः या कणखर आणि निर्भय सत्याग्रहीस पहायला आले.

एका निःशस्त्र, स्थिर, धीरगंभीर स्वयंसेवकावर सर्व पोलीस लाठ्यांनी तुटून पडले होते आणि त्याचा मात्र 'हरिः ॐ'चा मंत्रघोष सुरूच होता. एका मुंगीवर हत्तीने चाल करावी तशी स्थिती होती. इतर सर्वजण पळून गेले आणि मैदान ओस पडलं तरी खिंड लढविणाऱ्या बाजीप्रभूंप्रमाणे ते स्थिर अढळ उभे होते, मुठीत गच्चपणे मीठ धरून !

पोलीसप्रमुखांनी चौकशी केली की हा स्वयंसेवक कोण आहे ? त्यांना सांगण्यात आलं की हे नडियादीचे चुनीलाल भगत आहेत. त्यांनी लाठीमार बंद करविला.

श्रीमोटांना बऱ्याच ठिकाणी लाठ्यांचा मार लागला होता, आणि बऱ्याच जखमाही झाल्या होत्या. ताबडतोब त्यांना उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये नेण्यात आलं.

स्वराज्याच्या लढतीत आपला शांतिपूर्ण सहयोग देऊन श्रीमोटांनी धैर्य, सहनशीलता, कणखरता आणि बेडरतेची साक्ष दिली होती.

❖

## ५२. "तू त्राटक कर !"

स्वातंत्र्यलढ्याच्या संग्रामात श्रीमोटांना साबरमती, नाशिक, येरवडा, विसापूर आणि खेडा सबजेल या ठिकाणी १९३० ते १९३२ च्या दरम्यान ठेवण्यात आलं होतं.

एरवाद्या जेलमध्ये कैद्यांची संख्या जास्त झाली तर त्यांना एका जेलमधून दुसऱ्या जेलमध्ये पाठविण्यात येत असे.

एकदा याप्रमाणे श्रीमोटांना साबरमती जेलमधून खेडा सबजेलमध्ये इतर कैद्यांबरोबर नेणार होते.

जेलच्या प्रचंड दरवाजासमोर आत जाणारे राजकैदी रांगेत उभे होते. जेलच्या मोठ्या दरवाजाला एक दिंडी दरवाजा होता. प्रत्येक कैदी एकामागोमाग एक आळीपाळीने आत वाकून जाई.

जेव्हा तो आत वाकून जाई, तेव्हा जेलचा एक पोलीस त्याला खूप जोरात दंड्याने फटका मारीत असे. त्या मारण्याचा एवढ्या जोरात आवाज होत असे कीं रांगेतल्या मागच्या कैद्यांची धडकीच भरावी ! त्यांचा हेतु अगदी उघड होता.

प्रवेश करतांनाच एवढी प्रचंड दहशत निर्माण करायची की आत गेल्यानंतर गडबड करायची कोणाची हिंमतच होऊ नये, यासाठीच त्यांनी ही क्रूर युक्ती अवलंबिली होती.

श्रीमोटांचा आत जाण्याचा नंबर जेमतेम सातवाआठवाच असेल तेव्हा फटक्याचा आवाज ऐकताक्षणीच त्यांना आवाज ऐकू आला. "तू त्राटक कर !"

जवळ उभ्या असलेल्या विठ्ठलदास कोठारी आणि शिवाभाई या आपल्या सहकारी मित्रांना त्यानी विचारलं, "तुम्ही काही ऐकलं का ?" त्यांना काहीच ऐकू आलं नव्हतं.

परत एकदोनदा तोच आवाज श्रीमोटांना ऐकू आला आणि मग मात्र त्यांची खात्री पटली, श्रीगुरुंचाच तो आदेश होता.

शेवटी श्रीमोटांची आत जाण्याची वेळ आली. त्यांनी दिंडी दरवाजातून आत प्रवेश करताक्षणीच फटके देणाऱ्या त्या पोलिसाच्या डोळ्याला डोळा भिडवून एकटक बघायला सुरुवात केली – त्राटक करायला सुरुवात केली. प्रत्येकाला लाकडी दंडयाने जोरात रट्टा हाणणारा तो पोलीस यावेळी मात्र तसाच उभा राहिला. हा पोलीस असा शुंभासारखा उभा आहे हे पाहून निरीक्षक जमादारास आश्चर्य वाटलं आणि त्याने दुसऱ्या पोलिसाला बोलावून त्याला श्रीमोटांना फटका मारण्याची आज्ञा केली.

श्रीमोटांनी त्याच्याही डोळ्यात बघून श्रीगुरुंच्या आदेशाप्रमाणे त्राटक करायला सुरुवात केली. त्याचाही हात उगारला जाऊ शकला नाही, आणि तोही मूढासारखा उभा राहिला, भारल्यासारखा उभा राहिला.

जमादारास आता पराकोटीचं आश्चर्य वाटलं.

त्याने जेलरकडे जाऊन त्याला ही चमत्कारिक घटना सांगितली.

जेलरच्या लक्षात आलं की, "हे पाणी काही वेगळंच आहे, निश्चित यात काहीतरी मेख आहे, रहस्य आहे." त्याने जमादारास सांगितलं, "जा, त्या कैद्याला माझ्याकडे पाठवून दे."

श्रीमोटांना घेऊन तो जमादार आत आला.

जेलरने त्यांना विचारलं, "काय रे, तुला ते दोघे पोलीस मारू शकले नाहीत याचं कारण काय ? तुझ्याकडे कोणती विद्या आहे ?"

श्रीमोटा नम्रतेने म्हणाले, "मी तर फक्त देवाचं नाव घेणंच जाणतो."

जेलरने मग कुतुहलाने आणि आश्चर्याने विचारलं, "तर मग या राजकारणाच्या गडबडगोंधळात कशासाठी शिरलास ?"

स्मितपूर्वक श्रीमोटा उत्तरले, "अशा उल्कापातात* आणि अशी धमाल सुरु असतांनादेखील, माझे मन-बुद्धी-अंतःकरण-इंद्रिये ही सर्व, कशातही लिप्त न होता समत्व दाखवू शकतात का, याची कसोटी करण्यास मी आलो आहे."

इतर राजकीय कैद्यांपेक्षा वेगळा असा हा साधककैदी पाहून जेलरच्या मनात त्यांच्याविषयी आपुलकी आणि आदर निर्माण झाला, आणि श्रीमोटांना तुरुंगवासातील काळात चपात्या, गूळ इत्यादी रोज द्यावे अशी त्याने पत्रकावर नोंद करून ठेवली.

श्रीमोटा मात्र त्यांना मिळणारे ते विशेष 'रेशन' इतर कैद्यांना देऊन टाकीत आणि स्वतः मात्र 'सी' क्लासच्या कैद्यांचंच समूहात मिळणारं जेवण घेत.

❖

## ५३. जेलयात्रा – जीवनसाधना

स्वराज्याच्या लढतीत देशाच्या स्वातंत्र्यासाठी श्रीमोटा जेलमध्ये गेल्यावर त्याचा त्यांनी जीवनसाधनेसाठी उपयोग करून घेतला. ते जेलयात्रेस 'व्हेकेशन' मानीत, कारण आत

* झंझावातात आणि खडतर, प्रतिकूल परिस्थितीत

गेल्यावर हरिजनशाळेत शिकविणं, इतर कामं, घरची कामं यापासून मुक्ती असे.

जेलमध्ये ते कैदी जमवून गप्पाटप्पा करण्यात वेळ वाया घालवीत नसत तर दिलेलं जेलचं काम झटपट आणि व्यवस्थित करून इतर वेळ साधनायज्ञात घालवीत. जेलमध्ये मिळणारं अन्न अत्यंत दुय्यम दर्जाचं होतं. तिथे नियमांचं आणि हुकुमांचं काटेकोरपणे पालन करावं लागत असे. जेलशिवाय इतर कोणत्याही वस्तू वापरण्याची बंदी होती. या आणि अशा अनेक गोष्टींमुळे तिथे त्यांना स्वतःच्या संयमाची जाणीव होई.

जीवनात घडणारी प्रत्येक गोष्ट, प्रत्येक स्थिती, प्रत्येक कर्म जीवनविकासाच्या हेतूने साधना म्हणून ज्ञानभक्तीपूर्वक करायचं, स्वीकारायचं अशी त्यांनी निष्ठा होती व तसे त्यांचे आचरण प्रत्यक्ष कृतीतसुद्धा असे.

विसापूर जेलमध्ये श्रीमोटांनी फावल्या वेळात गीता लिहिली.

आश्रमात बऱ्याचवेळा विद्यार्थी त्यांना समजेल अशा साध्यासोप्या भाषेत गीता लिहायला सांगत असत म्हणून त्यांनी वेळेचा सदुपयोग करून गीता गुजराथी भाषेत शब्दबद्ध केली. हे लिहिणे झाल्यावर श्रीमोटा म्हणाले, "मी गीता पूर्णतः पचविली आहे असा दावा करीत नाही, परंतु गीतेचा भाव सुयोग्य रीतीने मांडू शकलो याचे कारण ईश्वरावर असलेली माझी श्रद्धाच होय !"

जेलमधून सुटल्यावर जेव्हा ते घरी आले, त्यानंतर एकदा आईला म्हणाले "आई, माझ्या एका मित्राने सानथोर सर्वांना समजेल अशी गीता लिहिली आहे. तू ती ऐक."

घरखर्चाला हातभार लावण्यासाठी आणलेली तूरडाळ निवडण्याचं काम करताकरता आईने ती गीता ऐकली. वाचन पूर्ण झाल्यावर श्रीमोटांनी आईकडे अभिप्राय मागितला.

ती म्हणाली, ''आमच्या कथांमध्ये ते 'महाराज' जी गीता वाचून दाखवितात आणि समजावून सांगतात, त्यापेक्षा तू वाचून दाखविलेली 'गीता' जास्त चांगल्या प्रकारे कळली. तुझ्या मित्राची सांगण्याची पद्धत, भाषा आणि मांडणी सोपी आहे.''

श्रीमोटांचे समाधान झाले. आबालवृद्धांना सर्वांनाच ही गीता कळू शकेल, पचू शकेल, रुजू शकेल याची त्यांना खात्री पटली व आनंद वाटला.

❖

## ५४. साधना हाच हेतु – सहाय्य सद्गुरूंचे

### ❑ हरिजनसेवा, कर्मे, तुरुंगवास, लाठीमार – साधना हाच हेतु :

श्रीमोटांची कर्मे, हरिजनसेवा, तुरुंगवास, लाठ्या झेलणं... या सर्वांचा एकच एक हेतु होता, तो म्हणजे साधनेचा हेतु !

स्वतःमध्ये किती गुण प्राप्त झाले आहेत याचा शोध घेण्याचा तो मार्ग होता.

भयात अभय, अशांतीमध्ये शांती, हिंसक वातावरणात अहिंसक राहणे, अनासक्त राहणे, निर्विकार राहणे – हे सर्व गुण किती प्राप्त झाले आहेत हे पाहणे हा हेतु होता.

### ❑ तुरुंगवासातही सद्गुरूंचं सहाय्य :

जेलमध्ये असतांना श्रीमोटांना ढीगभर धान्य उभ्याउभ्याने दळावं लागत असे. जात्याचा दांडा पकडून हाताला फोड येत,

तरीही काम करावं लागे. निश्चित केलेली वेळ संपत आली आणि तरीसुद्धा बरंच धान्य दळल्याविना पडून असलं की श्रीमोटा गुरूमहाराजांना प्रार्थना करीत, "हे प्रभु ! शक्ती द्या, की जिच्यामुळे माझं काम पूर्ण होवे. कामास मी भीत नाही..." आणि खरोखरच बघताबघता सगळं दळण पूर्ण होऊन जाई.

समोर प्रत्यक्ष सद्गुरु आहेत आणि आपली काळजी घेत आहेत याची साक्ष पटून श्रीमोटा सद्गदित होत.

❖

## ५५. सेवाभाव

खेडा जिल्ह्यातील 'बोरसद' तालुक्यात' 'बोदाल' नावाचं गाव आहे. बोदालमध्ये एक 'हरिजन आश्रम' होता आणि श्रीमोटा त्यात काम करीत.

आश्रमात प्रत्येक कार्यकर्त्याला आश्रमाच्या कामाव्यतिरिक्त सेवेची अन्य कामंपण दिली जात. श्रीमोटांना दवाखान्याचं काम मिळालं होतं. ते काही डॉक्टर अथवा वैद्य नव्हते, परंतु आतून जसं सुचेल तशी औषधे ते देत.

एकदा एक मनुष्य धावतधावत त्यांच्याकडे आला.

"चुनीभाई, चुनीभाई, तुम्हाला बोलावलं आहे."

श्रीमोटांनी विचारलं, "काय काम आहे ?"

तो मनुष्य धापा टाकतटाकत उत्तरला, "एका बाईच्या पोटात खूप दुखतंय आणि ती दुःखाने व्याकुळ होऊन लोळतेय, विव्हळतेय.'

ते त्या माणसाबरोबर विणकरवस्तीत गेले. ती बाई खरोखरच असह्य पोटदुखीने बेजार होऊन, पोटावर हात देऊन कळवळत होती.

"किती दिवसांपासून दुखतंय पोट ?" श्रीमोटांनी विचारलं.

"तीन दिवस झालेत. शिवाय तीन दिवस शौचालाही झालं नाही."

हे ऐकताच पोटदुखीचं कारण त्यांना कळलं. त्यांनी घरच्यांना विचारलं, "बोला, काय करायचं ?"

"आम्हाला काय कळतंय ? तुम्हीच काय योग्य असेल ते औषधपाणी द्या."

"तीन दिवस शौचास न झाल्यामुळे पोट साफ होण्यासाठी 'एनिमा' द्यावा लागेल," ते म्हणाले.

"ठीक आहे," घरच्यांनी संमती दिली. त्या बाईस मात्र संकोच वाटू लागला.

श्रीमोटा म्हणाले, "संकोच करू नका. मला आपला मुलगा किंवा भाऊ माना."

ती बाई मग उपचारास तयार झाली.

घरातील माणसांच्या उपस्थितीत श्रीमोटांनी त्या बाईला साध्या पाण्याचा एनिमा दिला. पण उपयोग झाला नाही.

परत दुसऱ्यांदा एरंडेल तेल आणि साबुपाणी एकत्र करून दिला, तरीही मळ सुटला नाही.

तिसऱ्यांदा देवाचं नाव घेऊन परत एरंडेल तेल आणि साबुपाण्याचा एनिमा दिला. ते पाणी पोटात गेलं आणि त्या बरोबरच एवढा काही दुर्गंधित मळ बाहेर आला की जवळ बसणंदेखील कठीण व्हावं.

त्यानंतर त्या बाईची पोटदुखी लगेच थांबली. खरंतर, बाई गर्भवती होती म्हणून एनिमा देणं जोखमीचंच काम होतं, परंतु ईश्वरकृपेने सर्व व्यवस्थित पार पडलं.

श्रीमोटांना सेवा करून दुःखमुक्ती करून दिल्याचा आनंद प्राप्त झाला. ते आश्रमात परत आले. व्यवस्थित स्नान केलं आणि कपडे धुवून, वाळवून ते दुसऱ्या कामास लागले.

❖

## ५६. कलंक लागण्यापासून रक्षण

सुरतजवळ 'नवसारी' येथे एक 'हरिजन आश्रम' होता. श्रीमोटा तिथेही कामकाज करीत असत.

आश्रमजावळच एक तलाव होता. पावसाळ्यात तो पाण्याने काठोकाठ भरून जणूकाही छोटंसं सरोवरच तयार होई. श्रीमोटांना वाटलं, "मुलांना पाण्यात फिरवून आणण्यासाठी एक तराफा बनवावा !" आश्रमास खर्चाचा भार होऊ नये म्हणून मुलांनी आणि श्रीमोटांनी इकडूनतिकडून लाकडाच्या फळ्या इत्यादी आवश्यक ते सामान आणून एक सुंदर आणि मजबूत तराफा बनविला.

श्रीमोटा मुलांना त्या सरोवरसदृश 'दुधिया तलावा'त सहल करायला घेऊन जात. तो तराफा मुलं बसू शकतील अथवा उभंही राहू शकतील एवढा मजबूत होता. मात्र श्रीमोटा असतील तरच सहलीला जायचा कडक नियम त्यांनीच घालून दिला होता.

एकदा श्रीमोटा आश्रमाचे पैसे आणण्यासाठी बँकेत गेले आणि ही संधी साधून काही व्रात्य पोरांनी गुपचूप तलावापाशी जाऊन तो तराफा सोडला आणि ते तलावात विहार करू लागले.

श्रीमोटा असले तर तराफ्याचा समतोल राखला जातोय की नाही याकडे त्यांचे डोळ्यात तेल घालून लक्ष असे,

मुलांवर अंकुश असे. आता मुलांच्याच हाती कारभार आल्यावर 'माकडाच्या हाती कोलीत' असाच प्रकार होता. वाटेल तसं उभं राहण्याने तराफा एका बाजूस कलंडला आणि काही क्षणातच त्या बाजूची मुलं धप्प्‌कन पाण्यात पडली. एकच बोंबाबोंब झाली.

बँकेतून पैसे काढून श्रीमोटा योगायोगाने त्याचवेळी आश्रमाकडे येत होते. त्यांनी दुरूनच हे पाहिलं आणि सायकल पिटाळत आणली आणि अंगावरच्या कपड्यांसकट आणि पैसे भिजतील याची पर्वा न करता पाण्यात उडी टाकली. बुडणाऱ्या मुलांना त्यांनी भराभर बाहेर काढलं. हे सर्व करीत असतांना त्यांची आर्त प्रार्थना अखंड सुरू होती. ज्या मुलांना पोहता येत होतं त्यांनीसुद्धा मुलांना बाहेर काढायला मदत केली. सुदैवाने काहीच बरेवाईट घडले नाही.

श्रीमोटा सद्‌गदित झाले, "हे भगवंता ! आज तू माझी लाज राखलीस. कोणी जर बुडून मेलं असतं तर तो कलंक कायमचा माझ्या माथी लागला असता."

श्रीमोटांनीच तो तराफा बनविला असल्यामुळे जरी मुलं स्वतःहून नियम तोडून गेली होती व बेशिस्तीने वागली होती, तरी बोट मात्र श्रीमोटांकडेच दाखविले गेले असते !

या नाचक्कीपासून, बदनामीपासून त्यांना ईश्वरानेच वाचविले होते. पूर्णतः समर्पित असलेल्या आपल्या प्रिय भक्ताचं सर्वोपरी रक्षण करून आपलं ब्रीद त्याने सांभाळलं होतं !

❖

# ५७. श्रीसद्गुरुंचे स्थूल देहात पुनरागमन

संपूर्ण गुजराथच्या हरिजन आश्रमांचं आणि शाळांचं संचालन करण्याची जबाबदारी श्रीमोटांवर होती. प्रत्येक संस्थेस आर्थिक मदत पोहोचविणं हे कठीण काम त्यांच्या शिरी होतं.

त्याशिवाय नवसारीच्या गायकवाड सरकारांच्या हद्दीत असलेल्या आश्रमातून चालत असलेली राजकीय चळवळ पोलिसांच्या डोळ्यात खड्याप्रमाणे सलत होती. आश्रमातील कार्यकर्त्यांना त्या पोलिसी जाचापासून वाचवायचं होतं.

एका बाजूस ही सर्व प्रासकर्मे प्रामाणिकतेने, निष्ठापूर्वक करायची होती आणि त्याचवेळी दुसऱ्या बाजूस जीवनविकासाची साधनापण उत्कटतेने, समग्रतेने तैलधारावत आणि भावपूर्णतेने जागृतीपूर्वक करायची होती.

समतोल सांभाळण्याची तारेवरची कसरत करण्यास श्रीमोटा सर्वस्वाने झटत होते.

अशावेळी एकदा 'सूपा गुरुकूला'पासून थोड्या दूर असलेल्या जंगलात विद्यार्थ्यांना पिकनिकला घेऊन जायचं ठरलं. विद्यार्थ्यांचीही संमती घेतली आणि सर्वांनी कूच केलं.

गप्पाटप्पा, मस्करी आणि आनंदप्रमोद करीत सर्वजण तिथे पोहोचले आणि नदीकिनारी वाळूतच त्यांनी तळ ठोकला.

विद्यार्थ्यांनी इकडेतिकडे जाऊन लाकडं गोळा करून आणली आणि श्रीमोटांनी तळ होता तिथेच धुनी पेटविली.

रात्री साडेदहापर्यंत छावणीच्या आसपास लहान मुलं गस्त घालीत आणि साडेदहानंतर मोठी मुलं गस्त घालीत.

श्रीमोटा धुनीजवळ बसून स्मरण, ध्यान, प्रार्थना, आत्मनिवेदन अशा निरनिराळ्या प्रकारांनी साधनेत मग्न होते.

प्रार्थनेचा भाव हृदयी अखंड होता. उच्च अशा भावावस्थेत ते आनंदात आकंठ बुडलेले होते.

मध्यरात्र झाल्यानंतर थोड्याच वेळात अचानक त्यांना धुनीजवळ सद्‌गुरुंचं – बालयोगी महाराजांचं प्रत्यक्ष दर्शन झालं. अचानक ते कोठून आणि कसे प्रगट झाले हे त्यांना कळलंच नाही. ते एकदम स्तंभित झाले. सद्‌गदित होत त्यांच्याजवळ जाऊन श्रीमोटांनी भक्तिभावपूर्वक त्यांच्या चरणी वंदन केलं.

सद्‌गुरुंचं दर्शन स्थूल देहात 'याची देही याची डोळा' पाहात असतांनादेखील श्रीमोटांच्या मनबुद्धीने शंका निर्माण केली. ते विचार करू लागले. "गुरुदेवांनी तर शरीराचा त्याग कधीच केलाय. ते शरीर पंचमहाभूतांमध्ये विलीनही झालं. तर मग ते इथे येऊ शकतील हे शक्य तरी आहे का ? तुझ्या अंतरी त्यांच्याविषयी जो प्रेमभक्तीयुक्त उत्कट भाव आहे त्यामुळेच हा भाव येथे साकार झाला असल्याचा तुला भास होत असावा !"

त्यांच्या मनातले हे विचार ताडून तत्क्षणीच बालयोगी महाराज उद्‌गारले, "अरे मूर्खा ! मी खरोखरच प्रत्यक्ष, सदेह आणि वास्तविकतेत इथे उपस्थित आहे आणि ते तुला चेतविण्यासाठीच ! *

"तुझं जे महत्त्वाचं कर्म आहे, आणि ज्या कर्मास तू जीवनविकासाची साधना मानीत आहेस, तो साधनेचा भाव पक्का करण्यासाठी तुला प्रभुकृपेने ही परिस्थिती प्राप्त झाली आहे. जो 'जीव' प्रेमपूर्वक आणि ज्ञानभक्तीपूर्वक — हृदयांतरी

* जाणीव करून देऊन निश्चित करण्यासाठीच

हृदयपूर्वक ईश्वराचा भक्त बनतो — त्याचा योगक्षेम ईश्वरच, कृपा करून, आपल्या हाती घेत असतो.

"'मात्र असा हा योगक्षेम एकच प्रकारचा, 'केवळ स्थूल' असा असत नाही. योगक्षेमाचे अनेक अर्थ होतात. जीवनातील प्रत्येक घटना, प्रत्येक परिस्थिती 'साधनेचा भाव' प्राप्त करण्यासाठीच असते आणि जो प्रभुकृपेने जीवनातील प्रत्येक प्रसंगात साधनेचा 'जिवंत भाव' सातत्यपूर्वक आणि समग्रतेने टिकवू शकतो, त्याला ईश्वर आपला मानून त्याचं सर्वकाही तो करत असतो. म्हणून तू निश्चिंत रहा आणि तुझं सर्वकाही तो ईश्वरच कृपा करून चालविणार आहे याची खात्री बाळग."

त्यावेळी श्रीमोटांच्या सद्गुरुंनी त्यांच्या शैलीप्रमाणे त्यांना प्रेमपूर्वक ज्या शिव्या दिल्या त्या इथे लिहिणे शक्य नाही.

गुरुदेव परत पुढे म्हणाले, "मी अदृश्य झाल्यानंतर तुझे मनबुद्धी हे, परत तुझ्यात संशय निर्माण करतील, म्हणून मी तुला खात्री पटविण्यासाठी सांगून ठेवतो की, इथे खरोखरच एक मृतदेह पडलेला आहे आणि त्यामुळेच मी इथे सदेह अवतीर्ण होऊ शकलो आहे !"

एवढं बोलून बालयोगी महाराज अदृश्य झाले.

पूर्णपणे जागृतीत झालेल्या सद्गुरुंच्या या पुनर्दर्शनामुळे श्रीमोटांमध्ये प्रचंड स्फूर्ती आणि चैतन्याचा आविर्भाव झाला. अनेक जन्मी पुरुषार्थ करूनही जी गती, जो भाव, जी अनन्य शरणागती, जे समर्पण प्रगट होऊ शकलं नसतं, ते या काही मिनिटातच घडलेल्या घटनेने घडून आलं.

पूज्य गुरुदेवांच्या अदृश्य होण्यानंतर खरोखरच श्रीमोटांच्या मनबुद्धीने एका कोपऱ्यात परत एकदा शंकेचं

भूत उभं केलं. "असं होणं कसं शक्य आहे ? इथे कोठे मृतदेह आहे ?" त्यांचं एक मन त्यांना प्रश्न करीत होतं.

त्याचवेळी त्यांचं दुसरं मन त्यांना समजावीत होतं, "अरे ! मी स्वतःच्या डोळ्यांनी सद्गुरूंना पाहिलं, कानांनी त्यांची वाणी ऐकली, स्पर्श करून प्रणाम केला. एवढंच नव्हे तर जातांना त्यांनी उजव्या पायाच्या अंगठ्याने रिंगणसुद्धा केलं आणि दाखविलं की इथे तो मृतदेह आहे."

त्यांनी पहारा करीत असलेल्या त्या दोन विद्यार्थ्यांना बोलाविलं आणि विचारलं, "काय रे, तुम्हाला इथे वाळूत रिंगण केलेलं दिसतंय का ?"

त्यांनी बॅटरीने प्रकाशाचा झोत टाकून पाहिलं तर खरोखर तिथे रिंगण स्पष्ट दिसत होतं. ज्या ठिकाणी रिंगण होतं त्याठिकाणी दिवसा मुलं खेळत, दंगामस्ती करीत. त्यामुळे दिवसा जर कोणी रिंगण केलं असतं तर ते आतापर्यंत तसं राहिलंच नसतं.

श्रीमोटांनी त्या मुलांना त्या रिंगण केलेल्या जागी रेती खोदायला सांगितली.

मुलं खोदू लागली. जवळजवळ दोन हातपर्यंत खोदूनही काहीच मिळालं नाही.

त्यांचं संशयी मन आनंदाने म्हणालं, "बघ, कोठे काय आहे ?'

त्यांनी मुलांना अजून खोदायला सांगितलं. नंतर पाणी लागलं आणि अजून पुढे साधारणपणे एक फुटावर पाण्याखाली मेलेल्या 'होला' पक्ष्याचा मृतदेह मिळाला.

आश्चर्य म्हणजे तो मृतदेह पाण्यात असूनही जणूकाही आत्ताच

मेला असावा अशा सुस्थितीत होता, अजिबात सडलेला नव्हता !

या प्रत्यक्ष पुराव्याने श्रीमोटांच्या मनबुद्धीचे देखील पूर्ण समाधान झाले.

❖

## ५८. "योगक्षेमं वहाम्यहम् !"

### (१) हिंदु युनिव्हर्सिटी निधी

पंडित मदनमोहन मालवीयजींनी हिंदू संस्कृती जिवंत ठेवण्याच्या हेतूने काशीत 'हिंदु युनिव्हर्सिटी' स्थापन केली. तिच्या कामकाजासाठी त्यांनी हिंदूंना निधी देण्याचं आवाहन केलं.

जीवनाचं मूळ अशी जी संस्कृती – तिच्याविषयी अपार भाव व आकर्षण असल्यामुळे श्रीमोटांनापण 'आपला सहभाग त्यात असावा' अशी इच्छा झाली. पण पन्नास रुपयात सर्व खर्च भागवून शिल्लकच जिथे रहात नसे तिथे पैसे देणार कोठून ? दाढीदेखील ते महिन्यातून एकदाच करीत, इतकी तंगी होती.

काही दिवसांनी ते काही कामानिमित्त साबरमती आश्रमातून शहरात जायला निघाले. आश्रमाजवळच उजव्या हाताला एक वृक्ष होता. तिथे येताच त्यांना लघुशंकेची इच्छा झाली.

ते गेले, आणि तिथून निघतांना बाजूलाच पडलेल्या एका कागदावर त्यांची दृष्टी गेली. त्यांनी पाहिलं तर ती एक कागदी पुडी होती व त्यात दोन सोन्याच्या अंगठ्या होत्या. कागदावर लिहिलं होतं, "हे तुझ्या उपयोगासाठी आहे."

त्यांनी बाजारात जाऊन त्या अंगठ्या मोडल्या आणि मिळालेली रक्कम बनारसला पाठवून दिली.

श्रीमोटांची प्राणांतिक आणि प्रामाणिक हृदयस्थ प्रार्थना भगवंताने पूर्ण केली होती.

## ( २ ) ठक्कर बाप्पांची सत्तरी - फंडनिधी

१९३८ मध्ये श्रीमोटा रक्तीजुलाबांनी आजारी झाले. आजार वाढल्यावर नंतर कराचीस जाऊन त्यांनी तिथे औषधपाणी केलं व त्यातून ते बरेही झाले.

त्यावेळी 'हरिजन बंधु'च्या अंकात त्यांच्या वाचनात आलं की ठक्करबाप्पांच्या सत्तरीनिमित्त सत्तर हजार रूपयांची थैली त्यांना द्यायचं गांधीजींनी ठरवलं होतं व तसं आवाहन-देखील केलं होतं.

ठक्करबाप्पांसारख्या निःस्वार्थ कर्मयोग्याने आदिवासी, भिल्ल आणि हरिजनांची जी सेवा केली आहे, जी व्यवस्था केली आहे, जे.आयोजन केलं आहे त्यामुळे त्यांच्याविषयी श्रीमोटांच्या मनात इतरांप्रमाणेच प्रचंड आदर होता. श्रीमोटांनी तर त्यांच्याबरोबर बरेच दिवस कामही केलं होतं.

श्रीमोटांनीपण या निधीत स्वतःचा खारीचा वाटा द्यावा असा खास आग्रह पू. गांधीजींनी एका भगिनीजवळ व्यक्त केल्याचेही त्यांना कळ्ले.

हे वाचूनऐकून सेवानिधी देण्याची इच्छा श्रीमोटांना झाली खरी, पण ते म्हणजे आकाशपुष्पाची इच्छा करण्यासारखंच होतं, तरीही ती 'भावना' तीव्रतेने जागृत होती.

त्यासुमारास एकदा दिवाळीत शुभेच्छा व्यक्त करण्यास कराचीचे माजी मेयर चागलासाहेब यांच्याकडे जाण्यासाठी श्रीमोटा व आणखी काहीजण निघाले.

बंगल्याजवळ गाडी पार्क करून आत जाणार तोच

कराचीच्या एरवी साफसूफ असणाऱ्या रस्त्यावर एक कागद पडलेला श्रीमोटांनी पाहिला.

आपल्यासमवेत असणाऱ्या एका भगिनींस त्यांनी तो कागद दाखविला. त्यांनी तो आणला आणि ती गुंडाळी उघडली तर आत पाच रुपयांची नोट होती. त्यावर उर्दू भाषेत लिहिलं होतं, "ही तुला मनाप्रमाणे वापरण्यासाठी आहे."

प्रभुकृपेनेच प्राप्त झालेली ही रक्कम मग त्यांनी ठक्करबाप्पांच्या निधीस पाठवून दिली.

## (३) सोन्याची कंठी मिळाली

आर्थिक तंगी तर श्रीमोटांच्या पाचवीलाच पूजलेली होती, सावलीसारखीच होती. एकदा एका कामासाठी त्यांना ताबडतोब बऱ्याच मोठ्या रकमेची आवश्यकता निर्माण झाली.

कोणापाशी मागावं अशी त्यांची वृत्ती नव्हती व त्यांनी कोणापुढेच हात पसरला नाही.

भगवंत त्याच्या खऱ्या भक्तास संकटकाळी कशा न् कशा प्रकारे मदत करतोच अशी त्यांची दृढ श्रद्धा होती व त्यामुळे त्याकरिता 'मुद्दाम त्यास प्रार्थना करावी', हापण 'भाव' त्यांच्या हृदयी नव्हता.

एके दिवशी संध्याकाळी श्रीमोटा हसमुखभाई, नानुभाई आणि अजून काही स्वजनांबरोबर एका साधुमहाराजांच्या दर्शनास निघाले. साधुमहाराज नर्मदाकिनारी उतरले होते. त्यांच्या राहण्याच्या ठिकाणाजवळ जातांना नदीकिनारी एका जागी फाटक्यातुटक्या लुगड्याचं एक बोचकं श्रीमोटांना दिसलं.

त्यांनी ते घेऊन उघडलं, तर आत एक सोन्याची कंठी निघाली. बोचक्यामध्ये तामिळमध्ये लिखाण असलेली एक

चिठ्ठीदेखील होती. त्या लिखाणातसुद्धा, "तुझ्या स्वतःच्या उपयोगासाठी हे आहे." असं लिहिलेलं होतं."

ती कंठी हसमुखभाईनी नंतर बाजारात सोनाराकडे विकली आणि त्या पैशातून श्रीमोटांची तत्कालीन गरज भागली.

❖

## ५९. एकांत साधना

### ❑ वर्षातून एकदा एकांतस्थळी साधना :

श्रीमोटा दरवर्षी एक महिना रजा घेऊन सद्‌गुरुंच्या आदेशानुसार निरनिराळ्या ठिकाणी एकांतात साधनेस जात. अभय, साहस, हिंमत, शौर्य, अंतर्मुखता आणि एकाग्रता या गुणांची प्राप्ती हा या साधनेचा उद्देश असे.

ज्या ठिकाणी जायचं असेल तेथील सर्व काही सद्‌गुरु त्यांना एखाद्या चलत्‌चित्रपटाप्रमाणे हुबेहूब दाखवीत असत. नदी, पर्वत, गुहा, मंदिर, जंगल, टेकडीवरील झाडं – सारंकाही अगदी बारकाव्यांसह दिसून येई. त्याप्रमाणे मग ते स्थान शोधून श्रीमोटा तिथे जात.

नामजप, स्मरण, भजन, प्रार्थना, ध्यान, आत्मनिवेदन यात त्यांचा वेळ भराभर निघून जाई. रात्री जेमतेम दोन तास झोप घेऊन परत त्यांची साधना सुरू होई.

झोपेसाठी उशाला धोंडा असे. अंथरण्यास स्वतःचे धोतर आणि पांघरण्यास साधा पंचा असे.

एकांत असल्यामुळे बऱ्याच वेळा नग्न रहात.

सुरुवातीचे दोनचार दिवस अन्नपाण्यावाचूनच जात. नंतर कोणीतरी त्यांना शोधतशोधत येई आणि भाजी, भाकरी, वरण आणून देई.

ते औत्सुक्याने विचारीत, "बाबा रे, तुला कळलं कसं की मी इथे आहे, उपाशी आहे ?"

उत्तर मिळे, "बापजी, मला स्वप्न पडलं आणि स्वप्नात कोणीतरी साधूने सांगितलं की 'तू आत्ताच्या आत्ता अमुकअमुक जागी जा. तिथे माझा भक्त साधना करीत आहे. आणि तीनचार दिवस अन्नपाण्यावाचून उपाशी आहे. तू त्याच्यासाठी जेवण घेऊन जा,' म्हणून मी आलोय. कृपा करून हे भोजन स्वीकारा." आणणारा मनुष्य भावपूर्वक सांगे.

श्रीमोटा त्याला सांगत, "ठीक आहे. आणा तुम्ही. पण फक्त एकदाच आणा, आणि तेही फक्त भाकरी आणि वरण किंवा भाजी !"

सद्गुरुंची कूर्मदृष्टी श्रीमोटा कोठेही असले तरी त्यांच्यावर खिळलेली असे. मुलांचा सांभाळ आई करणार नाही तर कोण करेल ?

सद्गुरुंच्या या अपार प्रेमाने ते सद्गदित होत.

❖

## ६०. चित्रकूटचा तांत्रिक ब्राह्मण

एकदा साधनेसाठी श्रीमोटा चित्रकूटला गेले होते. त्यांच्या तेथील साधनकाळात एक विद्वान पंडित ब्राह्मण त्यांना जेवण आणून देत असे. साधना आटोपून परत निघतेवेळी त्यांच्या-कडून त्या ब्राह्मणाने त्यांचा पत्ता मागून घेतला.

काही दिवसानंतर अचानक नडियादला श्रीमोटांच्या राहत्या घरी तो ब्राह्मण आला. इथे येण्यामागे त्याचा काहीतरी हेतु असावा हे श्रीमोटांच्या ध्यानी आलं. त्यांनी प्रेमाने त्याला ठेवून घेतलं. तो दुसऱ्याच्या हातचं अन्न खात नसल्यामुळे त्याला

श्रीमोटांच्या आईने शिधा दिला आणि आपलं अन्न स्वतः शिजवून मग त्याने ते भक्षण केलं. त्याचा तसाच अजून एक नियम होता : 'रात्री घरात झोपायचे नाही' म्हणून स्मशानात साधनेला जातांना श्रीमोटा त्यालापण बरोबर घेऊन गेले.

तो ब्राह्मण तंत्रविद्येचा अभ्यासू होता. त्या मैल्या विद्येत त्याने बरीच प्रगती केली होती. स्मशानात त्याने आपल्या साधनेच्या आणि मंत्रसामर्थ्याचा बळावर श्रीमोटांना प्रेतयोनी साकार करून दाखविली. "मी तुम्हाला ही विद्या शिकवीन आणि मग तुम्ही तिच्या सहाय्याने राजकारणातदेखील उलथापालथ करू शकाल," त्याने श्रीमोटांना लालूच दाखविली.

"बाबा रे, मला सद्‌गुरुंनी दिलेल्या साधनेत पूर्ण समाधान आहे. त्यामुळे तुझ्याकडून हे शिकण्याची माझी इच्छा नाही," ते शांतपणे म्हणाले.

त्याची ही मैली प्रेतविद्या पाहून श्रीमोटांना त्याची भीती वाटली नाही अथवा घृणाही वाटली नाही. उलट, "साधना केली, पुरुषार्थ केला तर प्रेतयोनीदेखील जर साकार करता येऊ शकते, तर मग मी शुद्ध भावनेने आणि खऱ्या प्रेमाने त्या भगवंताला आळविल्यावर तो निश्चितच प्रसन्न होऊन माझी मनोकामना पूर्ण करील" - असा आत्मविश्वास आणि भाव त्यांच्या अंतरी निर्माण झाला.

जाण्यापूर्वी त्या ब्राह्मणाने आपला मनोदय व्यक्त केला. तो म्हणाला, "माझ्या साधनेची सिद्धी व्हायला फक्त एकच विधी बाकी आहे. तो करण्यासाठी मला पैशांची निकड आहे. तुम्ही यासाठी मला काही मदत कराल या भावनेनेच मी तुमच्याकडे आलो आहे."

आपली असमर्थता व्यक्त करून श्रीमोटांनी त्याला अहमदाबादला जाण्याचं भाडं दिलं आणि त्याला निरोप दिला.

❖

## ६१. हृदय जिंकलं

एकदा सद्‌गुरुंचा आदेश झाला, ''जबलपूरजवळ नर्मदाकिनारी 'धुवांधार' या ठिकाणी साधनेसाठी एक महिना जा.'' आज्ञापालन करण्यासाठी श्रीमोटा जायला निघाले खरे, पण प्रवासात खिसा कापला गेला आणि मध्येच उतरावं लागलं.

पुढेही जाता येत नाही आणि मागेही फिरता येत नाही अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली. मार्ग शोधणं नितांत जरूरीचं होतं. ते एका गुजराथी व्यापाऱ्याच्या दुकानासमोर जाऊन उभे राहिले. शेठजींनी त्यांच्याकडे मान वर करून पाहिलं आणि विचारलं, ''काय देऊ आपल्याला ?''

श्रीमोटा म्हणाले, ''शेठजी, मी काही विकत घ्यायला आलो नाही. मी अडचणीत असल्यामुळे नोकरीच्या शोधात आहे. आपण मला नोकरीवर ठेवून घ्या.''

शेठजी त्यांना नखशिखांत न्याहाळत म्हणाले, ''सध्या माझ्याकडे नोकरमंडळी पुरेशी आहेत. मात्र आमच्या घरी सर्व कामे करू शकणाऱ्या एका गड्याची गरज आहे. तुम्हाला ते जमत असेल तर मी तसा बंदोबस्त करतो.''

''हरकत नाही, शेठजी चालेल मला !'' श्रीमोटांना आनंद झाला. काम मिळालं होतं आणि पर्यायाने पैशांची व्यवस्थापण होणार होती. 'काम अमुकच हवं', असा अट्टाहास तर त्यांच्या अंतरी अजिबात नव्हता, त्यामुळे त्यांनी काम सहर्ष स्वीकारलं.

शेठजींनी पाठविलल्या माणसाबरोबर ते त्यांच्या घरी गेले. घर मोठं होतं आणि कामाचा रगाडा अवाढव्य होता. कपडे धुणे, भांडी घासणे, मुलांना खेळविणे, त्यांना गोष्टी सांगून झोपविणे, रात्री गाद्या टाकून देणे, खोल्या नीटनेटक्या ठेवणे, बाजारहाट करणे अशी अनंत कामे भुंग्याप्रमाणे पाठीशी असत. वेळ भरांभर निघून जाऊ लागला.

त्यांच्याएवढं मनःपूर्वक व आपुलकीने, जीव ओतून आजपर्यंत कोणीच काम केलं नव्हतं. शेठशेठाणी दोघेही एकदम खूश झाले. हळूहळू शेठाणीचा या नव्या गड्यावर लोभ जडला. आपणही त्याला मदत करायला हवी ही भावना तिच्यात निर्माण होऊन तीसुद्धा त्यांना मदत करू लागली. पाचसहा दिवस उलटून गेले. घड्याळाच्या काट्याप्रमाणे कामात स्वतःला झोकून देऊन श्रीमोटांची कर्मसाधना अखंड सुरू होती. ती साधना एके दिवशी फलद्रूप झाली. शेठजींच्या मनात एक दिवस विचार आले, "ज्या पद्धतीने हा मनुष्य काम करीत आहे, त्यावरून हा गडीमाणूस असावा असे वाटत नाही. त्याच्यामध्ये जे संस्कार आहेत ते आपल्यातदेखील नाहीत. सर्व कामे आटोपून रात्री झोपतांना हा नामस्मरण करीत झोपतो, भजनं म्हणतम्हणत स्वतःच्या मस्तीत सर्व कामं करीत असतो. पहाटे सर्वांआधी उठून बिछान्यात बसून ध्यान करतांना पण मी याला बऱ्याच वेळा पाहिलंय. या साऱ्याचा आज उलगडा झाला पाहिजे."

अगदीच न राहवून त्यांनी श्रीमोटांना आपल्याजवळ बोलाविलं आणि आपले विचार बोलून दाखविले, "तुम्ही कोण आहात, कोठून आलात आणि ही नोकरी स्वीकारण्यामागे तुमचा काय उद्देश आहे ? कोणती अडचण निर्माण झाली

म्हणून तुम्ही हे करीत आहात ? तुम्ही गडीमाणूस असाल असे मला वाटत नाही. चांगल्या सुशिक्षित घराण्यातील तुम्ही असावेत असे वाटते. मोकळेपणाने मला सारंकाही सांगा.'' भराभर शेठजींनी आपलं मन पूर्णपणे मोकळं केलं.

श्रीमोटांनी सर्व सविस्तर सांगितलं आणि पैशांच्या अडचणीमुळे आपण साधनेसाठी धुवांधारला पोचू न शकल्यामुळे शेवटी इथे थांबून पैसे मिळविण्यासाठी ही नोकरी स्वीकारली हे नम्रतेने सांगितलं.

त्यांचं बोलणं ऐकून शेठजी स्तब्ध झाले. एका ईश्वरभक्तास आपण गड्यासारखं राबवून घेतलं याचा त्यांना खूप खेद झाला. धुवांधारला जाण्यासाठी पैसे देऊन त्यांनी श्रीमोटांना मोकळं केलं.

शेठशेठाणीचा निरोप घेऊन ते जायला निघाले तेव्हा त्या दोघांच्या डोळ्यात पाणी होतं.

नोकर म्हणून आलेले श्रीमोटा जातांना दोघांची हृदयं जिंकून चालले होते.

धुवांधारहून नडियादला गेल्यानंतर शेठजींचे आभार मानणारे पत्र लिहायला ते विसरले नाहीत. त्यांचं ते पत्र पाहून शेठ शेठाणीला फार आनंद झाला. त्यानंतर दरवर्षी नेमाने ते हरिजनशाळेस मदत म्हणून पाच रुपये पाठवू लागले, व बरीच वर्षे पाठवीत राहिले.

आपल्या निष्काम सेवेने दुसऱ्यांच्या हृदयास पाझर फोडून त्यांच्या अंतरी दडून असलेली प्रेमगंगा वाहती करणं हा श्रीमोटांचा एक आगळावेगळा पैलू होता !

❖

# ६२. ‘धुवांधार’

नर्मदामातेच्या किनाऱ्यास लागून असलेलं ‘धुवांधार’ हे ठिकाण अत्यंत गहन–गंभीर असं एकान्तातील स्थान होतं. एका मोठ्या धबधब्याचं पाणी तिथे उद्दामपणे व झंझावाता–प्रमाणे खालच्या दगडांवर आपटून त्याच्या ठिकऱ्याठिकऱ्या होत असंत.

ऐऱ्यागैऱ्याच्या काळजाचा ठोकाच चुकावा अशी ती भयंकर जागा होती. धबधब्याच्या डाव्या बाजूस असलेल्या कातळात ती गुहा नैसर्गिकरीत्या तयार झाली होती आणि तिथे जाण्याचा श्रीमोटांना सद्गुरुंनी आदेश दिला होता.

जागा भयंकर होती हे तर खरंच, पण त्या गुहेपर्यंत पोहोचणंदेखील एक दिव्य होतं. तरीही भगवंताचं नाव घेतघेत अनेक खटपटी लटपटी करून ते गुरुकृपेने गुहेत पोहोचले. गुहा खूप छोटी होती. घोंघावणाऱ्या पाण्याचा आवाज त्या गुहेत शिरून वातावरणाची भयाणता अधिकच वाढवीत होता.

दिवसा बाहेरचे आवाज, पक्ष्यांचा कलरव यांच्यामुळे आणि सूर्यप्रकाशामुळे वातावरणातील भीषणता विशेष जाणवत नसे, पण रात्री सूर्याने आपली प्रकाशाची चादर काढून घेऊन सृष्टीस झोपविल्यानंतर रात्रीच्या निबिड अंधःकारातील नीरव शांतीत रातकिड्यांची किरकिर आणि धबधब्याचा भीषण धोंऽऽधोंऽऽ आवाज यांचं अजब मिश्रण होऊन जिवाचा थरकाप होऊन पाय लटलट कापू लागावेत अशी भीती ठाव घेई.

सर्वसाधारण व्यक्तीस असंच वाटलं असतं. श्रीमोटा मात्र निश्चिंतपणे व निर्भयतेने नामस्मरण, भजन, ध्यान, प्रार्थना,

आत्मनिवेदन अशा साधनेत स्वतःस विसरून गेले, मनस्वी रंगून गेले.

पाचसहा दिवस भराभर निघून गेले, पोटात अन्नाचा कणदेखील नव्हता. एवढ्या भयंकर जागी कोण जेवण देणार? रोजच एकादशी आणि रोजच उपवास ! मग मात्र सद्‌गुरुंना कणव आली : "आपण इतके दिवस त्याची परीक्षा घेतली, पण आता यापुढे परीक्षा घेणं योग्य नाही. बाळाची काळजी आईनेच घ्यायची ना ? मी काहीतरी व्यवस्था केलीच पाहिजे." त्याचवेळी श्रीमोटा करीत असलेला "हरिः ॐ" जप एका माणसाच्या कानी पडला. गुहेतूनच हा ध्वनी येतोच ही खात्री पटल्यावर अशा अवघड जागी बसून साधना करणाऱ्या व्यक्ती-बद्दल त्याच्या अंतरी भक्तिभाव निर्माण झाला आणि त्याने भाजी-भाकरी एका भांड्यात ठेवून, ते दोरीला बांधून तो दोर हलवून गुहेच्या तोंडापर्यंत पोहोचावा अशी योजना केली.

समोर दिसणारं ते भांडं श्रीमोटांनी काढून घेतलं, त्यातील भाजी-भाकरी काढून घेतली आणि मग ते भांडं परत केलं. मग रोजच ती व्यक्ती त्यांना जेवण आणून देऊ लागली.

जेवणाचा प्रश्न असा सुटला. राहिलेला पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी एक क्लृप्ती अवलंबिली. आपल्या धोतराच्या सोग्यास धबधब्याच्या तुषारांनी त्यांनी भिजू दिलं आणि मग तो सोगा पिरगाळून पाणी पिऊन टाकलं.

गुहा खूप छोटी असल्यामुळे खाणंपिणं, झोपणं, मलमूत्र विसर्जन हे सर्व गुहेतच करणं क्रमप्राप्त होतं. प्रेमाने, आनंदाने हे सर्व त्यांनी सहन केलं आणि आपल्या साधनेस चिकटून राहिले.

म्हणताम्हणता एकवीस दिवस निघून गेले आणि आपली साधना मनासारख्या रीतीने पूर्ण करून मगच ते घरी परतले.

साहस, धैर्य, सहनशीलता, अभय या गुणांच्या प्राप्तीसाठी सद्गुरुंच्या आदेशाने झालेल्या त्यांच्या साधनेची यशस्वी पूर्णाहुती झाली होती.

श्रीमोटा साधना करीत राहिले, आपल्या देहास चंदनाच्या खोडाप्रमाणे झिजवीत राहिले, आणि प्रगट होणारा प्रेमाचा सुगंध सभोवताली पसरवीत राहिले.

❖

## ६३. अघोरी बाबांकडे हिमालयात !

'गुजराथ हरिजन सेवक संघा'त असतांना श्रीमोटा हिमालयात गेले होते. चैतन्यात स्थिर झालेल्या * महात्म्यांकडून त्यांची अनुभवप्राप्ती आपणास व्हावी या हेतूने ते गेले होते. गंगोत्री, जम्नोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ, तुंगनाथ आणि इतर काही ठिकाणी जाण्याची त्यांची इच्छा होती.

ते गंगोत्रीहून केदारनाथला जात असतांना आरामासाठी एका चट्टीवर थांबले. तिथे त्यांना माहिती मिळाली की इथे जवळपास एका अघोरी बाबांचं वास्तव्य आहे. चट्टीतल्या माणसाने त्यांना अजून माहिती दिली. तो म्हणाला, ''तिथे जायचं म्हणजे फार धाडसाचं काम आहे. वर जायला अत्यंत कठीण अशी चढण आहे. झाडांना, वेलींना धरून धरूनच जावे लागते. रस्तेदेखील नीट नाहीयेत आणि हा जवळजवळ दहाबारा मैलांचा दीर्घ टप्पा आहे. तिथे अघोरी बाबा नावाचे उच्च कक्षेचे अनुभवसंपन्न पुरुष आहेत.''

* साक्षात्कारी

हे ऐकल्यावर श्रीमोटांनी तिथे जायचं निश्चित केलं. स्मशानात, एकान्तवासात अगणित रात्री घालविल्यानंतर भीती हा शब्द त्यांच्यासाठी शिल्लक राहिला नव्हता. "हजार हातांचा समर्थ धनी पाठीशी असता भय कसलं आणि काळजी कसली ?"

विचार पक्का झाल्यानंतर लगेच त्यांनी परिक्षितलालजींना आणि घरच्यांना पत्रे लिहिली. त्यांच्याबरोबर असलेल्या बोजावाल्यास जवळ बोलवून ती पत्रे त्याच्याकडे सोपवीत ते म्हणाले, "बाबा रे, हे बघ, पाच दिवस तू इथेच थांब. माझं सगळं सामान, इतकंच नव्हे तर पैसेदेखील तुझ्याकडेच असू देत. या पैशांतूनच तू तुझा खाण्यापिण्याचा खर्च कर. पाचव्या दिवशी मी जर परत आलो नाही तर तू सरळ तुझ्या घरी निघून जा. आणि हो ! जातांना ही दिलेली पत्रे मात्र पोष्टाच्या पेटीत टकायला विसरू नकोस."

एक वॉटर बॅग, एक कांबळं आणि थोडंफार खायचं : फक्त एवढंच बरोबर घेऊन ते निघाले, अघोरीबांकडे जायला ! चट्टीतल्या दुकानाच्या मालकाने त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, "भाई, तुम्ही जाताहेत खरे ! पण परत येण्याची शाश्वती गृहीत धरू नका. माझं ऐकणार असाल तर अजून वेळ गेली नाही, तुम्ही निर्णय फिरवा आणि केदारनाथलाच जा कसे !"

श्रीमोटा फक्त हसले. "हा देह तर मी कधीच अर्पण केलाय सद्‌गुरुंना, तो माझा राहिलाय कोठे ?" मनातल्या मनात त्यांनी चट्टीवाल्याला उत्तर दिलं.

त्यांची वाटचाल सुरू झाली. सर्वांनी जे काही सांगितलं होतं ते काही खोटं नव्हतं. कडे-कपारी, दऱ्या, खड्डे, चढाव,

अरुंद वाटा, मध्येच हरवून जाणारे रस्ते, काटेकुटे... या सर्वांना जणू अंतच नव्हता. एकदोनदा पाय घसरला आणि ते कड्याच्या दिशेला कोसळता कोसळता वाचले. हाताशी आलेली झाडाची फांदी पकडल्यामुळे दरीच्या तळापर्यंत जाऊन पोहोचण्याची त्यांच्यावर पाळी आली नाही.

ते चालले होते, पण त्यांना माहित होतं की ते एकटे नाहीयेत. सद्गुरुंची अमृतदृष्टी त्यांच्या सोबतीला होती, कृपाछत्र शिरी धरून सावलीसारखीच बरोबर होती. ते पूर्णत: निश्चिंत होते.

आता एक पठारासारखी जागा लागली. तिथे एक डेरेदार वृक्ष होता आणि जवळपास हाडे, कवट्या, विष्ठा हे सर्व पसरलेलं होतं. वातावरण कमालीच्या दुर्गंधाने भरून गेलं होतं, "हेच अघोरीबाबांचं स्थान असावं," त्यांनी निष्कर्ष काढला.

आता पक्षी घरट्यात परतण्याची वेळ झाली होती आणि काळोखाचे ढग त्या जंगलातील टेकड्यांवर अलगदपणे उतरू लागले होते. अशावेळी पुढे जाणंदेखील आता योग्य नव्हतं. इथेच थांबण्याचं ठरवून, एक जागा पाहून, ती साफसूफ करून ते बसले. भूक सणसणून लागली होती, जवळ असलेलं खाण्यापिण्याचं सर्व त्यांनी फस्त करून टाकलं, वॉटर बॅगमधलं पाणीही संपून गेलं. बारा मैल चालत येणं आणि तेही अशा जंगलातील कठीण रस्त्याने, ही काही सोपी गोष्ट नव्हती.

पोटातील आग शांत केल्यावार ते आपल्या नामजपात, स्मरणात, ध्यानात, प्रार्थनेत, आत्मनिवेदन भक्तीत रंगून गेले. सर्व जंगल सामसूम होऊन भयाण शांती आता सर्वत्र पसरू लागली होती.

अचानक झाडी सळसळण्याचा आवाज आला. चमकून त्यांनी पाहिलं, ‘‘एखादा जंगली पशू तर येत नसावा ना ?’’ त्यांना शंका आली. आवाजाच्या रोखाने ते अंधाराचा वेध घेत पाहू लागले. अघोरीबाबा येत होते. त्यांचं स्वरूप एखाद्या पिशाच्च्याप्रमाणे भीतीदायक होतं. अत्यंत मळकट आणि दुर्गंधित शरीर, वाढलेले, पिंजारलेले आणि गाठीगाठी झालेले मस्तकावरचे केस, अस्ताव्यस्त वाढलेली दाढी आणि अंगावर शहारे आणणारी भेदक, वेधक आणि तरीही प्रेतासारखी थंडगार नजर. त्यांच्या डोळ्यात एक नशा होती, एक विशिष्ट आकर्षणशक्ती होती.

आपल्या जागेत कोणी दुसरी व्यक्ती आली आहे हे अघोरीबाबांनी पाहिलं, पण त्या गोष्टीला काडीमात्र महत्व न देता ते आपल्या नित्याच्या जागेवर जाऊन बसले. अनाहूत पाहुण्याकडे त्यांनी पूर्णतः दुर्लक्ष केलं होतं.

रात्र सरली, उजाडलं, परत रात्र झाली आणि परत उजाडलं. लागोपाठ तीन दिवस असे निघून गेले. एखादा दगडधोंडा पडून असावा तसा तो अनाहूत पाहुणादेखील बाबांच्या दृष्टीने जणू एक नगण्य वस्तू होता.

चौथ्या दिवशी मात्र अघोरीबाबांनी उपेक्षा करण्याचा अंत केला. आपलं मौन सोडून श्रीमोटांकडे पहात त्यांनी विचारलं, ‘‘बच्चा, भूखप्यास लगी है ?’’

तीन दिवस, तीन रात्री उपाशी असलेल्या मोटांनी फक्त होकारार्थी मान हालविली. बाबांच्या समोरच तर ते बसून होते. बाबांना माहित असूनही ते विचारीत होते.

अघोरीबाबांनी त्यांच्या हाती एक करवंटी दिली. तिच्यात अत्यंत दुर्गंध येणारा, रबडीसारखा घट्ट पदार्थ होता.

अघोरीबाबा म्हणाले, "बच्चा पी जा, इससे तेरी भूख-तरस मिट जायेगी । इससे भूख भी नहीं लगेगी, तृषा भी नहीं लगेगी ।"

कशाचाही विचार न करता सद्गुरुंचं स्मरण करून आज्ञाधारकपणे त्यांनी तो पदार्थ, दुर्गंधाची तमा न बाळगीत, पोटात रिचविला. तो विचित्र आणि अगम्य पदार्थ पोटात गेला न् गेला तोच क्षणभरात त्यांची तहानभूक नष्ट झाली आणि अंतरी एक विशिष्ट भाव निर्माण झाला. हळूहळू बाह्यभान विरत गेलं आणि ते भावसमाधीत मग्न झाले. त्या तद्रूप अवस्थेत काळाचं अस्तित्त्वच जणू नष्ट झालं होतं. तासांमागून तास निघून गेले.

जेव्हा ते भानावर आले तेव्हा त्यांना दिसलं, अघोरी बाबा त्यांच्याकडे प्रसन्न मुद्रेने पहात होते.

ते म्हणाले, "अरे बच्चा ! तुं मेरी साथ रह जा ईधर । तेरेकु जो कुछ दिलमें करने के महत्वाकांक्षा हय, वो सब इधर तेरेकु संतोषपूर्ण मिल जाएगा ।"

श्रीमोटा नम्रतेने म्हणाले, "मी गरीब तुमच्या दर्शनाला आलो आहे. कितीतरी अनुभवी महात्मा आहेत, त्यांचे शुभाशीर्वाद मला प्राप्त व्हावेत यासाठी मी त्यांची प्रार्थना करतो. कोणाकडे काहीच मागत नाही. केवळ असा भाव हृदयी ठेवतो की, "प्रेमभक्तीद्वारा माझ्या हृदयात स्वीकार-शक्तीने[१] भावाची तद्रूपता प्रगट होवो आणि ती जिवंतपणे[२] वहात राहो.[३]"

---

१ रिसेप्टिव्हिटी

२ जागृतपणे

३ प्रेमभक्तीने अंतरी भाव प्रगट होऊन तो जागृतपणे टिकून राहो, स्थिर राहो.

अघोरीबाबा म्हणाले, "तुला इथेच रहावं लागेल. इथून जाता येणार नाही. कितीतरी काळापासून मी एका समर्थ शिष्याच्या शोधात आहे. परंतु बाहेर शोधायला गेलो नाही. 'शिष्य मला शोधत इथे येईल', असा माझा दृढ भाव होता; आणि म्हणूनच, तू स्वतःहूनच आला आहेस तर तू इथेच रहा. तुझ्या ध्येयप्राप्तीच्या सर्व अपेक्षा पूर्ण होतील यात शंकाच नाही !"

श्रीमोटा म्हणाले, "प्रभु, प्राप्त परिस्थितीत अनुकूल असं, धर्माचं प्रेमभक्तीज्ञानपूर्वक पालन करणे, हेच मुख्य आहे, अशी माझी धारणा आहे.

"हिमालयातील आपल्यासारख्या महात्म्यांच्या आणि महानुभावांच्या 'चैतन्यभावा'चा हृदयामध्ये अनुभव मिळविणे, हा माझा सध्याचा धर्म आहे. माझा यात्रेचा हेतूपण हाच आहे ! मला अजून बऱ्याच ठिकाणी जायचं आहे. माझा हेतु अद्याप पूर्ण झालेला नाही. मला सध्या प्राप्त असलेली कर्मे, संयोग* आणि परिस्थिती यांच्याविषयी असलेल्या माझ्या कर्तव्यांमधून मी अद्याप मुक्त झालो नाही आणि जबरदस्तीने मला डांबून ठेवू शकेल अशी कोणतीच शक्ती नाही," निर्भयतेने श्रीमोटा उद्गारले.

रागाने बाबा म्हणाले, "तू जर तुझा हट्ट सोडला नाहीस तर तुझं शरीर टिकून राहणं कठीण होईल; मी पाहतोच तू कसा जातो ते !"

श्रीमोटा गंभीरपणे म्हणाले, "कसलंच भय या 'जीवा'स ग्रासू शकत नाही. 'भया'ला जीवनातून पळवून लावलं आहे

* ऋणानुबंध

माझ्या गुरुमहाराजांच्या आशीर्वादाने भगवंताची कृपा होऊन मला 'अभय' प्राप्त झालं आहे. तो माझ्या जीवनाचा मोठ्यात मोठा शृंगार आहे, गौरव आहे. जीवनाची शाश्वतता अणि चैतन्य अनुभवण्यासाठी 'अभय' प्राप्त होण्याचीच आवश्यकता आहे.''

ते चट्टीकडे परत यायला निघाले. त्यांच्या मनात कसलीच खळबळ नव्हती.

भजनं गातगात ते खाली उतरले. उतरायला फार वेळ लागला नाही. ते चट्टीवर आले, आंघोळ केली, स्वयंपाक बनविला, जेवले आणि रात्री निद्राधीन झाले.

सकाळी ते उठले तेव्हा शरीर हलकंफुलकं होतं, स्वस्थ होतं. नंतर अचानक शौचास जायची भावना झाली. जाऊन येतात न येतात, तो परत तोच प्रकार ! वारंवार हे होऊ लागलं.

चट्टीमधल्या माणसांनी त्यांना सांगितलं, ''अशा आजारी माणसाला इथे राहण्यास परवानगी नसते. एकामुळे सर्वजण आजारी पडू नयेत म्हणून आपणास दुसरी सोय पहावी लागेल.''

मग त्यांनी आपलं चंबुगबाळं आवरलं आणि तिथून थोड्या अंतरावर एका झऱ्याच्या बाजूला मेणकापड पांघरून त्यावर पडून राहिले. जुलाब होऊन शरीरातला कस जणू निघून गेला होता. ते गलितगात्र शरीराने पडून राहिले. हे सर्व घडण्यामागे अघोरीबाबांचाच हात आहे हे त्यांच्या लगेच लक्षात आलं.

जुलाबांचं प्रमाण आता एवढं वाढलं आणि शरीर एवढं क्षीण झालं की उठून बसण्याचीदेखील शक्ती राहिली नाही. हळूहळू त्यांचं बाह्यभान लोप होत गेलं आणि ते पूर्णपणे

बेशुद्ध झाले. एक बंगाली साधु आपल्याजवळ आला होता एवढंच अंधुक स्मरण त्यांना बेशुद्धीच्या क्षणापूर्वी होतं.

जेव्हा त्यांचं भान परत आलं तेव्हा त्यांना दिसून आलं की तो बंगाली साधु त्यांची आईच्या मायेने काळजी घेत होता. शौच धुणं, कपडे धुणं, जागा साफसूफ ठेवणं, अंग पुसणं, अन्नपाणी देणं – सर्वकाही तो खूप प्रेमाने करीत होता. साधूच्या जिवापाड सेवेमुळे त्यांची तब्येत झपाट्याने सुधारत गेली.

त्यांनी त्या साधूला विचारलं, ''महाराज, मी किती दिवस असा बेशुद्ध होतो ?'''

साधूने उत्तर दिलं, ''बेटा ! तू जवळजवळ अठरावीस दिवस आजाराने पडून होतास. तू वाचलास तो केवळ तुझ्या गुरुमहाराजांच्या कृपेमुळेच ! बेटा, मला तुझं कौतुक वाटतं ते यासाठी की अशा आजारी अवस्थेत आणि बेभान अवस्थेतसुद्धा तुझं नामस्मरण आणि प्रार्थना सुरू होती व अखंड सुरू होती.''

आपली सेवा करणाऱ्या त्या साधुमहाराजांकडे पाहतापाहता त्यांचे डोळे पाण्याने भरून आले. ''कोण कोठले साधुमहाराज ? माझा नि त्यांचा काय संबंध ? तरीही माझ्यासाठी इतकं सर्व त्यांनी केलं ! खूपखूप प्रेमाने केलं !! आपण त्यांचे कसे उतराई होणार ?'' कृतज्ञतेने त्याचं हृदय सद्‌गदित झालं.

त्यांनी आपल्याजवळचं एक कांबळं आणि पंचवीस रुपये त्या साधूला देऊ केले, फूल न फुलाची पाकळी म्हणून !

साधु म्हणाला, ''अरे बाबा, तू हे काय करतो आहेस ? तुझ्याकडेच काही नाही आणि मला देत आहेस हे बरोबर

नाही. "या या ठिकाणी माझा भक्त आहे, त्याची सेवा कर!" असा आदेश मला माझ्या सद्गुरुंकडून प्राप्त झाला म्हणूनच मी तुझी सेवा केली. बाळ, मी केवळ निमित्तमात्र आहे"

चालण्याएवढी शक्ती प्राप्त झाल्यावर दोघेजण परत येण्यास निघाले. काही अंतर पार केल्यावर आपल्याबरोबर ते साधुमहाराज नाहीयेत असं श्रीमोटांच्या ध्यानी आलं. ते लघुशंकेला गेले असतील आणि आपण चालण्याच्या नादात पुढे निघून आलो आहोत असं त्यांना वाटलं. उभं राहून ते त्यांची वाट पाहू लागले. आपली सेवा करणारे ते प्रेमळ साधुमहाराज कोण असावेत असा प्रश्न त्यांच्या अंतरी उद्भवला.

अंतर्मनाच्या गाभ्यातून त्यांना उत्तर मिळालं, "अरे, वेड्या! ओळखलं नाहीसच का तू त्यांना ? अरे, ते होते तुझे सद्गुरु! साक्षात् बालयोगी महाराज !!"

❖

## ६४. ब्रह्मचर्यासाठी अग्निसाधना

एकदा एका अनुभवी महापुरुषाने श्रीमोटांना सांगितलं, "ब्रह्मचर्यात सहजता येण्यासाठी, मी सांगतो ती साधना तू कर. चैत्र महिन्यात एखाद्या एकान्तस्थळी जाऊन तप्तशिलांवर बसून तुला ही साधना करावी लागेल. तुझ्या हृदयात भाव परिपूर्णतेने असल्यामुळे या साधनेने तुला जो लाभ होईल तो किती अनोखा असेल याचा तू स्वतःच अनुभव घे."

त्यांनी त्या साधुमहाराजांची सूचना अमलात आणायचं ठरवलं आणि त्यासाठी नर्मदामातेच्या तीरावरील एक रम्य असं एकान्तातील स्थान निवडलं.

चैत्र महिन्याच्या रणरणत्या, आग ओकणाऱ्या उन्हामुळे

तव्याप्रमाणे तापलेल्या शिलांवर ते दुपारी अकरा वाजता निर्वस्त्र होऊन बसत. त्यांच्या बसण्याच्या स्थानाभोवती एकवीस धुन्या तीन फूट अंतरावर वर्तुळाकार रचल्या जात. प्रत्येक धुनी दीड फूट उंच आणि दोन फूट रुंद असे. अशा एकवीस एकवीस धुन्यांची तीन वर्तुळं तीनतीन फुटांवर त्यांच्याभोवती असत.

या सर्व धुन्या पेटवून ते आपला वेळ नामजप, स्मरण, भजन, प्रार्थना, ध्यान यात घालवत. एवढ्या प्रचंड दाहातदेखील त्यांना अद्‌भुत अशी भावावस्था आणि ध्यानावस्था प्राप्त होई. अशाप्रकारे पाचसाडेपाचपर्यंत ते शिलांवर बसून असत. अंगातून घामाच्या धारा वहात असत. संध्याकाळी उठल्यानंतर दोन रुमालांनी ते सर्व अंग पुसून काढीत. या साधनाकाळात त्यांनी स्नान वर्ज्य केलं होतं.

एवढं झाल्यानंतर त्यांच्यासाठी दोन मोठ्या वाट्या भरून कडुनिंबाचा रस तयार असे. त्यांनी पैसे देऊन दोन माणसं खास या कामासाठी ठेवली होती. हा दोन वाट्या कडुनिंबाचा रस हेच त्यांचं त्या काळातील अन्नपाणी होतं. जणू जेवण घेत असावं अशा थाटाने ते घुटक्याघुटक्याने तो रस पिऊन टाकीत. हा कार्यक्रम तब्बल दोनअडीच तास चालत असे.

अशाप्रकारे अठ्ठावीस दिवस श्रीमोटांनी ही साधना केली. या साधनेमुळे त्यांच्या सर्व अंगांची आणि सर्व '–करणां'ची शुद्धी झाली, शरीरात आणि मनात अद्‌भुत शांती भरून राहिली. विकारांचं शमन झालं आणि साधनेत स्थिरता आली.

श्रीमोटांनी नंतर सांगितलं "शरीरात अनेक प्रकारचे मळ आहेत. आणि साधनेसाठी मळशुद्धी आवश्यक आहे, त्याचप्रमाणे शरीराच्या — चित्त, प्राण, आणि संकल्प — या तीन '—करणां'ची शुद्धीदेखील अनिवार्य आहे.

"शरीरातील रोमारोमाची मळशुद्धी होणं आवश्यक आहे आणि हा मळ घामाद्वारेच निघू शकतो.

"शरीरातून घाम येणं ही नैसर्गिक प्रक्रिया शरीर स्वस्थ ठेवण्यासाठीच निसर्गाने प्रदान केली आहे याचं आपल्याला फार थोडं भान आहे.

"हल्ली हवेशिवाय माणसाला चैन पडत नाही. शहरात एअर कंडिशन्ड रूम्स, पंखे याद्वारे शरीरास हवेची सवय झाली आहे आणि ते सर्वमान्य झालं आहे. परंतु शरीराच्या आरोग्याच्या दृष्टीने हे चांगलं नाही.

"आज जरी लोक हे मानीत नसतील तरीही शरीरातून घाम येणं, इतकंच नव्हे तर तो जास्तीतजास्त येणं हे शरीराच्या आरोग्याच्या दृष्टीने चांगलं आहे."

अग्निसाधनेमुळे श्रीमोटा तद्नंतर संपूर्णतः विकारमुक्त झाले.

❖

## ६५. श्रीकृष्ण दर्शन–सगुण साक्षात्कार

श्रीमोटांना १९३० मध्ये मनाच्या नीरवतेचा साक्षात्कार झाल्यावर १९३४ मध्ये द्वैताचा साक्षात्कार झाला.

द्वैताच्या — सगुण ब्रह्माच्या साक्षात्कारात त्यांना श्रीकृष्णाचं दोनतीनदा दर्शन झालं होतं.

श्रीमोटांनी स्वतःच त्याचं वर्णन याप्रमाणे केलं आहे.

*"ते कृष्णस्वरूप मुरलीधारी अथवा पार्थिव शरीराच्या तत्त्वांचं नव्हतं. ते परम सौंदर्याने परिपूर्ण व अपार तेजाने भरलेल्या सदेही कृष्णाचं दर्शन होतं. सर्व सौंदर्यमय होतं. ते अवर्णनीय दर्शन होतं. ते स्वरूप इतकं काही मनोहारी आणि हृदयाकर्षक होतं की कोणत्याही कल्पनेनेदेखील त्याची तुलना*

करता येणं शक्य नाही. ते मुलायम, पारदर्शक, स्फटिकाप्रमाणे प्रकाशमान, नीलवर्णरंगी, जिवंत दर्शन होतं.''

''दर्शन स्थिर नव्हतं; खेळतं, हलतं, चालतं, क्षणात जवळ येणारं आणि क्षणात दूर जाणारं-असं अनुभवास येत होतं. आणि ते आधाराच्या भिन्नभिन्न मनादिकरणांना स्पर्श करीत होतं आणि तिथे काहीतरी सूक्ष्म प्रक्रिया करीत असावं असं वाटत होतं...भ्रूकुटी आणि ब्रह्मरंध्राच्या भागात स्वतःस प्रस्थापित करणारं आणि हृदयात विराजमान — अशा प्रकारचं अनुभवलं जात होतं. समग्र आधार तप्तवर्णी आणि पूर्ण प्रकाशाने आलोकित झालेला जाणवत होता. 'स्वतः स्वतःला अनुभवू शकावं' अशी भूमिका पण अनुभवली जात होती. काहीक्षणी त्याचा विस्तारसुद्धा अनुभवला जात होता. श्रीकृष्णाचं अलौकिक दर्शन इतकं अद्‌भुत, रोमांचक, मुग्ध, स्निग्ध, कोमल होतं की विचारूच नका ! समग्र शरीर वजनरहीत झाल्यासारखं वाटत होतं. समग्र आधारांमध्ये आणि त्यांच्या '-करणां'मध्ये त्याचा परिणाम चिरस्थायी झाल्याचं अनुभवलं जात होतं. त्यानंतर याचा परिणाम 'त्या' (ईश्वरा)च्या कृपेने चिरस्थायी राहिला आहे.

''या अनुभवानंतर सूक्ष्मतर आणि सूक्ष्मतम आणि दिव्य प्रदेशांमद्ये विघ्ने प्रगट झाली नव्हती असं नाही. पण दिव्य कृपेच्या मदतीने त्यांचं निवारण होऊ शकलं होतं. त्याच्या अशा कृपामय मंगल दर्शन-अनुभवानंतर आधारातील केंद्रात काही अवर्णनीय बदल झाला असल्याचं अनुभवलं जात होतं, आणि नंतर ते सतत ज्वलंतपणे आणि स्थिरपणे अभिव्यक्त होत होतं.''

*या 'जीवा'च्या* जीवनात या दर्शनप्राप्तीनंतर ते चैतन्य सातत्याने व जिवंतपणे प्रगट राहिलं, आणि त्याच्या आकर्षणाची, भावाची सतत वृद्धी होत गेली. आणि पशुपक्षी, निसर्ग, वृक्ष, बालक, भजन – अशा कोणत्याही निमित्ताने भाव प्रगट होऊन तशा दिव्य दर्शनाची इच्छा परत निर्माण होऊन आपोआप भावसमाधी प्रगट होऊ लागली.*

❖

## ६६. अभयप्राप्तीची कसोटी : गिरनारमध्ये

आपणास अभयप्राप्ती झाली आहे किंवा नाही याची परीक्षा घेण्यास एकदा श्रीमोटा, वजुभाई जानी यांच्याबरोबर गिरनारला गेले होते.

गिरनारला दत्तात्रेयांच्या शिखरावर निर्गुण पादुकांकडे जाण्यासाठी असलेल्या पायऱ्यांजवळ एक कुंड आहे. त्यामागे अतिशय घनदाट आणि भयंकर असं जंगल आहे. तिथे जायचं निश्चित झालं.

श्रीमोटा जवळपासच्या साधुबाबांना जाऊन भेटले आणि आपला मनोदय व्यक्त केला: "त्या जंगलात आतआत उतरून तळाशी जायची आमची इच्छा आहे. तुम्ही आम्हाला रोज दुपारी, एकदाच, दोनजणांपुरत्या भाकरी आणि भाजी किंवा वरण आणून देत जा. आम्ही तुम्हाला पाच रुपये देत जाऊ. आम्हाला तिथे दोनचार दिवस राहण्याची इच्छा आहे."

हे ऐकल्यावर साधुबाबा व इतर लोक त्यांना घाबरून म्हणाले, "नाही, नाही, तुम्ही तिकडे जायच्या भानगडीत पडू नका, नाहीतर त्या सिंहांचं भक्ष्य व्हाल."

---

* श्रीमोटांच्या

श्रीमोटा हसून म्हणाले, "आम्ही तर भक्ष्य बनण्यासाठीच जात आहोत."

श्रीमोटांचा व वजुभाईचा जाण्याचा दृढ निर्धार पाहून शेवटी ते म्हणाले, "ठीक आहे, पण आम्ही थेट खालपर्यंत येणार नाही. सिंहांची भीती आहे. अर्ध्या रस्त्यापर्यंत आम्ही येऊ. अर्धे अंतर तुम्हाला येऊन अन्न घेऊन जावं लागेल."

श्रीमोटांनी ते मान्य केलं.

निश्चयाप्रमाणे दोघेही आत शिरले आणि निबिड जंगलात उतरतउतरत पायथ्यापर्यंत गेले.

सिंह येत, इकडेतिकडे फिरत. अगदी जवळसुद्धा येत पण त्यांनी काही केलं नाही. वजुभाईंनी मात्र भीतीने मलमूत्र विसर्जन केलं.

श्रीमोटा म्हणत, "भय तर आत आहे, बाहेर नाही !"

दोघांनी तिथे सलग सात दिवस मुक्काम केला. या दोघांना आपलं भक्ष्य बनविण्याचा प्रयत्न एकाही सिंहाने केला नाही.

❖

## ६७. प्रभाबांची सदेह पुनर्भेट

श्रीमोटा एकदा कच्छमधील 'भूज' येथे गेले होते. विशेषतः सिंहांचा आणि त्याचप्रमाणे इतर जंगली प्राण्यांचा तिथे मुक्त वावर असतो. दिवसादेखील हे हिंस्र पशू निर्भयतेने फिरत असतात.

तिथे एका टेकडीवर त्यांनी एक रात्र घालविली. अत्यंत घनदाट जंगल, काळीकुट्ट रात्र आणि भयंकर वातावरण होतं. परंतु 'अभय' प्राप्त केलं आहे त्यास भीती कसली ? टेकडीवरच बाजूला एक मंदिर होतं आणि त्यासमोरील विशाल पटांगणात श्रीमोटा भावपूर्ण स्मरणात डुंबले होते.

त्यांना स्मरण होत होतं तीव्रतेते आपल्या प्रभाबांचं ! "ज्या आईने–आपल्या आध्यात्मिक आईने आपल्याला एवढं प्रेम दिलं, नामस्मरणासाठी श्रद्धेचं पहिलं बीज दिलं, तिच्या अंत्यसमयी आपण उपस्थित राहू शकलो नाही, सेवा करू शकलो नाही."... श्रीमोटांच्या हृदयास जणू पीळ देत असल्यासारख्या वेदना झाल्या आणि प्रार्थना आणि स्मरण अधिकच गहिरं झालं.

अचानक त्यांना दिसलं–या चर्मचक्षूंनी त्यांनी पाहिलं–प्रभाबां प्रत्यक्ष देह धारण करून समोर उभ्या होत्या. एखाद्या अबोध, अनाथ बालकाप्रमाणे धावत जाऊन त्यांनी बांना घट्ट मिठी मारली. बां प्रेमाने त्यांच्या पाठीवरून, डोक्यावरून हात फिरवीत होत्या. आणि श्रीमोटांच्या डोळ्यांतून गंगा–यमुना वहात होत्या.

मायलेकरांचं पोटभर बोलणं झालं आणि श्रीमोटा आईच्या मांडीवर डोकं ठेवून पहुडले. ते एक स्वर्गसुख, दिव्यसुख होतं. 'स्वामी तिन्ही जगांचा, आईविना भिकारी' हे का म्हणतात याचा प्रत्यक्ष अनुभव ते घेत होते. श्रीमोटांनी पहुडल्यापहुडल्या कूस बदलली आणि एखादं स्वप्न विरून जावं तसा प्रभाबांचा स्थूल देह अदृश्य झाला.

मात्र जातांना मुलास सनाथ झाल्याचा आनंद त्या मागे ठेवून गेल्या, त्याच्या हृदयातला डंख काढून गेल्या, हृदय शीतल, शांत, तृप्त करून गेल्या. ती रात्र श्रीमोटा आयुष्यात कधीही विसरू शकले नाहीत !

❖

## ६८. सेवानिवृत्ती व कराचीस प्रयाण

म्हणताम्हणता हरिजन सेवेस वीस वर्षे उलटून गेली. सेवा सुरू होती आणि साधनाही सुरू होती. श्रीकृष्णाचा सगुण साक्षात्कार होऊन आठ वर्षे झाली, परंतु निर्गुण निराकाराचा साक्षात्कार झाला नाही याची खंत श्रीमोटांच्या उरी होती. आता त्यांना सेवा निवृत्तीचे वेध लागले होते.

"आपणास जे काही प्राप्त झालं आहे ते केवळ स्वतःसाठीच न ठेवता त्याची गुलालाप्रमाणे उधळण करावी, ते इतरांनाही भरभरून द्यावं," असा त्यांच्या मनोदेवतेने त्यांना कौल दिला. आपल्याला ज्या ज्या व्यक्ती सहजतेने येऊन भेटतील, त्यांना अंतरीचे हे अमृतबिंदू देण्यासाठी आता सेवाकार्यातून पूर्णतः मुक्त होण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

मोठ्या भावाच्या मृत्यूनंतर वीस वर्षे कुटुंबाची जबाबदारी त्यांनी एकखांबी पेलली होती. आतामात्र दोन्ही भाऊ मार्गी लागले होते. त्यापैकी एकाच्या मुलास नोकरीपण मिळाली होती. त्यामुळे आई आणि वहिनीचा भार ते उचलू शकणार होते.

सेवानिवृत्त होण्याचा आपला विचार श्रीमोटांनी आईला बोलून दाखविला. ते ऐकून ती त्राग्याने म्हणाली, "इथे पावशेर धान्य चिमण्यांना टाकायला मिळत नाही आणि आहे ती छोटीशी नोकरी सोडून मोठा जग जिंकणार आहेस !" दोनचार दिवसांनंतर त्यांनी परत विषय काढला आणि तिला समजावून सांगितलं. ती थोडा विचार करून म्हणाली, "ठीक आहे, पण मला दर महिन्याला पाचसहा रुपये मिळतील अशी व्यवस्था कर म्हणजे मला काळजी राहणार नाही."

"ठीक आहे."

"आणि हो, मी शेवटच्या घटका मोजत असेन तेव्हा तुला माझ्याकडे यावं लागेल हे पण मी आत्ताच सांगून ठेवते," आईने त्यांना प्रेमाने खडसाविलं.

श्रीमोटा हसून म्हणाले, "अगं आई, अशी सेवा करणं हा तर माझा धर्मच आहे, आणि तो मी पार पाडणार नाही असं तुला वाटलं तरी कसं ? मी जगाच्या पाठीवर कोठेही असलो तरी लगेच धावत येईन बघ !"

आई त्यांच्या या बोलण्याने निश्चिंत झाली आणि श्रीमोटांनी रीतसर निवृत्ती स्वीकारली. आपण आता यानंतर मूळजीभाईकडे रहायचं हे ठरवून आईपण आपल्या त्या मुलाकडे नडियादला निघून गेली.

माध्यान्ह काळी तळपणाऱ्या सूर्याप्रमाणे यावेळी त्यांची साधना शिखरावर पोहोचून तेजाने तळपत होती. त्यांच्या साधनामार्गात त्यांच्याबरोबर अजून तीन सहप्रवासी होते. एकच हृदय असलेल्या त्या तीन शरीरांची नावे होती हेमंतकुमार नीळकंठ, वजुभाई जानी आणि नंदुभाई !

ज्यांच्याविषयी श्रीमोटांच्या हृदयी पित्याचा भाव होता त्या परसदभाई मेहतांकडे–बापूंकडे कराचीला जाण्याचं ठरलं आणि आपल्या कुटुंबाचा आणि तिन्ही जिवश्चकंठश्च साधक मित्रांचा निरोप घेऊन ते कराचीस गेले. त्या तिघांनाही माहीत होतं, "श्रीमोटा आपल्याला सोडून नव्हे, तर बरोबर घेऊनच गेले आहेत."

कालप्रवाहात या सर्वांच्या जीवनसरितांचा ओघ वेगवेगळ्या दिशांना वहात होता पण तरीही शेवटी त्या सर्वच सरिता वाटचाल करीत होत्या एकच एक चैतन्यसमुद्राकडे !

❖

## ६९. "कराचीवाले बाबा" – एक औलिया

साधनेत व्याकुळता, झोकून द्यायचा प्राणांतिक आणि दृढ भाव आणि अभय यांची विशेषत्वाने गरज असते. भयदेखील एकाच प्रकारचं असतं असं नाही. अनेक प्रकारच्या भयांपासून मुक्ती मिळविण्यासाठी जिवाचं रान करावं लागतं.

याच हेतूने श्रीमोटादेखील दरवर्षी दिवाळीतील नर्कचतुर्दशीच्या दिवशी नव्या ठिकाणी रात्रभर साधना करण्यासाठी जात असत.

यावेळी त्यांचं वास्तव्य कराचीत होतं. नर्कचतुर्दशीचा दिवस होता आणि आज त्यांनी समुद्रकिनारी जायचं निश्चित केलं होतं. किनाऱ्याच्या खडकांवरील अत्यंत कठीण, दुर्गम आणि भीतीदायक जागी ते येऊन बसले. समुद्राचं पाणी घोंऽऽ घोंऽऽ करीत घोंघावत होतं आणि लाटा थडाथड् किनाऱ्याच्या कंगोरेदार खडकांवर आपटून, छिन्नविछिन्न होऊन इतस्ततः पाण्याचे तुषार उडत होते. काळाकुट्ट अंधार भरून राहिला होता आणि भयाण शांती दाटून होती. खडकावर बसून ईश्वरस्मरण, ध्यान, भजने, प्रार्थना, आत्मनिवेदनभक्ती या साधनेत ते रत झाले, आनंदमग्न झाले.

थोडावेळ जातो न् जातो तोच अंधारातूनच जणू उगवल्याप्रमाणे एक विचित्र वेष असलेला आणि भयंकर दिसणारा मनुष्य टेकडीखाली दिसला. त्याने टेकडीवर बसलेल्या श्रीमोटांना दरडावून विचारलं; "इधर क्यों बैठा है ?"

न डगमगता ते म्हणाले, "भगवान के ध्यानमें ।"

"नहीं, इधर तुम नहीं बैठ सकता ।" तो म्हणाला.

"क्यों ?" श्रीमोटांनी बेधडक प्रश्न केला.

"यह मस्त लोगोंकी जगह है ।" त्याने उत्तर दिलं.

श्रीमोटा प्रत्युत्तरादाखल म्हणाले, "मुझे भी मस्त बनना है ।"

आतामात्र तो मनुष्य जरा रागावूनच म्हणाला, "इधरसे चले जाओ ।"

कणखरपणे श्रीमोटा उद्‌गारले "नहीं जा सकता !"

हे ऐकताच त्या माणसाचा राग अनावर झाला. ओरडून त्याने धमकी दिली, "तो मारेगा ।"

"बहोत अच्छा !" निर्भयतेने श्रीमोटांनी उत्तर दिलं. आपल्या जागेवरून ते तसूभरही हलले नाहीत. हा मनुष्य आता काय करतो इकडे त्यांचं लक्ष होतं.

रागाने बेभान झालेल्या त्या माणसाने एक खूप मोठा दगड दोन्ही हातांनी उचलला आणि जोराने त्यांच्या दिशेने भिरकावला. सूंऽऽ सूंऽऽ करीत तो त्यांच्या डोक्याच्या केसांना अलगद चाटून गेला आणि पलीकडच्या खडकावर धाडकन् पडला. दगड पडल्याच्या प्रचंड आवाजाने त्या भयाण शांतीच्या ठिकऱ्याठिकऱ्या झाल्या.

क्षणभरात घडलेल्या या घटनेने श्रीमोटा स्तंभित झाले. तीनचार माणसांनादेखील उचलता येणार नाही एवढा मोठा दगड हा एकटा मनुष्य उचलतो काय, लीलया फेकतो काय, आणि आपल्याला थोडीसुद्धा इजा न होता डोक्याच्या केसांना केवळ स्पर्श करून जातो काय — हे सर्वच अद्‌भुत होतं, चमत्कारीक होतं, विशेष होतं. "निश्चितच हा कोणीतरी औलिया असावा. सामान्य मनुष्यास हे शक्यच नाही,"त्यांच्या मनाने भराभर गुंता सोडविला आणि पटकन उठून ते टेकडीखाली आले. तो मनुष्य आपल्या जागी स्थिर उभा होता, त्यांच्याकडे रोखून पहात होता.

त्यांनी पटकन जाऊन त्याचे चरण पकडले आणि आपलं मस्तक टेकविलं.

औलियाने त्यांना प्रेमाने उठविलं आणि म्हणाला, "तुला साधनेत प्रगती करवून देण्यासाठीच मी येथे आलो आहे. तू घाबरला नाहीस आणि निर्धारपूर्वक बसून राहिलास हे पाहून मी खूश झालो आहे. मी तुला आता साधनेचा एक विधी शिकवतो पण तत्पूर्वी तुला एक काम करावं लागेल. मला सिगारेट ओढायची आहे, तर ती तू घेऊन ये."

आज्ञेप्रमाणे ते निघाले आणि चालू लागले. औलियाने त्यांना थांबवून सांगितलं, "आणि हे बघ, लक्षात ठेव, सिगारेट तशीच आणायची आहे. पैसे द्यायचे नाहीत."

एवढ्या काळ्याकुट्ट अंधाऱ्या मध्यरात्री ते सिगारेट आणायला निघाले. थोड्या अंतरावर त्यांना एक दुकान दिसलं. त्यांनी दुकानाच्या लाकडी पाट्या खडखडविल्या.

एवढ्या रात्री झोपमोड झाल्यामुळे त्रासूनच मालक बाहेर आला.

"कोण आहे ? एवढ्या रात्री यायला लाज नाही वाटत ?" आपला त्रागा त्याने व्यक्त केला.

ते म्हणाले, "मला सिगारेट पाहिजे आहे."

केवळ सिगारेटसाठी बारा वाजता येऊन झोपमोड करणाऱ्या माणसाविषयी चीड येणं अत्यंत स्वाभाविकच होतं. खवळून तो म्हणाला, "ही काय सिगारेट घ्यायची वेळ आहे का ? आम्हाला काही विश्रांती घेऊ द्याल की नाही ?" पण नंतर त्याने विचार केला, "एवीतेवी आपण उठलोच आहोत तर याला सिगारेट देऊ, पण पैसे भरपूर मोजून घेऊ !" तो

म्हणाला, "ठीक आहे, देतो. पण पैसे मात्र जास्त द्यावे लागतील, तुझ्या अशा अवेळी येण्यामुळे !"

त्यांच्यापुढे पेच निर्माण झाला. करायचं काय ? पैसे द्यायचे नाहीत अशी औलियाची आज्ञा होती आणि खरंतर त्यांच्याकडेपण द्यायला फुटकी कवडीतरी होती का ? ते घरातून तसेच बाहेर पडले होते. एकाएकी त्यांना स्फुरण झालं की आपल्याजवळ असलेलं कांबळं त्याला द्यावं आणि त्याच्या मोबदल्यात सिगारेट घ्यावी.

ते झटकन म्हणाले, "चालेल, द्या मला आणि हो, एक काडीपेटीसुद्धा द्या." काडीपेटीशिवाय सिगारेट कशी ओढणार ? तीपण न्यावी असं त्यांना वाटलं.

दोन्ही वस्तू काढून दुकानदाराने त्यांच्या हाती ठेवल्या. त्या घेतल्यानंतर श्रीमोटा म्हणाले, "मालक, रागावू नका पण माझ्याकडे आता पैसे नाहीयेत. मी उद्या सकाळी तुमचे सर्व पैसे रोख देतो. आज तुम्ही त्याच्याऐवजी माझं हे कांबळं ठेवून घ्या."

आगीत तूप टाकल्यानंतर ज्वाला लवलवत वर जावी तसा दुकानदाराचा भडका झाला. तो ओरडून म्हणाला, "मूर्खा, पैसे नव्हते तर आधी सांगता नाही आलं तुला ? एवढ्या रात्री झोपमोड केलीस, दुकान उघडायला लावलंस, आणि सगळं घेतल्यानंतर हे सांगतोस तू मला, आता ? तुझं ते वापरलेलं जुनं कांबळं घेऊन मी काय करू ? आण ते सिगारेटचं पाकिट नि काडीपेटी, आणि तोंड काळं कर इथून !"

ही सर्व रगझग चालू होती आणि तेवढ्यात एक माणूस धावतधावत तिथे आला. त्याने श्रीमोटांच्या हाती पैसे दिले

आणि म्हणाला, “दुकानदाराला द्यायला बाबांनी पैसे पाठविले आहेत. पैसे देऊन सिगारेट घेऊन तू लगेच परत जा.” आला तसाच धावतधावत आणि धापा टाकत तो मनुष्य निघून गेला.

पैसे मिळाल्यानंतर दुकानदाराचं तोंड गप्प झालं. विकत घेतलेलं सिगारेटचं पाकिट आणि काडीपेटी एखाद्या मौल्यवान वस्तूप्रमाणे सांभाळत श्रीमोटा औलियाकडे यायला निघाले. ते खडकापाशी पोहोचले. औलिया त्यांचीच वाट पहात होता. आणलेल्या वस्तू श्रीमोटांनी त्यास सुपूर्द केल्या. सिगारेटबरोबर काडीपेटी आणल्याचे पाहून औलियाला त्याच्या हुषारीचं कौतुक वाटलं.

पाकिट उघडून एक सिगारेट काढून ती त्याने पेटविली आणि आपल्या मस्तीत झुरके घेऊ लागला. एक सिगारेट त्याने श्रीमोटांना पण दिली आणि म्हणाला, “ओढ तूपण.”

ते म्हणाले, “माफ करा, मला ओढता येत नाही.”

औलिया हसून म्हणाला, “हरकत नाही, येईल तशी ओढ.”

आता सिगारेट ओढल्याशिवाय गत्यंतरच नव्हतं. सिगारेट शिलगावून त्यांनी ती ओढायला सुरूवात केली. सवय नसल्याने जोरात ठसका लागला, खोंऽऽ खोंऽऽ करीत त्यांनी ती सिगारेट टाकून दिली.

त्यांची ती अवस्था पाहून औलिया हसू लागला. त्याचं सिगारेट पिणं संपलं आणि मग त्याने श्रीमोटांना जवळ बोलावून सुखासनात बसून ध्यान करायला सांगितलं.

ते त्याप्रमाणे बसले आणि ध्यान करू लागले. थोड्या वेळाने औलियाने विचारलं, “ध्यानात काय दिसतंय ?”

"काही नाही."

"ठीक आहे, आता मी तुझ्यासमोर बसून ध्यान करतो. काय दिसतं ते पहा", एवढं बोलून आता औलियाने ध्यान लावलं.

त्यांनी पाहिलं – त्याच्या शरीरामधून तेजोकिरणांचा प्रवाह सतत बाहेर पडत होता आणि चक्राकार गतीने परत शरीरातच विलीन होत होता. या तेजोकिरणांचा प्रकाश आल्हाददायक होता परंतु उष्ण नव्हता.

थोड्या वेळाने तो जागृत अवस्थेत आला आणि त्यांना म्हणाला, "आता तुझ्या शरीरातपण असंच होण्यासाठी क्रिया करतो", असं म्हणून त्याने श्रीमोटांना सुखासनात बसविलं आणि त्यांच्याजवळ जाऊन हृदयस्थानी बोटाने आघात केला. ते बोट तसेच शरीरास स्पर्श करीत ठेवून रेघ ओढल्याप्रमाणे वरवर नेत नासिकेवरून पुढे भृमध्याच्या स्थानापर्यंत नेलं. त्या आज्ञाचक्राच्या स्थानीदेखील बोटाने परत आघात केला आणि तिथून वर जातजात शेवटी ब्रह्मरंध्राच्या ठिकाणी आघात केला.

ही क्रिया पूर्ण होताच श्रीमोटांच्या शरीरात जणू विजेचा संचार झाला आणि तेजोकिरणांची प्रकाशवलये चक्राकार गतीने त्या औलियाप्रमाणे शरीरातून बाहेर येऊन परत शरीरात जाऊ लागली. अत्यंत रोमांचक आणि दिव्य असा तो अनुभव बराच वेळ टिकला. नंतर त्याने श्रीमोटांना परत स्पर्श केल्यावर हे सारं थांबलं.

ही क्रिया कशासाठी करण्यात आली याची जाणीव त्यांना नव्हती. औलियाने त्याचं स्पष्टीकरण लगेच दिलं. तो म्हणाला, "तुझ्या शरीराच्या रोमारोमातून ही तेजोकिरणे फिरल्याने तुझी शरीरशुद्धी झाली आहे."

नंतर तो त्यांना म्हणाला, "आता परत एकदा ध्यानास बैस आणि तू स्वतःच ही क्रिया करून अनुभव घे."

ते परत ध्यानास बसले आणि त्या औलियाने केली होती त्याप्रमाणेच ती क्रिया त्यांनी स्वतः केली. परत तोच अनुभव आला. तीच आल्हाददायक कोमल किरणे वाहू लागली. ही स्थितीपण बराच वेळ टिकून राहिली. औलियाचा आदेश मिळताच ते पूर्वस्थितीत आले.

त्यांनी जिज्ञासेने औलियाला विचारलं, "परत ही क्रिया करण्याचं कारण काय ?"

तो म्हणाला, "पहिल्यावेळी क्रिया केल्यामुळे तुझी 'शरीरशुद्धी' झाली. या वेळच्या क्रियेने तुझी 'इंद्रियशुद्धी' झाली आहे. आता तुला कोणत्याही शुद्धीची गरज नाही. यानंतर शेवटची क्रिया जी करायची आहे, ती तू रामनवमीच्या दिवशी जिथे असशील तिथे कर." असं सांगून श्रीमोटांना त्याने त्याविषयी काही विशेष सूचना दिल्या.

नंतर तो म्हणाला, "आता तू जा."

श्रीमोटांनी त्याला भावपूर्वक प्रणाम केला, आणि पहाटेपहाटे घरी येऊन पोहोचले.

त्याकाळी 'कराची डेली' नावाचं दैनिक प्रकाशित होत असे. त्याचे संपादक श्री. शर्मा यांच्याकडे दुसऱ्या दिवशी श्रीमोटा गेले होते. त्यांच्या अंगठीकडे लक्ष जाताच श्रीमोटा चमकले. त्यांनी विचारलं, "शर्मासाहेब, अंगठीवरील ही छबी कोणाची ?"

"साईबाबांची !" बाबांच्या स्वरूपाकडे प्रेमाने पहात त्यांनी उत्तर दिलं.

श्रीमोटा आश्चर्याने उद्गारले, "असं ! मी काल रात्री यांचं दर्शन केलं ! श्रीमोटांनी त्यांना सर्वकाही सविस्तर सांगितलं.

शर्माजींनी शंका काढली, "पण हे कसं घडू शकेल ? साईबाबांनी १९१८ त देह ठेवला. आणि त्याला वीस वर्षे होऊन गेलीयेत. ते कोठून असणार ?" त्यांचा विश्वास बसत नव्हता.

त्यांनी श्रीमोटांना विचारलं, "तुम्हाला त्यांची मोठी छबी पहायची आहे ?" त्यांनी गळ्यातलं लॉकेट काढून आत जडविलेली साईबाबांची मोठी छबी दाखविली.

ती पाहिल्यानंतर आता तर श्रीमोटांची पूर्ण खात्री झाली. ते उत्तरले, "अगदी यांचंच मला प्रत्यक्ष दर्शन झालं."

श्रीमोटा नंतर घरी परतले.

तो औलिया म्हणजे शिर्डीचे साईबाबाच होते यात शंकाच नव्हती. त्या दिवशीच्या घटनेद्वारे साईबाबांनी श्रीमोटांच्या साधनेत प्रवेश केला.

❖

## ७०. "परधर्मो भयावहः ।"

बनारसमध्ये परसदभाईंच्या दोन मुलींना सोबत म्हणून 'हिंदु विश्व विद्यालया'च्या निवासस्थानांमध्ये श्रीमोटा रहात होते.

कराचीला औलियाची मध्यरात्री भेट झाल्यानंतर श्रीमोटांच्या शुद्धीकरणाच्या दोन क्रिया त्याने तिथे आपल्यासमोर करवून घेतल्या होत्या. आणि तिसरी क्रिया रामनवमीच्या दिवशी असशील तिथे करण्याची त्याची आज्ञा होती.

आज रामनवमी होती म्हणून त्या दोघीजणी खूप अस्वस्थ होत्या. तिसरी क्रिया केल्यानंतर काही दुखूखुपू नये, त्रास

होऊ नये अशी त्यांची पितृसदृश श्रीमोटांविषयी भावना होती. मध्यरात्रीपर्यंत काहीच घडलं नाही आणि मग त्या निश्चिंतपणे झोपी गेल्या.

रात्री साधारण १२-५०ची वेळ असावी. अचानक बंगल्यासमोर जोरात "हरिः ॐ"ची आरोळी ऐकू आली. श्रीमोटा जागेच होते. आपल्याला उद्देशूनच हे बोलावणं आहे हे त्यांच्या ध्यानी यायला वेळ लागला नाही. त्यांनीही मोठ्याने "हरिः ॐ"ची आरोळी ठोकून प्रत्युत्तर दिलं आणि ती व्यक्ती कोण आहे ते पाहिलं. खाली एक नग्न साधु उभा होता. त्याच्या डोक्यावर खूप वाढलेले आणि गाठीगाठी झालेले केस होते. कुरंगी, चित्राला आपली काळजी वाटू नये म्हणून त्यांच्यासाठी चिठ्ठी लिहून ठेवून श्रीमोटा त्या साधूला भेटायला खाली गेले.

त्यांना पाहून साधु म्हणाला, "माझ्या गुरूंनी मला पाठविल्यामुळे मी येथे तुम्हाला बोलाविण्यासाठी आलो आहे. आमच्या सद्गुरूंचं स्थान मणिकर्णिका घाटाच्या पुढे गंगामातेच्या पलीकडच्या किनाऱ्यावर आहे. त्यांनी तुम्हाला बोलावणं धाडलं आहे. तुम्हाला तिथेच रहावं लागेल. तुम्ही ताबडतोब माझ्याबरोबर चला."

श्रीमोटा म्हणाले, "घरातील दोन्ही मुलींची काळजी घेणं हे माझं प्राप्त परिस्थितीतील कर्म आणि कर्तव्य आहे. त्यांना घरी एकटं सोडून मी तिथे रहायला येऊ शकणार नाही, तसं करणं हा 'परधर्म'च आहे, मग तिथे येण्याने भले माझा वाटेल तेवढा लाभ होणार असो !... 'परधर्मो भयावहः !'

"मी वाटल्यास रोज रात्री तिकडे येत जाईन आणि

सकाळी घरी परत येईन. असं जर चालत असेल तर माझी काही हरकत नाही."

साधु दृढतेने म्हणाला, "नाही, तसं चालणार नाही, तुम्हाला तिथेच रहावं लागेल. आणि अजून एक लक्षात ठेवा. कराचीच्या बाबाने सांगितलेलं ध्यान तुम्ही करू नका. कराल तर मोठ्या कठीण परिस्थितीत सापडाल. ते ध्यान सुरू करतेवेळी तुमची अत्यंत कोमलतेने, प्रेमभक्तीपूर्वक काळजी घेणारी माता-भगिनी असेल तरच तुम्ही ते ध्यान करू शकाल -- अन्यथा तुम्ही आमच्या गुरूंकडे चला. तुमची योग्य ती काळजी आम्ही घेऊ."

श्रीमोटा कबूल झाले नाहीत.

ते म्हणाले, "या दोन मुलींची काळजी घेण्याची, देखरेख करण्याची माझ्यावर जबाबदारी आहे म्हणून मी एकदोन महिन्यानंतर येईन."

साधु उत्तरला, "यायचं तर आत्ताच चला."

श्रीमोटांनी नकार दिला आणि ते वर निघून आले. साधुही निघून गेला. कराचीला बाबांनी अत्यंत गुप्तपणे दिलेल्या विद्येविषयी आणि त्या प्रयोग करण्याविषयी यांना इथे काशीत कसं कळलं हा विचार श्रीमोटांच्या मनास शिवला नाही, आणि 'ध्यानाच्या प्रयोगामुळे कोणती कठीण परिस्थिती ओढवेल ?' असं भयही वाटलं नाही. अभयप्राप्ती ज्याने केली आहे त्याला कसलं भय ?

❖

## ७१. अद्वैताचा साक्षात्कार

गंगातीरावरील त्या साधूच्या गुरुमहाराजांकडे जाण्यास स्पष्टपणे 'नकार देऊन श्रीमोटा शांतपणे वर आले आणि कराचीच्या औलियाने सांगितलेला प्रयोग करण्यासाठी ध्यानास बसले.

प्रयोगास सुरुवात झाली असेल नसेल तोच समग्र चेतना एकाग्र होत असल्याचा त्यांना अनुभव आला. शरीर, मन आणि इतर सर्व '-करणे' वेगवेगळी आहेत असा स्पष्ट अनुभव येत गेला. थोड्या वेळानंतर मस्तकाच्या मधल्या भागत प्रचंड उष्ण झरा वहात असावा असं जाणवलं आणि साऱ्या शरीराची आगआग झाली. ते जवळजवळ बेशुद्धच झाले. जीभदेखील जवळजवळ जळाल्यासारखीच झाली होती. पोटापासून थेट खालपर्यंतचा भाग जळून गेल्यासारखा झाला होता. संपूर्ण शरीर विस्तवाप्रमाणे तप्त झालं होतं.

घरात निवान्तपणे झोपलेल्या परसदभाईच्या दोन्ही मुलींना यातलं काहीच माहित नव्हतं. एकीला शौचाला जाण्याची इच्छा झाल्यामुळे ती उठली आणि त्यावेळी तिनें त्यांना असं बेभान झालेलं पाहिलं. ईश्वरकृपेनेच तिला नेमकी त्याचवेळी उठण्याची बुद्धी झाली. नंतर दोघींनी आपल्या त्या पितृसदृश, तरीही बालकाप्रमाणे निरागस असलेल्या श्रीमोटांची मुलीच्या आणि आईच्या प्रेमाने आणि मायेने काळजी घेतली.

'हे काय घडलं आणि याचा अर्थ काय, महत्त्व काय' हे त्यावेळी श्रीमोटांना पूर्णतः कळलंच नाही. परंतु काही शंका-कुशंका वा प्रश्नदेखील निर्माण झाले नाहीत.

ध्यानानंतर त्यांच्यात एक विशिष्ट भाव अखंडतेने प्रगट झाला. गंगौघाप्रमाणे हा भाव एकधारी टिकून राहिला. फक्त एकच एक 'लक्ष्य'[१] होतं आणि 'त्याचं'[२]च ध्यान होतं. समुद्राच्या लाटांप्रमाणे भावना आणि आनंदाचा भाव रोमारोमातून अखंड प्रगट होत होता.

रामनवमीच्या दिनी झालेल्या या अद्वैताच्या साक्षात्काराच्या वेळी जणू अनंत कोटी सूर्यांचा प्रकाश आजूबाजूस पसरून शरीरात प्रवेशला आणि श्रीमोटा 'महासमाधी'त गेले.

या महासमाधीतून जागृत झाल्यावर शरीराचा गुप्त भाग आणि आजूबाजूचा भाग जळून गेला होता. त्यासाठी त्यांनी बरेच दिवस बनारस हिंदु युनिव्हर्सिटीच्या आयुर्वेद कॉलेजचे डीन डॉ. बाळकृष्ण अमरजी पाठकसाहेब यांच्याकडून औषधपाणी घेतलं.

त्यांना औषधे द्यावीत असा आदेश एका स्वप्नानुभूतीद्वारा श्रीमोटांच्या गुरुमहाराजांनी अमरजी पाठकसाहेबांना दिला होता.

त्या वेळेपासूनच श्रीमोटांच्या मुक्तदशेची सुरूवात झाली. "मी सर्वत्र विद्यमान आहे"[३] अशा चैतन्यात्मक भावनेचा तेव्हा विलास होत होता आणि होत राहिला.[४]

यापूर्वी जो अनुभव आला होता तो सगुणाचा होता. त्यानंतर जणूकाही त्यांनी एकदम हनुमान उडीच मारावी अशाप्रकारे निर्गुणाचा तो अनुभव त्यांच्या स्वतःच्या 'आधारात'[५]

१. ईश्वर हेच लक्ष्य होतं.
२. त्या ईश्वराचंच
३. "I am omnipresent"
४. 'अहं ब्रह्माऽस्मि'चा अनुभव स्थिर झाला.
५. पाया, Base

संपूर्णतः प्रतिष्ठित[१] झाला. त्यानंतर त्यात 'जिवंत केंद्रितता' प्रगट झाली. तद्नंतर त्या भावाचा विस्तार होत असल्याचा अनुभव प्रगट झाला, तरीही तो भावरूपाने होता असंपण म्हणता येणार नाही.

एकरूप असल्याचा अनुभव येत होता. आणि त्याशिवाय 'सर्वांमध्ये असूनही सर्वांपासून अलिप्त' असादेखील अनुभव सतत येत होता.

चैतन्याचा तादात्म्याचा गुणधर्म त्यानंतर त्यांच्या जीवनात सुरू झाला असं म्हणता येईल.[२]

❖

## ७२. दागिन्यांची चोरी

श्री क्षेत्र बनारस ! भगवान श्री शंकरांचं साक्षात् वास्तव्य असलेलं पुण्यक्षेत्र ! श्रीमोटा कुरंगी आणि चित्राला घेऊन तिथल्या काशी विश्वनाथाच्या मंदिरात शंकर भगवानांच्या दर्शनास निघाले. गर्दी नेहमीप्रमाणेच होती, किंबहुना आज जरा अधिकच होती. तरीही धक्काबुक्कीतून पार होतहोत गर्भद्वारापर्यंत जाऊन त्यांनी दर्शन घेतलं आणि तृप्त मनाने घरी आले.

दुसऱ्या दिवशी नौकाविहारासाठी गंगामाईच्या पात्रात जायचं निश्चित झालं आणि सर्वजण झोपी गेले. उजाडल्यानंतर रोजच्याप्रमाणे कामाचं चक्र सुरू झालं. आज नौकाविहारास जाण्याच्या उत्सुकतेने कामं भराभर होत होती. शेवटी जाण्याची वेळ झाली. कुरंगी, चित्रा दोघीजणी तयार झाल्या आणि त्यांनी श्रीमोटांनाही लवकर तयार व्हायची सूचना केली. मग

१. स्थापित व स्थिर

२. निर्गुणाचा अनुभव प्राप्त झाला, स्थिर राहिला व प्रगट होत राहिला.

श्रीमोटांनीसुद्धा आपले कपडे बदलले आणि जुन्या झब्ब्याच्या खिशातून आपल्या वस्तू काढण्यासाठी आत हात टाकला आणि त्यांना धक्काच बसला ! कोणीतरी खिसा कापला होता. ते एकदम सुन्न झाले. खिशातल्या वस्तू तर गेल्याच होत्या, त्याशिवाय त्या दोघींजणींनी आदल्या दिवशी सांभाळण्यासाठी दिलेले दागिनेदेखील ! हे दागिने खिशातून काढून ठेवायला श्रीमोटा विसरले होते. काशी विश्वनाथाच्या मंदिरातच हे घडलं होतं. दागिने लगेच योग्य त्या ठिकाणी न ठेवण्यात आपला हलगर्जीपणाच झाला असं त्यांना वाटलं. "ज्या मुलींचे आपण वाली आहोत त्यांनी विश्वासाने आपल्याकडे ठेवायला दिलेले दागिने आपण निष्काळजीपणे ठेवल्यामुळे चोरीला गेले," या विचाराने त्यांना हजारो विंचवांच्या नांग्यांचा डंख झाल्यासारख्या वेदना झाल्या.

घडलेली घटना त्यांनी त्या दोघींना सांगितली. त्यांनी त्याकडे दुर्लक्षच केलं. "बापू ! दागिने गेले तर गेले, त्यात एवढं मनाला लावून घ्यायचं कारण काय ? नाहीतरी आम्ही ते दागिने जास्त वापरतच नव्हतो ! तुम्ही उगाच दुःखी होऊ नका. चला, आपल्याला नौकाविहाराला जायचंच ना ? उशीर होतोय ! चला बापू, विसरा ती घटना. होणारं काही चुकत नसतं..." त्यांनी सांत्वना देऊन त्यांचं मन शांत करण्याचा प्रयत्न केला.

सर्वजण मग गंगाकिनारी गेले. त्या दोघींची मैत्रीणदेखील खास नौकाविहारासाठी आली होती. गंगामाईच्या अथांग पात्रात नौका शिरली. चित्रा आणि कुरंगीची मुक्त बडबड सुरू होती. त्यांच्या मैत्रिणीने अचानक विचारलं, "बापू, मी भजन म्हणू ?"

आपण भजन म्हटलं तर कदाचित त्यांच्या दुखऱ्या मनाला शांती मिळेल असं तिच्या भाबड्या मनाला वाटलं. "हो, म्हण की, त्यात काय विचारायचं ?" — विचारात गढलेल्या श्रीमोटांनी काहीसं उदासपणे उत्तर दिलं. ती गाऊ लागली. सुरावटींच्या लहरी गंगानदीच्या पात्रावर पसरू लागल्या. आकाशात चांदण्या चमचमत होत्या, थंडगार बोचरे वारे अंगाला झोंबत होते आणि सर्वत्र गांभीर्य भरून होतं.

भजनांच्या त्या भावपूर्ण स्वरांनी श्रीमोटांना भारून टाकलं आणि त्यांना भावावेश प्राप्त होऊ लागला. हळूहळू ते भावसमाधीत स्थिर झाले. शरीर अकंप आणि स्थिर झालं. हा प्रकार त्या दोघींना नवीन नव्हता. भावसमाधीत ते पडून जाऊ नयेत याकडे त्या डोळ्यात तेल घालून लक्ष देऊ लागल्या.

भावावस्थेत खोल जाण्यापूर्वीदेखील श्रीमोटांच्या मनात दागिन्यांचेच विचार घोळत होते. 'कोणी कापला असेल खिसा ?' हा प्रश्न काट्याप्रमाणे सलत होता आणि 'मी जबाबदारी पार पाडण्यास कमी पडलो,' याचं शल्यही उरी होतं.

या विचारांचा परिणाम म्हणूनच की काय, भावावस्थेत त्यांना एक दृश्य दिसलं. मंदिरात शिरतांना कोणी आणि कसा खिसा कापला ते हुबेहुब एखाद्या चलत्‌चित्राप्रमाणे डोळ्यांसमोर साकार झालं. एवढ्या गहन अवस्थेतदेखील त्यांच्याकडून हृदयात बोललं गेलं, "बाबा रे, हे दागिने माझे नाहीत, माझ्याकडे दुसऱ्यांचे सांभाळायला दिले होते. मी गरीब मनुष्य आहे आणि त्या दागिन्यांची भरपाई करणं माझ्याच्याने शक्य नाही. हे धन तू पचवू शकणार नाहीस. तू ते मला परत कर.

माझं राहण्याचं ठिकाण असंअसं आहे; उद्या सकाळी परीक्षेच्या वेळी अर्धापाऊण तास युनिव्हर्सिटीत मी या या ठिकाणी आणि यावेळी असेन''

हे सर्व बोलणं, सांगणं ध्यानावस्थेत घडलं. जणू प्रत्यक्ष आपल्यासमोरच हे घडत असावं इतक्या स्पष्टतेने हे त्यांना जाणवलं. भावसमाधी खूपच प्रगाढ होती. नौका किनाऱ्याला लागल्यावर त्यांना देहभानावर आणण्यासाठी चित्रा आणि कुरंगीला बरेच प्रयत्न करावे लागले. ते भानावर आल्यानंतर सर्वजण घरी परतले.

दुसऱ्या दिवशी कुरंगीची युनिव्हर्सिटीत परीक्षा होती. तिला सोबत म्हणून श्रीमोटा गेले. तिचा पेपर सुरू झाला आणि ते तिच्या एका मैत्रिणीबरोबर बाहेर व्हरांड्यात उभे राहून तिच्याशी बोलू लागले.

एवढ्यात एक मनुष्य धापा टाकतटाकत, पळतपळत युनिव्हर्सिटीत शिरला आणि ते दोघे उभे असलेल्या व्हरांड्याच्या खाली उभा राहून खुणेने श्रीमोटांना बोलावू लागला. त्यांचं तिकडे लक्ष नव्हतं. कुरंगीच्या मैत्रिणीने त्यांचं तिकडे लक्ष वेधलं.

तो मनुष्य ओरडून म्हणाला, "भाईसाहेब, कृपा करून खाली या."

श्रीमोटा त्या अनोळखी व्यक्तीस भेटायला खाली गेले.

तो त्यांना काकुळतीने म्हणाला, "दादा, हे तुमचे दागिने परत घ्या. माझ्या अंगाचा एवढा प्रचंड दाह होतोय की मी तो सहन करू शकत नाहीये ! कृपा करून तो शमेल असं काहीतरी करा."

त्याने दागिन्यांचं बोचकं त्यांच्या हाती दिलं. दागिने पाहून श्रीमोटा अवाक् झाले. त्यांचं हृदय प्रेमभक्तीने भरून आलं. जणू डोक्यावरचं मणामणाचं ओझं उतरलं होतं. ढगासारखं शरीरमन हलकंहलकं झालं होतं.

तो मनुष्य अजूनही त्यांचे पाय धरून रडतरडत गयावया करीतच होता, "भाईसाहेब, माझ्यावर दया करा, हा दाह मिटवा."

श्रीमोटांनी त्याला उठवून विचारलं, "पण तुला कळलं कसं की या दागिन्यांचा मालक मीच आहे म्हणून ?"

तो रडतरडत उत्तरला, "काल संध्याकाळपासून अचानकच माझ्या अंगाची एवढी लाहीलाही होते आहे की ती मी सहन करू शकत नाहीये. त्यावेळेपासूनच तुमची शरीराकृती, तुमचा चेहरा मला प्रत्यक्ष समोर दिसू लागला आणि तुम्ही राहता ती जागा, तुम्ही कोठे असाल ती जागा हेपण मला दिसू लागलं.

"रात्रीच्या रात्री येण्याएवढी शक्ती माझ्या अंगी नव्हती. आतापण मी कसातरी आलोय. निघालो तेव्हा तर चालू शकेन की नाही याचीच मला शंका वाटत होती, पण चालणं सुरू केल्यावर मला आपोआप इतकी गती प्राप्त झाली की पळतपळत एका दमातच इथे आलो आहे. कृपा करून माझ्या अंगाचा दाह दूर करा, मला शांत करा."

श्रीमोटांच्या अंतरातून अचानक शब्द बाहेर पडले, "बाबा रे, तू व्रत घे की, "विश्वनाथाच्या मंदिरात दर्शनाला येणाऱ्या कोणाचाच खिसा कापणार नाहीस." तू जर असं प्रामाणिकपणे वचन देशील आणि प्रामाणिकपणे पालन करशील तर प्रभुकृपेने तुझा दाह निश्चित शमेल. माझ्यासारखाच एखादा गरीब दर्शनास

आला आणि तू त्याचा खिसा कापलास तर त्या बिचाऱ्याला किती मनस्ताप आणि त्रास सहन करावा लागेल ! म्हणून कृपा करून तशी शपथ घे."

तो मनुष्य लगेच तयार झाला. आणि तसं व्रत त्याने त्यांच्यासमोरच घेतलं, ते मी पालन करीन असं वचनही दिलं. एवढंच नव्हे तर तो हेपण म्हणाला, "एकवेळ उपाशी मरेन पण परत कधी मंदिरात कोणाचाही खिसा कापणार नाही."

श्रीमोटांचा त्याच्या बोलण्यावर विश्वास बसला आणि त्याची प्रामाणिकतासुद्धा त्यांना जागवली.

त्यांच्या पाया पडून तो मनुष्य घरी निघून गेला.

दागिने प्राप्त झाल्याच्या आनंदापेक्षा आपली जबाबदारी पार पाडण्याच्या कर्तव्यपूर्तीचा आनंद अनंतपटींनी अधिक होता, अवर्णनीय होता !

## ७३. "वचनपूर्ती कशी करू ?"

परसदभाईंच्या मुली कुरंगी आणि चित्रा या दोघीजणी बनारसला चांगल्या स्थिर झाल्या होत्या. हिंदू युनिव्हर्सिटीतील त्यांचं शिक्षण जोमाने सुरू होतं. पाठीशी श्रीमोटांची भरभक्कम अशी पित्याप्रमाणे माया व आधार असल्यामुळे त्या त्यांच्यावर भार सोपवून निश्चिंतपणे कॉलेजात शिकत होत्या.

त्या दोघींचा सांभाळ आणि साधना या दोन्ही गोष्टी श्रीमोटा सहजतेने आणि प्रेमाने करीत होते. बनारसला त्यांना येऊन महिना दीडमहिना झाला होता.

एके दिवशी अचानक मूळजीभाईंचं नडियादहून पत्र आलं.

भावाने लिहिलं होतं, "भाई, नडियादला आई आजारी आहे. अत्यंत गंभीर स्थिती आहे. ती शेवटच्या घटका मोजते आहे. आणि तुझी आठवण काढून उशी ओली करते आहे. 'चुनियाला बोलावून घे', 'चुनियाला बोलावून घे', सारखा असाच घोशा चालविला आहे. तू ताबडतोब निघून ये, म्हणजे आईला बरं वाटेल."

वाचून त्यांचं मस्तक सुन्न झालं. आईला भेटायला असंच उडतउडत जावं आणि तिच्या कुशीत जाऊन निजावं, मुक्तपणे रडावं आणि तिने प्रेमाने रागावून चार शब्द आपल्याला बोलावेत असं त्यांना वाटलं. "पण...कुरंगी आणि चित्राचं काय ?"

त्या दोघींविषयी मनात विचार येताच त्यांनी कराचीला परसदभाईना ताबडतोब तार करून आईच्या गंभीर आजारपणाजी माहिती दिली आणि विचारलं, "अशा परिस्थितीत मी काय करू ?"

त्यांना आशा होती की काहीतरी मार्ग निघेल आणि आपलं नडियादला जाणं शक्य होईल, पण नियतीची इच्छा निराळीच होती. परसदभाईचं तारेनंच उत्तर आलं, "तुला त्या दोघींची काळजी घेण्यासाठी तिथेच थांबलं पाहिजे. त्यांची सोय करणं जमलं तरच जा."

हे वाचल्यानंतर त्यांचं मन खिन्न झालं. "एवढ्या तरण्याताठ्या पोरींना कोणाच्या भरवशावर सोडून जायचं आपण नडियादला ? नाही ! आपली जबाबदारी आणि कर्तव्य महत्त्वाचं ! आपण इथेच रहायला हवं." त्यांच्या मनाने त्यांना कौल दिला. पण लगेच दुसऱ्या मनाने त्यांना खडसावून प्रश्न केला, "अरे ! तू तर आईला वचन दिलं होतंस की तो

शेवटच्या घटका मोजत असतांना तू जगाच्या पाठीवर कोठेही असलास तरी निघून येशील. आणि आता जर तू गेला नाहीस तर तुझ्या वचनाची किंमत काय ? आई बिचारी तुझी वाट पहातपहात तळमळून दुःखाने प्राण सोडेल !"

ते जणू कैचीत सापडले होते. नियतीने न सुटणारं कोडं समोर उभं केलं होतं आणि तरीही ते सोडवायचं होतं.

नडियाद आणि बनारस या दोन ठिकाणी त्यांचं मन हेलकावे घेऊ लागलं. आपल्या मनाच्या द्विधा परिस्थितीचं वर्णन करणारं पत्र त्यांनी मूळजीभाईंना पाठविलं आणि कळवळ्यानं लिहिलं, "माझी अशी कोंडी झाल्यामुळे मला येणं जमेलसं वाटत नाही. आता तू आणि प्रसन्नच आईची काळजी घ्या." प्रसन्नचा — आपल्या वहिनीचा सेवाभाव ते जाणून होते. ती आईच्या सेवेत कसलीच कमतरता पडू देणार नाही याची त्यांना खात्री होती.

पत्र लिहून कळवलं खरं, पण त्यांच्या मनात विचारांचं काहूर माजलं. "आपल्याला आई आजारी पडणार आहे हे आधी माहीत असतं तर आपण बनारसला आलोच नसतो. पण मी तरी काय करू ? आयुष्यात त्या बिचारीने माझ्यांकडे एकच मागणं मागितलं आणि तेसुद्धा मला देत येत नाहीये ! तिला बिचारीला आपण काहीच देऊ शकलो नाही, पण आता निदान तिची ही शेवटची इच्छा तरी पूर्ण झालीच पाहिजे." परिस्थितीतून मार्ग काढायचाच असा त्यांनी निर्धार केला आणि घरात एका खोलीत स्वतःला कोंडून घेतलं. आता प्रार्थनेशिवाय काहीच हाती राहिलं नव्हतं. त्यांची प्रार्थनेवर, आपल्या स्वतःवर आणि सद्‌गुरूंवर अढळ श्रद्धा होती.

आर्तभावाने स्वतःच प्रार्थनारूप होऊन त्यांचे भाव शब्दरूपाने बाहेर पडू लागले, त्या भगवंताच्या हृदयाला पाझर फोडू लागले, "हे भगवान् ! हे दीनानाथ ! मी कधीच तुझ्यावर अधिकार गाजवला नाही आणि आतापर्यंत कधीच काहीसुद्धा मागितलं नाही, पण अशा त्रिशंकु अवस्थेत माझा तुझ्याशिवाय दुसरा कोणीच वाली नाहीये !

"हे प्रभु, माझं हृदय, मन तर आईकडेच आहे हे तूपण जाणून आहेस. पण माझा हा स्थूल देह मी तिथे कसा नेऊ ? माझं वचन मी कसं पाळू ? हे करूणानिधान, तूच आता माझी लाज राख आणि माझं वचन पूर्ण करण्यासाठी तूच स्थूल देहाने तिच्याजवळ उपस्थित रहा. हे करूणासिंधो, माझ्या प्रचंड आणि प्राणांतिक भावनेस तूच मूर्त स्वरूप दे. साकार हो आणि आईला धीर दे, शांत कर. माझ्या आईची शेवटची इच्छा पूर्ण कर, प्रभो !"

प्रार्थनेचा ओघ गंगाप्रवाहाप्रमाणे अखंड वहात होता. खाणं, पिणं, निद्रा हे सर्व विसरून तीन दिवस प्रार्थनेचा अभिषेक प्रभुचरणी अखंड सुरू होता. ते सारं जग विसरले होते आणि प्रार्थनेशिवाय दुसरं काहीच जाणत नव्हते.

त्यांची आर्त, प्राणांतिक प्रार्थना त्या करूणाघन प्रभूने ऐकली. अखेरचे क्षण मोजणारी त्यांची आई नडियादला आनंदाने ओरडून मूळजीभाईंना म्हणाली, "ए ! मुळिया ! मुळिया ! बघ, हा चुनीलाल आला आहे !"

मूळजीभाई आईकडे उदासपणे पहात म्हणाले, "अगं, चुनीलाल तर तिकडे काशीत आहे. इथे कसा येऊ शकेल तो ?"

आई ठामपणे परत म्हणाली, "अरे, हा काय इथे आहे ! माझ्या पायावर डोकं टेकवून बसलाय. माझ्या शरीरावरून हात फिरवतोय ! बघ ! हा इथेच आहे."

मूळजीभाईला वाटलं, "आईला शेवटच्या घटकेला भ्रम झालाय आणि त्यामुळेच ती असं असंबद्ध बडबडतेच." त्याच्या डोळ्यात अश्रू दाटून आले. गप्पगप्पसा तो आईच्या डोळ्यांमध्ये शून्यपणे पहात राहिला.

शेवटी पिकलं पान झाडावरून गळून पडलं. आईने त्या अवस्थेतच देह सोडला. इकडे बनारसला प्रार्थना करणाऱ्या श्रीमोटांच्या खोलीतला विजेचा दिवा त्याचक्षणी एकाएकी बंद झाला आणि त्यांना हृदयात जाणीव झाली, "आपली आई गेली ! प्राणपाखरू पिंजरा सोडून मुक्त झालं !! आकाशात उडून गेलं !!!" त्यांच्या डोळ्यांतील अश्रूंना आता खंड राहिला नाही.

आपल्याला प्रेमाने कुशीत घेऊन झोपणारी, प्रेमाने काहीबाही बोलणारी, आपल्यासाठी जिवापाड कष्ट घेतलेली आई गेली ! आपण आता पार पोरके झालो !

त्यांच्या आतमधला एक कप्पा जणू मरून गेला होता !

नंतर मूळजीची तारपण मिळाली आणि मागाहून त्याचं सविस्तर पत्रदेखील आलं. आई शेवटच्या क्षणी जे काही बडबडत होती ते सारं त्याने सविस्तर लिहिलं होतं.

प्रार्थनेला मूर्त रूप देऊन आईसमोर आपल्या रूपात प्रगट होऊन वचनपूर्ती करणाऱ्या प्रभूला अर्पण्यासाठी त्यांचाकडे अश्रूंशिवाय काहीच शिल्लक नव्हतं.

वचनपूर्तीच्या आनंदाच्या आणि आईच्या वियोगाच्या दुःखाच्या अश्रूंच्या सरीच्या सरी अविरत कोसळतच राहिल्या !

❖

# ७४. आईचा पुनर्जन्म

श्रीमोटांना एकदा गुरुमहाराजांनी सांगितलं, "एखाद्या 'जीवा'त एखाद्या साधुमहात्माविषयी राग *, मोह, भक्ती असल्यास त्या 'जीवा' ला, तसेच एखाद्या महात्म्यात एखाद्या 'जीवा'विषयी भाव असेल तर तशा 'जीवा'स कल्याणकारी पुनर्जन्म तात्काळ प्राप्त होतो."

त्यांचं हे वचन कसोटीच्या दगडावर घासून बघावं, आपल्या स्वतःच्याच जीवनात त्याचा अनुभव घ्यावा असा भाव श्रीमोटांच्या अंतरी निर्माण झाला. जे मनात आलं ते तात्काळ कृतीत आणण्याचा त्यांचा स्वभाव होता. केवळ कोणी सांगितलं आहे म्हणून, अथवा शास्त्रात लिहिलं आहे म्हणून त्यावर ते विश्वास ठेवू शकत नसत.

नुकतंच आईचं निधन झालं होतं, फार काळ गेला नव्हता. आपली आई कोठे असावी याचा शोध घ्यायचं त्यांनी ठरविलं. आणि ते ध्यानाला बसले. हे जाणून घेण्यासाठी त्यांना 'संयम' साधावा लागणार होता.

'संयम' या शब्दाचा जो प्रचलित अर्थ आहे, तो हा संयम नसून — ध्यानात संपूर्णतः एकाकार होऊन शरीराची जागृती जाण्याचा जो क्षण, त्याक्षणी जो संकल्प केला जातो, तो साकार होतो — यासच 'संयम' असे म्हटले जाते. एवढी 'चैतन्यपूर्ण जागृती' ठेवणं हे साधारण साधकाचे काम नव्हे. हा 'संयम' साधून श्रीमोटा स्वतःच्या आध्यात्मिक अवस्थेचीद्देखील कसोटी करू शकणार होते.

ध्यानाला बसल्यावर समाधीत प्रवेश करण्याच्या क्षणी

*राग = अनुराग, भाव, प्रेम

त्यांनी संकल्प धारण केला. "आपली आई आता कोठे असेल ?" हा संकल्प त्यांनी धारण केला होता. लगेच त्यांना काशीतील रस्ते, गल्लीबोळ, घरं हे सर्व एखाद्या चलत्-चित्रपटाप्रमाणे दिसू लागलं. शेवटी त्यांची दृष्टी एका गल्लीतील एका विशिष्ट घरावर स्थिर झाली. 'त्या घरात जन्म घेतलेला 'जीव' म्हणजे माझी आईच होय,' हे त्यांना समजून आलं. एका बालिकेच्या रूपात आईचा तिथेच जन्म झाला आहे याची त्यांच्या अंतरात्म्याला स्पष्टतेने जाणीव झाली. तद्नंतर ते देहभानावर आले.

दुसऱ्या दिवशी सकाळी आईच्या शोधासाठी ते बाहेर पडले. ते काशीत होते आणि आईनेदेखील तिथेच जन्म घेतला होता हा मोठा विलक्षण योगायोग होता.

काशीच्या रस्त्यांवरून ते आईच्या दर्शनाच्या ओढीने भराभर चालू लागले. ध्यानात दिसलेली गल्ली त्यांनी शोधून काढली आणि मग ते घरसुद्धा त्यांच्या दृष्टीस पडलं.

"इथपर्यंत आलो खरे, पण आत कसं जायचं ? कोणाला आणि कसं विचारायचं ? आपण तर त्या सर्वांसाठी एकदम नवखे आहोत, मग ते कसे घरात घेतील आपल्याला ?" त्यांच्यासमोर पेच निर्माण झाला.

अशा अडीअडचणीच्या वेळी प्रार्थना आणि सद्‌गुरुस्मरणच मार्ग दाखवितं हा त्यांचा पूर्वानुभव होता. ते त्या घराला लागून असलेल्या ओट्यावर बसले आणि भावपूर्ण भजन म्हणत सद्‌गुरूंना आळवू लागलें, प्रार्थना करू लागले. घरातील एका प्रौढ बाईला ते भजन ऐकल्यावर राहवलं नाही. एवढ्या आर्ततेने कोण गात आहे हे पाहण्याची अनिवार ओढ निर्माण

होऊन ती बाहेर आली. ओट्यावर बसून भजन गाणाऱ्या श्रीमोटांना तिने सहानुभूतीने व आपुलकीने प्रश्न केला, "भैय्या, आप इधर क्यों बैठे हो ? और यह भजन क्यों गा रहे हो ? क्या बात है ?"

आता सगळं सविस्तर परंतु वेगळ्या पद्धतीने सांगणं भाग होतं. "माई, काल रात्री मला स्वप्न पडलं की आपल्या घरी एका बालिकेने जन्म घेतला आहे. तो 'जीव' माझ्या जीवनाबरोबर जोडला गेलेला 'जीव' आहे. त्या बालिकेचं दर्शन करून मी निघून जाईन. परमेश्वराची आज्ञा झाली म्हणून मी आलो आहे," ते उत्तरले.

खरोखरच त्या घरी एका सुकोमल बालिकेचा जन्म झाला होता, त्यामुळे त्या बाईचा त्यांच्या शब्दांवर लगेच विश्वास बसला.

"भाईसाब, आपकी बात सच है । मैं दिखाती हूं वह प्यारी गुडिया आपको । अंदर आईये ।" ती म्हणाली. या अनाहूत व्यक्तीबद्दल तिच्या मनात आपुलकी आणि भाव निर्माण झाला होता.

तिने त्यांना घरात बसविलं आणि आतल्या खोलीतून त्या बालिकेस आणून त्यांच्या मांडीवर दिलं.

'ही बालिका आपली पूर्वजन्मीची आई आहे', या भावनेने श्रीमोटांचं हृदय सद्‌गदित झालं. तिच्या चरणांना स्पर्श करून भरल्या डोळ्यांनी त्यांनी तिचं रूप आपल्या अंतर्यामी साठवून ठेवलं. मग तिला त्या बाईकडे सोपवून आणि त्यांचे आभार मानून ते घरी परतले.

सद्‌गुरुंनी आपल्या वचनाची यथार्थता पटवून दिली होती. आईचं दर्शन झालं आणि चरणस्पर्श करून वंदनपण करता

आलं असा दुहेरी आनंद त्यांना प्राप्त झाला होता.

त्यांचा आईविषयी असलेला भाव आणि आईचादेखील त्यांच्याविषयी असलेल भाव खरा होता, दृढ होता. ते प्रेम अपार्थिव आणि अशरीरी होतं हे कसोटीच्या दगडावर घासलं गेलं होतं.

सोनं शंभर टक्के शुद्ध होतं !

❖

## ७५. "पेदाईश के दिन करांची जाना !"

कराचीहून काही दिवसांसाठी श्रीमोटा पू. गांधीजींच्या साबरमती आश्रमात आले होते. १९४०चं वर्ष ! म्हणताम्हणता जवळजवळ अडीच महिने उलटून गेले. परसदभाईकडील सर्वांनी त्यांना आग्रहाने कळवलं, "तुमच्या जन्मदिनी तुम्ही कराचीलाच या. आपण तो इथे साजरा करू या."

सर्वांचं प्रेम होतं, माया होती, ओढ होती, परंतु जायचं ठरविलं तरी पैशांचा खडखडाट होता ही एक अडचण होती. आणि दिवसही इतके थोडे राहिले होते की ट्रेनने जाऊन जन्मदिनापर्यंत पोहोचणं जवळजवळ अशक्य कोटीतील गोष्ट होती. तिथे जाण्याचा प्रश्न आपोआपच निकाली निघाला होता. निकालात निघाल्यासारखं वाटूनसुद्धा या गोष्टीला वेगळंच वळण मिळालं. एकदा रात्री श्रीमोटांना स्वप्न पडलं. एका औलियाने दर्शन देऊन त्यांना आज्ञा केली, "तू कराचीस ये आणि तेपण विमानानेच व तुझ्या जन्मदिनीच ये." तो औलिया कोण होता याचा मात्र त्यांना उलगडा झाला नाही.

त्यांनी स्वप्नातच त्याला विचारलं, "माझ्याकडे पैसे कोठे आहेत कराचीला येण्यासाठी ?"

त्याने उत्तर दिलं, "पैसे भेजेंगे।"

श्रीमोटा लगेच जागे झाले आणि यावर विचार करू लागले, "कोण असावा हा औलिया ?" त्याच दिवशी पोस्टमनने त्यांच्या नावाने आलेलं एक रजिस्टर्ड पाकिट त्यांच्या हवाली केलं.

आश्चर्याने आणि उत्कंठतेने त्यांनी ते उघडलं. आत साठ रूपयांच्या नोटा होत्या आणि एक कागद होता. "उर्दूतील ते लिखाण वाचणार कसं ?" –त्यांनी कुरेशी साहेबांना गाठलं आणि ती चिठ्ठी त्यांच्याकडून वाचून घेतली.

मजकूर होता, "करांची के सांई के हुकम से भेजे गये हैं। पेदाईश के दिन तुम करांची जहाज से चले जाना ऐसा हुकम है।"

श्रीमोटांनी रजिस्टर्ड पाकिट उलटंपालटं करून पाहिलं. पाठविणाऱ्याचं नाव नव्हतं, सही नव्हती. ते कोणी आणि कोठून पाठविलं याची त्यांनी पोस्टात चौकशी करविली, तेव्हा असं समजलं की ते आदल्या दिवशी अहमदाबाद येथील डिस्ट्रिक्ट कोर्टाच्या पोस्ट ऑफिसातून रवाना झालं होतं, याशिवाय काहीच माहिती उपलब्ध नव्हती. सर्व प्रकारास एक गूढतेचं वलय होतं.

पैसे मिळाल्यावर आता तिकीटाची व्यवस्था करणं आवश्यक होतं. त्याकाळी एक चार सीटचंच छोटंसं विमान कराचीस जाई पण ऐनवेळी त्याचं तिकीट मिळणं कठीण होतं.

सुरुवातीस तर तिकीट मिळणारच नाही असं वाटलं. पण दोनतीनदा तपास केल्यानंतर एकदाचं तिकीट मिळालं आणि हुकुमाप्रमाणे कराचीस विमानाने जायचा योग — पहिलाच योग जवळ येऊन ठेपला.

विमानतळावर त्यांना निरोप द्यायला आश्रमातील बरेच स्नेहीसोबती आले होते. विमानात बसले न् बसले तोच त्यांना अत्यंत अद्‌भुत आणि अवर्णनीय असं ध्यान लागलं. कराची येईपर्यंत सर्व वेळ त्या ध्यानातच पसार झाला. एक अति उच्च कक्षेचं असं ते ध्यान होतं. ध्यानावस्था एवढी प्रगाढ होती की मुक्काम आला तरी त्यांचं देहभान परत आलं नाही. या मनुष्याची अशी विचित्र स्थिती पाहून विमानातील लोकांना चिंता वाटली. हा एखादा रोगाच्या प्रकार असावा आणि हा मनुष्य बेशुद्ध झाला असावा अशीच त्यांची समजूत झाली. त्यांनी श्रीमोटांना खूप हलवलं, वारा घातला. बरेच प्रयत्न केल्यावर मोठ्या कष्टाने ते देहभानावर आले.

ते जेव्हा परसदभाईच्या घरी पोहोचले तेव्हा त्यांच्या अकल्पित आगमनामुळे घरातील सर्वजणांना कल्पनातीत आनंद झाला आणि सर्वांनीच त्यांचा जन्मदिन घरातल्या घरातच थाटमाटाने साजरा केला.

आपल्याला आदेश देणारा आणि पैशांचा प्रबंध करणारा औलिया म्हणजे शिर्डीचे साईबाबाच होते हे त्यांना नंतर कळून आलं.

❖

## ७६. शिर्डीत

एकदा परसदभाईनी श्रीमोटांना आग्रह केला, "चुनीलाल, तू मला शिर्डीत बाबांजवळ मौन दे. तुला माझ्याबरोबर तिकडे यायलाच हवं."

त्यांनी हे विचारलं आणि लगेच श्रीमोटांना साईबाबांचे बोल आठवले. बाबांनी त्यांना एकदा कराचीत सांगितलं होतं,

"तू माझ्या स्थानी ये," आपल्याला शिर्डीत नेण्यासाठीच बाबांची ही योजना आहे आणि परसदभाईंना मौन घेण्याची प्रेरणा देणारी शक्तीदेखील त्यांचीच आहे हे त्यांना अंतरी जाणवलं. परसदभाईबरोबर शिर्डीस जायला ते तयार झाले.

शिर्डीला पोहोचल्यावर त्यांना राहण्यासाठी समाधी-मंदिरासमोर पहिल्या मजल्यावर खोली मिळाली. त्याकाळी शिर्डीला एवढी गर्दी नसे. त्यामुळे खोली मिळण्यास अडचण आली नाही.

श्रीमोटांनी परसदभाईंना तिथे अठ्ठावीस दिवसांचं मौन दिलं.

एकदा ते दोघेजण बाबांच्या समाधीमंदिरात बसले होते. थोड्यावेळाने आरती सुरू झाली. आरती सुरू होताच श्रीमोटांना समाधी लागली आणि ते तसेच बसून राहिले. त्यावेळी त्यांना त्या अवस्थेत साईबाबांचं दर्शन झालं. बाबांनी त्यांना हात वर करून आशीर्वाद दिला. नंतर बाबा उठून चालतचालत त्यांच्याजवळ आले आणि खाडकन् एक थोबाडीत ठेवून दिली आणि उद्गारले, "काय रे, आरतीच्या वेळी सर्वजण उभे राहिले आहेत आणि तू का बसून राहिला आहेस ? उभा रहा !"

त्यांनी लगेच माफी मागितली आणि ते उभे राहिले.

आपल्या अठ्ठावीस दिवसांच्या तिथल्या मुक्कामात श्रीमोटा शिर्डी गावात व इतरत्र फिरत रहात. तेव्हा समाधीमंदिराच्या मागे अब्दुलबाबा नावाचे साईबाबांचे एक भक्त रहात असत, ते मोठे अधिकारी संत होते. श्रीमोटा जेव्हा त्यांच्याकडे गेले, तेव्हा त्यांच्याकडे बोट दाखवून अब्दुलबाबा सर्वांना सांगू

लागले, “हा आमचा ‘नातीला’ आहे.” त्यांचं आणि श्रीमोटांचं नातं जोडणारा दुवा होते साईबाबाच ! म्हणूनच ते ‘नातलग’ होते, कुटुंबातले होते. प्रेमपाशाने जोडले गेलेले ते अशरीरी दिव्यात्मे होते.

साईबाबांनी श्रीमोटांना एकदा प्रत्यक्ष सदेह भेट देऊन एक रुपया दिला होता. तो त्यांनी आपल्या आईला प्रेमाने दिला व तो पूजेत ठेव असं बजावून सांगितलं. दुर्दैवाने तिच्याकडून तो नंतर हरवला गेला.

❖

## ७७. मूक सत्याग्रह

१९४२ची स्वातंत्र्यलढ्याची चळवळ सुरू झाली आणि ब्रिटीश सरकारने प्रचंड प्रमाणावर धरपकड सुरू केली. ‘हरिजन सेवा संघा’चे देखील बहुसंख्य कार्यकर्ते गजाआड होते. याचा परिणाम असा झाला की फंडाअभावी हरिजन बालकांचे गुजराथ व मुंबईमधील आश्रम बंद पडण्याची वेळ आली.

श्रीमोटांना अशावेळी अंतरी हृदयात सद्‌गुरूंची आज्ञा झाली. — “जरी तू सेवाभारातून मुक्त झाला असलास तरी आता गुजराथ व मुंबईमधील शाखांची तंगी दूर करणे हा तुझा धर्म आहे.”

आज्ञा मिळताच ट्रिचीहून ते मुंबईला आले. त्यांचा मुक्काम हेमंतभाई या हृदयसंबंध असलेल्या आपल्या साधकसहकारी मित्राच्या बहिणीच्या घरी होता.

रोज सकाळी लवकर जेवण करून निघण्याचा त्यांचा परिपाठ होता. दिवसभर सर्वत्र फिरून, निधी गोळा करून मग

ते संध्याकाळी परत घरी जात. एके दिवशी एका मंडळाच्या सभेत जाणं झालं. सभा झाल्यावर आपला उद्देश त्यांनी सर्वांच्या कानी घातला. मंडळाचे प्रमुख असलेल्या शेठजींनी सांगितलं, "कोण किती मदत देणार आहे त्याची यादी तुम्ही तयार करा. माझं नाव यादीत पहिलं टाका आणि समोर पाचशेएक रुपयांचा आकडा टाका. एकदोन दिवसात माझ्या पेढीवर प्रत्यक्ष येऊन पैसे घेऊन जा. शेठजींचं पाहून नंतर बऱ्याच जणांनी आपापली नावं लिहून आकडे समोर लिहिले.

सूचनेप्रमाणे श्रीमोटा एकदोन दिवसांनी शेठजींच्या पेढीवर गेले आणि सेवादानाची मागणी केली. शेठजींनी एकशेएक रुपयांचा चेक त्यांच्या हाती ठेवला.

चेक पाहून श्रीमोटा स्तंभित झाले. एक क्षणभर काय बोलावं हेच त्यांना सुचेना. "पण शेठजी, तुम्ही तर पाचशेएक रुपयांचा आकडा लिहिला होता," त्यांनी आठवण करून दिली.

हसून शेठजी म्हणाले, "भाईसाहेब, तुम्हाला यातली मेख कळली नाही. मी पाचशेएकचा आकडा लिहिल्यामुळे इतर व्यक्तीदेखील जास्त मदत देतील या भावनेनेच मी तो आकडा लिहिला. मी तर तुम्हाला एकशेएकच देणार आहे." शेठजींनी अजब स्पष्टीकरण दिलं. अनपेक्षित अशी कलाटणी देणाऱ्या शेठजींना काय सांगावं आणि कसं सांगावं हेच त्यांना कळेना.

ते अंतरी सद्‌भाव ठेवून नम्रतेने म्हणाले, "शेठजी, ते चालणार नाही. तुम्ही लिहिल्याप्रमाणे पाचशेएक रुपये घेतल्याशिवाय मी इथून हलणारच नाही."

शेठजी रागावून म्हणाले, "हे पहा, घ्यायचे असतील तर एवढेच घ्या, नाहीतर चालायला लागा."

काहीही न बोलता श्रीमोटा उठले आणि पेढीच्या बाहेरील ओट्यावर बसले. आपली पोतडी उघडून त्यांनी त्यातील कागद, पेन, पत्रे काढली आणि आपल्या वैयक्तिक लिखाणकामास सुरुवात केली.

तिथे बसून ते साधकभक्त, आप्तजन, प्रेमी व्यक्ती यांनी पाठविलेल्या पत्रांना उत्तरे लिहू लागले.

संध्याकाळ झाली. पेढी बंद झाली आणि शेठजी घरी निघून गेले. श्रीमोटादेखील घरी परतले.

दुसऱ्या दिवशी सकाळी ते परत पेढीवर आले, शेठजींना प्रणाम केला आणि पेढीबाहेर ओट्यावर बसून परत लिखाणास सुरुवात झाली. संध्याकाळी परत पेढी बंद करून शेठजी घरी गेले. आणि तेही घरी परतले.

लागोपाठ सात दिवस चक्र असंच सुरू राहिलं. आतापावेतो शेठजींचा राग शमला होता आणि त्याची जागा कुतुहलाने घेतली होती. "सारखेसारखे काय लिहितात हे ? सात दिवस सुरू आहे हे सारं. खूप चिवट दिसते आहे ही व्यक्ती," त्यांच्या मनात विचार आला.

त्यांनी श्रीमोटांना आत बोलावून ते लिखाण त्यांच्याकडून वाचायला मागून घेतलं. त्यांनी ते आनंदाने दिलं. शेठजी पत्रं वाचू लागले आणि त्यात आनंद प्राप्त होऊन बराच वेळ वाचत राहिले.

शेवटी ते म्हणाले, "वा ! तुम्ही तर कोणी ज्ञानी दिसताहात ! तुम्ही तुमच्या मित्रांना साधनेच्या बाबतीत ज्याप्रकारे लिहित

आहात ते खरोखरच उत्तम आहे. इतकी उत्तम भावना एवढ्या साध्यासरळ भाषेत लिहिणं ही फार मोठी गोष्ट आहे. तुम्ही सात दिवस धीर ठेवून बसत होते, लिहीत होते, मला प्रणाम करीत होते. मी मात्र तुम्हाला कटू वचनं बोललो. तुमचा हा गोड सत्याग्रह आयुष्यभर माझ्या लक्षात राहील. तुमच्या लिखाणाने माझ्यात सद्‌भाव निर्माण झाला आहे.

"तुम्हाला सात दिवस रखडविल्याबद्दल मला माफ करा. तुमचे सात दिवस मी वाया घालविले त्याचा मला खेद होत आहे. हे पाचशेएक रुपये घ्या," त्यांनी आनंदाने पैसे दिले.

श्रीमोटांनापण खूप आनंद झाला. प्रार्थनाभावाने त्यांचं हृदय द्रवित झालं आणि डोळे अश्रूंनी भरून आले. 'त्याच्या' कृपेमुळेच हृदयपरिवर्तन होऊन शेठजींनी पैसे दिले होते.

सत्याग्रहाचा शेवट गोड झाला होता.

❖

## ७८. समदृष्टी

आपलं जेवणखाण आटोपून आजही श्रीमोटा फंडासाठी निधी गोळा करायला निघाले होते. ते प्लॅटफॉर्मवर पोहोचले आणि पाहिलं तर लोकलगाडी सुटण्याच्या बेतात होती. समोर दिसला त्या डब्यात ते झटकन शिरले.

डबा फर्स्ट क्लासचा होता आणि आत बव्हंशी स्त्रियाच होत्या. गाडीने आता चांगलाच वेग घेतला होता. कोपऱ्यात एक जागा पाहून जरा संकोचूनच श्रीमोटा बसले आणि पत्रलिखाणाच्या आपल्या कामांत गर्क झाले. मान वर न करता त्यांचं लिखाण झरझर सुरू होतं.

हे सर्व पाहणाऱ्या डब्यातील त्या भगिनींना राहवलं नाही. एकीने विचारलं, "माफ करा भाईसाहेब, पण तुम्ही हे सारखंसारखं काय लिहित आहात ?"

ते म्हणाले, "बहेनजी, मी येथे 'हरिजन सेवा संघा'साठी निधी जमविण्यासाठी आलो आहे, आणि प्रवासात वेळेचा सदुपयोग व्हावा म्हणून स्नेही, मित्र, आप्तजनांना पत्रे लिहित असतो. माझ्या परीने त्यांच्या जीवनात निर्माण होणाऱ्या प्रश्नांचं शंकासमाधान करण्याचा प्रयत्न करीत असतो."

बोलण्याबोलण्यातून हळूहळू सत्संगही सुरू झाला व श्रीमोटा एक कर्मयोगी संत असल्याचं त्यांच्या ध्यानी आलं आणि त्या साऱ्याजणींमध्ये त्यांच्याविषयी आदरभाव निर्माण झाला. आपणही काही सत्कृत्य करावं या भावनेने एकीने विचारलं, "आपल्या फंडास आम्ही पैसे दिले तर तुम्ही ते घ्याल ?"

"का नाही ? अवश्य घेईन."

थोडंसं संकोचून आणि धीर करून ती म्हणाली, "पण... आम्ही गणिका आहोत !"

श्रीमोटा हसून म्हणाले, "दया, करुणा दर्शविण्याचा अधिकार कोणा एका विशिष्ट जाती-जमातीलाच दिला गेला आहे का ? प्रत्येकजण त्याचा अधिकारी आहे. मी तुमचे पैसे घेईन."

"आमच्या घरी येऊन पैसे घ्याल ? आमच्याकडे सध्या जास्त पैसे नाहीयेत !" तिने काहीसं भीतभीतच विचारलं. 'आपल्यासारख्या चिखलात बटबटलेल्यांच्या घरी यायला ते तयार होतील का ?' ही तिची शंका रास्तच होती.

पण निर्लेप अशा श्रीमोटांना दिसत होतं त्यांचं प्रेम आणि भाव !

"जरूर येईन, तुम्ही मला तुमचा पत्ता आणि वेळ देऊन ठेवा," ते उत्तरले.

हे ऐकून त्या साऱ्याजणींना फार आनंद झाला. पत्ता आणि वेळ देऊन, आपलं स्टेशन येताच त्या डब्यातून उतरून निघून गेल्या.

ठरल्या दिवशी आणि ठरल्यावेळी श्रीमोटा त्यांच्या घरी गेले. त्या साऱ्याजणी त्यांना पाहून आनंदल्या. "आमचा व्यवसाय, सामाजिक स्थान यांचा विचार न करता, आमची घृणा न करता, हा संतपुरुष, हा कर्मयोगी इथे आला," या विचाराने त्यांची हृदये भरून आली.

त्यांनी बरीच मोठी रक्कम उदार अंत:करणाने श्रीमोटांना सुपूर्द केली. नंतर एकीने विचारलं, "भाईसाहेब, तुम्ही आमच्या हातचा चहा प्याल ?"

"एका अटीवर पिईन. तुम्ही सर्व भांडी व्यवस्थित घासून, स्वच्छ करून मग बनविणार असाल तर !" श्रीमोटांनी प्रेमाने पण स्पष्टतेने सांगितलं.

सांगितलेल्या पद्धतीने चहा बनवून त्यांनी श्रीमोटांना प्यायला दिला. त्या कपभर चहाला त्या भगिनींच्या हृदयात असलेल्या विशुद्ध प्रेमाच्या स्पर्शाने एक वेगळंच माधुर्य आणि अवीट गोडी प्राप्त झाली होती.

दूध पिणाऱ्या आपल्या बाळाकडे मायेने ओथंबलेल्या नजरेने पाहणाऱ्या आईप्रमाणे त्या साऱ्याजणी त्यांच्याकडे, ते चहा पीत असतांना, बघत होत्या.

चहा पिऊन झाल्यावर त्यांनी सर्व भगिनींचा निरोप घेतला.

ते जिना उतरून जाईपर्यंत त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे

त्या साऱ्याजणी भरल्या डोळ्यांनी आणि डोळे भरून पहात होत्या.

❖

## ७९. "...अब भी तेरा अहम् नहीं गया ?"

आपण रोजे करावेत असा भाव श्रीमोटांच्या हृदयात निर्माण झाला आणि त्यांनी तसं अमलात आणायचं ठरविलं. कराचीत रहात असतांना चाळीस दिवसांचा उपवास करायचा त्यांनी दृढ संकल्प केला.

कडव्या मुसलमानांप्रमाणे उपवास न करता ते स्वतःस आतून प्राप्त झालेल्या संकेतानुसार उपवास करीत आणि दिवसातून दोन वेळा चहा तेवढा घेत, याव्यतिरिक्त पाण्याचा थेंबदेखील घेत नसत.

अडतीस दिवस अशाप्रकारे निघून गेले.

पुढच्या दिवशी अचानक श्रीमोटांची एका गोदडिया महाराजांशी भेट झाली.

त्यांनी श्रीमोटांना विचारलं, "कशाकरिता एवढे उपवास करतो आहेस ? पुरे झालं, आता खाऊन घे."

श्रीमोटांनी ते ऐकून घेतलं व म्हणाले, "ठीक आहे."

जसे भेटले तसे अचानक ते गोदडिया महाराज निघून गेले.

श्रीमोटा 'हो' म्हणाले खरे, पण त्यांच्या डोक्यात विचारचक्र सुरू झालं, "आपण तर संकल्प चाळीस दिवसांचा केला होता. अडतीस दिवस पूर्ण झाले आहेत आणि राहिलेल्या फक्त दोनच दिवसांसाठी संकल्प तोडायचा ? आपण आत्मसंयमाची परीक्षा पाहण्यासाठी हे उपवास करीत आहोत.

आणि हे करीत असतांना आपलं मनही शांत रहातंय, आत्मिक समाधान प्राप्त होतंय. एक प्रकारचा हलकेपणा जाणवतोय, आणि साधनेत स्फूर्ती आणि एकाग्रता पण प्राप्त होतेय. असं असतांना फक्त दोन दिवसांकरिता उपवास तोडायचा ?..." विचार केल्यानंतर त्यांच्या मनबुद्धीने त्यांना कौल दिला, "नाही, तू रोजे सुरू ठेव."

रोज्याचे चाळीस दिवस पूर्ण करण्याचा निर्णय घेतल्यावर त्यांचा सूक्ष्म अहंकार सुखावला.

त्यानंतर श्रीमोटा मोटारीत बसून एका वडिलधाऱ्या व्यक्तीबरोबर काही कामानिमित्त बाहेर निघाले.

गाडी वेगाने जात होती. अचानक श्रीमोटांना दिसलं की रस्त्याच्या कडेला एका ओट्यावर बसलेला एक मळकट कपडे घातलेला, वेंडसर वाटणारा मनुष्य त्यांच्या गाडीकडे पाहून हाताने गाडी थांबविण्याचा आणि बोलाविण्याचा श्रीमोटांना इशारा करीत होता.

त्यांनी गाडी लगेच थांबवायला सांगितली आणि गाडीतून उतरून त्या माणसाकडे जाऊ लागले. त्यांना आश्चर्य वाटत होतं की या माणसाचं आपल्याशी काय काम असावं ?

जवळ गेल्यावर तो मनुष्य त्यांच्याकडे रोखून पहात म्हणाला, "क्यों ? अब भी तेरा अहम् नहीं गया ? ले, ये मिठाई खा ले और रोजा पूरा कर."

हा एखादा फाटकातुटका माणूस नसून कोणीतरी औलिया * आहे हे कोणी सांगण्याची गरज नव्हती आता !

---

* ते औलिया म्हणजे साईबाबा होते हे श्रीमोटांनी स्वतः सांगितले आहे.

"आपलं सर्व अंतरंग जाणतोय हा औलिया. आपलं खरं तर चुकलंच ! गोदडिया महाराजांनी * सांगूनदेखील आपण हट्ट सोडला नाही, रोजा सोडला नाही. आपला सूक्ष्म सात्त्विक अहंकार तोडण्यासाठीच ईश्वराने योजना करून यांच्या रूपाने आपल्याला जागृत केलंय," श्रीमोटांना आपली चूक कळून आली आणि मग मनात काहीही विकल्प न आणता त्यांनी त्या औलियाने दिलेली मिठाई प्रेमभक्तीभावपूर्वक घेतली आणि ते खाऊ लागले.

श्रीमोटांबरोबरचे यजमान घाबरून त्यांना म्हणाले, "अरे, अरे, इतक्या दिवसांच्या उपवासानंतर एकदम मिठाई खाणं योग्य नाही. आजारी पडशील, बघ !"

श्रीमोटांनी त्यांच्या बोलण्याकडे लक्ष दिलं नाही आणि त्या औलियाने दिलेली सर्व मिठाई खाऊन संपविली आणि रोजा पूर्ण केला.

शुभ संकल्पबळाचा अहंकार आपणामध्ये असतो आणि तो तोडणं आवश्यक असतं. ईश्वर आपल्यावर कृपा करून आपल्याला तो तोडायला भाग पाडतो.

❖

## ८०. "समुद्रात चालत जा !"

श्रीमोटा जेव्हा कराचीस रहात होते तेव्हा ते बऱ्याच वेळा सकाळी फिरावयास जात. एकदा ते असेच फिरायला

* सदर घटना कराचीस घडली. स्वामी प्रकाशानंदजी (गोदडिया स्वामी) हे नडियादला असत. श्रीमोटांनी स्वतः ही माहिती ज्या पत्रात लिहिली आहे त्यात 'एक गोदडिया स्वामी' असा उल्लेख आहे. ते स्वामी प्रकाशानंदजीच का याचा स्पष्ट उल्लेख नाही.

निघाले. बऱ्याच दूरपर्यंत गेले आणि त्यावेळी त्यांना सद्गुरुंकडून * आदेश मिळाला, "समुद्रात चालत जा !" स्थूल देहाने उपस्थित होऊन हा आदेश त्यांनी दिला नव्हता, तर श्रीमोटांच्या हृदयात प्रगट होऊन हा आदेश दिला होता.

श्रीमोटांनी त्यांच्या जीवनात सतत, गुरूआज्ञेस सर्वोच्च स्थान दिलं होतं. आज्ञा कशीही असो, जीव-प्राण ओतून, मागचा पुढचा विचार न करता ती त्यांच्याच शक्तीच्या सहाय्याने पुरुषार्थ करून पार पाडलीच पाहिजे अशी त्यांची भावना होती.

'समुद्रात चालत जा' अशी आज्ञा मिळताच ते तडक सडक सोडून आत समुद्राच्या दिशेने चालू लागले. पायांना पाण्याचा स्पर्श झाला. ते आत चालतच राहिले. पाणी वरवर चढत होतं आणि शरीर आतआत बुडत चाललं होतं. घोटे, पाऊलं, गुडघा, कंबर — क्रमाक्रमाने शरीर समुद्राच्या पाण्यात बुडत होतं. चारी बाजूंनी समुद्राच्या पाण्याच्या लाटा उसळत होत्या, थपडा मारीत होत्या. त्यांचा अंगावरचे सर्व कपडे भिजून चिंब झाले.

बाह्य पातळीवर जेवढी प्रचंड अस्थिरता होती तेवढीच प्रचंड शांती अंतरी, मंदिरातल्या मूर्तीपुढे शांतपणे तेवत रहाणाऱ्या समईच्या ज्योतीप्रमाणे, स्थिर होती, हा एक चमत्कारच होता.

श्रीमोटा चालतच राहिले. आता छाती आणि मानेपर्यंत पाणी वर चढलं होतं. समुद्राच्या तळावरील रेतीवर पाऊलं आता स्थिर ठेवणं कठीण झालं होतं. मधूनच जोरात लाट येऊन पाणी डोक्यावरूनही निघून जाई.

---

* साईबाबांकडून हा आदेश मिळाल्याचे श्रीमोटांनी स्वतः सांगितले आहे.

नाकातोंडापर्यंत पाण्याची पातळी वाढली आणि त्यानंतर त्यांचं बाह्य जगाचं भान एकाएकी पूर्णतः गेलं.

जेव्हा ते भानावर आले तेव्हा त्यांना एकच जाणवलं की, आपलं शरीर रेतीत पडलंय, कपडे साधारण ओले आहेत, अगदी ओलेचिंब नाहीयेत. "याचा अर्थ आपलं शरीर किनाऱ्यावर बराच काळ पडून असावं," — त्यांनी निष्कर्ष काढला.

शरीराचं भान येताच श्रीमोटा उठले. त्यांनी पाहिलं — त्यांचं राहण्याचं ठिकाण, जो क्लिफ्टन बंगला — त्यापासून बरेच दूर ते रेतीवर उभे होते. घराच्या दिशेने श्रीमोटा शांतपणे चालू लागले. 'समुद्रातून बाहेर किनाऱ्यावर रेतीत आपण आलो कसे ?' हा प्रश्नदेखील त्यांच्या मनात उद्‌भवला नाही, कारण सद्‌गुरूंशिवाय ही किमया दुसऱ्या कोणाची असणार होती ?

श्रीमोटा घरी आले. त्यांचे ओले कपडे पाहून सर्वांनी खूप विचारपूस केली, "झालं तरी काय ? तुमचे कपडे ओले कसे ?" पण ते काहीच बोलले नाहीत. ओले कपडे काढून त्यांनी कोरडे कपडे घातले आणि सद्‌गुरूंच्या स्मरणात डुंबून गेले.

❖

## ८१. 'मेहेबूब'चा हुकूम !

मुसलमानांचा पवित्र महिना 'रमझान मास' सुरू होता. यावेळीपण श्रीमोटा कराचीतच होते. सर्वच मुसलमान या महिन्यात रोजा करतात. रोजा म्हणजे दिवसभरात काहीही खायचंप्यायचं नाही, अगदी थुंकीदेखील गिळायची नाही. असं पालन केलं की तो खरा रोजा !

संयम प्राप्त करण्यासाठी श्रीमोटादेखील रोजे करीत. ते गुजराथ विद्यापीठात शिकत होते तेव्हा पू. गांधीजींनी हिंदु–

मुस्लिम ऐक्यावर विशेष भर दिला होता. त्याशिवाय एक दुसऱ्याच्या धर्माविषयी, नीती-नियमांविषयी आदरभाव ठेवा असंही ते आग्रहाने सांगत असत. त्या दृष्टीनेसुद्धा रोज्याचं महत्त्व होतं, हाही दुसरा पैलू होताच !

रमजान पूर्ण झाल्यावर ईदच्या दिवशी कराचीच्या ईद्गाह मैदानात हजारो मुसलमान नमाज पढतात. त्याठिकाणी आपणही जायचं अशी तीव्र उर्मी उसळून आली आणि श्रीमोटा तिकडे जायला तयार झाले. त्यांचा वेष नेहमीचाच होता — धोतर, झब्बा आणि शुभ्र टोपी !

घरच्या लोकांनी जरा घाबरूनच विचारलं, "काय ? तुम्ही हे कपडे घालून नमाज पढायला जाल ? त्या लोकांनी काही केलं तर ?"

श्रीमोटा निभर्यतेने आणि ठामपणे म्हणाले, "जे व्हायचं असेल ते होईलच ! आणि जे घडणार नसेल तर ते घडणारच नाही, मग घाबरण्याचा प्रश्न येतोच कोठे ? काय वाटेल ते होवो, मी जाणारच !"

श्रीमोटा मोटारीने ईद्गाहच्या मैदानात गेले.

हजारोंच्या संख्येने मुसलमान जमले होते. तेपण रांगेत उभे राहिले. बांगची पुकार झाली. सर्वजण कानावर हात ठेवून खाली झुकले आणि नंतर उभे राहिले. श्रीमोटांनीपण तसंच केलं, तेही खाली झुकले आणि नंतर उभे राहिले. गुडघ्यावर बसून सर्वजण वाकले, तसे तेही वाकले.

सर्वजण जेव्हा नमाज पढतांना कुराणाची आयते वाचत होते तेव्हा ते हृदयात सद्गुरुस्मरणपूर्वक प्रार्थना करीत होते.

नमाज संपला. सर्व मुसलमान एकमेकांना आलिंगन देऊन "अस्सलाम् आलयकुम्" म्हणत निरोप घेऊ लागले. श्रीमोटांनी ज्याचा निरोप घ्यावा अशी एकही व्यक्ती त्या प्रचंड जनसागरात नव्हती. त्यांना आलिंगन देऊन आईच्या प्रेमाचा वर्षाव करणारे होते केवळ सद्‌गुरु !

मोटारीकडे जाण्यासाठी श्रीमोटा चालू लागले आणि चालताचालता एकदम थबकले. त्यांनी स्वतःच्या अंगाला चिमटा काढून पाहिला. ते स्वप्नात तर नव्हते ना ?... समोर प्रत्यक्ष सद्‌गुरू उभे होते. त्यांना पाहताच, हंबरडा फोडून आईकडे धाव घेणाऱ्या वासराप्रमाणे, ते धावत गेले आणि सद्‌गुरुंच्या चरणकमलांवर त्यांनी स्वतःला झोकून दिलं. त्यांचं हृदय भरून आलं, अश्रू वाहू लागले आणि अंतरी भक्तीच्या, प्रेमाच्या, भावाच्या लाटांवर लाटा उसळून श्रीचरणांकडे धाव घेऊ लागल्या.

गुरुदेवांनी त्यांना उचलून प्रेमाने आलिंगन दिलं, पाठ थोपटली आणि म्हणाले, "इथून नग्न होऊन तुझ्या घरी चालत जा !"

त्यांची ही आज्ञा ऐकल्यावर त्यांच्या अंतरी भाव प्रकटला, "हा खरा आज्ञापालनाचा क्षण आला. हा क्षण गमावला तर आणीबाणीची * वेळ गेली. देहाविषयी असलेलं ममत्त्व, देहाविषयी मनात असलेली गाठ आणि लज्जा या सर्वांपासून मुक्त होण्यासाठी ही अमूल्य संधी ईश्वरकृपेनेच प्राप्त झाली आहे."

पण त्याचबरोबर मनात विचार आला, "कपडे काढून कोणास द्यावेत ? गाडीच्या ड्रायव्हरला - भीमजीभाईला - द्यावेत तर त्याला वाटायचं की मी वेडा झालो आहे, आणि तो मला खचितच असे करू देणार नाही. तो सरळ उचलून

---

* अत्यंत महत्त्वाची

गाडीत घालेल आणि बंगल्यावर घेऊन जाईल, त्यामुळे असं करणं जोखमीचं आहे.''

एवढ्यात त्यांना कल्याणपूर यांचं स्मरण झालं. अशा गोष्टींचं महत्त्व व गांभीर्य ते जाणत होते म्हणून त्यांच्या घरी जाऊन, त्यांना सर्व निवेदन करून, कपडे त्यांनाच सुपूर्द करावेत असं ठरवून ते गाडीकडे गेले. भीमजीभाईला त्यांनी सांगितलं, ''हे बघ, तू मला कल्याणपूर यांच्या घराजवळ सोड आणि घरी जा. सर्वांना सांग की मी इकडे आहे आणि घरी सावकाश येईन. माझी काळजी करू नका, आणि सर्व जेवून घ्या.''

त्यांना कल्याणपूर यांच्या घराजवळ सोडून गाडी निघून गेली. जिने चढून ते कल्याणपूर यांच्याकडे गेले. ते घरीच होते. ते भेटल्यावर श्रीमोटांनी सरळ विषयालाच हात घातला. ''आज माझा परम सौभाग्याचा आणि सद्भाग्याचा सूर्य उगवला आहे. मला माझ्या मेहेबूबचा हुकूम प्राप्त झाला आहे आणि मला त्याचं प्रेमभक्तीपूर्वक पालन करायचं आहे.'' त्यांनी भराभर सांगितलं आणि नंतर हुकूम काय आहे ते स्पष्ट केलं.

ते ऐकताच कल्याणपूर घाबरूनच गेले. ते भेदरलेल्या स्वरात म्हणाले, ''नाही, नाही, इथे नाही, इथे नाही.''

श्रीमोटा त्यांना धीर देत म्हणाले, ''तुम्ही उगाच घाबरू नका. तुम्ही खाली रस्त्यावर या. तुमच्या घराच्या थोडं पुढे जाऊन मी माझे कपडे काढून तुमच्या हवाली करीन. ते घेऊन तुम्ही क्लिफ्ट्न बंगल्यात जा. परसदभाईना आणि इतर सर्वांना माझी ही हकीगत सांगा आणि कोणीही थोडंसुद्धा घाबरू नका. मी निवांतपणे सगळीकडे फिरतफिरत येईन. मात्र कधी येईन ते निश्चित सांगता येणार नाही.''

कल्याणपूर या गोष्टीला तयार झाले. ते दोघेजण मग जिना उतरून खाली रस्त्यावर आले. काही अंतर चालत गेल्यावर श्रीमोटांनी एकएक करून अंगावरचे सर्व कपडे उतरविले आणि कल्याणपूर यांच्या हातात दिले.

कपडे काढून टाकताक्षणीच शरीराच्या रोमारोमात एकप्रकारचा भाव आणि मस्ती प्रगटली आणि तिचा आवेश आणि जोर एवढा काही प्रचंड होता की ते जमिनीवर पायदेखील टेकवू शकत नव्हते. आपण जणू पृथ्वीवर अधांतरी उडत आहोत असं त्यांना वाटू लागलं. थोड्या वेळात हे भानपण गेलं आणि 'केवळ शरीर चालत होतं' अशीच जाणीव शिल्लक राहिली. एक न्यारी, अनोखी स्थिती अंतरी प्रगट झाली.

अशा स्थितीत ते कधी चालतचालत, तर कधी धावतधावत कराचीच्या मोठमोठ्या रस्त्यांवरून जात राहिले. पाचसहा मैल आपण कोठे आणि कसे फिरत होतो याचंदेखील त्यांना भान नव्हतं.

ते जात असतांना एका चौकात एका गोऱ्या सार्जंटने त्यांची नग्न स्थिती पाहून त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला अशी अर्धवट जाणीव त्यांना त्यावेळी झाली. तेव्हा त्यांनी त्या सार्जंटकडे पाहून अशी काही प्रचंड बोंब ठोकली की त्या गोऱ्या सार्जंटने, "साईबाबा, ईद मुबारक !" म्हणत त्यांना सलाम केला. तेवढ्यापुरती काही क्षण भौतिक जाणीव प्रगट झाली आणि नंतर परत विलीन झाली.

त्यानंतर ते चालतचालत गव्हर्नरच्या बंगल्याजवळ आले. तिथे सद्गुरू प्रत्यक्ष स्वतः उभे होते. त्यांनी श्रीमोटांना छातीशी धरलं आणि प्रेमाने कुरवाळलं नि पाठ थोपटून शाबासकी दिली. नंतर त्यांनी श्रीमोटांना रोजा तोडण्यासाठी पाच रुपये दिले.

त्यानंतर परत एकदा त्यांचं बाह्यभान पूर्णतः लोप पावलं आणि ते चालू लागले. समुद्राकिनारी असलेल्या क्लिफ्ट्न बंगल्यापासून शेदोनशे फूट अंतरावर त्यांचं देहभान परत आलं आणि मोठ्याने हाक मारून अंगावरचे कपडे त्यांनी बंगल्यातून मागवून घेतले.

**❑ ध्यानात सद्‌गुरुंना चहा पिण्यास निमंत्रण**

वरील अत्यंत रोमांचक अनुभव आणि गुरुदेवांचं झालेलं प्रत्यक्ष दर्शन यांविषयी परसदभाईकडील सर्वांना कळताच त्यांना फार आनंद झाला.

परसदभाईनी श्रीमोटांना सुचविलं, "तू तुझ्या गुरूमहाराजांना आपल्या घरी बोलावून आण, आपण चहापाणी देऊन मग त्यांना निरोप देऊ."

"पण ते कोठे असतील हे समजणार कसं ?"

बापूंनी यावर मार्ग सुचविला. "तू ध्यानात जाऊन, शरीराचं भान पूर्णतः जाण्याच्या आणि एकमात्र चैतन्यात एकाग्र होण्याच्या क्षणी गुरुमहाराज कोठे आहेत हे जाणून घेण्याचा संकल्प हृदयात धारण कर, म्हणजे तुला कळून येईल." पातंजल योगात 'संयम' * या नावाची जी प्रक्रिया आहे ती बापूंनी श्रीमोटांना सांगितली होती.

सहजतेने कोणाकडून काही सूचना मिळाल्यास ती स्वीकारून आचरणात आपणे हादेखील श्रीमोटांच्या साधनेचाच एक भाग होता. म्हणून त्यांनी या गोष्टीस संमती दिली.

त्यांनी ध्यान लावलं आणि 'संयम' साधला. त्यांना

---

* याच प्रक्रियेने त्यांनी आईचे काशीतील पुनर्जन्माचे स्थान शोधले होते. प्रकरणांच्या सलगतेच्या दृष्टीने ते प्रकरण आधी घेतले आहे.

दिसून आलं की कराची शहरापासून खूप दूर, समुद्रकिनाऱ्यास लागून असलेल्या एका रस्त्यावर ते अत्यंत द्रुत गतीने चालत होते.

त्यांचं दर्शन होताच श्रीमोटांनी त्यांना चहा पिण्यास येण्यासाठी भावभक्तीपूर्ण हृदयाने नम्रतापूर्वक विचारलं.

गुरुदेव म्हणाले, "बघ ! मला चहाच पाजायची इच्छा आहे ना तुला ? घे, हा बघ, मी चहा पितो !" असं म्हणून गुरुदेव चहा पिऊ लागले. अगदी स्पष्टतेने श्रीमोटांनी हे सर्व ध्यानात पाहिलं.

देहातीत सद्‌गुरूंच्या दृष्टीने स्थूलापेक्षा अधिक महत्त्व होतं सूक्ष्माचं, शुद्ध भावाचं ! शरीर तिथे गौण होतं !!

*टीप : श्रीमोटा हे शिर्डीचे साईबाबा, स्वामी समर्थ अक्कलकोट महाराज, ताजुद्दीन बाबा, उपासनी बाबा अशा सर्व महात्म्यांमध्ये आपले सद्‌गुरु दादा धुनीवाले –केशवानंदजी महाराज यांचेच दर्शन करीत असत. व तेच सद्‌गुरुंचे चैतन्य या आकारांमधून आपणास मार्गदर्शन करीत आहे असा भाव ठेवून होते. त्यामुळे, त्यांनी त्यांच्या पत्रांमध्ये, लिखाणात व बोलतांनापण 'सद्‌गुरु' हा एकच शब्द वापरला आहे.*

*कराचीत घडलेल्या या घटनेतील 'मेहेबूब' उर्फ 'सद्‌गुरु' म्हणजे 'शिर्डीचे साईबाबा' होते असे त्यांनी स्वतः सांगितले आहे.*

❖

## ८२. सद्गुरूंचा प्रेमप्रसाद

आज रविवारचा दिवस ! बाजारहाट करण्यासाठी श्रीमोटा रविवारी कधीच जात नसत, तरी आज मात्र त्यांच्या हृदयात कोणीतरी धक्के मारून जणू सांगत होतं, "भाजी बाजारात जा, भाजी बाजारात जा." परसदभाईच्या घरातील भाजीपाला व इतर सामानसुमान आणण्याचं काम तेच प्रेमाने करीत असत. आजच आपल्याला बाजारात जाण्याची ओढ का निर्माण व्हावी याचं त्यांना आश्चर्य वाटत होतं.

घरातील लोकांना ते म्हणाले, "चला, आज भाजीबाजारात खरेदीला जाऊन येऊ."

परसदभाईच्या मुलीने त्यांना मस्करीत विचारलं, "तुम्हाला तर तुमचे ते साईबाबा बोलावित असतील, होय ना ? पण आज जायचं नाही."

दुसऱ्याचे बोलदेखील ईश्वरी संकेत मानून ते कृतीत उतरविणं, हादेखील त्यांच्या साधनेचा एक वैशिष्ट्यपूर्ण पैलू होता. त्यामुळे तिचे शब्ददेखील 'पडत्या फळाची आज्ञा' मानून त्यांनी स्वीकारले आणि बाजारात जाणं रहित केलं.

बाजारात जरी गेले नाहीत तरी, सद्गुरुंच्या सूक्ष्म उपस्थितीचा अनुभव मात्र त्यांना दिवसभर होत राहिला, 'जिवंत अनुभव' होत राहिला.

दुसऱ्या दिवशी सकाळी सर्वांबरोबर ते मोटारीने बाजारहाटासाठी निघाले. 'सिंधिया स्टीम नेव्हिगेशन'च्या ऑफिसमध्ये त्यांनी सर्वांना बसविलं आणि आपण एकटेच भाजीबाजारात गेले.

भाजीपाला खरेदी केल्यावर त्यांच्या ध्यानी आलं की पैशांचं पाकीट ऑफिसमध्येच राहिलं होतं. पण रोज एकाच माणसाकडून भाजी घेत असल्यामुळे तसा काहीच प्रश्न नव्हता. पैसे उद्या दिले तरी चालण्यासारखं होतं.

सर्व आटोपून, भाजी घेऊन मंडईतून बाहेर येतात न् येतात तोच समोर प्रत्यक्ष गुरु महाराज * उभे आहेत असं त्यांना दिसलं. ते धावतधावत गेले आणि त्यांना कडकडून मिठी मारली. त्यांचं हृदय प्रेमाने काठोकाठ भरून गेलं आणि नेत्र सजल झाले. गुरुदेवांनी त्यांना प्रेमाने थोपटलं आणि कुरवाळून त्यांचं चुंबन घेतलं.

मग मधाळ हसत ते हळुवारपणे म्हणाले, "काल तुझी किती वाट पाहिली ! दोन करंड्याभर प्रसाद तुझ्याकरिता मी आणून ठेवला होता, शेवटी तुझ्या नावावर खैरात करून टाकला. आज मी पुन्हा या दोन करंड्या भरून प्रसाद तुझ्यावर खूश होऊन आणला आहे, तो तू घेऊन जा."

मोटारीतदेखील मावू शकणार नाहीत, एवढ्या मोठमोठ्या त्या करंड्या होत्या, म्हणून शेवटी हमालांद्वारेच त्या घरी न्याव्या लागल्या.

नमाजाच्या दिवशी आज्ञापालन केल्याच्या खुशीत गुरुमहाराजांनी तो प्रेमप्रसाद स्वतः आणून दिला होता. एका करंडीत निरनिराळ्या प्रकारची मिठाई खच्चून भरली होती आणि दुसऱ्या करंडीत बऱ्याच प्रकारची फळं नि सुका मेवा भरला होता, ते पहातापहाता श्रीमोटांचे डोळे अश्रूंनी भरून आले.

---

* साईबाबा

"आपण गुरुमहाराजांच्या एका छोट्याश्या आज्ञेचं पालन केल्याचं एवढं कौतुक ? आई आपल्या मुलावर करीत नसेल एवढं प्रेम करतात गुरुदेव आपल्यावर !" ते भावविव्हल झाले. तसंच धावतपळत जावं आणि त्यांच्या मांडीवर डोकं ठेवून चिरकाल पडून रहावं असं त्यांना वाटलं.

घरातील सर्वांनी तो अमृततुल्य प्रसाद पोटभरून ग्रहण केलाच, शिवाय इतरांनादेखील वाटला. तो प्रसाद खाणं बरेच दिवस सुरू होतं.

प्रसाद नंतर संपला, तरी त्याची अमृततुल्य चव आणि अनोखी तृप्ती मागे रेंगाळत राहिली. ती विसरणं कधीच शक्य नव्हतं !

❖

## ८३. गुरुदक्षिणा

**❑ प्रसाद सर्वांना वाट :**

गुरुकृपेच्या बळावर स्वपुरुषार्थाने साधना पूर्ण होऊन आपल्याला ध्येयप्राप्ती झाली आहे असं श्रीमोटांना जेव्हा वाटलं, तेव्हा त्यांनी गुरुमहाराजांना हृदयांतरी प्रगट करून नम्रतेने विचारलं, "गुरुदेव ! आपल्या कृपेने आणि आशीर्वादाने मी जे काही प्राप्त केलं आहे त्याची गुरुदक्षिणा म्हणून मी आपणांस काय देऊ ?"

प्रसन्नतेने सद्‌गुरुंनी आदेश दिला, "तुला जे काही 'मिळालं' आहे, आणि जे काही तू 'प्राप्त केलं' आहे ते एकटाच भोगू नकोस, तर सर्वांना त्याचा प्रसाद दे. जो 'खरा प्रसाद' प्राप्त करतो तो एकटाच खात नाही, तर तो सर्वांना वाटून मगच स्वतः खातो."

**❑ सज्जन, दुर्जन दोघांवर समभाव असू दे :**

गुरुमहाराज पुढे म्हणाले, "तुझ्याकडे सज्जन येतील आणि दुर्जनही येतील. त्यांच्यावर तुझा समभाव असू दे. एकाविषयी कमी भाव आणि दुसऱ्याविषयी जास्त भाव उत्पन्न होऊ देऊ नकोस.

"जास्त भाव ठेवायचाच असेल तर दुर्जनांबद्दल जास्त भाव असू दे, की ज्यामुळे ते दुर्जन न राहता सज्जन होऊन जातील. महादेव सर्वांचं विष पिऊन टाकीत तसंच तूसुद्धा सर्वांचं विष पिऊन टाक, परंतु विष देणाऱ्यांनासुद्धा तुझ्या 'अंतरीचं अमृत' दे."

**❑ तुझ्याकडे जे येणार नाहीत त्यांनाही विसरू नकोस :**

शेवटी गुरुमहाराजांनी सांगितलं, "बेटा, तुझ्याकडे जे येतील त्यांच्यासाठी तू सर्वकाही करशीलच ! पण तुझ्याकडे जे येणार नाहीत त्यांनाही तू विसरू नकोस. समग्र समाजाचं कल्याण होईल असं काहीतरी तू कर."

गुरुमहाराजांचा आदेश पूर्ण झाला. तो त्यांनी हृदयात प्रेमपूर्वक स्वीकारला.

एक तपस्या पूर्ण झाली होती आणि दुसरी तपस्या सुरू होत होती.

पहिली तपस्या होती ध्येयप्राप्तीची आणि आता ही दुसरी तपस्या होती आदेशपालनाची ! पहिली त्यांनी पूर्ण करून घेतली होती. हीपण ते पूर्ण करून घेतीलच अशी त्यांची खात्री होती, श्रद्धा होती.

'नराचा नारायण' करण्याची शक्ती सद्गुरुंमध्ये होती, त्यांची शक्ती असीम होती आणि ती अजूनही आपल्याला पूर्णत्वाने कळलीच नाही असंच श्रीमोटांना वाटत होतं !

❖

## ८४. अनाग्रही आणि अनासक्त श्रीमोटा

श्रीमोटा एकदा कवी सागर यांना भेटण्यास 'सरखेज' येथे गेले. सुरुवातीला सत्संग झाला, आंतरिक साधनेच्या संदर्भात मनमोकळी चर्चा व विचारविनिमय झाला. त्यानंतर श्रीमोटांनी कविवरांना आपण स्वत: रचलेली काही 'प्रेमलक्षणा भक्ती'ची गीतं ऐकविली.

ती गीतं ऐकून कविराज म्हणाले, "तुमच्या हृदयात शुद्ध, अनासक्त प्रेम आहे आणि ते खूप उच्च कोटीचं आहे, परंतु प्रेमभावनेने तुम्हास सांगतो की अशा उच्च प्रकारच्या गीतांमधूनदेखील योग्य सार ग्रहण करण्याऐवजी लोक आपल्या स्वत:च्या जीवदशेच्या वृत्तीचंच पोषण करतील, म्हणून तुम्ही या सर्व रचना बाजूच्या तलावात फेकून द्या."

त्यांचं हे बोलणं ऐकलं मात्र, आणि एका क्षणाचाही विलंब न करता श्रीमोटांनी तत्क्षणीच ते सर्व बाजूच्या तलावात टाकून दिलं.

कवी सागर एकदम स्तब्ध झाले.

त्या जुन्या साधनकाळातल्या प्रार्थनांपैकी फारच थोड्या आता शिल्लक आहेत.

* * *

### ❑ जप्तीच्या वेळी वह्या गायब

स्वातंत्र्यलढ्याच्या वेळी तुरुंगवास स्वीकारावा लागत असे. त्यावेळी दंड भरल्यास सरकार कैद्यांना सोडून देई. कधी कधी निव्वळ दंडाचीही शिक्षा होत असे. पण अशा वेळी असहकाराचे वातावरण असल्यामुळे शक्यतो पैसे न भरता शिक्षा भोगणेच सर्वजण पत्करीत.

श्रीमोटांच्या बाबतीतसुद्धा असेच झाले होते. दंड न भरल्यामुळे त्यांच्या घरी चारपाच वेळा तरी जप्ती आली होती आणि त्यावेळी त्यांनी लिहिलेल्या प्रार्थनागीतांच्या जवळपास चार मोठ्या पिशव्या भरतील एवढ्या वह्या गहाळ झाल्या.

त्या गेल्या त्या गेल्याच !

परंतु श्रीमोटांना त्याचा काहीच हर्षशोक झाला नाही. ते तटस्थ होते, स्थिर होते, साक्षी होते.

कमलवत !

❖

## ८५. "तू समाजाचं देणं लागतोस !"

### ❑ सद्‌गुरुंचा आदेश :

१९५५ मध्ये एक दिवस पूज्य श्रीमोटा नडियाद आश्रमात वडाखाली झोक्यावर बसलेले असतांना श्रीसद्‌गुरुंनी प्रत्यक्ष प्रगट होऊन सांगितलं, "तू बसून काय राहिला आहेस ? समाजासाठी काहीतरी काम कर."

पूज्यश्रींनी विचारलं, "मी काय काम करू ?"

सद्‌गुरुंनी उत्तर दिलं, "समाजाकडून एक कोटी रुपये जमा करून समाजास परत देऊन टाक. मात्र मौलिक कार्य कर."

### ❑ देणाऱ्यांचं ऋण कसं फेडू ?

श्रीमोटांनी विचारलं, "मला कोण देईल ? मी एक विधवा आईचा मुलगा ! समाजात माझी कवडीचीही किंमत नाही."

सद्‌गुरु म्हणाले, "तू माग. माझं तुला सहाय्य आहे."

श्रीमोटांनी केशवानंदजी महाराजांना विचारलं, "पण मी देणाऱ्यांचं ऋण कशाप्रकारे फेडू ?"

करुणानिधान सद्‌गुरु म्हणाले, "ती जबाबदारी माझी ! तुला देणाऱ्याला मी सहापट करून देईन."

"रोटीसाठी तू चिंता करू नकोस. तू जनसेवा खूप केली आहेस. म्हणून रोटी ही तुझी पेन्शन आहे असं समज," असंही त्यांनी श्रीमोटांना सांगितलं.

❑ **"मला समाजास बसतं करायचं आहे."**

"मारे समाजने बेठो करवो छे" हे श्रीमोटांचं स्वप्न होतं. आणि त्यासाठीच त्यांनी तन–मन–धन वेचलं; उठताबसता वेचलं; दिवसरात्र, स्वास्थ्य अस्वास्थ्य न पाहता शेवटच्या श्वासापर्यंत वेचलं. त्यांच्या देहत्यागापूर्वीच एक कोटी दहा लाख रुपये एवढी रक्कम समाजाकडून जमा करून त्यांनी ती समाजास परत दिली, मौलिक कार्यासाठी दिली. 'गुण' आणि 'भाव' यांच्या विकासासाठी आयुष्यभर ते प्राणपणाने झटत राहिले.

❑ **धन जमा करण्यासाठी पुरुषार्थ :**

श्रीमोटांच्या जीवनात लहानपणापासून शेवटपर्यंत त्यांच्या जीवनात सतत प्रखर पुरुषार्थच दिसतो. कधी ते थांबले आहे, विश्रांती घेत आहेत असं दिसलंच नाही.

गुरुमहाराजांनी आदेश दिल्यानंतर धनाच्या राशी जमा करणं हे उद्दीष्ट त्यांनी निश्चित केलं आणि तसं जाहीर केलं, "ज्यांना ज्यांना मला आपल्या घरी बोलवायची इच्छा असेल, त्यांनी मला स्नेह्यांकडून, मित्रांकडून, स्वजनांकडून रक्कम जमा करून द्यावी."

त्याकरिता मग ते रोज दुपारच्या रणरणत्या उन्हातदेखील दोनशे, अडीचशे मैल मोटारीतून फिरू लागले.

...आणि मग दोन, पाच, दहा, पन्नास, शंभर,, दोनशे,

हजार रुपये देणारेसुद्धा मिळत गेले. देणारा जो 'हजार हातांचा धनी', त्याची ही प्रेरणा होती.

त्यानंतर निधी जमा करण्याच्या निमित्ताने महोत्सव, उत्सव, स्मृतिग्रंथ प्रसिद्ध होऊ लागले.

श्रीमोटांच्या दृष्टीने उत्सवांचं महत्त्व नव्हतं, महत्त्व होतं जमणाऱ्या निधीचं !

हजारो लोकांच्या सहाय्याने लोककल्याणाचा गोवर्धन पर्वत श्रीमोटारूपी श्रीकृष्णाने यशस्वीपणे तोलला.

**❑ दागिन्यांनी मढलेले श्रीमोटा :**

श्रीमोटांच्या अहमदाबाद येथील शेवटच्या उत्सवात त्यांनी सांगितलं, "आजपर्यंत तुम्ही मला मुक्त हस्ताने, भावपूर्वक देत आला आहातच. आज मात्र मला दागिने पाहिजे आहेत. तेव्हा भगिनींनो, तयार रहा. मी हे मागतोय, कारण तुमचं हृदय त्यात आहे. मला तर तुमचं हृदय पाहिजे आहे."

आणि मग, आलेले सर्व दागिने घालून जेव्हा श्रीमोटा आपल्या स्थानी बसले तेव्हा त्या दागिन्यांनी लखलखत शोभत होते. हाताच्या बोटांत सोन्याच्या अंगठ्या, हातात बांगड्या, दंडावर वाक्या, बाहूत बाजुबंद, पायांच्या बोटात जोडवी, गळ्यात निरनिराळे हार, कानात कर्णफुले, कुड्या... सर्व प्रकारच्या सोन्याच्या दागिन्यांनी ते नटले होते.

तेव्हा सर्वांना वाटलं असेल, "दागिने गेले ते गेले !" पण श्रीमोटांना त्याची हाव नव्हती. त्यांनी ते ज्याचे त्याला परत करून टाकले आणि त्या दागिन्यांची जी किंमत होती, ती घेतली.

देणाऱ्या या सर्वांचं समर्पण आणि त्याग यांच्या कणांनीच तो गोवर्धन पर्वत बनला होता आणि त्यांनीच तो तोललाही होता, प्रेरक होते श्रीमोटा आणि त्यांचे सद्गुरु ! श्रीमोटांनी नंतर देहत्याग केला परंतु कार्य मात्र अद्यापही अखंडितपणे सुरूच आहे !

श्रीमोटांनी स्थापन केलेल्या हरिः ॐ आश्रमांद्वारे समाजास सेवादानरूपाने ३१ मार्च १९९५ पर्यंत दिली गेलेली रक्कम सोडनऊ कोटी रुपये इतकी झाली आहे, आणि हा आकडा कालचक्र पुढेपुढे जाईल तसतसा वाढतच जाणार आहे.

हा दानकुंभ हे एक अक्षयपात्रच आहे !

❖

## ८६. प्रेमस्पर्श

एकदा रागाने थरथरत, लालबुंद डोळे झालेला एक मागासलेल्या जमातीतील मनुष्य श्रीमोटांकडे आला. तो अधूनमधून त्यांच्याकडे येत असे. त्यांच्या पाया पडून तो म्हणू लागला, "मोटा, आज माझ्या बायकोला मारून टाकल्याशिवाय राहणार नाही, आता मला तिची काहीच गरज नाहीये."

"अरे बाबा, असं झालं तरी काय ? सांगितलंस तरच कळेल ना ?" श्रीमोटांनी खूप शांततेने आणि प्रेमाने त्याला विचारलं.

"काय सांगू मोटा ? सांगयलासुद्धा लाज वाटते ! तिचे राईराईएवढे तुकडे केले तरी पाप नाही लागणार, माझा सत्यानाश केला तिने !"

"ठीक आहे, मारून टाक तिला, कर तुकडे, पण एक विचारू ? "

"हो, विचारा की."

"तुला मुलं आहेत ?"

"हो."

"किती ?"

"चार."

"तुझी घरवाली त्यांना व्यवस्थित खाऊपिऊ घालते ?"

"हो तर, देते की, पण त्याच्याने काय झालं ?"

"तुझ्या मुलांचं संगोपन व्यवस्थित करते ?"

"ते तर ती करणारच, त्यात विशेष ते काय ?"

"मग आता तूच बघ, तुला इतकी मुलं आहेत; आणि त्या मुलांना ती खाऊपिऊ घालते, घर चालवते, मग अजून काय पाहिजे ?" श्रीमोटांनी प्रेमाने विचारलं.

"पण मोटा, ती जर माझ्याशी प्रामाणिक राहिली नाही तर ते कसं खपवून घ्यायचं ?" त्याचा राग आता हळूहळू शांत होत होता.

"तुझं म्हणणं खरं आहे, बाबा," त्याने स्वतःशी विचार करावा म्हणून शब्दांवर वजन देत श्रीमोटा बोलू लागले, "पण शांततेने विचार कर. तू राग मानणार नसशील तर एक गोष्ट विचारू ?"

"विचारा, मोटा, आनंदाने विचारा."

"मग मला एक सांग की आतापर्यंत तू एकही वाईट गोष्ट केली नाहीयेस का ? शरीराने, मनाने किंवा वाणीने एकही खराब काम केलं नाहीयेस का ?"

“हो भगवन्, केलं आहे,” नरम पडलेल्या आवाजात तो म्हणाला.

“तर मग आता तू तिला माफ कर म्हणजे परमेश्वर सर्वांनाच माफ करेल,” श्रीमोटांनी त्याच्या हृदयाला हात घातला.

काहीही बोलल्याविना खाली मान घालून तो बसून राहिला. त्याच्या डोळ्यांमधून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. श्रीमोटांनी मन मोकळं होईपर्यंत त्याला रडू दिलं.

तो शांत झाल्यावर त्याला सफरचंदाच्या दोन फोडी देत ते म्हणाले, “एक फोड तुझ्या घरवालीला दे आणि एक तू खा. ‘मोटांनी दिलेला प्रसाद आहे’, असं तुझ्या घरवालीला सांग आणि दोघं मिळून एकत्र खा. आणि ‘तू तिला माफ केलं आहेस,’ हे तिला सांगण्याची गरज नाही. जा, देवाचं नाव घेत जा.”

तो श्रीमोटांच्या पाया पडला. त्यांनी प्रेमाने त्याची पाठ थोपटली. डोळे पुसतपुसत तो घरी निघून गेला.

श्रीमोटांच्या प्रेमस्पर्शाने हृदयपरिवर्तन होऊन एक घर उध्वस्त होण्यापासून वाचलं होतं.

❖

## ८७. प्रेमीस भेटता प्रेमी

देशात असहकाराचं झंझावाती वातावरण पसरल्यावर गांधीजींच्या आवाहनास प्रतिसाद देऊन बडोदा कॉलेजमधून सर्वप्रथम बाहेर पडली दोन मुलं : श्रीमोटा आणि पांडुरंग वळामे. दोघेही नंतर ‘गुजराथ विद्यापीठा’त दाखल झाले पण तिथेही ते फार काळ टिकू शकले नाहीत.

पांडुरंग वळामे नंतर अध्यापनकार्यात पडले आणि काही काळानंतर त्यातही मन न रमल्याने उच्च ध्येयाने प्रेरित होऊन

त्यांनी घराबाहेर पाऊल ठेवलं. भगवान दत्तात्रयांची आराधना करून त्यांचे कृपाशीर्वाद प्राप्त करण्यासाठी आणि साक्षात्कारप्राप्तीसाठी ते बाहेर पडले. गरुडेश्वराच्या दत्तावतारी पूज्य वासुदेवानंद सरस्वती महाराजांकडून त्यांना दीक्षा मिळाली आणि कालक्रमानुसार साधना फलीभूत होऊन त्यांनी ध्येयप्राप्ती केली. त्यानंतर ते नारेश्वरला श्री रंग अवधूत महाराज या नावाने ख्यातनाम झाले. गुजराथ भूमीत 'अवधूतजी' या लाडक्या नावाने त्यांची कीर्ती दिगंत पसरली. त्यांनी गुरुचरित्रसाररूप लिहिलेल्या 'दत्तबावनी' मुळे तर ते सर्वांच्याच हृदयसिंहासनावर आरूढ झाले.

अशा या अवधूतजींचा आणि श्रीमोटांचा गहिरा हृदयसंबंध होता. दोघेजण एकमेकांस अधूनमधून भेटत असत.

एकदा श्रीमोटांना कळलं की अवधूतजी सुरतला आते आहेत. श्रीमोटांनी त्यावेळेपर्यंत आपले इप्सित साध्य करून सद्गुरुंच्या आदेशाने मौनमंदिरांची स्थापना केली होती. ते त्यावेळी सुरतच्याच हरिः ॐ आश्रमात विराजमान होते. आपल्या काही आप्तजनांबरोबर ते रंगजींच्या भेटीस निघाले.

अवधूतजींचं आगमन झालं की लोक त्यांच्या दर्शनास गर्दी करीत. मुंग्यांसारखी रीघ लागे. स्वयंसेवक रांगा लावून ओळीने सर्वांना दर्शनाची संधी देत. श्रीमोटा पोहोचले तेव्हाही हजारोंच्या संख्येने जनसमुदाय जमला होता. रंगजींपर्यंत पोहोचणं शक्य नव्हतं. श्रीमोटांच्या साध्या वेषामुळे आणि अवडंबरहीन बाह्यावतारामुळे स्वयंसेवकांच्या ध्यानी आलं नाही की हे एक संत आहेत. स्वतःहून परिचय देण्याची श्रीमोटांची वृत्ती नव्हती. पण त्यांच्या आप्तजनांपैकी एकास राहवलं नाही. श्रीमोटा

आले असल्याची चिठ्ठी त्याने एका स्वयंसेवकाकडे देऊन ती रंगजींना नेऊन द्यायला त्याला सांगितलं.

आपला या गर्दीत निभाव लागणार नाही असं वाटून श्रीमोटा आश्रमात निघून आले. रंगजींपर्यंत स्वयंसेवकाची चिठ्ठी पोहोचतापोहोचता तास-दीडतास उलटून गेला. चिठ्ठी वाचताच अवधूतजींनी श्रीमोटांना बोलावणं धाडलं, पण ते तर कधीच निघून गेले होते. हे कळल्यावर रंगजींना फार हळहळ वाटली. त्यांनी खास गाडी पाठवून श्रीमोटांना घेऊन येण्यासाठी एक माणूस धाडला.

भेट झाल्यावर दोघांना अतीव आनंद झाला. दोघांच्या मनमोकळ्या गप्पागोष्टी झाला. गप्पांच्या ओघात श्रीमोटा म्हणाले, "बापजी, तुम्हाला भेटायला यायचं म्हणणे फार कठीण ! दर्शनार्थींची एवढी मोठी रांग असते की आमच्यासारख्यांचा पत्ताही लागत नाही."

रंग अवधूत महाराज हसून लगेच म्हणाले, "पण मोटा, रांग माणसांसाठी आहे, संतांसाठी नाही." मग त्यांनी स्वयंसेवकांना बोलावून सांगितलं, "हे बघा, मला भेटायला येणाऱ्या लोकांना भले रांगेत उभं करा, पण संतांना रांगेत उभं करीत जाऊ नका." स्वयंसेवक 'हो' म्हणून निघून गेले.

श्रीमोटा तिथे येऊन बराच वेळ झाला होता. ते म्हणाले, "चला, बापजी, मी आता उठतो. माझ्यामुळे बिचारे दर्शनार्थी ताटकळत उभे आहेत. त्यांची खोटी व्हायला नको."

बालकाप्रमाणे मुक्त हास्य करीत अवधूतजींनी मार्मिक उद्गार काढले, "मोटा, एवढी माणसं काय माझं दर्शन करायला

येतात ? ती डोकं द्यायला येत नाहीत, तर डोकं घ्यायला येतात !" त्यांच्या हसण्याला श्रीमोटांनीही साथ दिली.

नंतर श्रीमोटा आश्रमात परतले.

कालप्रवाह वाहात होता.

आपल्या अंतिम कालवधीत एकदा रंग अवधूत महाराज श्रीमोटांना भेटायला नडियाद आश्रमात आले. सत्संग, गप्पा झाल्यावर थोडंसं गंभीर होत ते त्यांना म्हणाले, "चला मोटा, आता आपण भेटून घेतलंय एकमेकांना !"

त्यांच्या बोलण्यातलं वेगळेपण श्रीमोटांना जाणवलं. त्यांनी प्रश्न केला, "असं का म्हणताय, बापजी ?"

अवधूतजींनी मंद हसत उत्तर दिलं, "माझी गाडी आता हरिद्वारला जायच्या तयारीत आहे."

"तर मग मलाही तुमच्याबरोबर घेऊन चला बापजी," श्रीमोटा म्हणाले.

रंगजी घाईघाईने म्हणाले, "नाही, नाही ! तुला अजून वेळ आहे. मी जाऊन तुझी जागा करून ठेवेन आणि मग बोलावेन, तेव्हा तू यायचंस !"

अवधूतजींनी श्रीमोटांचा सर्व आश्रम फिरून पाहिला. मौनमंदिरांच्या खोल्या पाहून ते उद्‌गारले, "तू तुझ्या मौनमंदिरांची चांगली योजना केली आहेस. जो येईल त्याला आत कोंडायचं. ईश्वरासाठी जो पुरुषार्थ करेल, त्याला मिळेल, नाहीतर 'ठणठण गोपाळ !'... रिकाम्या हातांनीच बाहेर पडावं लागेल !"

त्यां दोघांच्या नेहमीच अशा आनंदविनोदाच्या आणि तरीही अर्थपूर्ण गप्पागोष्टी होत.

जवळजवळ अडीच तास रंगजी नडियाद आश्रमात होते. नंतर ते काही दिवसांनी हरिद्वारला गेले.

गेले ते गेलेच !

हरिद्वारमध्ये त्यांनी आनंदपूर्वक देहत्याग केला !

❖

## ८८. परतीचा प्रवास

अहमदाबादला टाऊनहॉलमध्ये १९७५चा रामनवमीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. आश्रमाच्या विविध योजनांसाठी लोकांनी उदंड हस्ते निधी दिला. एवढंच नव्हे तर दागिनेही काढून दिले.

त्यावेळी मनोगत व्यक्त करतांना श्रीमोटा म्हणाले, "आता उत्सव होणार नाही. मी आश्रमाच्या बाहेर निघणार नाही. मला भेटण्यासाठी कोणी आश्रमात येऊ नका. यायची इच्छा झालीच तर तेवढे गाडीभाड्यचे पैसे मला मनीऑर्डरने पाठवा. समाजकल्याणाच्या कार्यात ते उपयोगी होतील.

हे ऐकल्यावर मात्र सर्वांची हृदयं हेलावली. श्रीमोटांची तब्येत इतकी ढासळली असेल याची कोणालाच कल्पना नव्हती.

शरीराच्या खिळखिळ्या अवस्थेत आपला देह लोक-कल्याणाच्या कार्यांसाठी उपयोगी होऊ शकेल अशी स्थिती राहिली नाही, असं त्यांना जाणवू लागलं होतं.

"१९७६च्या गुरुपौर्णिमेस मी अज्ञात स्थळी जाणार आहे, म्हणून कोणीही मला भेटायला येऊ नका," असं श्रीमोटांनी सांगितलं. दक्षिण भारतात जायची त्यांची इच्छा होती. पण त्यावेळी त्यांची प्रकृती परत नाजुक झाली आणि जाण्याचा

कार्यक्रम रद्द करावा लागला, सुरतलाच थांबावं लागलं. तिथे ते आहेत म्हटल्यावर त्यांच्या उपस्थितीत गुरुपौर्णिमा सुरतला साजरी झाली.

१२ जुलै, १९७६ : श्रीमोटा सकाळीच कारमध्ये बसून सुरतहून नडियादला यायला निघाले. पोहोचायला संध्याकाळचे सात वाजले. तुफानी पावसामुळे सर्वांचे कपडे ओलेचिंब झाले होते, सामानही पार भिजून गेलं होतं, आणि थकून सर्वजण लोळागोळा झाले होते.

श्रीमोटांना अनेक रोग होते. कोठला रोग केव्हा उचल खाईल हे सांगता येत नसे. त्यामुळे बरीचशी औषधे तर कायमच जवळ बाळगावी लागत.

श्रीमोटा सुरतहून नडियाद आश्रमात येत, तेव्हा विद्यानगरहून डॉक्टर कांताबहेन आणि त्यांचे पती रामभाई त्यांची काळजी घ्यायला बरोबरच येत. श्रीमोटांची सेवापण करता येत असे आणि वेळ पाहून योग्य ती औषधेसुद्धा देता येत असत.

यावेळी नडियादला आल्यावर श्रीमोटा फारच अस्वस्थ होते, नेहमीपेक्षा तब्येत जास्तच नरम वाटत होती. याचं काय कारण असावं हे त्या दोघांनाही कळलं नाही.

'स्वतःहून श्रीमोटा काय होत असेल तर सांगणारही नाहीत', अशी त्यांची वृत्ती असल्यामुळे तर कळणं अजूनच कठीण होतं. प्रवासाच्या दगदगीनेच हे होत असेल असं त्यांनी मानून घेतलं.

आज जेवणही खूप कमी गेलं, "पोटात अतिशय दुखतंय, सहन होत नाही," असं ते अधूनमधून म्हणत. पोटाचाच काहीतरी त्रास होता हे निश्चित ! कांताबहेन औषधे देत पण तात्पुरता आराम होई.

असं करताकरता जुलैची १३-१४ आणि १५ तारीखदेखील उलटली.

१६ तारखेस लघ्वीचा त्रास सुरू झाला. श्रीमोटांनी लघ्वी करण्यासाठी खूप प्रयत्न केले, पण लघ्वी झालीच नाही.

ते झोपलेले उठून बसत, बाजूलाच लघ्वीसाठी एका स्टूलावर व्यवस्था केली होती पण 'होईल होईल' असं वाटायचं, पण व्हायची मात्र नाही. त्यांना हातांनी धरून उभं केलं आणि मग त्यांनी लघ्वी करण्याचा प्रयत्न केला, तरीही परिणाम शून्य ! दिवसभर हेच चाललं होतं.

कांताबहेन डॉक्टर असल्यामुळे परिस्थितीचं गांभीर्य त्यांच्या ध्यानी आलं. तुंबलेल्या लघ्वीतील विषारी द्रव्यं शरीरात भिनून 'युरेमिया' होण्याची, 'कोमा'त जाण्याची शक्यता असते हे त्या जाणून होत्या. तुंबलेली लघ्वी मोकळी करणं हा एकच मार्ग शिल्लक होता आणि तो कोणत्याही परिस्थितीत त्वरेने अमलात आणायलाच हवा होता.

गंभीरपणे त्यांनी श्रीमोटांना विचारलं, "मोटा, आपण मोठ्या डॉक्टरांना बोलवायचं का ?"

श्रीमोटांचा तर नन्नाचाच पाढा होता. पण ते भले 'नाही' म्हणोत, डॉक्टरांना आणायलाच हवं होतं. कांताबहेननी आश्रमाचे कर्ताहर्ता आणि श्रीमोटांचे अंतरंगीचे नंदूभाई यांना सारंकाही सांगितलं. त्यांनी मूत्रपिंडाच्या तज्ज्ञ डॉक्टरांना बोलाविण्यास परवानगी दिली.

नडियादचे प्रसिद्ध युरॉलॉजिस्ट डॉ. वीरेंद्र देसाई यांची चौकशी केली तर ते बाहेर गावी गेले होते.

शेवटी डॉ. विनोदचंद्र अमीन हे नडियादचे दुसरे प्रसिद्ध

डॉक्टर श्री. पटेल यांच्याबरोबर यायला निघाले. सडकेपासून आश्रमापर्यंतचा रस्ता नदीच्या पाण्याने खराब झाला होता. तशाही स्थितीत ते येऊन पोहोचले, परंतु लगेच लघ्वी मोकळी व्हावी असं कोणतंच साधन बरोबर आणलेलं नसल्याने स्थिती अधिक गंभीर झाली.

दुसऱ्या दिवशी डॉ. वीरेंद्र देसाई बाहेर गावाहून परत आले आणि श्रीमोटांच्या गंभीर स्थितीची जाणीव होताच सर्व साधने घेऊन तयारीनिशी संध्याकाळी चारच्या सुमारास आश्रमात यायला निघाले. सेढी नदीच्या उन्मत्त पुरामुळे सडकेचा मार्ग बंद झाला होता. त्यांनी शेतातून चिखल तुडवत तुडवतच रस्ता काढला आणि आश्रमात येऊन पोहोचले.

आल्यावर श्रीमोटांना प्रणाम करून विचारलं, "जर आपण परवानगी द्याल तर, आपल्याला काहीही त्रास होऊ न देता दोन मिनिटातच कॅथेटरने लघ्वी काढतो आणि मग तुम्हास आराम पडेल, त्यानंतर तुम्ही म्हणाल तसं करूं."

श्रीमोटांनी 'ईश्वरेच्छा' मानून परवानगी दिली.

दोन मिनिटातच डॉक्टरांनी कॅथेटर टाकला आणि धडाधड पिशवीत लघ्वी जमा होऊ लागली. त्वरितच श्रीमोटांना आराम पडला. डॉक्टरांनी आवश्यक त्या सर्व सूचना दिल्या आणि 'उद्या आम्ही परत येऊ', असं सांगून निरोप घेतला.

लघ्वी मोकळी झाली आणि आराम तर पडला, पण त्यांना गुरुमहाराजांनी दिलेला आदेश आठवला, "जेव्हा तू परवश * होशील आणि लाचार परिस्थितीत असशील तेव्हा तू तुझ्या देहाचा त्याग कर." कॅथेटरचा वापर करावा लागणं

* पराधीन

अनैसर्गिक होतं, परवशच होतं !

"आता देह ठेवण्याचं काहीच प्रयोजन नाही. सद्गुरूंना जेवढं या शरीरद्वारे करवून घ्यायचं होतं ते पूर्ण झालं आहे. त्यांच्या आज्ञेने आश्रम स्थापन केला.समाजाला बसतं करण्याचा प्रयत्न केला. खरं तर आपल्याला यापैकी कशाचीच इच्छा नव्हती. केवळ कर्म या भावनेने करीत आलो. पण आज ते पूर्ण झालं. या शरीराचं प्रयोजन संपलं. पंचमहाभूतांचा हा देह आता त्यांना स्वाधीन करायलाच हवा !" श्रीमोटांनी ठाम निश्चय केला आणि दुसऱ्या दिवशी १९ जुलै रोजी सकाळी स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिलेला कागद नंदुभाईंना सुपूर्द केला.

***जे जे कोणी संबंधित आहेत त्यांच्यासाठी :***

*"मी, चुनीलाल आशाराम भगत उर्फ मोटा, रहिवासी हरिः ॐ आश्रम, नडियाद, याद्वारे जाहीर करतो की माझ्या राजीखुशीने मी स्वतः माझ्या जडदेहास सोडू इच्छितो. हा देह अनेक रोगांनी घेरला गेला आहे आणि आता लोककल्याणाच्या कामास येईल असा राहिला नाही. हे रोग मिटण्याचीपण आशा नाही. म्हणून आनंदपूर्वक शरीर सोडणे हे उत्तम आहे आणि त्याकरिता योग्य क्षण वाटेल तेव्हा मी असं करीन.*

*माझ्या शवाचा अग्निसंस्कार एकान्तात, शांत जागी मृत्युस्थानाच्या जवळच करावा. आणि तोसुद्धा आपल्या सहा जणांच्या उपस्थितीतच करावा. खूप जणांना गोळा*

*करू नये, असं मी माझ्या सेवकांना फर्मावतो आहे.*

*माझ्या अस्थीपण संपूर्णतः नदीत टाकून द्याव्यात.*

*माझ्या नावाचं विटाचुन्याचं काहीच स्मारक करायचं नाही. माझ्या मृत्यूनिमित्त जो काही नाणेनिधी जमा होईल, त्याचा उपयोग शाळेच्या खोल्या बांधण्यासाठी करावा.*

*चुनीलाल आशाराम भगत उर्फ मोटा.''*

*ता. ११-७-'७६*

❖

## ८९. देहत्याग

२२ जुलै रोजी सकाळी श्रीमोटांना नडियादहून फाजलपुरला जायचं होतं. २१ तारखेस संध्याकाळी श्रीमोटांनी त्यांच्या सेवेत असलेल्या श्री राजूभाईना बोलावून सांगितलं, ''मला खुर्चीगाडीत बसवून सगळ्या आश्रमात फिरव.''

जणूकाही आश्रमाला प्रदक्षिणा घालत असावं अशाप्रकारे राजूभाईनी श्रीमोटांना खुर्चीगाडीत बसवून चारी बाजूंना फिरविलं. श्रीमोटा लतावेली, वृक्ष, झाडे, खोल्या - जे जे काही समोर येईल त्याला प्रमाम करीतकरीत पुढे जात होते.

शेवटी ते ज्या टबमध्ये रोज स्नान करीत, तिथे आले. त्या टबकडे पहात श्रीमोटांनी राजूभाईना सांगितलं, ''हे बघ, हा टब वैकुंठकाकांचा आहे. उद्या लवकरात लवकर त्यांच्याकडे पोहोचता कर.''

"पण मोटा, तुम्ही परत याल, तेव्हा लागणार नाही ?" राजूभाईंनी विचारलं.

श्रीमोटा जरा जोरातच म्हणाले, "सगळ्या चांभारचौकश्या सोडून मी सांगतो तसं कर ना ! परत येईन तेव्हा परत मागवून घेऊ."

राजूभाई म्हणाले, "ठीक आहे, मोटा." विषय तिथेच संपला.

२१ जुलैची रात्र पसार झाली. २२ जुलैला पहाटे लवकरच सर्व विधी आटोपून, स्नान करून, चहापाणी घेऊन, जाण्याच्या तयारीत सर्व बसले होते. गाडीत सर्व सामान व्यवस्थित ठेवलं आणि श्रीमोटांच्या सांगाव्याची सर्वजण वाट पाहू लागले. रात्रभर पाऊस वेड्यासारखा कोसळत होता. एवढ्यात जोरदार कडाडून कोठेतरी वीज पडली. लख्खकन् प्रकाशाचा झोत जमिनीकडे झेपावला. सर्वजण दचकले. सृष्टी क्रुद्ध झाल्यासारखं तांडव चालू होतं. लक्षणं ठीक वाटत नव्हती.

एवढ्यात श्रीमोटांनी आरोळी मारून राम आणि राजूभाईंना बोलाविलं आणि म्हणाले, "मला ताडपत्रीखाली घेऊन चला आणि गाडीत बसवून द्या. एकदम लगेच ! जराही उशीर करू नका." लगेच ताडपत्री डोक्यावर छत्रीसारखी ठेवून ती तीनचार जणांनी धरली आणि पटकन त्यांना गाडीजवळ नेऊन आत बसवलं.

गाडी सुरू झाली. बाहेर रपारप कोसळणाऱ्या पावसाकडे खिडकीतून पहात श्रीमोटा विचार करीत होते, "जर का या पावसाच्या तडाख्याने रमणभाईंच्या फार्म हाऊसकडे जातांना मध्ये लागणाऱ्या रेल्वेलाईनीखालच्या बोगद्यात पाणी साचलं आणि गाडी पुढे जाऊ शकली नाही, तर ?"

त्यांनी म्हणूनच त्वरा करून गाडी लवकर काढायला लावली होती. गाडी आश्रमाच्या दरवाजामधून बाहेर पडली, आणि लगेच त्याच क्षणी संपूर्ण आश्रमातली वीज गेली, गुडुप अंधार पसरला !

गोरधनकाकांच्या मुखातून सहज उद्गार बाहेर पडले, "नडियाद आश्रमात श्रीमोटा आता परत येणार नाहीत !"

श्रीमोटा देहत्याग करणार आहेत याचा अंधुकशीदेखील जाणीव नंदुभाईशिवाय दुसऱ्या कोणालाच नव्हती.

फाजलपुरला जाताच श्रीमोटांनी नंदुभाईंना सांगितलं, "भाई, तुम्ही रमणभाईबरोबर बोलून घ्या आणि त्यांची संमती नसेल तर सरळ सुरतच्या आश्रमात जाऊन तिथे देहत्याग करायचा."

नंदुभाईंनी रमणभाई अमीन यांना विचारलं, "मोटा तुमच्या फार्मवर देह सोडू इच्छित आहेत. तुमची जर संमती असेल तरच होईल, नाहीतर ते सुरत आश्रमात जाऊन तसं करतील."

ऐकल्यावर रमणभाईंवर आघातच झाला. ते विषण्ण होऊन म्हणाले, "घर मोटांचंच आहे, त्यांची इच्छा असेल तसं करावं."

हे निश्चित झाल्यानंतर सर्वजण आपपल्या कामास लागले. थोड्या वेळातच श्रीमोटांनी चष्मा, माळ आणि घड्याळ रामभाईंना दिलं आणि म्हणाले, "भाईंना देऊन या." त्यांनी लगेच आज्ञापालन केलं.

खरंतर नेहमी श्रीमोटा काही काम असलं तर या वस्तू त्यांच्या सेवेत असलेल्या व्यक्तीस देत आणि काम पूर्ण होताच परत मागून घेत. "आज तसं न करता नंदूभाईकडे का दिलं ?" सर्वांना प्रश्न पडला. काहीतरी वेगळं घडतंय हे सगळ्यांना

जाणवलं, पण उमगलं नाही, अर्थ लागला नाही.

नंदुभाई श्रीमोटांजवळ गेले तेव्हा ते त्यांना म्हणाले, "आज चार वाजेनंतर मी देह सोडीन."

नंदुभाई म्हणाले, "मोटा ! पावसाचे दिवस आहेत. पावसामुळे देहाच्या अग्निसंस्कारास त्रास होईल. तीनएक दिवस थांबता येणार नाही का ?"

कडक आवाजात श्रीमोटा उत्तरले, "हा चर्चा करण्याचा विषय नाहीये !" *

आता पुढे काहीच बोलण्यात अर्थ नव्हता. सर्वजण चिडीचूप झाले आणि चिमणीप्रमाणे बारीक तोंड करून कामाला लागले.

फाजलपुरच्या फार्म हाऊसचं नामकरण अद्याप झालं नव्हतं. त्याचं नाव लिहिलेली पाटी येऊन पडली होती. नाव ठेवलं होतं 'हरिस्मृति'. श्रीमोटांना ती दाखविण्यात आली. ते म्हणाले, "आत्ताच ती लावून टाका."

लगेच व्यवस्था झाली, घरास 'हरिस्मृति'ची पाटी लागली. फार्म हाऊस 'हरिस्मृति' बनलं. श्रीमोटांच्या प्रयाणाच्या दिवशीच ती लागली हा केवढा योगायोग !

तीन वाजताच श्रीमोटांनी रमणभाईना बडोद्याहून फोन करून बोलावून घ्यायला सांगितलं. भेटायला आलेल्या रमणभाईच्या परिवाराच्या सदस्यांना त्यांनी भराभर निरोप दिला.

चार वाजता त्यांनी आतल्या खोलीत आपलं स्वतःचं शरीर नेऊन ठेवायला सांगितलं. मग नंदुभाई, रमणभाई, धीरजबेन, रामभाई, डॉ. कांताबेन आणि राजूभाई अशा

---

* This is not a matter of discussion !

सहाजणांना खोलीत बोलाविलं आणि म्हणाले, ''तुम्हाला आत बसायचं असेल तर आत बसा, बाहेर बसायचं असेल तर बाहेर बसा. आता मला कोणी बोलावू नका, तसंच स्पर्शपण करू नका. हा कॅथेटर माझ्या शरीरापासून दूर करू नका – हा माझा जीवनसाथी आहे'' — त्यांचे हे अंतिम शब्द होते.

श्रीमोटांनी डोळे बंद केले तेव्हा घड्याळ बरोबर चारची वेळ दाखवीत होतं.

श्रीमोटांच्या डोक्याजवळील स्टुलावर बसून नंदुभाई डोळे मिटून 'हरिः ॐ'चा जप करीत होते. सर्वजण खोलीतच कोठेतरी बसून 'हरिः ॐ'ची धून म्हणत होते.

संकल्पित वेळ जवळ आली आणि श्रीमोटांनी पाठीवर सरळ झोपून डोळे बंद करून आपला प्राण खेचण्यास सुरुवात केली.

रात्री १२–३० वाजता डॉ. कांताबेननी नाडीचे ठोके मोजले तेव्हा ते तीस–पस्तीसच्या दरम्यान होते. दुपारी चार वाजता सुरू झालेला देहत्यागाचा क्रियाविधी बरोबर पहाटे १–२५ वाजता (२३ जुलै, १९७६ला) पूर्ण झाला.

नंदुभाई 'हरिः ॐ' च्या जपात मग्न होते, पण एक वाजता अचानक त्यांच्या अंतरी स्फुरण झालं की श्री अरविंदांना जो आजार होता तोच 'प्रोस्टेट ग्लँड'चा आजार श्रीमोटांना आहे, श्री अरविंद यांनी देह सोडला तोच वार आज आहे; आणि त्यांनी रात्री १–३० वाजता देह सोडला; तेव्हा श्रीमोटापण त्याच सुमारास देह सोडतील अशी दाट शक्यता आहे. १–२५ वाजता जेव्हा नाडी पाहिली तेव्हा ठोके अजिबात नव्हते, हृदयावर स्टेथोस्कोप ठेवून पाहिला तर तेही बंद होतं !

पंचमहाभूतांना परत करण्यासाठी आपलं शरीर श्रीमोटांनी मोकळं करून दिलं होतं !

❖

## १०. "अग्नये स्वाहा: ।..."

श्रीमोटांच्या देहाची दहनक्रिया सकाळी सहा वाजता ठेवण्यात आली. आत्ताशी रात्रीचा दीड वाजला होता. पाच-साडेपाच पर्यंतच्या वेळात महत्त्वाची कामं उरकता येणार होती, उरकायलाच हवी होती ! अतीव दु:खशोक बाजूला ठेवून नंदुभाई श्रीमोटांच्या स्वजनांना आणि चाहत्यांना तारेने आणि टपालाने संदेश देण्यामागे लागले. टाईपरायटरच्या मशिनवर बोटं सराईतपणे फिरून खाली फटाफट् अक्षरं उमटत जावीत त्याप्रमाणे नंदुभाई जसजसं सुचेल तसतसं भराभर लिहीत जात होते. पहाटे साडेपाचपर्यंत श्वास घ्यायलादेखील उसंत न घेता हेच काम चाललं होतं.

रात्रीचा काळाकुट्ट अंध:कार आता ओसरला होता आणि पहाटेचा मंद प्रकाश पसरू लागला होता. श्रीमोटांच्या देहत्यागानंतर लगेच रमणभाईंनी फार्म हाऊसचे व्यवस्थापक छगनभाई यांना चार वाजता बोलावून चितेसाठी कोरड्या लाकडांची व्यवस्था करायला सांगितलं होतं.

पावसाळ्याच्या दिवसात कोरडी लाकडं मिळणं कठीणच आहे असं छगनभाईंना वाटलं, तरीही पंधरावीस मण लाकडांची व्यवस्था होऊन गेली.

महीनदीचं पाणी जोरजोरात वहात होतं. बाजूलाच चिता रचण्यात आली. बरोबर याचवेळी काल श्रीमोटा नडियादहून फाजलपुरला यायला निघाले होते. आणि आज आता हा देह

ज्वाळांच्या स्वाधीन होणार, दृष्टीआड जाणार या विचारांनी सर्वांची हृदयं जड झाली होती, डोळ्यांच्या पापण्या ओल्या झाल्या होत्या. आपण आज पोरके झाले, आपली आई सोडून गेली या भावनेने सर्वांची हृदयं आक्रंदन करीत होती.

एकदोन घटकांमध्येच श्रींचं शरीर आता डोळ्यांसमोरून खरोखरीच नाहीसं होणार आहे यावर विश्वास बसत नव्हता; "किती भराभर काळ उलटून गेला ? जणू काही एखादं स्वप्नच ! आता मागे राहणार त्यांचे चैतन्य, जे कधीच नाहीसं होणार नाही... पण हे शरीरमात्र आता परत दृष्टीस पडणार नाही."... स्वतःच्या मनावर ताबा ठेवून श्रींच्या देहास स्पंजिंग करण्यात आलं. प्राणविहीन कलेवर सर्वांनी उचललं आणि आळीपाळीने खांदा देतदेत नदीकिनारी जड पावलं पडू लागली. चालताचालता डोळ्यांतून ओघळणारे अश्रूंचे थेंब ओल्याचिंब मातीत टपटप पडत होते. घडणाऱ्या घटेनेची चाहूल लागल्यामुळे मेघराजाने आधीच रडून घेतलं होतं आणि आता कोरड्या डोळ्यांनी भकासपणे तो त्या देहाकडे पहात होता. स्वेच्छेने देहाची खोळ अलगद काढून ठेवणाऱ्या, विधात्याच्या त्या लाडक्या बाळाच्या अग्निसंस्काराच्यावेळी आपण आपलंही दुःख बाजूला ठेवून शांत बसायला पाहिजे आणि मूकपणे ते पहायला पाहिजे याची जाणीव त्या मेघराजालादेखील होती.

चितेवर ठेवलेल्या देहास अग्नीने हळुवारपणे स्पर्श केला. आणि थोड्याच वेळात लवलवत्या ज्वाळा उंच उंच भगभगू लागल्या. 'इदं न मम...' म्हणत दिलेली ती श्रीमोटांची अंतिम आहुती अग्नीने स्वीकारली होती. एवढ्या पवित्र शरीराची आहुती त्याला बऱ्याच दिवसानंतर मिळाली होती. त्याने ती

अधाशीपणे स्वाहा करण्यास सुरूवात केली आणि ती काया आता भस्मीभूत होऊ लागली. डोळ्यात प्राण एकवटून बारा डोळे हे पहात होते. श्रीमोटा म्हणत असत, "ज्या गोष्टीचा कोणीच साक्षी नसेल त्याविषयी मी कधीच बोलत नाही."... केवळ सहाजणांच्याच उपस्थितीत देह भस्मीभूत झाला याला साक्षी होते हे बारा डोळे, पंचमहाभूतं, आणि अवघी सृष्टी ! जगाला जर या घटनेची चाहूल लागली असती तर जत्रेप्रमाणे माणसांची रीघ लागली असती. पण हारतुरे, स्मशानयात्रा, भाषणं, स्मारक या सर्वांपासून हा साधासुधा महान दिव्यात्मा दूर होता, मैलोगणती दूर होता, अस्पर्शित होता !

आपली आहुती पूर्णपणे ग्रहण करून अग्निदेवता आता शांत झाली होती. सर्व अस्थी आणि रक्षा गोळा करण्यात आल्या. त्या दिव्य अस्थी आणि रक्षा पोटात घेऊन नदीचंदेखील शुद्धीकरण झालं.

श्रीमोटांनी आपला देह पंचमहाभूतांना पूर्णत्त्वाने परत केला होता, त्या देहाची चिमूटभर राखसुद्धा मागे राहिली नव्हती. मागे राहिलं त्यांचं नाव, त्यांच काम, त्यांचं 'मी सर्वत्र विद्यमान आहे' हे आश्वासन, त्यांचं सर्वव्यापी चैतन्य आणि भक्तांच्या हृदयातील त्यांचं अढळ स्थान !

एका परिपूर्ण कर्मयोग्याच्या निष्काम कर्मयोगाची सांगता झाली होती !

॥ हरिः ॐ ॥

# खंड दोन

## परिशिष्ट

"मला समाजास बसतं करायचं आहे."

-पूज्य श्रीमोटा

## १. सद्गुरूंविषयी–पूज्य श्रीमोटांच्या शब्दात

❑ **समर्थ सद्गुरु :**

श्रीमोटा म्हणाले आहेत, ''प्रभुकृपेने 'या जीवा'चे सद्गुरु इतके समर्थ होते की त्यांनी जर ठरविलं असतं तर हा गधाशंकर त्यांच्या सहजकृपेच्या केवळ इशाऱ्यानेच चैतन्यात स्थिर होऊ शकला असता.''

❑ **''गुरूंनी मला पकडलं'' :**

बऱ्याचवेळा श्रीमोटांना भक्तांद्वारे विचारण्यात येई, ''तुम्ही तुमच्या गुरूंबद्दल सांगा.''

तेव्हा ते म्हणत, ''गुरूंनी मला पकडलं होतं. मी काही गुरूंना पकडलं नव्हतं.

''युवावस्थेच्या सुरुवातीपर्यंत या मार्गात जाण्याची इच्छा किंवा जिज्ञासा प्रगट झाली नव्हती.

''भूगर्भात पेट्रोल असलं तरच ते बाहेर येऊ शकतं, तसंच माझ्यात देशसेवा करण्याची जी प्रचंड धुंद * होती, तीच गुरुमहाराजांनी साधनेच्या क्षेत्रात वळविली.

''सुरुवातीस गुरूंच्या मदतीचं आणि त्यांच्या शक्तीचं, कलांचं मला काहीच भान नव्हतं. (जाणीव नव्हती.) त्यांनी मला फक्त साधना सांगितली : स्मरण, प्रार्थना, भजन, आत्मनिवेदन करणे. अभय, नम्रता, मौन, एकान्तवास इत्यादी प्रगटविणे.''

❑ **''माझे खरे गुरु केशवानंदजी – धुनीवाले दादाजी :''**

''मला साधनेत प्रथम प्रवेश करविणारे बालयोगी महाराजच होते.कुंभ मेळयात त्यांनाच भेटण्यास धावत गेलो होतो.

* धुन

"माझे खरे गुरु केशवानंदजी – धुनीवाले दादाजी. परंतु केशवानंदजी, साईबाबा वगैरे एकाच चैतन्याचा आविर्भाव आहेत असं दादांना बोलतांना मी ऐकलंय."

**❑ 'ते सर्व मीच आहे' :**

सुरुवातीसुरुवातीस जेव्हा माझं गुरुमहाराजांकडे जाणं झालं होतं, तेव्हा त्यांना कितीतरी वेळा बोलतांना मी ऐकलंय : "मी साईबाबा आहे, मी ताजुद्दीन बाबा आहे, मी उपासनी महाराज आहे, मी अक्कलकोट स्वामी आहे..." अशी बरीच नावं ते मुखाने घेत आणि परत म्हणत, "ते सर्व मीच आहे."

मला हे नीटसं कळलं नाही आणि मी विचारात पडलो, तेव्हा स्वतःच्या हृदयप्रदेशाकडे बोट करून ते म्हणाले, "इथे पहा !" आणि पाहिलं तर ते चारही महात्मा तिथे विराजमान होते.

**❑ सद्‌गुरु भावनारूप, चैतन्यरूप आहेत – स्थूल नव्हे !**

"सद्‌गुरु हे स्थूलरूप नव्हे, तर चैतन्यरूप, भावनारूप आहेत, "अशाप्रकारे त्यांचं स्मरण, त्यांचा चैतन्यभाव – आपले विचार, कर्म, व्यवहार, संबंध इत्यादींमध्ये जिवंत राहील असा अभ्यास करीत राहाल तर आपल्या हृदयात त्यांच्या उपस्थितीचा अनुभव होईलच !

**❑ गुरु शरीरधारी असूनही, व्यक्ती असूनही, व्यक्ती नाही.**

**❑ गुरुस जिवंत ठेवणं – आधार साधकावर :**

गुरुस जिवंत ठेवायचं की मुडद्याप्रमाणे ठेवायचं हे साधकाच्या किंवा भक्ताच्या आधारावरच अवलंबून आहे.

**❑ "...अन्यथा गुरुसुद्धा लुळेपांगळे असतात."**

आपल्या आधाराच्या प्रत्येक '...करणात' त्यांच्याविषयी जिवंत जागृत भाव समर्पणभावाने नसेल तोपर्यंत गुरुसुद्धा लुळेपांगळे असतात.

**❑ गुरुस सक्रिय ठेवा :**

गुरूच सक्रिय ठेवण्यासाठी खऱ्या हृदयाने आपणास आपल्या हृदयात गुरूंशी एकरूप व्हायला हवं, तरच योग्य गुरु योग्य साधकाला गतिमान करू शकतात.''

**❑ हृदयाशी जोडले जाताच मग सद्गुरूंच्या स्थूल संपर्काची आवश्यकता रहात नाही :**

''प्रेमभक्तीने हृदयाशी जोडले जाताच मग सद्गुरूंच्या स्थूल संपर्काची आवश्यकता रहात नाही.

''जो सद्गुरूंना स्थूल प्रकारे पाहतो, तो खरा साधकच नाही.''

**❑ गुण आणि भावांचा विकास हवाच :**

''प्राप्त कर्मे करीतकरीत गुणांचा आणि भावांचा विकास करा, तरच आध्यात्मिक साधनेच्या भावनेचा विकास होईल.''

**❑ स्वतःच्या आधारात[१] सद्गुरूंना जिवंत करा :**

श्रीमोटा म्हणत, ''गुरु हे शरीरधारी असूनही, व्यक्ती असूनही, व्यक्ती नाहीत !

''गुरूंची मदत ही एक वस्तुस्थिती[२] आहे, सत्य आहे आणि ती मिळू शकते, फक्त आपण जर आपल्या आधारात त्यांना जिवंत करू शकलो, तरच !''

**❑ हे करायचे कसे ?**

आपल्याला गुरूंची मदत हवी असल्यास स्वतःच्या आधारात सद्गुरूंना जिवंत करायला हवं ही समज मला सद्गुरूंकडूनच मिळाली असं श्रीमोटा म्हणत.

१ अंतरी स्वतःत, 'आपण स्वतः' हा पाया

२ वास्तविकता

ते करण्यासाठी सुरुवातीस श्रीमोटा गुरुमहाराजांचं स्वरूप स्वतःच्या डोळ्यांसमोर सतत ठेवून त्यांच्याशी बोलू लागले, निवेदन करू लागले आणि अशाप्रकारे रोज शेकडो वेळा त्या स्वरूपास अंतर्चक्षूंनी पाहू लागले.

हळूहळू असं करताकरताच गुरुमहाराजांच्या स्वरूपाचा सूक्ष्म भाव त्यांच्या स्वतःच्या आधारात प्रगट होऊ लागला.

**❑ सद्‌गुरूंचं साकार स्वरूप प्रगटविणं नेहमीच शक्य झालं :**

श्रीमोटा म्हणाले आहेत, "माझे सद्‌गुरु 'जिवंत समर्थ' आहेत. त्यांनी प्रेमभावाने माझा हात धरला आहे.

"प्रभुकृपेने माझ्या हृदयातील भावामुळे त्यांचं साकार स्वरूप प्रगटविणं नेहमीच शक्य होत आलं आहे.

"तसंच अंतरीसुद्धा त्यांना जागविणं आणि त्यांची मदत आणि प्रेरणा प्राप्त करणं शक्य झालं आहे.

"श्रीसद्‌गुरूंचं प्रेमभक्ती, ज्ञानभक्तीपूर्वक अवलंबन आणि त्यातून प्राप्त होणारा भाव आणि शक्ती हे अनोखंच असतं !"

**❑ लहानपणी हिमालयाची स्वप्ने :**

लहानपणी मला हिमालयाची स्वप्ने पडत असत. हिमालयात जाण्याची वारंवार प्रेरणा होई. एवढंच नव्हे, पुढे साधनाकालातही अशी प्रेरणा होई. मग गुरुमहाराजांनी सद्‌भावना प्रगटविली की 'तुज चरणे'ची प्रार्थना छापून त्या रकमेतून हिमालयाची यात्रा कर !"

**❑ गुरुमहाराजांचं स्वप्नात दर्शन आणि साधनेचं मार्गदर्शन :**

श्रीमोटा रोज रात्री स्मशानात झोपायला जात. तेव्हा एकदा त्यांना स्वप्नात गुरुमहाराजांचं दर्शन झालं आणि श्रीमोटांना त्यांनी काही साधना सांगितली.

स्वप्न मिथ्या आहे असं मानून श्रीमोटांनी त्याला महत्त्व दिलं नाही. दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या दिवशीदेखील तेच स्वप्न पडलं तरीही त्यांनी लक्ष दिलं नाही.

पाचव्या दिवशीपण तेच स्वप्न पडल्यावर मात्र श्रीमोटांना वाटलं, ''सतत एक प्रकारचं स्वप्न पडतंच याला काहीतरी निश्चित अर्थ असला पाहिजे ! त्या स्वप्नाप्रमाणे करून पहायला काय जातंय ?'' असा विचार करून स्वप्नानुसार साधना करायला त्यांनी सुरुवात केली. पाचवेळा स्वप्नात सांगितल्यावर आपल्याला त्याचं महत्त्व कळलं म्हणजे आपली ग्रहणशक्ती* फार कमी आहे हे त्यांना त्यावेळी खूप सललं आणि उत्कट प्रार्थनाभावदेखील प्रगट झाला.

त्यानंतर स्वप्नांद्वारे गुरुमहाराजांनी त्यांना अनेक प्रकारच्या साधना सांगितल्या, आणि मग त्यांच्या लक्षात आलं, ''अरे, गुरु ही केवढी मोठी आध्यात्मिक शक्ती आहे !''

**❑ जप, ध्यान, धारणा :**

''जपाचं उद्‌भवस्थान हृदय आहे. जपदेखील शेवटी एक भावच आहे. जर आपण जप हृदयाच्या स्पंदनांबरोबर करू, तर ध्यानसुद्धा आपोआप तिथे असेलच.

''हा अभ्यास स्थिर होताच जप हृदयात स्वतंत्रपणे होत राहील आणि जर त्यात भावपण प्राप्त झाला तर धारणादेखील असेल. असे तिन्ही — जप, ध्यान आणि धारणा — एकाच वेळी घडतील.

**❑ आशीर्वाद आणि कृपा केव्हा प्राप्त होईल ?**

''साधुसंतांकडे पळत जाऊन लोक आशीर्वाद आणि कृपेची याचना करतात ही निव्वळ मूर्खता आहे. काहीही न करता

*Receptivity

आशीर्वाद आणि कृपेची मागणी केल्यामुळेच समाज लुळा झाला आहे. आशीर्वाद दिल्याने तो दिला गेला आहे असं घडत नाही. तो सहज वहात असतो, सूर्यप्रकाशाप्रमाणे ! तो प्राप्त करण्यासाठी आधी पात्रता, योग्यता प्राप्त करा, मग तो आपोआप प्रगटेल.''

❑ **चैतन्यनिष्ठ पुरुषांची लक्षणे :**

''साक्षीभाव, तादात्म्यभाव आणि करुणा हे तीन प्रमुख गुण आहेत.''

❑ **''ज्याचा साक्षी नाही, ते बोललो नाही :''**

त्यांना साधनेत प्रत्यक्ष मदत करणारे स्वामी समर्थ अक्कलकोट महाराज व ताजुद्दीनबाबा (नागपूर येथील) यांच्याविषयी नंदुभाईसारख्या हृदयसंबंध असलेल्या व्यक्तीसही त्यांनी सांगितले नाही, कारण ''ज्याचा साक्षी नाही ते सांगू नकोस,'' असा त्यांना सद्‌गुरूंचा आदेश होता.

❑ **''सद्‌गुरूंचा हुकूम नाही म्हणून...''**

ते म्हणाले आहेत, ''जीवनात अनेक रोमांचक अनुभव आले, सद्‌गुरूंनी केलेली कृपा, मदत याविषयी अनेक घटना घडल्या आहेत, परंतु जोपर्यंत चैतन्यभावात पूर्ण निष्ठा प्राप्त झालेली एखादी व्यक्ती भेटत नाही तोपर्यंत लिहिण्याचा सद्‌गुरूंचा आदेश नाही.''

❑ **गुरुमहाराज शत्रूप्रमाणे चिकटले :**

''माझे गुरुमहाराज तर मला शत्रूप्रमाणेच चिकटले होते. कितीतरी वेळा कडू गोळ्या त्यांनी प्रेमाने गिळायला लावल्या आहेत.

''एवढं काही करायला लावलं आहे की ते ऐकलं तर तुम्ही लोक हबकूनच जाल.''

❖

# २. पूज्य श्रीमोटा - एक बहुरंगी व्यक्तीमत्त्व

श्रीमोटांच्या व्यक्तीमत्त्वाचे अनेक पैलू आहेत, त्यापैकी काहींचा अतित्रोटक परिचय करून देणे अगत्याचे आहे.

**(१) लोकलज्जा आणि लोकनिंदेपासून मुक्त :**

❑ **विचित्र पोषाख :** नाडीची हाफपँट आणि डोक्यास रूमाल गुंडाळलेला व बाकी शरीर उघडेबंब या पोषाखात 'हरिजन सेवक संघा'चे प्रमुख म्हणून वावरण्यास त्यांना संकोच नसे. लग्नात वा बाहेरसुद्धा अशा प्रकारचा पोषाख, किंवा लुंगीप्रमाणे धोतर नेसून डोक्याला टॉवेल हा पोषाख असे.

❑ **बांगड्या घालून प्रवास :** मस्करीत घालायला दिलेल्या सोन्याच्या बांगड्या त्यांनी घालून दाखविल्या, एवढेच नव्हे तर पैजेप्रमाणे कुंभकोणम, त्रिची, मद्रास, मुंबई, अहमदाबाद असा प्रवासही त्या बांगड्या घालून केला, कारण त्यानंतर त्या बांगड्या त्यांना मिळणार होत्या, त्या बांगड्या त्यांनी नंतर साबरमती आश्रमास समाजसेवेसाठी देऊन टाकल्या.

❑ **स्त्रियांचे कपडे घालून मंदिरात :** स्त्रियांची भावना प्रगट होण्यासाठी व कन्याकुमारी मातेच्या दर्शनाच्यावेळी तन्मयता प्रगटविण्यासाठी स्त्रियांचा पोषाख करून ते मंदिरात गेले होते.

❑ **"मी गाढव आहे !" :** चिडून त्यांना कोणीतरी म्हणालं, "तुम्ही गाढव आहात," तर त्यावर न रागावता त्यांनी काव्य रचले - भावार्थ-"मी गाढव आहे, कारण मी ईश्वरास विसरलो आहे."

**( २ ) घृणेपासून मुक्ती :**

एकदा मध्य प्रदेशात ते एक महिना साधनेसाठी गेले होते. तेव्हा खडकातील विहिरीसारख्या भागात ते दोर लावून उतरले व तिथे चोवीसपंचवीस दिवस आहाराविना स्वतःचीच विष्ठा खाऊन व स्वमूत्र पिऊन राहिले होते. काहीही खाल्ल्याविना रोज मळ निघे. "दुर्गंध नव्हता व शेणासारखी चव लागत असे," असे ते म्हणाले. "घृणा वाटली नाही. घृणा, स्वाद-अस्वाद, सुंदरता-असुंदरता या द्वंद्वांच्या पार होणे हा हेतु होता. अत्यंत उत्कट भावनेच्या भरात हे घडले. यास अघोरपंथी साधनादेखील म्हणू शकता. मला स्वतःला सुचलं म्हणून मी हे केलं, कोणाच्या आदेशाने नव्हे," असेही श्रीमोटा म्हणाले.

**( ३ ) स्थितप्रज्ञ :**

नडियाद हरिः ॐ आश्रमात ८ x १० फूट एवढ्या छोट्याशा खोलीत ते रहात. पंखाही नसे. आश्रमाच्या सुरुवातीस जड पेटी डोक्यावर घेऊन बऱ्याच वेळा चालतचालतच पाच मैल दूर असलेल्या नडियाद स्टेशनवर जात.

**( ४ ) नम्रता व सेवावृत्ती :**

❑ **नम्रता :** आपल्या सहकाऱ्यांच्या जड ट्रंका घेऊन जाणं, 'हरिजन सेवक संघा'त मजुराप्रमाणे काम करणं, मलमूत्र साफ करणं हे पण बऱ्याच वेळा घडलं आहे.

❑ **सेवावृत्ती :** रात्ररात्र जागून रोग्याची काळजी घेणं, स्वजनच नव्हे तर सेवकवर्गाचीदेखील काळजी घेणं, सेवा करणं घडत असे.

❑ **नववर्षाची भेट :** आपल्या सहकाऱ्याचा मुलगा मोहन याने नववर्षदिनी गंमतीखातर भेट म्हणून दिलेली चिमूटभर धूळ त्यांनी लगेच भावपूर्वक खाऊन टाकली.

❑ **"शौचाला जाऊ नका :"** 'हरिजन कन्या छात्रालया'तील मुली जर गंमतीने म्हणाल्या, "चुनीभाई, शौचाला जाऊ नका," तर ते "असं ?" म्हणून लगेच परत फिरत. स्वतःच्या धारणा, मते, आग्रह इत्यादी तोडणे हा हेतु असे; साधनेचा भाव असे. नम्रतेस परकोटीच्या टोकापर्यंत–शून्यापर्यंत घेऊन जायचा त्यांचा प्रयत्न असे.

**(५) नोकराचाकरांप्रती समानता :**

ते गाडीत नेहमी ड्रायव्हरच्या बाजूलाच बसत. शेठ आणि ड्रायव्हर असा भेद मनी नसे. त्याच्याशीदेखील प्रेमाने बोलत.

**(६) नोकराचाकरांप्रती उदारता व क्षमाशीलता :**

नोकराचाकरांनी चोरी केली, वा त्यांच्यात इतर कोणतेही दोष असले तरी कधीही त्यांचा त्याग केला नाही, उलट अधिक प्रेम देऊन आपलंसं केलं. प्रेमाने सर्वांना जिंकलं. त्यांना चुकांबद्दल क्षमा केली.

**(७) आई आणि शिक्षक :**

लहान मुलांचे मलमूत्र साफ करणे, त्यांना स्नान घालणे, खेळविणे, फिरविणे, सगळ्यांसमोर त्यांचा 'घोडा' बनणे, चाकांच्या बाबागाडीतून ओढतओढत भर बाजारात जाऊन येणे, त्याला शेजारी घेऊन झोपणे याप्रमाणे आईची भूमिकासुद्धा पार पाडीत.

**(८) साधना गुप्त :**

ज्यांच्याबरोबर ते वर्षानुवर्षे काम करीत, त्या ठक्करबाप्पांना अथवा हेमंतभाई नीलकंठ यांच्यासारख्या सहकारी मित्रांना, तसेच तुरूंगवासातील सहकाऱ्यांना – कोणालाच त्यांनी ते साधना करीत असल्याची जाणीव होऊ दिली नाही. सर्वांना हे खूप उशिरा कळले.

**(९) शिष्य केले नाहीत :**

कोणालाही स्वत:हून शिष्य केले नाही वा शिष्य होण्यास सुचविले नाही. मात्र साधनेत उन्नती करण्याची खरी भावना असणाऱ्यांना प्रेमाने मदत केली. ''मी गुरु नाही,'' असेच ते म्हणत. कोणालाही त्यांनी दीक्षा दिली नाही.

**(१०) अभय :**

त्यांचे सौराष्ट्रातील मित्र वजुभाई यांच्याबरोबर अभयप्राप्तीसाठी गिरनारच्या जंगलात सिंहांबरोबर, त्यांच्यामध्ये सात दिवस राहिले होते.

**(११) लक्ष्मीचा उपयोग केला, उपभोग घेतला नाही :**

लक्ष्मीची कधीच उपेक्षा केली नाही. ती 'शक्ती' आहे असे ते मानीत. मात्र ज्यांच्या जीवनात 'गुण' आणि 'भाव' प्रगट झालेले नाहीत अशांना प्राप्त झालेली लक्ष्मी जीवनाचा उत्कर्ष करू शकत नाही असे ते सांगत.

**(१२) ''ढोंगी संत ?'' :**

एकदा एकजण त्यांना म्हणाला, ''मोटा, तुम्हांस रोगबिग काही नाहीत. हे देखाव्यापुरतं आहे, ढोंग आहे.'' एकदोनदा

तो हे बोलल्यानंतर ते वाक्य धरून ते म्हणाले, ''तू एक सोन्याचा मुकुट बनव व त्यावर मोठ्या अक्षरात 'ढोंगी संत' लिहून दे. तो मी जाहीररीत्या घालीन म्हणजे लोकांना याची जाणीव होईल.'' बोलणाऱ्यास पश्चात्ताप झाला तरी ते मागे हटले नाहीत. शेवटी तसा मुकुट त्याने बनवून दिला व श्रीमोटांनी तो जाहीररीत्या घातला. त्याचे फोटो काढलेले आहेत.

**( १३ ) भावोद्रेक :**

कोणाला पाहताच ते सद्‌गदित होत, डोळ्यांत अश्रू येत, इतके ते भावाविष्ट होत. ते म्हणत, ''भाव' जर नसेल तर संबंधांना काहीच अर्थ नाही. संबंध 'जिवंत–जागृत' असतो तो भावामुळेच !''

**( १४ ) वृक्षप्रेमी :**

नडियादला, साबरमती आश्रमात व इतरत्रही अनेक झाडे वाढविली. आश्रमातील वृक्ष शक्य तो कापू देत नसत. नडियाद आश्रमातील वडाच्या वाढलेल्या पारंब्या जमिनीत खोलवर पुरून वृक्षाचा विस्तार वाढविला व मजबूत केला.

गुजराथमधील सर्वात जुन्या व भावनेने महत्त्वाच्या अशा 'कबीरवडा'चं (भक्त कबीर जेव्हा गुजराथमध्ये आले होते तेव्हाचा) रक्षण केलं, पुनरुद्धारासाठी मेहनत घेतली व निधीसुद्धा दिला.

**( १५ ) लहानांची कदर :**

नोकरचाकर व लहानांबरोबर समानतेची, प्रेमपूर्ण वागणूक असे. सर्वजण एकाच पंक्तीत जेवण घेत, मग तो ड्रायव्हर असो, मजूर असो, हजाम असो वा भंगी असो.

**( १६ ) प्रार्थना :**

साधनेच्या सुरुवातीपासून प्रार्थनेवर फार भर होता. वैयक्तिक प्रश्न, गुंते, साधनेतील अडचणी हे सर्व साधनेने सुटतात असं ते सांगत.

"मी भगवंताचा नोकर आहे, चाकर आहे, मुनीम आहे, मी प्रार्थनेद्वारा त्याच्या चरणी सर्व सांगेन," असं श्रीमोटा येणाऱ्या प्रत्येकास सांगत.

**( १७ ) साहित्य सृजन :**

शिक्षण गुजराथी विषय घेऊन बी. ए. पर्यंतचेच ! तरीही सहासष्ट पुस्तके लिहिली आहेत. सुरुवातीस नावाविना छापली जात. बरीच पुस्तके पत्रांचे संग्रह आहेत; काव्ये, भजने, प्रार्थना इ. पण !

त्यांचे उपलब्ध बोल, मुलाखती, प्रवचने इत्यादी जे टेप केले गेले आहे, त्याची पुस्तके प्रकाशित होत आहेत.

जिज्ञासा, श्रद्धा, निमित्त, रागद्वेष, कर्मोपासना, कृपा, स्वार्थ, प्रेम, मोह अशा विषयांवर पुस्तके लिहिली. ज्याने जे सुचविलं आणि छपाईच्या खर्चाची जबाबदारी स्वीकारली, त्या त्या विषयांवर लिहित गेले.

गीतेशिवाय अन्य कोणतंही शास्त्र त्यांनी वाचलं नाही, तरीही भगवत्कृपेमुळे हे सर्व 'अवतरण' झालं.

बरंचसं प्रसिद्ध असलं तरी अप्रसिद्ध शिल्लक आहे.

❑ **"हा भगवंताचा प्रताप"** : श्रीमोटा म्हणाले आहेत, "हा सर्व माझा नव्हे, तर भगवंताचा प्रताप आहे. गुरुमहाराज एकदा मला म्हणाले, "तू भगवंताचे 'नाम' बरोबर घे, आणि मग बघ तुझ्यात कशी शक्ती जागृत होते ती !"... माझ्या गुरुमहाराजांचं हे वाक्य आज खरं ठरलं आहे."

❑ **"सर्व त्यांनी लिहवून घेतलं :"** माझी साधनेवरील पुस्तकेपण त्यांनीच लिहवून घेतली आहेत.

ते म्हणाले, "माझ्या शरीरात अनेक रोग होते आणि हृदय पिळवटून जावं अशा प्रचंड वेदना असतांनादेखील भजनं उतरत गेली, ती, कोणीतरी आतमध्ये जागृत राहून, लिहवून घेत असल्याशिवाय असेल का ?"

पुढे ते अजून सांगतात, "भगवंताने मला बुद्धूचा विद्वान बनविलं आहे ही गोष्ट खोटी नाही. जसं माझं स्मरण एकधारी सुरू आहे, तसंच माझं लिखाणही एकधारीच सुरू आहे."

**(१८) शरीर अनेक रोगांचे घर, तरीही कार्यरत :**

त्यांच्या कमरेचे चारपाच मणके जवळजवळ खलास झाले होते. शेवटची बरीच वर्षे ते चालूही शकत नव्हते. त्यांना चाकाऱ्या खुर्चीवर उचलून बसवून ठेवून फिरवावं लागत असे. मणक्यांमध्ये सतत पिन खुपसल्यासारख्या असह्य वेदना असत.

सर्पदंशाची उष्णता शरीरात होतीच.

'ग्लॉकोमा' असल्यामुळे प्रचंड डोकेदुखी असे. ॲसिडिटी, संग्रहणी, शरीरात पाणी भरणे, गळा दुखणे, चामडीची ॲलर्जी, खाज हे सर्व प्रकार होते.

अचानक हल्ला करणारा दमा अनेक वर्षे सोबतीस होता. बऱ्याचवेळा ऑक्सिजन घ्यावा लागत असे.

'प्रोस्टेट ग्लँड'चा आजार, मूत्रपिंडांचे आजार, मूळव्याध हे रोगसुद्धा होतेच.

क्षय, मधुमेह बरेच दिवस होते, नंतर ते बरे झाले.

❑ **रोगांची कारणे :** चैतन्यस्थित पुरुषांच्या संपर्कात ज्या ज्या व्यक्ती येतात, त्यांच्याविषयी तादात्म्यभाव निर्माण

झाल्यामुळे, अथवा करुणेमुळे, त्या त्या व्यक्तींची दुःखे, रोग, भोग त्यांच्यावर परिणाम करून जातात. काही शरीरातून पसार होतात, काही शरीरास चिकटून राहतात.

**❑ तादात्म्यभावाने रोग – काही उदाहरणे :**

संत रोग अंगावर घेत नाहीत, घेण्यात प्रयत्न आहे. सहजतेने, निमित्ताने ते घडते. जसे –

१. श्रीमोटांची पुतणी क्षयाने आजारी असतांना तिच्यासाठी भगवंताला प्रार्थना केली आणि त्यांना खोकला व रक्ताच्या उलट्या होऊ लागल्या.

२. जयाबहेनना प्रसूतीच्या वेळी असह्य प्रसूतीवेदना होत असतांना त्यावेळी त्यांनी पोटदुखी सहन केली व जयाबहेनना आराम पडला.

३. गांधीजींना चरणस्पर्श करून नमस्कार केल्यानंतर गांधीजींच्या लघ्वीतले विषारी जंतु त्यांच्या लघ्वीत आढळून आले व बरेच दिवस मूत्रपिंडांच्या आजार होता.

४. मधुमेह....व...

५. स्पाँडिलायटिस – हे दोन्ही आजारसुद्धा असेच झाले.

**(१९) "मी स्त्रीदेहात जन्म घेणार आहे."**

त्यांनी सांगितलं आहे, "मला स्त्रियांसाठी स्त्रियांमध्ये राहून कार्य करायचं आहे. या पुरुषदेहात राहून मी त्यांच्यासाठी पाहिजे तितकं कार्य करू शकलो नाही, म्हणून मी स्त्रीदेहात जन्म घेईन, पण एवढ्यात नव्हे !" ते पुढे अजून म्हणाले की या जन्मीच्या त्यांच्या भक्तांनादेखील ते बरोबर घेऊन येणार आहेत, आणि म्हणूनच काही कालाने ते हा स्त्रीजन्म घेणार आहेत. 'पोरं जन्माला घालणारी' अशी स्त्री नव्हे, तर झाशीच्या राणीप्रमाणे मर्दानी, कणखर,

दृढ अशा व्यक्तीमत्त्वाचा तो स्त्रीजन्म असेल हेदेखील त्यांनी आवर्जून सांगितलं.

**( २० ) कार्याचा हेतु :**

❑ **''मला समाजास बसतं करायचं आहे :**

'' सध्या समाजात जी स्वार्थवृत्ती बोकाळली आहे, ती दूर होऊन समाजाच्या उत्थानासाठी जोपर्यंत प्रयत्न होत नाहीत, तोपर्यंत मिळालेल्या स्वराज्यास अर्थ नाही. या लुळ्यापांगळ्या समाजात मर्दानगी, साहस, हिंमत, शौर्य, धैर्य, कणखरता, झोकून देण्याची प्रवृत्ती अशा गुणांचा उगम होत नाही तोपर्यंत केवळ हॉस्पिटल्स, मंदिरे आणि धर्मशाळांना मदत करून वा चालवून काही उपयोग नाही,'' असं ते म्हणत.

❑ **'गुण' आणि 'भाव' यांचा विकास नसेल तर पांगळेपणा :**

श्रीमोटांची दृढ धारणा होती की ज्या समाजात 'गुणा'चा आणि 'भावा'चा विकास झाला नसेल तो आध्यात्मिकदृष्ट्या पांगळा समाज आहे.

'भाव' व 'गुणां'च्या विकासासाठी निरनिराळ्या प्रकारची संस्कारवर्धक, भक्तीवर्धक, ज्ञानवर्धक पुस्तके-ग्रंथ-बालसाहित्य-यांचे प्रकाशन करून त्यांनी मोठ्या प्रमाणावर कार्य केलं.

पुस्तकाची पृष्ठमर्यादा ध्यानी घेऊन अत्यंत संक्षिप्तपणे त्यांच्या काही पैलूंवर प्रकाश टाकला आहे. 'शितावरून भाताची परीक्षा' या न्यायाने अप्रगट असा भाग ज्याने त्याने अंतरी मौनात जाणून घ्यावा हेच इष्ट !

❖

## ३. साधनेसंदर्भात – पूज्य श्रीमोटांच्या शब्दात

❑ **''साधनेत एकाश्रयी रहा, गुरुभाव दृढ करा'' :**

साधनेत एकाश्रयाची विशेष आवश्यकता आहे. ज्यास गुरु मानलं आहे त्याच्याच आधीन राहणं व त्याच्या मार्गदर्शनाने जात राहणं आपणास हितावह आहे. मात्र आपली दृष्टी आणि मन संकुचित व्हावं, असा याचा अर्थ नव्हे.

अन्य महात्म्यांबद्दल अन्यथा (कमी जास्त) भाव असता कामा नये. प्रसंगोपात्त अनायासे एखाद्या साधुमहात्म्याकडे जाणं झालं तर त्यांच्यातही 'गुरुभाव' दृढ केला पाहिजे'[१] तरीही इकडेतिकडे धावाधाव करण्याची गरज नाही. ''मोटा'[२] उपासनीबाबा इत्यादी ज्या ज्या संतांकडे जात ते आत्मस्फुरणानुसार अथवा गुरुमहाराजांच्या आदेशानुसारच जात आणि त्यांच्यात गुरुमहाराजांचेच दर्शन करीत.''

सापेक्ष रीतीने पाहिल्यास सर्व संतांमध्ये एकाच चैतन्याचा विलास होत असतो. तरीही साधकास लपेटून असणारी आवरणं जोपर्यंत दूर होत नाहीत, तोपर्यंत त्यास आपल्या सद्गुरूंमध्येच सर्वांना सामावून घेण्यासाठी एकाश्रयाची विशेषत्वाने आवश्यकता आहे.

❑ **प्रार्थना :**

दीर्घकाल पुरुषार्थ करून जी कामे साध्य होऊ शकतील ती, अथवा पुरुषार्थानेदेखील अशक्यप्राय वाटणारी कामे — ही सर्व केवळ प्रार्थनेने त्वरित साध्य होऊ शकतात. मात्र खऱ्या

---

१ आपल्याच सद्गुरूंचं चैतन्य या आकारात आहे असा भाव ठेवून गुरुनिष्ठेत स्थिर रहावं.

२ स्वतःस उद्देशून श्रीमोटांचं वक्तव्य

प्रार्थनेची निकड निर्माण होऊन ती आतून जागृत झाली पाहिजे, तरच ती फलीभूत होऊ शकते.

स्वतःच्या हृदयात – हृदयपूर्वक, आणि खऱ्या भावाचा आश्रय करून आर्ततेने आणि आर्द्रतेने – जो 'जीव' प्रार्थनेचं अवलंबन करतो, त्यास ती कधीच निराश करीत नाही.

प्रार्थना करण्याची कला प्राप्त झालेल्या साधकास जीवनात बळ, प्रेरणा, सहानुभूती, धैर्य, हिंमत इ. प्राप्त होतं.

प्रार्थनेच्या एकधारी भावपूर्ण अभ्यासाने कर्मांमधील दोष कमी होत जातात आणि सद्विचारांसाठी प्रेरणा मिळते. प्रार्थनेने सर्वकाही घडू शकतं. प्रार्थना काहीही काम करीत असतांना केली जाऊ शकते.

प्रार्थना हे एक सरळ, सहज आणि उत्तम साधन आहे.

❑ **आत्मनिवेदन :**

आत्मनिवेदनात हृदयातील भावाचं महत्त्व आहे. आत्मनिवेदनामुळे आपलं हृदय भगवंताच्या हृदयाशी जोडलं जातं.

मनार्दीचा मळ धुवून काढण्यासाठी प्रभूंच्या चरणकमली केलं गेलेलं ते निवेदन आहे. त्यातून 'नम्रता' आणि 'शक्ती' प्रगट व्हायला हवी. ज्याचं निवेदन केलं, तशा प्रकारचं कर्म आपल्याकडून परत न होवो याची 'ज्ञानयुक्त जागृती' प्रगट व्हायला हवी, तरच त्या आत्मनिवेदनास अर्थ आहे.

❑ **भजन :** भजन गाऊन जर तसा उत्कट भाव अंतरी निर्माण होत असेल, तरच ते गाण्याचा उपयोग !

❑ **कृपेचं अवतरण :**

जसा ईश्वर निरिच्छ आहे, तसेच महात्मेपण निरिच्छ असतात. त्यांना हालवाल तर हालतील व चालवाल तर चालतील. सूर्यप्रकाशाप्रमाणेच आत्मनिष्ठ संत सर्वांवर कृपा वर्षवीत असतात, पण आपणच जर पडदे लावून झोपी गेलो तर प्रकाश कसा मिळेल ? अहंकार आणि भय सोडून सर्वभावाने प्रभूस शरण जाल, प्रभुसमान महात्म्यांच्या शरणी जाल तर तुम्हांस कृपाप्रसाद निश्चितच प्राप्त होईल.

❑ **साधनेत चित्तशुद्धी अनिवार्य :**

जोपर्यंत कामक्रोधादी रिपु हृदयातून जात नाहीत तोपर्यंत कोणीही साधनेत पुढे जाऊ शकत नाही. जर साधना करू शकत नसाल तर महात्म्यांबरोबर मैत्री ठेवा, सत्संग करा. संतांबरोबर मैत्री ठेवल्याने त्यांचे पवित्र संस्कार आपल्या अंतरी खोलवर होऊन दीर्घ काळानंतर निश्चितच उदय पावतील आणि ते जीवनविकासास मदत करतील.

❑ **मंत्र एकच ठेवा; सातत्य, स्थिरता, भाव महत्त्वाचा :**

वारंवार मंत्र बदलू नका. एकच पक्का धरून ठेवा. जपसंख्येवर जास्त भार देऊ नका. त्यात 'सातत्य' असणं महत्त्वाचं ! हृदयात 'भाव' स्थिर राहून तो अढळपणे प्रगट होणं हे सर्वात महत्त्वाचं !

❑ **नामजप, ध्यान कसे करावे ? मनःशांती कशी मिळेल ? :**

सर्वप्रथम अशांती निर्माण होण्याचं कारण शोधून काढलं पाहिजे. दुसऱ्यांविषयी आपल्यात असलेल्या इच्छा-अनिच्छा, मनातल्या गाठी, आवड-नावड, अपेक्षा यांच्यामुळेच अशांती निर्माण होते. प्राप्त झालेलं कार्य प्रभुप्रित्यर्थ केल्यास अशांती

निर्माण होणार नाही. तरीही अशांती निर्माण झालीच तर प्रार्थना करा, नामस्मरण करा.

व्यापार करायला भांडवल लागतं, तसंच ध्यानासाठी देखील भांडवल आवश्यक आहे. सर्वप्रथम मनाची एकाग्रता प्राप्त करण्यास नामस्मरणाची सवय करा. नामजप एकाच स्थानी, ठराविक वेळी, निश्चित केलेल्या अवधीपर्यंत, नियमित पणे एका आसनावर बसून करा. त्यात एकाग्रता प्राप्त झाल्यानंतर सुरुवातीस एकच विचारावर, मूर्तीवर अथवा स्वतःच्या इष्टगुरूंवर ध्यान केंद्रित करायला हवे. मग हळूहळू शांती प्राप्त होईल.

**❑ भक्तीचा आधार भाव आहे, बुद्धी नव्हे :**

जेव्हा 'भाव' जागृत होतो तेव्हाच खरी भक्ती होते आणि जेव्हा खरी भावपूर्वक भक्ती होते तेव्हा तिचं फळ मिळणारच हे दृढ जाणा.

भक्ती हे हृदयाचं कार्यक्षेत्र आहे, बुद्धीचं नव्हे !

**❑ 'लगनी' निर्माण व्हायला हवी :**

जोपर्यंत ईश्वर प्राप्तीसाठी जिवंत, चैतन्यात्मक उत्कट जिज्ञासा जागृत होत नाही, तोपर्यंत निव्वळ 'शिवोऽहं, शिवोऽहं' करून आणि 'आत्मा–अनात्मा' याचं वाचन करून उपयोग नाही.

आर्द्र प्रबळ भाव, उत्कटता, झोकून देण्याची वृत्ती आणि 'लगनी'* निर्माण होत नाही तोपर्यंत जाणून असा की आपण पुढे गेलो नाही.

कोऱ्या ज्ञानाचा काहीच उपयोग नाही, ते कृतीत आणणं महत्त्वाचं.

---

* लगन, व्याकुळता, अभिप्सा

❑ **स्वतःतील दोष शोधा :**

व्यक्तींच्या भिन्नभिन्न प्रकृतींमुळे आणि संसारव्यवहारमुळे जर संघर्ष निर्माण झाला तर खरा साधक अशावेळी स्वतःतील दोष पाहतो आणि दुसऱ्यांविषयी अंतरी सद्‌भावच ठेवत असतो. त्याच्या हृदयातील सद्‌भाव आणि प्रेम जर अशा संघर्षात विशेषत्वाने जागृत आणि तेजस्वी होत असतील तर सुसंवाद आणि मनोमीलन प्रगट होईलच हे दृढ जाणा !

❑ **अपरा प्रकृतीच्या प्रवृत्तींची निंदणी करा :**

श्रीमोटा म्हणाले आहेत, ''या 'जीवा'स (स्वतःस उद्देशून) अपरा प्रकृतीच्या प्रवृत्ती काही कमी नव्हत्या. प्रभुकृपेने त्या शोधत राही, त्यासाठी सतत प्रार्थनाभावात बुडून राही. जीवभावाच्या वृत्तींना शोधून त्यांची निंदणी करणं आवश्यक आहे.

★ **'निंदणी' म्हणजे काय ? :** निंदणी म्हणजे, 'त्याची निंदा करायची,' एवढेच नसून ते उखडूनदेखील टाकायचं आहे.

★ **'निंदणी' केव्हा होईल :** जेव्हा खेडुतास समजतं की, ''जे सार्थ आहे त्याच्याबरोबर व्यर्थही उगवलं आहे, आणि ते सार्थला उगवू देणारच नाही,'' तेव्हा असं व्यर्थ उगवलेलं तो उखडून फेकून देतो — यालाच 'निंदणी' म्हटलं जातं.

निंदणी करण्याची क्रिया साधकाने जागृतीपूर्वक करणे अत्यावश्यक आहे.

❖

# ४. हरिः ॐ आश्रम

**❑ गुरु महाराजांचा आदेश :**

श्रीमोटांना एकदा गुरुमहाराजांनी आदेश दिला, "तू देशसेवा पुष्कळ केलीस, आता मानवांमध्ये 'गुण' आणि 'भाव' यांचा विकास होईल अशी सेवा कर." गुरुमहाराजांनी श्रीमोटांना दंड (संन्यास) देण्याची इच्छादेखील व्यक्त केली.

**❑ दंड घेण्यास नकार :**

गुरुमहाराज जरी दंड देऊ इच्छित होते तरी श्रीमोटांनी त्यास नकार दिला. ते म्हणाले, "मी संसारात राहणारा आहे; त्यामुळे दंड घेऊन लोकांना खऱ्या मार्गावर नेऊ शकणार नाही, प्रेमानेच त्यांना या रस्त्यावर नेऊ शकेन."

श्रीमोटांनी सांगितले आहे, "लहानपणापासूनच संन्यास घेण्याचा विचार कधीही मनात आला नाही. 'जीवनाचा समग्र स्वीकार' ही धारणा पूर्वीपासूनच अंतरी होती." यामुळेच त्यांनी दंड घेण्यास नकार दिला.

गुरुमहाराजांनी त्यांचं म्हणणं मान्य केलं आणि मौनमंदिरे स्थापन करण्याचा मार्ग दाखविला.

**❑ परतफेड कशी करणार ? :**

आदेश झाल्यानंतर श्रीमोटा प्रथम साबरमती आश्रमातच 'मीरा कुटिर' मध्ये मौनमंदिर चालवत होते. एका खोलीचे गोणपाटाच्या पडद्याने दोन भाग करून एका बाजूस बसण्याची व दुसऱ्या बाजूस मलमूत्र विसर्जनाची व्यवस्था केली होती. तिथे मौनात बसणाऱ्यांची काळजी घेणं, इतकंच नव्हे तर मलमूत्र साफ करणं हे देखील ते स्वतःच करीत.

नंतर हळूहळू स्वजनांकडून त्यांनी आश्रमासाठी निधी गोळा केला. परंतु, "मी त्याची परतफेड कशी करणार ?" या प्रश्नाचे उत्तर अंतरी हृदयातून न मिळाल्याने ते सर्व जमलेले पैसे– जवळजवळ एक लाख रुपये–ज्याचे त्याला परत करून टाकले.

**❑ मी परतफेड करीन :**

एक दिवस कुंभकोणम येथे कावेरी नदीच्या काठी त्यांना सद्गुरूंचा आदेश झाला, "आश्रमास जो कोणी देईल त्याची परतफेड मी करीन, तू आश्रम स्थापन कर."

**❑ आश्रमांची सुरुवात :**

आदेश मिळाल्यावर १९५० मध्ये कुंभकोणम येथेच कावेरी नदीच्या काठी पहिला आश्रम झाला, नंतर नडियादला १९५४ मध्ये सेढी नदीच्या काठी आणि १९५६ मध्ये सुरतला तापी नदीच्या काठी असे तीन आश्रम स्थापन झाले.

**❑ मौनमंदिरांचा हेतु :**

श्रीमोटांनी सांगितलंय, मौनमंदिरांत घालविलेला काळ म्हणजे माझ्या मते या 'जीवा'शी (श्रीमोटांशी) त्या जीवाचं (साधकाचं) जोडलं राहण्याची क्रिया आहे. जर तसं नसतं तर तुमच्यापैकी कोणीच जीव माझ्याबरोबर राहू शकला नसता... प्रत्येक जीवाचा मौन–एकांतातील काळ हा अमूल्य असा काळ आहे."

ते अजून सांगतात, "तेच लोक इथे येतील, ज्यांच्याशी माझं 'निमित्त' आहे. –अर्थात, 'निमित्त' ते, आणि कर्ताकरविता ईश्वर – हाच भाव यातून व्यक्त आहे.

मंदिरातील मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करतात त्याचप्रमाणे श्रीमोटांनी या मौनमंदिरांची प्राणप्रतिष्ठा केली आहे. अर्थात

मौनमंदिरे 'रिकामी' नसून श्रीमोटांच्या चैतन्याने भरलेली आहेत, व त्यांचे दर्शन, वाणी, आदेश, मदत इ.चे अनुभव अद्यापही खऱ्या साधकास येतात.

❑ **मौनमंदिरात काय घडते ? :**

इथे साधकांना त्यांच्या 'अर्धजागृत' आणि 'अजागृत मना'त खोलवर पडून असलेले वेगवेगळ्या दिशांचे प्रवाह; आणि त्याची स्वतःची 'प्रकृती' तसेच 'स्वभाव' यांची जीवनात पहिल्यांदा स्पष्टतेने जाणीव होते, दर्शन होतं.

आतापर्यंत सुप्त असलेले मन, बुद्धी, चित्त, प्राण आणि अहम् यात प्रचंड उलथापालथ होते; यमुनेच्या जलातील कालियास बालकृष्णाने जसे डिचवले होते, तसे !

जप सोळासोळा तासापर्यंतही सुरू रहातो, तरीही शारीरिक श्रम जाणवत नाहीत, थकवा येत नाही.

असा दीर्घकाळचा एकाग्रतेने झालेला 'जपयज्ञ' साधकाच्या सत्त्व जीवकोशावर (म्हणजेच 'आधारा'वर) शिलालेखाप्रमाणे खोल संस्कार निर्माण करतात.

हे संस्कार पुसले जात नाहीत आणि वेळ पक्व झाली की ते उदय होऊन साधकास उर्ध्वगती देतातच देतात !

याशिवाय दिव्य दर्शने, दिव्य ध्वनिश्रवण, प्रकाशदर्शन, भविष्यसूचक चित्रे वा स्वप्ने, श्रीमोटांच्या सूक्ष्म उपस्थितीचा अनुभव (ध्वनी, दर्शन, स्पर्श, प्रत्यक्ष दर्शन) यापैकी काही न् काही आत बसलेल्या साधकास प्राप्त होतात.

भूतकाळातील प्रसंग, विचार, भावनांचे आघात मूर्त स्वरूपात सिनेमाच्या चित्रांप्रमाणे दृश्यमान होतात. त्यातून पश्चात्तापाची पुनित धारा वाहू लागते.

**❑ जीवनविकासासाठी, ईश्वरमय जीवनासाठी मौनमंदिरे :**

"जीवनविकासासाठी म्हणजे ईश्वरमय जीवन जगण्यासाठी मौनमंदिरे आहेत. ज्या 'जीवा'स जीवनाविषयी मनन, चिंतन आणि निदिध्यासन करायचं असेल; ते जीवनात उतरवायचं असेल; मंथन करायचं असेल; स्वतःचा जीवनाविषयी सखोल पृथक्करण करून स्वतःच्या शोध घ्यायचा असेल त्यांच्यासाठीच हे स्थळ आहे." असं श्रीमोटा म्हणाले आहेत.

**❑ "जीवांनी पडून राहू नका !" :**

"मौनमंदिरे पडून राहिली * (रिकामी राहिली) तरी हरकत नाही (आक्षेप नाही); परंतु जीव जर पडून राहतील (निष्क्रिय राहतील) तर मात्र मोटांची खूपखूप हरकत आहे," असा इशारा त्यांनी दिला आहे.

**❑ कोणासाठी मौनमंदिरे ? :**

सर्व धर्मांचे व सर्व जातींचे स्त्री-पुरुष आत बसून आपापली इष्टसाधना करू शकतात, वयाचीही अट नाही. सात वर्षांपासून सत्तर वर्षांपर्यंतच्या व्यक्ती मौनात बसल्या आहेत.

**❑ आत व्यवस्था कशी ?**

आगाऊ नोंदणी करून एक आठवड्याच्या पटीत साधक बसू शकतो. सध्या, केवळ पाच रुपये प्रतीदिन, याप्रमाणे पैसे आधी भरावे लागतात.

आत नियमित वेळी चहा, कॉफी, जेवण मिळते. मात्र जेवण देणारा व घेणारा हे एकमेकांस पाहू शकणार नाहीत अशी व्यवस्था असते. स्नान, शौच इ. क्रियांची व्यवस्था असते. वर्तमानपत्रे, पत्रव्यवहार इ. बाह्यप्रवृत्ती नसतात.

---

*हवड

आत पंखे नाहीत व बाहेरचे पदार्थ खाण्यासाठी नेता येत नाहीत. धार्मिक ग्रंथ घेऊन जाण्याची परवानगी आहे. आत पारायण, अनुष्ठान, जप, स्मरण, प्रार्थना, आत्मनिवेदन, भजने, धार्मिक लिखाण-वाचन इ.चे अवलंबन करून जो तो आपापल्या पद्धतीने साधना करू शकतो.

❑ **आश्रमांचे पत्ते :**

सध्या दोन आश्रम कार्यरत आहेत :

**( १ ) नडियाद आश्रम :** हरिः ॐ आश्रम,
पोस्ट बॉक्स नं. ७४,
नडियाद-३८७००१,
गुजराथ. फोन : ३७७९४

**( २ ) सुरत आश्रम :** हरिः ॐ आश्रम,
कुरूक्षेत्र, जहांगीरपुरा, रांदेर,
सुरत-३९५००५, गुजराथ.

❑ **इतर ठिकाणी अनुकरण :**

श्रीमोटांच्या मौनमंदिरांची प्रेरणा घेऊन अनेक ठिकाणी मौनमंदिरांची स्थापना झाली.

१. फिरोझपूर येथे उत्तरभारतात एका इंग्रजीच्या प्राध्यापकांद्वारे.

२. अहमदाबादजवळ 'सोला' येथे 'श्री भागवत विद्यापीठा'त.

वरील दोन्ही श्रीमोटांच्या प्रेरणेने स्थापन झाली.

३. सौराष्ट्रात सुरेंद्रनगर येथे 'मानव मंदिर ट्रस्ट' द्वारा.

४. नडियादमध्ये 'संतराम मंदिरा'त.

५. अहमदाबादमध्ये 'वाडज' भागात एक रणछोडजींचं

मंदिर आहे, ज्याची वहिवाट स्त्रियाच करतात, तिथे केवळ स्त्रियांसाठीच मौनमंदिर आहे.

६. बनासकांठा जिल्ह्यातील अंबामातेचं शक्तिस्थान असलेल्या अंबाजी येथे पू. हैडाखानवाले बाबांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या 'कैलास आश्रमा'त देखील मौनमंदिर आहे.

७. पालावासणा - महेसाणा येथे 'ओशो कम्युन' द्वारा तीन मौनमंदिरे आहेत, पन्नास रुपये रोज प्रमाणे !

अजून इतरत्रदेखील मौनमंदिरे असण्याची शक्यता आहे.

❖



# ५. अमृतबिंदू

- प्रभुप्राप्तीचा हेतु स्थूल अथवा सूक्ष्म लाभ प्राप्त करणे हा नसावा. प्रभुकरीताच प्रभूस प्राप्त करायचं आहे.
- आधीचं शिकलेलं सर्व विसरावं लागेल.
- स्वत:चे आग्रह, विचार, धारणा, मते इत्यादी दुसऱ्यांवर लादू नका. प्रेमपूर्वक सांगा. प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या रीतीने त्याच्या वातावरणातच स्वतंत्रतेने विकास करू द्या.
- कोणतीही भावना अथवा उर्मी उसळल्यास तिचा नामस्मरणाच्या गतीसाठी उपयोग करून घ्यायला विसरू नका.
- समजपूर्वक, ज्ञानपूर्वक पुढे जायचं आहे, अंधश्रद्धेने नव्हे.
- मनाची दृष्टी, वृत्ती, आणि वळण बहिर्मुख होताच त्याला खडसवा, गोळा करा आणि अंतर्मुख करा. परंतु हे 'चैतन्यपूर्ण जागृती'शिवाय शक्य नाही आणि हे होण्यासाठी प्रखर आणि प्रचंड साधनायुक्त पुरुषार्थ आवश्यक आहे.
- स्वत:तील दुर्बलता, दोष आणि विकृत वळणं हा मोठा अडथळा आहे आणि ते जोपर्यंत सलत नाहीत, तोपर्यंत त्यापासून मुक्त होऊ शकत नाही.
- कर्मांचे संस्कार चित्तावर पडत असतातच आणि पडून रहातात. ते केव्हा वर येतील हें निश्चिततेने सांगता येत नाही.
- साधक चुका तर करणारच, परंतु जर त्यातही तो साधनेची भावना सतत जिवंत ठेवत असेल तर त्याला आपल्या चुका कळतीलच आणि त्यांपासून तो मागे फिरेलच !
- जीवनात संघर्षाच्या वेळीच हृदयमंथन होतं आणि या मंथनातूनच नवनीत प्राप्त करण्याची कला असणं अनिवार्य

आहे. पुरुषार्थी साधकास ते आपोआप सुचतं.

- संसारास सोडून सोडलं जाऊ शकत नाही. संसार आपल्याला चिकटलेला नाहीये, उलट आपणच संसारास चिकटलेलो आहोत, म्हणून केवळ मनाच्या स्थितीलाच पलटवायचं आहे आणि त्याकरीताच साधनेची आवश्यकता आहे.
- प्रत्येक मनुष्यात ईश्वराकडे जाण्याची शक्ती आहे, इतकंच नव्हे तर तो ईश्वरही आपणांस साद घालत असतो, आपणच त्याच्याकडे जात नाही.
- साधना मार्गात सर्वप्रकारे आणि संपूर्णतः भिकारी व्हावं लागेल.
- मनाने जेवढं भटकत राहाल तेवढंच अत्याधिक नुकसान आहे.
- प्रत्येक क्षणी केलं जाणारं कार्य आपल्या अंतरीच्या आध्यात्मिक आणि दैवी चैतन्यास मदतरूप होत आहे की नाही याची काळजी घेणं - याचंच नाव 'जागृती.'
- मनात कोणतीही गोष्ट, अभिप्राय, धारणा, मत इत्यादींशी बांधले जाऊन संग्रह न केला जावो -- हा पण 'अपरिग्रहा'चा एक उत्तम अर्थ आहे.
- आपण स्वतः स्वतःलाच पूर्णतः समजावू शकत नाही, तर मग दुसरं कोणी आपलं —म्हणणं मानेल असा भ्रम असणं ही मूर्खता आहे.
- प्रभूत आपण जेव्हा भावपूर्वक तल्लीन होऊन जाऊ, तेव्हाच संस्कारांचा लय होईल.
- ज्याप्रमाणे लोहचुंबक त्याच्या हद्दीत येणाऱ्या सगळ्या

लोखंडास आपल्या स्वभावानुसार खेचतच असतो, त्याप्रमाणे ईश्वर आपणास खेचायला तयार आहे, परंतु आपल्याला तो खेचू शकेल अशा हद्दीपर्यंत जाणं हे आपल्यावर अवलंबून आहे.

- निःसंग म्हणजे माणसांपासून दूर असे नाही, तर वृत्ती, विचार, भावना, सुख, दुःख इत्यादी कोणत्याही प्रकारच्या भावनेपासून आणि आंतरिक मनादिकरणांच्या प्रवृत्तींपासून अलिप्तता !
- 'बहिर्'मध्ये एक दृष्टी असण्यासाठी 'भक्ती'ची आवश्यकता आहे आणि 'अंतरी' एक होण्यासाठी 'ध्याना'ची आवश्यकता आहे.
- जीवनाचा रस संसारात नाहीये तर अंतरी आहे. व्यक्तीचंच विस्ताररूप म्हणजे संसार होय.
- वृत्ती ही शक्तीस्वरूप आहे, जर ज्ञानभक्तीपूर्वक तिचा उपयोग होत असेल, तर !
- साधनेचं फळ म्हणजे प्रकृती आणि स्वभावाचं रूपांतरण !
- सगळ्यांचं मूळ बीज आपली स्वतःची प्रकृती आहे. दुसऱ्याचे दोष दिसणं किंवा दुसऱ्यास दोष देणं ही आपली पामरता आणि दुर्बलता आहे. आपणास 'जागृत' राहण्यासाठी प्रयत्नशील राहिलं पाहिजे आणि आपले स्वतःचेच दोष दिसले पाहिजेत.
- जोपर्यंत आपल्याकडून होणाऱ्या पुरुषार्थात आपलं हृदय संपूर्णतः ओतलं जात नाही, तोपर्यंत तसा पुरुषार्थ संपूर्णतः फलीत होऊ शकत नाही.
- प्रयत्नांबरोबरच भगवंताच्या कृपेची, मदतीची याचना सतत करायला हवी.

- बुद्धी हे ज्ञानाचं साधन आहे आणि भावना-सहानुभूती हे भावाचं साधन आहे. जीवनविकासाच्या मार्गात बुद्धी आणि भाव दोघांची आवश्यकता आहे.
- मौन-एकांताचा हेतु 'लगनी' निर्माण होणे हा आहे आणि साधनेत विशेष एकाग्रता, केंद्रितता निर्माण होण्यासाठी आहे.
- आपल्यात ज्या ज्या प्रकारचे विचार, वृत्ती आणि वळण उद्भवत असतं त्यावरून आपणास स्वत:च्या कक्षेची जाणीव व्हायला हवी.
- घृणा, दया, लज्जा, भय, शोक, निंदा, कुलाभिमान तथा शील, स्वभाव आणि जातीचा अभिमान हे सर्व एक प्रकारचे संकोच आहेत. त्यापासून मुक्त व्हायलाच हवं !
- सुरुवातीसुरुवातीस दीर्घकाळपर्यंत साधकास स्वप्रयत्न अनिवार्य आहेत. मूर्ख आणि अज्ञानी लोक 'सर्वच गुरु करतील' असं मानून काहीही केल्याविना तमसाच्या प्रेरणेने जसे असतील तसेच पडून राहतात.
- स्वप्रयत्नात अहंकार न येवो याची खबरदारी घेणे.
- साधकाचं महत्त्वाचं एक लक्षण प्रसन्नचित्तता आहे.
- अभ्यास वाढतावाढताच वैराग्य जागृत होणार आहे.
- कोणाचंही हृदय जिंकणं हे संपूर्ण नम्रता प्रगट झाल्याशिवाय घडू शकत नाही.
- खरा स्वीकार तोच, की जेव्हा स्वीकार झाल्यानंतर त्यातून कधीही पाऊल मागे घेतलं जात नाही.
- साधनेत निश्चितता, नियमितता आणि निरंतरता प्रगट केली पाहिजे, असायला पाहिजे.

- नम्रता प्रगटविणे आणि निराग्रही, निरासक्त बनणे अत्यंत आवश्यक आहे.
- स्वधर्माच्या यथार्थ पालनामधूनच विशालता जन्मास येते.
- विशालदृष्टीविहीन साधुता निरर्थक आहे, ती साधुताच नव्हे !
- कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह ठेवून असणं म्हणजे जीवनाच्या विकासात अडथळा निर्माण करणं.
- प्रत्येक संतात्म्याची जीवनसरणी वेगवेगळी असते, एकदुसऱ्याशी तुलना करणं हे अजिबात योग्य नाही.
- कसोटी आणि मंथन जीवनविकासाकरिता अत्यंत महत्त्वाची अंगे आहेत, त्यांच्याविना जीवनाचा खरा कस जाणला, पारखला जाऊ शकत नाही.
- प्रभुमय जीवन म्हणजे प्रथम सात्त्विक जीवनाचा विकास !
- प्रत्येक गोष्टीत तोंड खुपसायची इच्छा होत असेल तर जाणा की तो अहंकार आहे.
- मळकट कपड्यांना रंग बरोबर बसू शकत नाही. कपड्यांना रंगविण्यासाठी प्रथम त्याचा सगळा मळ काढून टाकावा लागतो, त्याचप्रमाणे अंत:करणाच्या आणि आधाराच्या सर्व '-करणां'च्या शुद्धीविषयी जाणा.
- जीवनाच्या समस्यांचा उलगडा बुद्धीच्या निर्णयापेक्षा हृदयातून मिळविण्यासाठी साधकास अधिकाधिक अंतर्मुखता प्राप्त करायला हवी.
- अंतर्मुखता संपूर्णतः प्राप्त केल्याविना बुद्धीत समता प्रगट होऊ शकतच नाही.
- केवळ पुरुषार्थ उपयोगी नाही आणि केवळ कृपापण उपयोगी नाही.

- सद्‌गुरुस आपल्या हृदयात जिवंत करायचं आहे. सद्‌गुरु म्हणजे दिसत असलेली त्यांची शरीराकृती नव्हे, तर त्यांच्या * हृदयात प्रगट असलेली चैतन्यभावना, जिच्या मदतीनेच आपण वर येऊ शकतो.
- हृदयातील खरी नम्रता मेंढ्यांप्रमाणे नसते, त्यात तर अग्नीचं प्रचंड तेज आणि शक्ती भरलेली असते.
- साधकाने स्वतःच्या सवयी, धारणा, समजुती, आग्रह, मत-मतांतरे, दोष, वाईट सवयी, आशा, इच्छा, कामना, तृष्णा, काम, क्रोध, मद, मोह, मत्सर इत्यादींचा स्वीकार करायचा आहे, पण तो स्वीकार त्यांच्या पार होण्यासाठी आहे.
- अनुभवाच्या कथनामागे आत्मविश्वासाचं धगधगतं चैतन्य असतं.
- ज्या जीवात्म्याचा अहम् वितळून गेला आहे त्याला कोठेच विरोध होत नाही, नव्हे त्याच्यासाठी विरोध राहिलेलाच नसतो.
- कर्माचं महत्त्व भावामुळे आहे.
- ज्ञान आचरणात आणल्याशिवाय मोक्ष नाही.
- अमुक संपूर्णतः योग्य आहे आणि सर्वसमर्थ आणि सर्वश्रेष्ठ आहे असं आध्यात्मिक क्षेत्राच्या जीवनात असू शकत नाही.
- आपली या भवाच्या प्रवृत्तींची गती आणि दिशा जशा प्रकारची असेल, तशा प्रकारचा आपला पुनर्जन्म होतो.
- जसं लवणविहीन भोजन, तशीच भावविहीन साधना !
- गुरु करून जर जीवनाचा विकास साधू शकलो नाही तर तसा गुरु करणं केवळ व्यर्थच होय.

---

*सद्‌गुरूंच्या

- चर्चेने मताग्रह वाढतो, आणि अहम्‌देखील !
- 'लगनी'* असल्याशिवाय रस उत्पन्न होऊ शकत नाही आणि रस नसल्यास मन स्थिर होऊ शकत नाही.
- सर्व प्रकारच्या संकोचास आणि लज्जेस साधकाने दूरदूर फेकून दिलं पाहिजे, मात्र त्याच्या हेतूचं ज्ञानभान ठेवूनच !
- चूक झाल्यानंतर त्याची आणि चिंता करीत राहणं हे तर अजून वाईट आहे. हे तर उलट अंधारात टक्करा देण्यासारखं आहे.
- जो जीव जागृत रहात असतो, तो पडला तरी उभा राहणारच आहे.
- जीवनास सर्वतोमुखी (विशाल) बनवायचं आहे, न की विहिरीतल्या बेडकाप्रमाणे !
- नकारात्मक स्थितीची जाणीव झाल्यानंतरही त्यातच वाहत राहणं ही तर निव्वळ पामरता आहे.
- सद्‌गुरूंप्रती हृदयपूर्वक प्रेमभक्ती हृदयांतरी प्रगट झाल्याविना सद्‌गुरुदेखील आपल्यात जीवनविकासाच्या भावनेचं बीज पेरू शकत नाहीत.
- फुकट काही असतं हे मी मानीत नाही. ज्याची त्याची किंमत द्यावीच लागते. जीवनात अथवा जगतात अथवा व्यवहारात काहीही उगाचच्या उगाच मिळत नाही.
- आत्मनिवेदन म्हणजे स्वतःला चैतन्याच्या भावाशी जोडून देणारी दिव्य शृंखला.
- कोणी अन्याय केला असेल तर त्याचं स्मरणदेखील राहू नये, इतकंच नव्हे तर त्याच्यावर उपकार करण्याची भावना प्रत्यक्ष जिवंत रहावी याकडे साधकाने लक्ष असू द्यावं.
- जो 'जीव' दुःखात सुख पाहातो आणि सुखात दुःख

* लगन, व्याकुळता, अभिप्सा

जोडलं गेलेलं पाहातो तो ‘जीव’ या दोघांपासून अलिप्त राहू शकतो.

- सूक्ष्मभावाने पाहिल्यास गुरुचं सामिप्य आणि दूरत्व (अंतर) असतच नाही, कारण गुरु तर भावरूप आहे.
- कोणी आपले दोष दाखविल्यास त्यास खरा गुरु माना. अशावेळी हृदयात भाव प्रगट झाल्यास तो खरा साधक आहे.
- जोपर्यंत आशा, तृष्णा, काम, क्रोध, मद, मोह, लोभ, मत्सर, कामना, रागद्वेष, अहंकार इत्यादींना काढून टाकण्याची अथवा त्यांस क्षीण करण्याची व्याकुळतापूर्वक समज अंतरी निर्माण झाली नाही, तोपर्यंत अशा ‘जीवा’स साक्षात परमेश्वरदेखील उच्चगती देण्यास समर्थ नाही.
- आपणांस दुसरा कशाचाच सामना करायचा नाहीये, सामना जो करायचा आहे तो केवळ अंतरी असलेल्या आंतरिक वृत्तींचा.
- ज्ञानभक्तीपूर्वक आत्यंतिक संपूर्ण आत्मसमर्पण झालं नाही, तोपर्यंत आपल्या स्वतःच्या वैयक्तिक पुरुषार्थाची खूप आवश्यकता आहे.
- सद्‌गुरूंची खरी ओळख बाह्य स्तरावर कधीच होऊ शकत नाही. ती तर, नंतर अंतरी, ‘ अंतर्मुखतेतच’ होत जाते. असा प्रगट झालेला अनुभव हाच खरा अनुभव होय.
- गरीबांवर ‘दया’ करू नका. दया करणारे आपण कोण ? तो दया मागत नाही, तो मागतो ‘न्याय’ ! देत असल्यास तो द्या. दयेच्या भावनेत सूक्ष्म अहंकार लपून आहे.
- दुःख स्वतःस समजून घेण्यासाठी योग्य आरसा आहे.
- जीव आणि प्रकृतीचा, चैतन्यात ज्ञानपूर्वक लय प्राप्त होणं, याचंच नाव ‘मरून जन्मणे’ !

- इच्छाशक्तीचं बळ हे वृत्ती, विचार अथवा वासनेपेक्षा कितीतरी पटीने अधिक आहे.
- आपणास प्राप्त झालेलं जग, शरीर, मातापिता, नातेवाईक, भाईबंद, पती–पत्नी, मिळकत, संयोग, परिस्थिती आणि या सर्वांशिवाय, हे जीवनसुद्धा केवळ साधनेच्या उपयोगासाठीच प्राप्त झालं आहे.
- जगत मिथ्या नाही, असत्य नाही; परंतु जगास पाहण्याची आपली दृष्टी असत्य आहे. जेव्हा आपण भावनामय होऊन जातो, तेव्हा जग हे 'जग' राहात नाही; 'भगवंताचं व्यक्त स्वरूप' अशाप्रकारे ते आपल्याला दिसतं.
- ज्ञानाचा खरा अर्थ केवळ समज नव्हे, तर तशा प्रकारचं जीवन !
- प्रार्थनादेखील एक प्रकारचं ध्यान आहे. प्रार्थना साकार आहे, ध्यान निराकार आहे.
- दोषांचा वारंवार विचार करू नका. त्यापेक्षा भगवंताच्या भक्तीत मन गुंतून राहणं अधिक उत्तम आहे.
- शून्यता हे नम्रतेचं अंतिम माप आहे. शून्यता म्हणजे अहंकाराचा संपूर्ण नाश.
- अहंकार कधीकधी नम्रतेचं सोंग सजून येतो.
- आपला हा स्वभावच झाला आहे की जो आपलं मत मानीत नाही, त्यास आपण विरोधी मानतो. हे असहिष्णुतेचंच रूप आहे.
- सत्कर्माचा बदला सत्कर्मच देतं, त्यात अपेक्षेस स्थान नाही.

– **पूज्य श्रीमोटा**

❖

## ६. साधनामर्म

(१) मुखाने अथवा मनात जागृतीपूर्वक 'जप'; त्याचबरोबर हृदयप्रदेशी 'ध्यान' आणि चैतन्याच्या चिंतनासह भावात्मक 'भावाचं रटण'.

(२) प्रत्येकक्षणी सतत समर्पण – चांगलं तसंच वाईट, दोघांचं.

(३) साक्षीभाव , जागृती; विचारांची साखळी निर्माण होऊ देऊ नका.

(४) जमेल तेवढं जास्तीत जास्त वाचिक आणि मानसिक मौन पाळा, प्राप्त करा; आणि खूपखूप शरणभाव जीवनात चैतन्यपूर्ण जागृतीने प्राप्त करा.

(५) प्रभुचिंतनाशिवाय इतर सर्व आग्रह सोडा; नम्रता प्राप्त करा; शून्य होण्याचं ध्येय ठेवा.

(६) खूप भावपूर्वक हृदयस्थ राहून आर्द्र आणि आर्तभावाने प्रार्थना करा; भगवंतास सर्व सुख–दुःखे सांगत रहा; त्याच्याबरोबर आत्मनिवेदनाद्वारा व्यक्तिगत घनिष्ठ संबंध प्रस्थापित करा; मनात काहीही घोळू देऊ नका, ते रिकामं राहू द्या.

(७) प्राप्त झालेली कर्मे प्रभूची समजा; थोडीसुद्धा कुरकूर न करता ती खूप प्रेमपूर्वक करा. प्रत्येक प्रसंग, घटना आपल्या कल्याणार्थच आहे आणि प्रत्येक प्रवृत्ती आपल्या स्वतःच्याच विकासार्थ अशीच होईल याची दक्षता घ्या. प्रत्येक प्रसंगामागे प्रभूंचा गूढ, शुभ संकेतच असतो.

(८) आत्मलक्षी–अंतर्मुखी व्हा, फक्त स्वतःच्याच दुनियेत रहा. जाणूनबुजून निष्कारण स्वतःला कशात गुंतवून घेऊ नका.

(९) पर (परक्याची) सेवा प्रभूची सेवा माना; सेवा घेणारा सेवा देणाऱ्यावर सेवा करण्याची संधी देऊन उपकार

करतो. रामाने दिलं आहे आणि रामास देतो आहे, तिथे 'माझं माझं' राहिलं कोठे ? तुझं या जगात आहे तरी काय ?

(१०) प्रत्येक कार्य, प्रत्येक बोलणं-चालणं, व्यवहार आपल्या स्वतःच्या ध्येयास गती देईल अशा हेतूसाठी, हेतूंचं उद्दीष्ट जिवंत ठेवून करा. लिहिता-वाचतांना आणि प्रत्येक कर्म करतांना क्षणोक्षणी भावाच्या स्मरणधारेचा अभ्यास प्राप्त करा.

(११) वृत्तींचं मूळ शोधा, तिचं पृथःक्करण करा. तिच्यात वाहून न जाता तिचं तटस्थतापूर्वक आणि स्वस्थतापूर्वक अवलोकन करा.

(१२) प्रभूची प्रत्येक कला, सौंदर्य, रम्यता, विशुद्धता आदी प्रसादांमध्ये असलेल्या भावाचं त्यास त्यास अनुरूप भावाचं, तेव्हा अवतरण होण्यासाठी प्रार्थना करा.

(१३) उर्मी, आवेश, भावना तशीच वाहून जाऊ देऊ नका; तिच्यात वाहूनही जाऊ नका. तिच्या साधनेत उपयोग करा; तटस्थता प्राप्त करा.

(१४) जेवतांना, पाणी पितांना जीवनात चैतन्यशक्तीच्या अवतरणभावाची प्रार्थना करा; मलमूत्रादी क्रिया करतेवेळी विकार, दुर्बलता इत्यादींच्या विसर्जनभावाची प्रार्थना करा.

(१५) स्थूलाच्या विचारांचा त्याग करून सूक्ष्म तत्त्वाकडे दृष्टी ठेवा. वृत्तीची शुद्धी करा. भावाची वृद्धी करा.

(१६) प्रभु सचराचर आहे. 'आत्मवत् सर्वभूतेषु'ची भावना प्राप्त करा.

(१७) प्रत्येक व्यक्ती आणि वस्तूची उजळ बाजू बघा. कोणाच्याही आहारी जाऊ नका; कशावरही त्वरीत अभिप्राय

देऊ नका; वादविवाद करू नका; स्वतःचा आग्रह ठेवू नका; दुसऱ्यांमध्ये शुभ हेतूंचं आरोपण करा; जीवनात मानसिक आणि सार्वत्रिक उदारता प्रगट होऊ द्या; खूप प्रेमभाव प्राप्त करा; प्रकृतीचं रूपांतरण करायचं आहे ते लक्षात ठेवून प्रकृतीस आधीन न होता तिचे अतिक्रमण करण्यासाठीच कर्म करा; फळाची आसक्ती सोडा; स्वतःवर होणारे अन्याय, येणारी दुःखं आदींचं मूळ स्वतःच आहे हे दृढ करा; गुरूंमध्ये प्रेमभक्तीभाव दृढतर करीत रहा; अभिप्सा, नकार आणि समर्पणाचा त्रिवेणी संगम उद्‌भवू द्या; सदैव प्रसन्नता असू द्या; कृपा आणि पुरुषार्थाच्या द्वयीला जीवनात उतरू द्या; प्रत्येक कर्माच्या सुरूवातीस, मध्ये आणि शेवटी प्रभूंची स्मृती प्रगट होऊ द्या; मन निःस्पंद करा; रागद्वेष निर्मूळ करण्यासाठी जागृती ठेवा; झालेले आध्यात्मिक अनुभव प्रत्यक्ष रोजच्या व्यवहारात जिवंत करा; कोठेही कशापासूनही पळून जाऊ नका; यदृच्छेने जे काही प्राप्त होईल तो प्रभुप्रसाद मानून त्यास स्वीकारा; कोठेही कोणाशीही तुलना करू नका; अनुकूल–प्रतिकूल परिस्थिती हा मनाचा भ्रम आहे; जीवनसाधना करणाऱ्यास सर्व काही सानुकूलच असतं; आता प्रभुमय–'त्याचं मूक यंत्र'–व्हायचीच एकमेव उत्तेजना जीवनात ठेवा.

(१८) कर्मात कर्माचं महत्त्व नाही, तर जीवनाच्या भावाचं सतत एकधारी, जिवंत चिंतन टिकून राहाणं हे सविशेषतेने महत्त्वाचं आहे. कर्म करतांना प्रत्येकक्षणी तसा जिवंत अभ्यास प्राप्त करा.

– **पूज्य श्रीमोटा**

❖

## ७. "ॐ शरण चरण लेजो " — आरती

### पूज्य श्रीमोटा रचित आरतीचा भावार्थ :

ॐ कार रूप हे प्रभु ! मी तुला शरण आलो आहे, मला तुझ्या चरणी घे; मी पतित तुझ्या दारी आलो आहे, माझा उद्धार कर, मला वाचव; मला तुझ्या हातांनी उचलून आपल्या हृदयाशी घट्ट धर. ॥ध्रु.॥

हे प्रभु ! माझ्या मनात आणि वाणीत भाव निर्माण होऊन, तो भाव माझ्या कर्मांमध्ये प्रगट होऊ दे; आणि माझे मन, वाणी आणि हृदय – तिन्ही तुझ्या कृपेने एक कर.

ॐ शरण... (१)

हे प्रभु ! मला भेटणाऱ्या प्रत्येकाबद्दल माझ्या हृदयात सद्‌भावच उत्पन्न होऊ दे; आणि जिथे (ज्यांच्याकडून) अपमान झाला असेल, तिथेही (त्यांच्याबद्दलही) माझ्या अंतरी भावाचीच वृद्धी होऊ दे.

ॐ शरण... (२)

माझ्यातील निम्न प्रकारच्या वृत्तींचं उर्ध्वगमन करण्यासाठी, हे प्रभु, तुझ्या कृपाशक्तीच्या बळावरच मी पुरुषार्थ करून – त्याद्वारे तुझ्या चरणी शरणागती स्वीकारू शकेन, असं कर.

ॐ शरण... (३)

हे प्रभु ! माझ्या मनातील सर्व विकार, प्राणातील वाहणाऱ्या वृत्ती आणि बुद्धीत निर्माण होणाऱ्या सर्व शंका तुझ्या चरणकमली गळून पडोत, असं कर.

ॐ शरण... (४)

हे प्रभु ! मी 'जसा आहे तसा स्वतः स्वतःस पाहण्यासाठी, स्पष्टतेने पारखण्यासाठी', माझी बुद्धी मोकळी (रिक्त) कर.

ॐ शरण... (५)

हे प्रभु ! माझ्या हृदयात तू जो चैतन्यरूपाने भरलेला आहेस, त्याच्या प्राप्तीसाठी जीवनात आचरण व्हावं, व त्याच्याऐवजी चैतन्यापासून दूर नेणारं–निम्नगामी असं आचरण माझ्याकडून होऊ नये, अशी बुद्धी तू मला दे.

ॐ शरण... (६)

हे प्रभु ! जिथेजिथे 'गुण' आणि 'भाव' आहेत, तिथेतिथे माझं हृदय स्थिर होऊ दे; आणि त्या गुणाबद्दल आणि त्या भावांबद्दल माझ्या हृदयात भक्तीचा संचार होऊ दे.

ॐ शरण... (७)

हे प्रभु ! तुझ्याबद्दल उत्पन्न झालेल्या 'भावा'मध्ये माझं मन, बुद्धी आणि प्राण हे सर्व विरघळून जाऊ दे आणि हृदयात तुझ्याच भक्तीच्या लाटा उसळू दे.

ॐ शरण... (८)

❀

ही भावपूर्ण प्रार्थनारूप आरती पूज्य श्रीमोटांच्या प्रत्येक भक्तास, आप्तजनास पूर्णतः परिचित आहे. बऱ्याच व्यक्तींना ती कंठस्थ आहे.

हरिः ॐ आश्रमात–मौनमंदिरात प्रवेश करण्यापूर्वी सामुहीक प्रार्थना करून, 'हरिने भजता हजी कोईनी लाज जता नथी जाणी रे' हे भजन म्हणून शेवटी ही आरती म्हटली जाते व नंतरच प्रत्येकजण मौनात प्रवेश करतो.

रोज सकाळी सहा वाजता ही आरती सर्व मौनमंदिरातील प्रत्येक खोलीत ऐकविली जाते.

❖

# ८. सेवाकार्ये व दानगंगा-यादी

**हरिः ॐ आश्रमाद्वारे लोककल्याणार्थ सुरुअसलेली कार्ये :**

ही सर्व कार्ये धर्म, संप्रदाय, जातपात यांचा भेदभाव न करता सुरू आहेत.

- ❑ भिन्नभिन्न क्षेत्रात उत्कृष्ठ संशोधनासाठी, मुद्दल कायम ठेवून वार्षिक व्याजातून, दरवर्षी पारितोषिकांसाठी.
- ❑ संस्कारपोषक आणि 'गुण' व 'भाव' विकासक साहित्य, जीवनचरित्रे, विज्ञानविषयक, तत्त्वज्ञान इ.च्या प्रकाशनकार्यासाठी.
- ❑ समुद्र आणि जलतरण स्पर्धांसाठी, होडी स्पर्धा, तरणतलाव करणे आदींसाठी — मुद्दलाच्या व्याजातून.
- ❑ विद्यार्थ्यांसाठी पर्यटन; पायी प्रवास; सायकलींग, पळणे, यांच्या शर्यती; व्यायाम, बोटींग, पर्वतारोहण, धाडसी खेळ इ. विद्यार्थी जीवनात विकासासाठी.
- ❑ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी, गुणांसाठी, हितासाठी.
- ❑ विविध क्षेत्रात समाजोपयोगी कार्यांसाठी

❀

## प्राथमिक शाळांसाठी खोल्या :

हरिः ॐ आश्रमातर्फे लहानलहान गावात प्राथमिक शाळेच्या एकएक खोलीसाठी लोकनिधीरूपाने ३१ मार्च १९९५ पर्यंत दिलेल्या दानांचे आकडे :

एकूण जिल्हे : १८ पेक्षा अधिक

नावे : अहमदाबाद, अमरेली, कच्छ, खेडा, गांधीनगर, जुनागड, जामनगर, पंचमहाल, बनासकांठा, भरुच, भावनगर, महेसाणा,

राजकोट, बडोदा, बलसाड, सुरत, साबरकांठा, सुरेंद्रनगर.

एकूण खोल्या : ८७३२

वापरली गेलेली रक्कम : रु. ३,९५,७९,७०६/-

एकूण रु. तीन कोटी, पंच्चाणणव लाख, एकोणऐंशी हजार, सातशे सहा फक्त.

❀

**दि. ३१ मार्च, १९९५ पर्यंत हरिः ॐ आश्रमातर्फे गुजराथला अर्पण केलेल्या रकमेचा तपशील खालीलप्रमाणे :**

| | | |
|---|---|---|
| १. | हरिः ॐ आश्रमाच्या सुरुवातीपासून १९७५ पर्यंत | रु. ८३,६३,५९८/- |
| २. | गुजराथच्या १८ जिल्ह्यात प्राथमिक शाळांच्या खोल्या : ८७५२ | रु. ३,९५,७९,७०६/- |
| ३. | अन्य ग्रामीण शैक्षणिक संस्थाची छात्रालये, विद्यालये यासाठी | रु. ४,२५,२१,१०३/- |
| ४. | दुष्काळ आणि अतिवृष्टीच्या वेळी मदत कार्यासाठी | रु. ४३,२३,४१७/- |
| | एकूण | रु. ९,४७,८७,८२४/- |

(एकूण रुपये नऊ कोटी, सत्तेचाळीस लाख, सत्त्याऐंशी हजार, आठशे चोवीस फक्त.)

❖

# ९. पूज्य श्रीमोटांच्या जीवनातील महत्त्वाच्या तारखा

ता. ४ सप्टेंबर १८९८ : पूज्य श्रीमोटांचा जन्म
जन्मस्थळ : सावली, जि. बडोदा, नाव : चुनीलाल.
माता–सूरजबां, पिता–आशाराम भगत *

१९१६ : पित्याचा स्वर्गवास.

१९०५ ते १९१८ : तुटकतुटक अभ्यास व खडतर मजुरी.

१९१९ : मॅट्रिक पास.

१९१९–२० : बडोदा कॉलेजात.

१९२१ : ६ एप्रिल — कॉलेज त्याग.

१९२१ : गुजराथ विद्यापीठात प्रवेश, विद्यापीठाचा त्याग, हरिजन सेवेचा आरंभ.

१९२२ : फिट्सच्या रोगास कंटाळून गरुडेश्वरजवळ नर्मदेत आत्महत्येचा प्रयत्न; दैवी बचाव, 'हरिः ॐ' जपाने रोग बरा करण्याचा सफल प्रयत्न.

१९२३ : 'तुज चरणे' आणि 'मन ने'ची रचना; वसंतपंचमीस पू. बालयोगीजींद्वारा दीक्षा. धुनीवाले दादांच्या – श्री केशवानंदजींच्या दर्शनास 'सांईखेडा' येथे गेले; रात्री स्मशानात साधना आणि दिवसभर प्रभूप्रीत्यर्थ हरिजन सेवा.

---

* आडनाव भावसार असले तरी वडिलांच्या, आजोबांच्या भजनानंदी स्वभावामुळे भगत हेच आडनाव रूढ झाले.

१९२६ : लग्न-हस्तमिलाप समयी भावसमाधी.

१९२७ : हरिजन आश्रम-बोदाल येथे सर्पदंश, परिणामस्वरूप 'हरिः ॐ' जप अखंड झाला.

१९२८ : साकोरीचे पू. उपासनीबाबा यांचे नडियादमध्ये आगमन. त्यांच्या आदेशानुसार साकोरीस जाणं- तिथे मलमूत्राच्या बिछान्यात सात दिवस, देहशुद्धी, समाधी.

१९२९ : प्रथम हिमालय यात्रा.

१९३० : मनाच्या नीरवतेचा साक्षात्कार.

१९३० पासून १९३२ पर्यंत : साबरमती, विसापूर, नाशिक, येरवडा, खेडा सबजेल मध्ये. हेतु-देशसेवेचा नाही, साधनेचा ! कठीण परिश्रम आणि लाठीमारा दरम्यान प्रभुस्मरण-मौन. विद्यार्थ्यांना समजाविण्यास विसापूर जेलमध्ये सरळ भाषेत श्रीमद्‌भगवतगीतेचं विवरण लिहिलं-'जीवनगीता'

१९३४ : सगुण ब्रह्माचा साक्षात्कार.

१९३४ ते १९३९ दरम्यान : हिमालयात अघोरी बाबांकडे जाणं; 'धुवांधार' या धबधब्यामागील गुहेत साधना; चैत्र महिन्यात शेणीच्या गोवऱ्यांच्या त्रेसष्ट धुन्यांमध्ये नर्मदाकिनारी तप्त शिलांवर नग्न बसून उघड्यावर साधना; शिर्डीच्या साईबाबांचं प्रत्यक्ष दर्शन-आदेश- साधनेच्या अंतिम टप्प्याचं मार्गदर्शन.

१९३९ : २९ मार्च, १९३९–रामनवमी–संवत १९९५ ला काशीत निर्गुण ब्रह्माचा साक्षात्कार; 'हरिजन सेवक संघा'चा राजीनामा.

१९३९ ते १९७६ : साधकांना व्यक्तिगत मार्गदर्शन.

१९४० : विमानमार्गे अहमदाबादहून कराचीस जाण्याचा गूढ हुकूम.

१९४१ : सूरजबाँचा स्वर्गवास.

१९४२ : 'हरिजन सेवक संघा'पासून विभक्त होते तरीही 'हरिजन कन्या छात्रालया'साठी मुंबईत निधी जमविला. दोनदा पाशवी पोलिसी मारपीट–देहातीत अवस्थेचा पुरावा.

१९४३ : फेब्रुवारीत गांधीजींच्या लघ्वीतील विषारी जंतूंचं स्वतःच्या लघ्वीत दर्शन–नैमित्तिक तादात्म्याचा अनुभव.

१९४५ : हिमालयाची तिसरी यात्रा–अनेक अद्‌भुत अनुभव.

१९४६ : हरिजन आश्रम, अहमदाबाद मीराकुटीरमध्ये मौन एकांताचा आरंभ.

१९५० : दक्षिण भारतात कुंभकोणम येथे कावेरी नदीकिनारी हरिः ॐ आश्रमाची स्थापना (१९७६ मध्ये हा आश्रम बंद केला.)

१९५४ पासून सुरतला कुरुक्षेत्र- येथे एका खोलीत मौन–एकांताचा आरंभ.

१९५५ : नडियादला सेढी नदीच्या किनारी हरिः ॐ आश्रमाची स्थापना.

१९५६ : सुरतला कुरुक्षेत्र येथे हरिः ॐ आश्रमाची स्थापना.

१९६२ पासून हरिः ॐ आश्रमाद्वारा लोककल्याणाच्या कार्यांचा आरंभ.

१९६४ : निधीनिमित्ताने उत्सव साजरे करू देण्यास संमती.

१९६८ ते १९७५ : शरीरात अनेक रोग–सतत प्रवास आणि त्याचबरोबर छत्तीस आध्यात्मिक अनुभवांच्या ग्रंथांचे लेखन–प्रकाशन.

१९७६ : फाजलपुर–मही नदीच्या किनारी श्री. रमणभाई अमीन यांच्या फार्म हाऊसमध्ये ता. २३ जुलै, १९७६ रोजी केवळ सहा जणांच्या उपस्थितीत आनंदपूर्वक देहत्याग, स्वतःचं विटाचुन्याचं स्मारक न करण्याचा आदेश आणि यानिमित्त मिळालेल्या रकमेचा उपयोग गुजराथच्या अंतर्भागातील मागासलेल्या गावांमध्ये प्राथमिक शाळांच्या खोल्या बांधण्यासाठी लोकनिधीत देण्याची सूचना.

चार उत्सव दिन : (१) जन्मदिन
(२) दीक्षादिन
(३) साक्षात्कारदिन
(४) गुरुपौर्णिमा.

❖

॥ हरिः ॐ ॥

१९५५ : नडियादला सेढी नदीच्या किनारी हरिः ॐ आश्रमाची स्थापना.

१९५६ : सुरतला कुरुक्षेत्र येथे हरिः ॐ आश्रमाची स्थापना.

१९६२ पासून हरिः ॐ आश्रमाद्वारा लोककल्याणाच्या कार्यांचा आरंभ.

१९६४ : निधीनिमित्ताने उत्सव साजरे करू देण्यास संमती.

१९६८ ते १९७५ : शरीरात अनेक रोग–सतत प्रवास आणि त्याचबरोबर छत्तीस आध्यात्मिक अनुभवांच्या ग्रंथांचे लेखन–प्रकाशन.

१९७६ : फाजलपुर–मही नदीच्या किनारी श्री. रमणभाई अमीन यांच्या फार्म हाऊसमध्ये ता. २३ जुलै, १९७६ रोजी केवळ सहा जणांच्या उपस्थितीत आनंदपूर्वक देहत्याग, स्वतःचं विटाचुन्याचं स्मारक न करण्याचा आदेश आणि यानिमित्त मिळालेल्या रकमेचा उपयोग गुजराथच्या अंतर्भागातील मागासलेल्या गावांमध्ये प्राथमिक शाळांच्या खोल्या बांधण्यासाठी लोकनिधीत देण्याची सूचना.

चार उत्सव दिन : (१) जन्मदिन
(२) दीक्षादिन
(३) साक्षात्कारदिन
(४) गुरुपौर्णिमा.

❖

॥ हरिः ॐ ॥

॥ हरिः ॐ ॥

एक 'जीव',

होता ज्याकडे गरीबीचा वारसा,
कर्मप्रवणता व अथक परिश्रम,
जीवनसाधना आणि प्रचंड पुरुषार्थ,
सद्गुरुंच्या आदेशाने, शिवप्राप्तीनंतर
ज्याने 'मौनमंदिरे' उभारली आणि
समाजास साडे नऊ कोटी रुपये* दान दिले,
समाजात 'गुण' आणि 'भाव'
यांचा ज्याने विकास केला,
**'मला समाजास बसतं करायचं आहे'**
हे ज्याचं स्वप्न होतं
अशा
गुजराथ भूमीत जन्मलेल्या, आणि
**'मी सर्वत्र विद्यमान आहे'** ही घोषणा करून
'इच्छामरण' स्वीकारलेल्या
एका निष्काम कर्मयोग्याचं

**श्रीमोटांचं**

हे **जीवनचरित्र**

आपणांस निमंत्रण देत आहे
रसास्वादन करण्यास, अनुभव घेण्यास !

---

* ३१ मार्च, १९९५ पर्यंत